UNIVERSAL
LIBRARY
OU_192039
UNIVERSAL
LIBRARY

॥ श्री ॥

# पहिलें महायुद्ध

१९१४-१८

## ( भाग ४-६ वा )

लेखक

श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

मुद्रक व प्रकाशक

श्री. यशवंत कृष्ण खाडिलकर

श्रीदत्तात्रय प्रिंटिंग प्रेस, १३ शेणवीवाडी मुंबई न. ४

( आवृत्ति पहिली )

सन १९४०

किंमत २ रुपये

# प्रस्तावना.

ती. कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांनीं १९१४–१८ च्या महायुद्धाच्यावेळी चित्रमय–जगत्‌मध्यें लिहिलेले लेख ग्रंथरूपानें प्रसिद्ध करण्याचा संकल्प ४–५ वा भाग प्रसिद्ध होऊन सिद्धीस जात आहे ह्याबद्दल समाधान वाटत आहे. चवथ्या आणि पांचव्या भागाचा अंतर्भाव एकाच पुस्तकांत केला तरी पुस्तकाचा आटोपशीरपणा कायम रहातो असे दिसून आल्यामुळे, पांचवा भाग स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध न करितां चवथा आणि पांचवा भाग एकत्रच प्रसिद्ध करण्यांत येत आहे. महायुद्धाच्या चवथ्या वर्षांतील सर्व लेख चवथ्या भागांत आणि पांचव्या वर्षांतील युद्धतहकुबीपर्यंतचे लेख त्याचप्रमाणें युद्धतहकुबीच्या वेळची परिस्थिति लक्षांत यावी म्हणून आक्टोबर–नोव्हेंबर व नोव्हेंबर–डिसेंबर ह्या महिन्यांचे लेख पांचव्या भागांत देण्यांत आले आहेत. त्यानंतर व्हर्सायचा तह १९१९ च्या जून महिन्यांत झाला. त्यावेळची परिस्थिति लक्षांत येण्याच्या दृष्टीनें नोव्हेंबर डिसेंबरच्या लेखानंतर मडुक कलुंगित करून पांचव्या वर्षाचा जून महिन्याचा लेख दिला आहे. व्हर्सायच्या तहाची कलमें काय होतीं हें वाचकांना सुसंगत कळावें म्हणून व्हर्सायचा तह ह्या मथळ्याखालील लेख स्वतंत्र ह्या पुस्तकासाठी तयार करून दिलेला आहे. युद्धविषयक विवेचन वाचकाच्या लक्षांत यावें म्हणून मागील भागाप्रमाणें याहि भागांत तीन नकाशे देण्यांत आले आहेत.

पहिले महायुद्ध हा ग्रंथ संपूर्ण प्रसिद्ध होण्याच्या बाबतींत ज्यांचे सहकार्य झालें त्यांचे आभार ह्या ठिकाणीं मानणें उचित आहे. चित्रशाळा छापखान्यानें जरूर त्या चित्रमय–जगत्‌च्या फाइली आस्थेपणानें पुरविल्या त्याचप्रमाणें मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयानें आपल्या फाइली ह्या कामासाठीं उपलब्ध करून दिल्या. ह्याबद्दल चित्रशाळा छापखाना आणि मुंबई ग्रंथसंग्रहालय यांचे आभार मानीत आहे. त्याचप्रमाणें व्हर्सायचा तह ह्या मथळ्याखालील लेख निरनिराळे संदर्भग्रंथ पाहून नवाकाळचे उपसंपादक श्री. गो. बा. महाशब्दे यांनीं तयार करून दिला ह्याबद्दल त्यांचेहि आभार मानीत आहे.

नवाकाळ कचेरी, मुंबई.
ता. २१–१०–४०

प्रकाशक

॥ श्री ॥

# पहिलें महायुद्ध

( भाग ४ था )

## महायुद्धाचा चवथ्या वर्षाचा आगस्ट–सप्टेंबर महिना

जुलई महिन्याप्रमाणें आगस्ट महिनाहि रशियन सरकारच्या दृष्टीने बराच काळजीचा गेला; आणि सप्टेंबरच्या प्रारभाला जर्मनीने रिगा पेट्रोग्राडवरील आपली मोहीम सुरू करून रिगा बंदर व रिगा प्रात काबीज केल्यामुळे डिसेंबरपर्यंत रशियाचे काळजीचें ग्रहण सुटत नाही अशीं चिन्हे दिसू लागलीं ! गॅलीशिया, ब्युकोव्हिना व रोमानिया येथील आस्ट्रो–जर्मनाच्या चढाईला आगस्टच्या दुसऱ्या पंधरवड्यात बरीचशी मदता प्राप्त झाली, व रशियाचे काळजीचे दिवस सपत आले अशीहि आशा वाटू लागली, पण रिगा–पेट्रोग्राडवरील मोहिमेने ती आशा नष्ट केली. रिगा–पेट्रोग्राडवरील चढाईकडे वळण्यापूर्वी गॅलिशियाच्या बाजूची जर्मनीची चढाई मदावली कशी, याचा प्रथम विचार करू.

आगस्टच्या पहिल्या आठवड्यात जर्मनीने सर्व गॅलिशिया प्रांत घेतला, व गॅलिशियाच्या पूर्वेकडील प्रातातहि काहीं ठिकाणी प्रवेश केला. दुसऱ्या आठवड्यात सर्व ब्युकोव्हिना प्रात घेऊन ब्युकोव्हिनाच्या पूर्वेकडील बेसारेबिया प्रांतांतहि जर्मनीनें प्रवेश केला. जर्मन सेना जेव्हां बेसारेबिया प्रातांत घुसली त्यावेळीं नीस्टर नदीच्या दक्षिण किनाऱ्यानें काळ्या समुद्रापर्यंत जाऊन ओडेसा गांठावयाचा व बेसारेबियांतील या पाचरीनें रोमानियांतील रूसो–रुमानियन सैन्यास मागाहून वळसा द्यावयाचा असें लष्करी धोरण दिसू लागलें; तें धोरण सप्टेंबर प्रारंभाला जर्मनीनें सोडून दिलें. रशियन लष्कर न लढतां मागे फिरत असतांहि जर्मनीने आपल्या हातचा विजय कां गमा-

वला ? या दिरंगाईची किंवा धोरण सोडण्याची अनेक कारणें सांगण्यांत येतात. त्यांत तीन कारणें प्रमुख आहेत. पहिलें कारण असें कीं ब्युकोव्हिनाची हद्द संपल्यानंतर आस्ट्रो-जर्मन आगगाडया संपून रशियन आगगाडया सुरू होतात, व रशियन आगगाडीची रुंदी आस्ट्रो-जर्मन आगगाडीहून निराळी असल्यामुळे बेसारेबियांतील आगगाडीचा रस्ता दुरुस्त केल्याशिवाय जर्मनाचें पाऊल पुढे पडणें शक्य नाहीं. दिरगाईची उपपत्ति लागण्यास हे कारण अंशतः खरें मानण्यास हरकत नाहीं. पण आगस्टच्या दुसऱ्या पंधरवडयातील आस्ट्रो-जर्मनाच्या लढायाकडे पाहिलें असतां, ओडेसाचें धोरण वाटलें होते तितक्या प्रमुखपणानें आस्ट्रो-जर्मनांनी आपल्यापुढे ठेविलें नव्हतें असेंच अनुमान काढावें लागतें. गॅलिशियाच्या किंवा ब्युकोव्हिनाच्या पूर्वेस जोरजोराने आस्ट्रो-जर्मन लढलेच नाहींत. मिळालें तेवढे संपादून बसण्याचा त्यांचा इरादा दिसला. रशियाच्या या दक्षिण रणभूमींत कोठेंच ते लढले नाहींत असें नाहीं. रोमानियाच्या मोल्डेव्हिया या प्रांतांतील सीरेथ नदीच्या पश्चिम भागात आक्यूना व फाक्सेनी या टापूत पंधरा दिवस भयंकर लढाया झाल्या. रोमानियाचें लष्कर गारद करण्याकरितां सेनापति मॅकेन्सन यांनीं आपल्याकडून पराकाष्ठा केली. रोमानियन सैन्याने या पंधरवडयांत चांगलें शौर्य गाजविलें व सेनापति मॅकेन्सन याच्या जोमाच्या चढाईस चांगलाच अडथळा केला. आगस्ट अखेरीला रोमानियन सैन्य सीरेथ नदीकडे हलू लागलें व सप्टेंबर प्रारंभाला ब्युकोव्हिनाच्या दक्षिण पूर्व कोपऱ्यांतून प्रूथ नदीच्या उत्तर किनाऱ्यानें आस्ट्रो-जर्मनाचें पाऊल थोडेसें पुढे पडू लागलें. रोमानियाच्या तोंडावर दडपण पडू लागलें व पाठीमागच्या वळशालाहि सुरुवात झाली असें पाहून रोमानियन सरकारचे कागदपत्र व जडजवाहिर यासह काळ्या समुद्रावरील ओडेसाच्याहि पलीकडच्या खुरसा बंदरांत रोमानियाच्या राणीसाहेब राहावयास गेल्या. प्रसंग पडल्यास रोमानियाची राजधानी रशियांत खुरसा बंदरांत नेण्याची ही पूर्वतयारी झाली. रोमानियन सैन्यांत फाटाफूट करण्याची व रोमानियन सरकारास स्वतंत्र तह करावयास लावण्याची शिकस्त जर्मनीनें केली, पण त्यांत जर्मनीस यश आलें नाहीं. अखेरपर्यंत दोस्त सरकारच्या खांद्यास खांदा भिडवून लढण्याचा आपला निश्चय रोमानियाने जाहीर केला आहे. सप्टेंबर-आक्टोबर महिन्यात रोमानियाचा सर्व प्रांत सेनापति मॅकेन्सन कदाचित् पादाक्रांत करतील

किंवा न करतील, पण आपल्या सर्व बलाचें वजन या बाजूला टाकून ओडेसाची मोहीम जोरावण्याकडे आस्ट्रो–जर्मनाचें साप्रत लक्षच दिसत नाहीं; किंबहुना जून–जुलई महिन्यांतहि त्याचा मूळचा बेतहि तसा नव्हता असेंच म्हणावें लागतें. सेनापति हिंडेनबुर्ग यानीं योग्यवेळीं रशियाच्या अंगावर फेकण्याकरितां पांच दहा लाख सैन्याचा एक गठ्ठा गुलदस्त म्हणून एका बाजूला ठेवला होता. या गुलदस्तां-तील काही हुकूम आंग्लो–फ्रेंचानीं आपल्या जोराच्या चढाईच्या वेळीं खाऊन टाकिले असे तज्ज्ञाचें मत आहे. सेनापति हिंडेनबुर्ग यांचा हा गठ्ठा अंशतः हलका झाला तरी रशियावर मोठा विजय संपादन करण्यास पुरेसा आहे असेंच जुलई महि-न्यात जर्मन सेनानायकांना वाटत असलें पाहिजे. एरव्ही सेनापति हिंडेनबुर्ग याच्या पक्षाचा वरचष्मा होऊन नांवाजलेले मुख्यप्रधान बेथमन हॉलवेग याना तहाच्या वाटाघाटींत मवाळपणा दाखविण्याबद्दल राजीनामा देण्याची पाळी आली नसती. सेनापति हिंडेनबुर्ग याच्या जवळचा हा गठ्ठा बेसारेबियात उतरून ओडेसावर त्यानीं सोडला असें आगस्टच्या पहिल्या पंधरवड्यात वाटलें; पण आगस्टच्या दुसऱ्या पंधरवड्यात बेसारेबियामध्ये विशेष प्रगतीहि दिसली नाहीं व लढायाहि दिसल्या नाहीत. ओडेसाचें लष्करी धोरण जर सेनापति हिंडेनबुर्ग यानीं अंगिकारिलेलें असतें तर दक्षिणेस रोमानियन सैन्यास अंगावर घेऊन बेसारेबियामध्येच लढण्याची खरी धुमश्चक्री आस्ट्रो–जर्मनांच्या सेनेसमोर दृष्टीस पडली असती. ओडेसाच्या लष्करी धोरणाच्या दृष्टीनें बेसारेबियातील लढाया जरुरीच्या व निकराच्या व्हावयास पाहिजे होत्या आणि मोल्डेव्हियातील लढाया शत्रूच्या निकट राहण्यापुरत्याच व्हावयास पाहिजे होत्या. रोमानियाच्या जोरामुळे बेसारेबियात दिरंगाई झाली असे म्हणण्यापेक्षा बेसारेबियात शत्रूच्या पाठीवर हात ठेवून राहाणें व रोमानियाचा जेवढा मुलुख गिळकृत करता येईल तेवढा गिळकृत करणें, असल्या धोरणानें सेनापति मॅकेन्सन आगस्टच्या दुसऱ्या पंधरवड्यात लढले, हे म्हणणे अधिक सयुक्तिक होय. आगगाडीची रुंदी बदलली म्हणून नव्हे, तर मूळच्याच तशा हेतूमुळे ओडेसाचें धोरण मंदगतीचें दृष्टीस पडलें.

हा मूळचाच तसा हेतु होता असे कशावरून म्हणता? ओडेसाचें धोरण तडीस नेण्यास आस्ट्रो–जर्मन सैन्य असमर्थ ठरलें, असे का म्हणू नये? ओडेसा घेण्यास जरूर लागणारें सैन्यच आस्ट्रो–जर्मनाच्यापाशीं नव्हतें

असा अंदाज कां बांधू नये? वरील अंदाज युक्तिजुक्तीस धरून झाला असता, पण सप्टेंबर प्रारंभाला रिगा–पेट्रोग्राडवरील मोठी चढाई जर्मनीने सुरू केली व या चढाईस लागणारें मनुष्यबलहि जर्मनीने रिगाच्या प्रांतात एकवटलें असल्याचें रशियन सरकारतर्फे प्रसिद्ध करण्यांत आलें. तेव्हा जर्मनीपाशी फालतुक मनुष्यबल आगस्ट महिन्यात नव्हतें, हें विधानच खरें ठरत नाही. जर फालतुक मनुष्यबल नव्हतें तर रिगाच्या पायावर उभा राहून पेट्रोग्राडच्या रोखानें जर्मनी कसा पुढे सरसावला असता? ही गोष्ट खरी कीं रशियन राज्यक्रांतीमुळे रशियन लष्कर ढिलें पडलें असून त्याची लढण्याची शक्ति निम्याहून कमी झाली आहे, तेव्हां एक वर्षापूर्वी पेट्रोग्राडची मोहीम सुरू करण्यास जर्मनीपाशी जेवढे मनुष्यबल असावयास पाहिजे होते तेवढया मनुष्यबलाची आता जरुरी उरलेली नाही; पण रिगाच्या बाजूला रशियन लष्करची स्थिति एक तऱ्हेची व ओडेसाच्या बाजूला एक तऱ्हेची असा थोडाच भाग आहे? रशियात सर्व ठिकाणीं सर्व तऱ्हेची शिस्त बिघडलेली आहे, आणि रशियाचें नवें सरकार ही शिस्तीची घडी पुन्हा बसवून शत्रूशीं टक्कर देण्यास आपल्याकडून आटोकाट मेहनत करीत आहे. परंतु रशियाच्या व सर्व लोकमुखी सरकाराच्या दुर्दैवानें ही घडी अद्याप नीट बसलेली नाहीं. ओडेसा व पेट्रोग्राड या दोन्ही टोकाला जर सारखीच अस्वस्थता नांदत आहे व ओडेसावरील मोहीम अर्धवट सोडून देऊन रिगाच्या बाजूला जर्मनी जर जोर करीत आहे तर ओडेसावरील मोहीम प्राधान्यें करून जर्मनीनें आगस्ट महिन्यांत अगिकारलेली नव्हती, असेंच म्हणावें लागते. ओडेसापेक्षां पेट्रोग्राडचा रोख जर्मनीस अधिक श्रेयस्कर कां वाटावा, ह्याचा विचार करण्यापूर्वी बेसारेबियातील हालचाली एकदम बंद पाडणाऱ्या तिसऱ्या एका महत्त्वाच्या कारणाचा येथे उल्लेख करणें जरूर आहे.

जर्मनीची ओडेसावरील मोहीम सुरू होण्याबरोबर आगस्टचे प्रारंभापासून तो अखेरपर्यंतची इंग्लंड, फ्रान्स व इटली या तीन राष्ट्रांनी जर्मन सेनेवर निकराचे हल्ले करून जर्मन लष्करची अतिशय खराबी करण्यास बिलकूल कसूर केली नाही. आगस्टच्या पहिल्या आठवड्यात यिप्रेसच्या बाजूला व फ्लॅंडर्समध्ये पावसाचा व वादळाचा त्रास सुरू असताहि ॲंग्लो–फ्रेंच सैन्यानें एक आठवडाभर जर्मन सेनेचा खरपूस समाचार घेतला. ही लढाई पूर्वीच्या सर्व लढायांहून फार भयंकर झाली, आणि थोडे थोडे मागे हटून आपली बाजू संभाळतां संभाळतां जर्मनीस पुरेवाट

झाली. पहिल्या आठवड्यानंतर ॲंग्लो–फ्रेंचांचा जोर कमी होत आहे असें जर्मनीस वाटते न वाटतें तों लेन्सच्या सभोंवती इंग्रजानीं गर्दी उडवून दिली ! उत्तर, पश्चिम व दक्षिण, या तिन्ही बाजूंनीं इंग्रजी सेना लेन्सच्याजवळ इतकी गेली कीं, लेन्सचा पूर्वेकडील रस्ताहि इंग्रजी तोफखान्याच्या माऱ्याखालीं आला. या लेन्सच्या लढाईत कानडाच्या पथकानीं विशेष बहादुरकी गाजविली. लेन्सचें फळ गळून इंग्रजांच्या पदरांत पडणार असा समय प्राप्त झाला; त्यावेळीं जर्मनांनी फ्रान्सच्या पूर्व भागातील सैन्य लेन्सकडे तांतडीनें नेले व लेन्सचा कसाबसा बचाव केला. लेन्सचा तात्पुरता बचाव झाला खरा, पण व्हर्डूनच्या टापूंत फ्रेंचांनीं जर्मनीला चांगला टोला दिला, व पूर्वीच्या व्हर्डूनच्या लढाईच्यावेळीं कित्येक महिने कष्ट करून म्यूज नदीच्या दोन्ही बाजूला ज्या माऱ्याच्या टेकड्या व जागा जर्मनीनें हस्तगत केल्या होत्या त्यापैकीं काही महत्त्वाच्या टेकड्या फ्रेंचानी एकदोन दिवसात परत घेतल्या. पश्चिम रणभूमीत जर्मनीची अशी तारांबळ झाल्याकारणानें गॅलिशियाच्या बाजूचें काहीं जर्मन सैन्य फ्रान्सकडे पाठविणें जर्मनीला भाग पडलें. ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात इटालियन सैन्य जोरानें उठलें. गार्झीआ व कार्सोचा टापू येथे इटलीची मोठी चढाई सुरू झाली, व भयंकर लढाया होऊन आस्ट्रियाला पाचसात मैल मागें हटावें लागलें. आस्ट्रियाचें तीस हजार सैन्य इटलीनें कैद केले व कित्येक तोफा घेतल्या. आस्ट्रियाच्या या पराभवामुळे गॅलिशियाच्या बाजूच्या आस्ट्रो–जर्मन सैन्याला इटलीच्या रणभूमीकडेहि मदत पाठवावी लागली. आगस्ट महिन्याप्रमाणें सप्टेंबर महिन्यांतहि फ्रान्स व इटली या दोन्ही ठिकाणच्या रणभूमि एकसारख्या पेटलेल्या रहातील हे सागणें नकोच. जर्मन सेनेची फळी फोडण्यापेक्षां जर्मन सेनेची खराबी करून जर्मन सेना रशियाच्या बाजूकडून स्वतःच्या अंगाकडे खेचून घेणें हा या लढायांचा उद्देश आहे, व या उद्देशात ॲंग्लो–फ्रेंच व इटालियन सेनानायकांनीं बरेंच यश संपादन केले यात संशय नाहीं. रिगा–पेट्रोग्राडच्या स्वारीकरिता सेनापति हिंडेनबुर्ग यानी जमविलेल्या सामग्रीस आगस्ट महिन्यांत जर्मनीनें हात लाविला नाहीं हे खरें, तथापि गॅलिशिया व ब्युकोव्हिना येथून रशियन सेना बाहेर निघून गेल्यानतर कोंपरानें खणण्यासारखी रशियाची त्या बाजूची नवी स्थिति झाली असतांहि मऊ झालेल्या बेसारेबियालाहि जर्मनीच्या कोपरानें खणवलें नाहीं. याचें कारण रिगाच्या बाजूला

जर्मनीचा एक हात गुंतला होता हे होय, पण या कारणाबरोबरच जर्मनीचा दुसरा हात अँग्लो–फ्रेंच इटालियनांनीं आपल्याकडे ओढून घेतला याहि कारणाचा तितकाच प्राधान्ये करून उल्लेख करणें जरूर आहे. सप्टेंबर आक्टोबर महिन्यांत अँग्लो–फ्रेंच–इटालियन स्वस्थ बसून रशियाचा पराभव पहात रहातील हे होणें शक्य नाही. गेल्या पाचसहा महिन्यात मनुष्यबलाच्या दृष्टीनें फ्रान्सची फार हानि झाली आहे. इंग्लंड व इटली याच्याप्रमाणें या अवधींत फ्रान्सनें कित्येक वेळां जर्मनीवर चढाईहि केली व त्याबरोबरच सहा महिने एकसारखे ऐन नदीवरील जर्मनीच्या चढाईला तोड द्यावें लागलें. गेल्या सालच्या व्हर्डूनच्या लढायांचा जितका गाजावाजा झाला, तितका यंदाच्या या ऐन नदीच्या काठच्या लढायाचा झाला नाहीं. पण मनुष्य हानीच्या दृष्टीनें गेल्या साली व्हर्डून फ्रान्सला व जर्मनीला जितके भोवले तितकीच ऐन नदीहि यंदा दोघानाहि भोवली असें प्रसिद्ध झालें आहे. फ्रान्सचें नुकसान जरी अशाप्रकारें मोठें झालें आहे तरी पेट्रोग्राडवरील मोहीम ढिली करण्याकरिता इंग्लंड व इटली यांच्याप्रमाणें फ्रान्सहि सप्टेंबर आक्टोबर महिन्यांत जर्मनीवर तुटून पडण्यास कमी करणार नाहीं, असा भरंवसा सर्वांस वाटत आहे. ओडेसावरील मोहीम आगस्ट अखेरीड थंड पाडणाऱ्या कारणांचा येथ पर्यंत विचार झाला. आता रिगा–पेट्रोग्राडवरील मोहिमेकडे वळू.

रशियांत राज्यक्रान्ति झाल्यापासून जुलई प्रारंभापर्यंत रशियाशी स्वतंत्र तह व तसे न साधल्यास रशियाच्या मार्फत सर्वांशी आपल्या वरचष्म्याचा तह करण्याचें कारस्थान जर्मनीनें चालू ठेविलें होतें. जुलईच्या प्रारंभाला हे सर्व कारस्थान विलयाला गेले व रशियाच्या बाजूच्या लढायांना पुन्हा सुरुवात झाली. गॅलिशियाच्या बाजूला कोपरानें खणण्याची ऐती संधि मिळाली असता ओडेसाचा रोख सोडून देऊन सप्टेंबर प्रारंभाला पेट्रोग्राडचा रोख जर्मनीनें पत्करला. जुलई–आगस्ट महिन्यात रशियांतील सत्ता पट्रोग्राड येथील कामकऱ्याच्या कमिटीच्या हातून जाऊन मुख्य प्रधान एम. केरेन्स्की व त्याचें नवें राष्ट्रीय प्रधानमंडळ याच्या हातीं प्रस्थापित झाली. आगस्ट महिन्यात मास्को येथे सर्व तऱ्हेच्या व सर्व प्रकारच्या लोकमताची कॉंग्रेस भरली होती. त्या कॉंग्रेसपुढे नव्या प्रधानमंडळानें रशियाच्या दुर्दशेचें चित्र अगदीं उघडे नागडे रेखाटले व सर्वांकडून एम. केरेन्स्की याना मनोभावानें सहाय्य करण्याचें अभिवचन घेतलें.

सैन्यांत शिस्त नाहीं, सैन्याला खावयाला नाहीं, आगगाड्यांच्या संपामुळें सैन्याची उपासमार होण्याचा संभव आहे, निरनिराळया मतांच्या बजबजपुरीमुळें कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, कारखाने सर्व ठिकाणीं मंदावले असल्यामुळे पूर्वीच्या निम्याहून कमी बंदुका व तोफा तयार होतात, विमाने बांधण्याचे कारखाने बहुतेक संपुष्टांतच आले आहेत, द्रव्य दृष्टया सरकारची स्थिति खालावलेली आहे, आणि मृत्यूच्या शिक्षेची दहशत नष्ट झाल्यामुळे कोणत्यावेळीं कोणचें लष्कर कोठे कसा धोका देईल याचा नियम नाहीं; अशा प्रकारचें अत्यंत खेदजनक वर्णन मास्कोच्या कॉंग्रेसपुढे मुख्य प्रधान एम. केरेन्स्की व मुख्य सेनापति कार्निलॉफ यांनीं केलें. हेतु हा कीं रशियाचें दुखणें वेशीवर टांगलें जावें. रशियाच्या नव्या सरकारचा हा हेतु मास्कोच्या कॉंग्रेसमध्ये सफल झाला व अंतस्थ कलह एका बाजूस ठेवून जर्मनीशीं दोन हात करण्याचा निश्चय सर्व रशियानें केला. सप्टेंबरमध्ये स्टाकहोम येथें भरूं घातलेल्या सोशियालिस्टांच्या सर्व राष्ट्रीय परिषदेंत तहाचा डोलारा उभारूं शकूं म्हणून जर्मनीस वाटत असलेली आशा मास्कोच्या कॉंग्रेसने नष्ट केली. येत्या हिवाळयात जर तहावर महायुद्ध गेलें नाहीं तर पुढील सालच्या वसंतकाळीं अमेरिकेची सेना फ्रान्सच्या रणभूमींत येऊन पोंचल्यावर आपली धडगत नाहीं, हें जर्मनीस पक्के कळून चुकलें आहे. आपली छाप राहील असला तह येत्या हिंवाळयात रशियाच्या मार्फत घडवून तरी आणला पाहिजे, नाहीं तर पुढील सालीं शरणचिठी तरी लिहून दिली पाहिजे अशा पेचांत सांप्रत जर्मनी आहे. कारस्थानाने व लालचीने रशिया वश होत नाहीं असें आगस्ट महिन्यात मुक्रर ठरलें. तेव्हां दांडगाईने रशियास तह करावयास भाग पाडण्याशिवाय दुसरा मार्गच शिल्लक राहिला नाहीं. ऑडेसाच्या मार्गानें पुढे जावें तर सुपीक व निरनिराळया धान्यांनीं भरलेला मुलूख हातीं पडतो इतकेंच. तह कांहीं हातीं पडत नाहीं. जर्मनीला सांप्रत धान्यापेक्षां तहाची अधिक जरुरी आहे. तह जर पाहिजे असेल तर डिसेंबरचे आंत पेट्रोगाड काबीज करणें जरूर आहे. पेट्रोगाड जर्मनीनें घेतल्यास रशियाचे महत्त्वाचे कारखाने जर्मनीच्या हातीं पडतात इतकेंच नव्हे तर नॉर्वे–स्वीडनच्या मार्फत इंग्लंड व अमेरिका यांच्याशीं असलेला रशियाचा संबंध तुटून जातो. पेट्रोग्राड मिळालें तर तह, नाहीं तर पुढील सालीं लढाईंत पराभव; असा हा डाव आहे. तेव्हां ओडेसाचा नाद सोडून तहाच्या लोभानें सप्टेंबरच्या पहिल्या

तारखेला पेट्रोग्राडच्या मोहिमेस जर्मनीने सुरुवात केली, असें म्हणावें लागतें. रिगाच्या पूर्वेस पंचवीस तीस मैलावर ड्यूना नदीची फळी जर्मनीनें फोडली आणि लगेच उत्तरेस रीगा–बाक पिस्कौ या मार्गानें पेट्रोग्राडकडे जाणारी आगगाडी गाठण्याचा उद्योग आरंभिला. तेव्हां मीठा–रिगा हीं ठाणीं सोडून देऊन बेडेन म्हणजे रिगाच्या उत्तर–पूर्व पन्नास मैलपर्यंत रशियन मागे हटले. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात बेडेन–फ्रेडरिकस्टॅड या पट्यावर जर्मनीला अडवून धरण्याचा पहिला बेतहि रशियाला सोडून द्यावा लागला. कारण लढणाऱ्या सैन्याच्या मागे असलेलें कुमकेचें सैन्यच भीतीनें गंगारून पळून गेलें. यामुळे रिगापासून बाकपर्यंत व फ्रेडरीकस्टॅडपासून बाकपर्यंत धनुष्याकृतीनें पसरलेल्या आगगाडीच्या टापूत जर्मनीचा खरा प्रतिकार रशियाच्या हातून होईल असें दिसत नाहीं. ड्विन्स्क ते पिस्कौ आणि पिस्कौ–बाक परना या दक्षिणोत्तर व पूर्व पश्चिम आगगाड्याच्या पायावर उभे राहून रशियन सैन्यास लढावें लागेल. रिगाचे आखातात जर्मनीचें आरमार आलें असून रिगाचें आखात जर्मनीच्या आरमाराचे ताब्यात गेल्यासारखे आहे; व रिगाचे आखाताच्या ईशान्य कोपऱ्यांतील परना व दराच्या आसपासचा किनाराहि जर्मन आरमारी तोफानीं झोडपून काढण्यास सुरुवात केली आहे. तज्ज्ञाचें असें मत आहे की, सप्टेंबर महिन्यात जर्मन आरमार व रशियन आरमार यामध्ये आरमारी लढाई होईल; व या लढाईवर पेट्रोग्राडचें दैव विशेष करून अवलंबून राहील. या आरमारी लढाईत जर जर्मनीची सरशी झाली तर फिनलडच्या आखातात अगदीं पेट्रोग्राडच्या जवळ शेपन्नास मैलावर सैन्य उतरून पेट्रोग्राडला आरमारी शह काट-शह देण्यास जर्मनीस हरकत उरणार नाहीं. पण जर आरमारी लढाईत स्वतःचा बचाव करून जर्मनीला त्रास देण्याइतक्या स्थितींत रशियन आरमार शिल्लक राहिलें तर पाण्याच्या बाजूची भीति पेट्रोग्राड शहराला रहाणार नाहीं. समुद्राची भीति जर राहिली नाहीं तर नुसत्या जमिनीवर रिगापासून शेंसव्वाशे मैलाच्या पलिकडे जर्मनीस थोपवून धरता येणें रशियास शक्य आहे. आरमारी बाजू जर रशियाच्या अंगलट आली नाही तर रिगा व पेट्रोग्राड या दरम्यानच्या अर्ध्या वाटेवरच बर्फ पडण्याच्या सुमारास जर्मनीस मुक्काम करावा लागेल, असें तज्ज्ञाचें मत आहे.

---

# महायुद्धाचा चवथ्या वर्षाचा सप्टेंबर--आक्टोंबर महिना

आगस्ट महिन्याप्रमाणें सप्टेंबर महिनाहि रशियासंबधानें बऱ्याच काळजीचा गेला. सप्टेंबर प्रारंभाला जर्मनीनें रिंगा प्रांत घेऊन रिगा बंदराच्या ईशान्येस पन्नास साठ मैलपर्यंत पुढे चाल केली. प्रारंभीच्या या धक्कयासरशी जेवढा मुलूख मिळाला तेवढयावरच जर्मनी संतुष्ट राहिला. फ्रेडरिकस्टॅड व जॅकबस्टॅड हीं डिवना नदीवरील मुख्य ठाणीं सबंध सप्टेंबर महिन्यांत जर्मनीने घेतलीं; व डिवना नदीवर रशियानें चराची जी मजबूत जागा गेलीं दोन वर्षें तयार केली होती ती जागा सोडून देणें रशियास भाग पडलें. रशियाची फळी अवचित फुटली असतांना जर्मनीनें डिवना नदी व रिगा बदर येवढयावरच सतुष्ट रहावें हें जरा चमत्कारिकच होय. लष्करी दृष्टया विचार केला असतां जर्मनीचें हें वर्तन कोडयाच्या स्वरूपाचें म्हणावें लागते. पेट्रोग्राडला तबी देण्याची सधि मिळाली असताना जर्मनी स्वस्थ का ? जर्मनीपाशीं तितके मनुष्यबळ नाहीं असे म्हणावे तर अतस्थ कलहांमुळें रशियन सैन्याची पेट्रोग्राडच्या बाजूला इतकी तारांबळ उडाली होती की, त्या बाजूचा बराचसा प्रात घेण्यास मोठयाशा मनुष्यबलाची जरुरीच नव्हती. कोपरानें खणण्याइतकी मऊ जागा मिळाली असतांना टणक जागा लागेतोंपर्यंत कोपराने खणण्याचें जर्मनीनें सप्टेंबर महिन्यात का टाळलें ? रशियांतील राज्यक्राति झाल्यापासून जर्मनीस असा लोभ सुटलेला दिसतो कीं मनुष्यबल खर्ची न घालतां रशियाच्या बाजूचें तहाचें फळ आपल्या पदरात आयतें पडावें. सप्टेंबर महिन्यात रशियांत ज्या उलढाली झाल्या, त्या उलाढाली जर्मनीच्या ह्या लोभास पोषक झाल्या, अपाय-कारक झाल्या नाहींत. रशियांत सांप्रत दोन मोठे तट आहेत. एक भाडवलवाल्या वर्गाचा व दुसरा कामकऱ्याचा. झारच्या कारकीर्दीला मध्यम स्थितीतील वर्ग नाखुष झाला होता. महायुद्धास सुरवात झाल्यापासून सरकारास मनोभावें मदत करणारा हा वर्ग होय. ह्या युद्धात जर्मनीची खोड मोडलीच पाहिजे, व रशियाच्या कित्येक पिढयाच्या आकांक्षा सफल झाल्याच पाहिजेत अशा निश्चयाच्या बलानें हा वर्ग युद्धाचा बोजा शिरावर घेण्यास प्रवृत्त झाला होता. लढाईच्या खात्याने ज्या ज्या वेळीं जी जी मदत मागितली त्या त्या वेळीं ती ती मदत त्यानें मोठया

उत्साहाने व सढळ हाताने केली. बंदुका व काडतुसें ह्या वर्गाच्या खासगी किंवा म्युनिसिपालिटीच्या कारखान्यातून तयार होऊं लागली; जखमी झालेल्यांची शुश्रूषा करण्याकरिता ह्यानीं काढलेले दवाखाने चहूकडे दिसू लागले; इतकेंच नव्हे तर ह्याच्या खासगी तैनातींतले डॉक्टर रणभूमीवर मदतीकरतां धावून गेले. सैन्यामध्ये खाण्यापिण्याची गैरसोय दिसून आली त्यावेळीं अन्नपाण्याची मदत ह्यानीं सैन्यास केली. शिवाय ठिकठिकाणीं व्हालंटियराचें लष्कर उभारून अंतस्थ व्यवस्था राखण्याचाहि बराच बोजा ह्यानीं आपल्या शिरावर घेतला. उत्साहानें, हिंमतीने व दृढ निश्चयानें वेळोवेळीं केलेल्या ह्या मदतीमुळे लष्करांतील अम्मलदार ह्या मध्यम स्थितीतील भाडवलवाल्याकडे सहानुभूतीनें पाहू लागले; इतकेच नव्हे, तर रशियन राष्ट्राच्या वैभवाबद्दल जर कोणाला खरी कळकळ असली तर ती ह्याच वर्गातील पुढाऱ्याना आहे अशी खात्री सेनापति आलेक्सी, सेनापति ब्रुसेलॉफ, सेनापति कॉर्निलॉफ वगैरे तडफदार लष्करी अम्मलदारानाहि पटली. अशा रीतीने ड्यूमा सभेचे किंवा मध्यम स्थितीतील वर्गाचे पुढारी व लष्करी बडे अम्मलदार ह्याचीं अतःकरणें एकमेकांत मिसळत असताना १९१५ सालच्या जर्गी पीछेहाटीनतर १९१६ सालच्या अखेरीस रोमानियाचा बराच भाग जेव्हा जर्मनीनें पादाक्रात केला तेव्हां वरिष्ठ लष्करी अमलदार व ड्यूमा सभेचे भाडवलवाले पुढारी ह्या दोघाच्याहि अतःकरणाचा पूर्ण मिलाफ झाला. झारचें प्रधानमडळ नालायक लोकाचें असल्यामुळे ह्या आपत्ती रशियावर येतात असे त्यानीं ठरविलें. झार सभोवतालच्या ज्या सरदार मंडळांतून निरनिराळ्या खात्यांचे प्रधान नेमण्यात येत असत ती सरदार मडळी ही नालायकीनें पूर्णपणें ग्रासलेली असल्यामुळें प्रधानमडळाची नेमणूक ड्यूमा सभेच्यामार्फत त्याच सभेच्या पुढाऱ्यामधूनच केली पाहिजे, असा रशियाचा तरणोपाय मध्यम स्थितीतील वर्गानें व लष्करी अमलदारांनीं निश्चित केला. हा दोघाचा निश्चय ज्यावेळीं झाला त्यावेळीं झारच्या सत्तेची शभर वर्षे भरलीं. लष्करी अमलदाराचे हुकूम पाळण्याची तत्परता व झारच्या पुरातन सिंहासनाला प्रत्यक्षपणें दुखविण्याविषयीं मध्यम स्थितींतील लोकांची नाखुषी ह्या दोन पायावरच झारची सत्ता उभी राहिलेली होती. महायुद्धांत झालेल्या पराभवामुळे झारच्या राजमडळाची नालायकी उघडी नागडी झाली. आंतील हिडीस स्वरूपावरचें पाघरूण रणभूमीवर काढलें गेलें व त्या हिडीस स्वरूपाच्या खतीमुळे मूळचे लोक

झारला सोडून जाण्यास तयार झाले. अशा स्थितींत पेट्रोग्राड शहरांत धान्याच्या महर्गतेमुळे दंगे होऊन ड्यूमा सभेनें नेमलेल्या नव्या प्रधानमंडळाच्या हातांत रशियाची राजसत्ता दिली.

हे नवें प्रधानमंडळ ज्यावेळीं स्थापलें गेलें त्यावेळीं एका नव्या कलहास रशियात प्रारंभ झाला. हा नवा कलह एकदोन वर्षांत मिटणारा नसून पांचपन्नास वर्षें सर्व युरोप खंडास व्यापून टाकणारा आहे. सोशियालिस्टपक्षाचीं मतें व इंग्लंडसारख्या देशात सांप्रत रूढ झालेल्या लोकमुखी राज्यपद्धतीचीं मतें ह्याच्यामधील हा कलह आहे. अर्थात् हा कलह आणखी दोन चार पिढ्या तरी सहज चालणारच. इंग्लंडातील लोकमुखी राज्यपद्धत डेमॉक्रसी परंपरागत समाजातील वरिष्ठ वर्गाला दुखवू इच्छीत नाहीं आणि कनिष्ठ वर्गाला न्यायबुद्धीने व औदार्यानें वागवून वरच्या पायरीस चढण्याचे त्याचे मार्ग खुले ठेवून मध्यम स्थितींतील भांडवलवाल्याच्या हातांत राज्यसत्तेचीं सूत्रें ठेवीत असते. अमेरिका व फ्रान्स ह्या देशांतहि असल्याच प्रकारचीं लोकमुखी राज्यसत्ता आहे. झारची सत्ता झुगारून देऊन त्या सत्तेच्या जागीं इंग्लंड, फ्रान्स किंवा अमेरिका ह्याच्या नमुन्यावर मध्यम स्थितींतील पुढाऱ्याच्या हातांत लोकमुखी राज्यसत्ता प्रस्थापित करण्याचा उद्योग राज्यक्रांति होण्याबरोबर ड्यूमा सभेच्या लष्करी अमलदारांनीं सुरू केला. पण ज्यानीं प्रत्यक्ष बंड करून झारला उलथून पाडले ते कामकरी व सैनिक सोशियालिस्ट मताचे कैवारी ठरले. सोशियालिस्टांचें मत वरिष्ठ सरदार मंडळाला किंवा कोट्याधीशांना प्रतिकूल आहे इतकेच नव्हे, तर त्यांचें उन्मूलन झाले पाहिजे असा सोशियालिस्टांचा हट्ट आहे. लोकमुखी राज्यसत्ता या वरिष्ठ मंडळाला प्रतिकूलहि नसते व अनुकूलहि नसते, पोषकहि नसते व बाधकहि नसते, सुखवूं इच्छित नाहीं व दुखवूं इच्छित नाहीं. या सरदार मंडळांनी किंवा कोट्याधीशांनीं स्वतःच्या कर्मानें जगावें किंवा मरावें; त्याच्या जन्ममरणाच्या फेऱ्यांत लोकमुखी राज्यसत्ता हात घालीत नाहीं. सोशियालिस्ट पक्ष त्यांना मारू इच्छितो. लोकमुखी राज्यसत्तेचा मुख्य भार परंपरेनें उत्पन्न केलेल्या व चालू राज्यव्यवस्थेनें नेहमीं नवें जुनें होऊन कार्यक्षम बनवलेल्या मध्यम स्थितींतील संग्रही वर्गावर पडलेला असतो. सोशियालिस्ट पक्षाला मध्यम स्थितींतील वर्ग नको आहे असें नाहीं. पुढारी व अनुयायी असे वर्ग रहाणारच. पण कांहींतरी संग्रह केल्यामुळे परंपरागत भावनेनें ज्यांची

स्थिति स्थिर झाली आहे व राज्यपद्धतीमुळे ज्याचें हें स्थिर आसन चटदिशीं डळमळीत होत नाहीं असला मध्यम स्थितीतला संग्रही वर्ग–मग तो कालांतरानें नवाजुना होईना–एका पिढीपुरता तरी स्थिर असलेला व पुढच्या अशाच पिढीला प्रसवणाऱ्या स्थितींतील भांडवलवाला वर्ग सोशियालिस्ट पक्षाला नको आहे. जसे म्युनिसिपालिटयाचे किंवा पार्लमेंटचे सभासद पांच सात वर्षांच्या अवधींत बदलतात त्याप्रमाणें कामकरी, सैनिक व शेतकरी यांच्या सर्रास मताला अनुसरून तीन चार वर्षांच्या अवधींत बदलणाऱ्या वर्गाशिवाय इतर कोणीहि वरच्या दर्जाचा किंवा खालच्या दर्जाचा रहाता कामा नये असें सोशियालिस्ट पक्षाचें मत आहे. फ्रान्समधील राज्यक्रांतीच्या वेळीं ज्याप्रमाणें वरचें सरदार मंडळ सत्ताहीन झालें त्याप्रमाणें आजच्या रशियाच्या राज्यक्रांतीच्यावेळीहि परंपरागत संग्रही वर्गहि सत्ताहीन झाला पाहिजे अशी सोशियालिस्ट पक्षाची शिकवणूक आहे. झारची सत्ता उलथून पडून राज्यक्रांति होण्याबरोबर जें नवें प्रधानमंडळ डयूमा सभेनें स्थापलें या प्रधानमंडळांत सोशियालिस्ट पक्षाचे एक दोन पुढारी होते, बाकी सर्व मध्यम वर्गाचे कैवारी होते. ज्या दिवशी प्रधानमंडळ स्थापले गेलें त्याच दिवशी मध्यम वर्ग व सोशियालिस्ट पक्ष याच्यामधील कलहास प्रारंभ झाला; आणि सप्टेंबर महिन्यात तर एकमेकांत अतस्थ लढाया होण्यापर्यंत पाळी आली. नवीन प्रधानमंडळ स्थापन झाल्यापासून दोन तीन महिन्यांतच डयूमा सभा नष्ट झाली व प्रधानमंडळांत प्रारंभीं जे एकदोन सोशियालिस्ट होते त्यानीं सर्व प्रधानमंडळाचीं कामें आपल्या हातांत घेतलीं.

हे असें झालें कसें ? मध्यम स्थितींतील भांडवलवाल्यांची सत्ता झारबरोबरच अशी विलयाला कशी गेली ? याचें उत्तर असें आहे कीं, झारची सत्ता असतांनाच रशियांत सोशियालिस्ट पक्ष खालच्या वर्गांत चांगला पसरला होता. या मताचा कैवार घेणारे हजारों वक्ते व लेखक रशियांत पूर्वी तयार झाले होते. याच मताच्या कमिटीनें पेट्रोग्राड शहरीं बंडाळी करून यश संपादन केलें अशी बातमी कळतांच सदर कमिटीचे उपदेशक म्हणून या हजारो वक्त्यानीं रणभूमीवरील सैनिकाना प्रथम घेरलें व सोशियालिस्ट मतें त्यांच्या मनात पक्कीं बिम्बविलीं. डयूमाचे पुढारी राजकारणांत व युद्धाचे तयारींत गुंतले असतांना सोशियालिस्टानीं लष्करचीं मनें स्वतःकडे आकर्षून घेतलीं.

भांडवलवाल्या लोकांच्या हातांत कोठेहि कसलाहि अधिकार नको व लष्करी अमल तर नकोच नको, असें सामान्य सैनिकाचें मत बनलें. सेनापति अलेक्सी, ब्रुसेलॉफ व कॉर्निलॉफ हे प्रमुख सेनापति खरे, पण त्यांचा अम्मलच सैन्यावर चालेना. रणभूमीवर उभ्या असलेल्या लाखों सैन्यानें लष्करी अधिकाऱ्यांचा अम्मल झुगारून दिला व स्वतः निवडलेल्या कमिटया या अम्मलदारांच्या जागी प्रस्थापित केल्या. अर्थात् पेट्रोग्राड येथील कामकऱ्यांच्या व सैनिकाच्या कमिटीचें प्रस्थ अधिक माजलें. या कमिटीच्या नमुन्यावर रशियांतील सर्व मुख्य शहरीं कामकऱ्याच्या व सैनिकाच्या कमिटया स्थापण्यांत येऊन भांडवलवाल्या लोकाच्या विरुद्ध खालच्या लोकाचीं मनें चोहोंकडे कलुषित करण्यांत आलीं. रणभूमीवरील सैनिकाची मनें सोशियालिस्टाच्या हातात गेलेलीं आणि भांडवलवाल्या लोकाच्या हातांत व्हालटियराचें लष्कर जरी होतें तरी मनुष्यबलाच्या दृष्टीनें तें हताश झालेलें, अशा स्थितींत या मध्यम वर्गाच्या पुढाऱ्यांनीं कसें वागावयाचें ? ज्यानीं झारची सत्ता आंतून पोखरून काढिली ते स्वतःच पोखरलेल्या भूमीवर उभे होते. जर्मनीला जिंकून आपल्या राष्ट्राचें वैभव केव्हा आपण पुन्हां उज्ज्वलित करू या विचारानें त्यांचीं अंतःकरणें एकसारखी तळमळत होतीं; या तळमळीमुळें सोशियालिस्टाच्या मताशीं उघडपणें विरोध करून देशांत दुही माजविणें त्याना इष्ट वाटलें नाही. तेव्हां सुसरबाई तुझीच पाठ मऊ असें म्हणणारेंच वर्तन त्यांनीं पेट्रोग्राडच्या कमिटीशीं ठेविलें. प्रधानमंडळात सोशियालिस्ट पक्षाचें मताधिक्य होऊ दिलें; आणि केरेन्स्की यांना ते सोशियालिस्ट असताहि मुख्यप्रधानाची जागा दिली. मध्यम वर्गाविषयीं मनांत सहानुभूति ठेवून या वर्गाच्या मदतीने जर्मनीचा पराभव करू इच्छिणारे जे थोडे सोशियालिस्ट रशियात आहेत त्याचे अग्रणी मि. केरेन्स्की हे आहेत. त्याच्या हातांत सत्ता गेल्यानें सोशियालिस्ट पक्षालाहि संतोष झाला व भांडवलवाल्यांनाहि पडत्या काळाचें समाधान वाटलें.

इतक्यांत जुलईच्या अखेरीस व आगस्टच्या प्रारंभाला सोशियालिस्ट मतांच्या पगडयामुळें गॅलिशियाच्या रणभूमींत रशियन सैन्याची पीछेहाट झाली. या पीछेहाटीनें भांडवलवाल्यांचा वर्ग व सोशियालिस्ट पक्ष यांच्यामधील विरोध विशेष स्पष्ट झाला. सैन्यामधील राजकारणाची चर्चा बंद पाडून अम्मलदाराचा अधिकार

पूर्वीप्रमाणें सुरू केल्याशिवाय लढण्याची सैन्याची शक्ति पूर्वीप्रमाणें दृष्टीस पडणार नाही अशी ओरड वरिष्ठ लष्करी अम्मलदारांनी व भांडवली पुढाऱ्यांनीं सुरू केली. अम्मल ढिला झाल्यानें पराभव होतो हें तत्त्व एम केरेन्स्की याना समजलें; पण हा ढिलेपणा नष्ट कसा करावयाचा ? ज्या सोशियालिस्ट मतांनीं हा ढिलेपणा उत्पन्न केला त्या मताच्या पाठिंब्यावर एम. केरेन्स्की यांचें अस्तित्व अवलबून. ' एकिकडे आड तर एकिकडे विहीर ' अशी त्यांची स्थिति झाली. तेव्हां लष्करच्या स्थितींत दुरुस्ती केल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें सोशियालिस्ट पक्षाच्या निदर्शनास आणून देण्याकरितां मास्कोची अडीच हजार प्रतिनिधींची जंगी परिषद भरविण्यांत आली. झारसाहेबाच्या वेळच्या सर्व सार्वजनिक संस्थाचे पुढारी या परिषदेस बोलाविले होते. कामकरी व सैनिक यांच्या कमिटयाचे प्रतिनिधी जरी या परिषदेस आले होते तरी मुख्य जमाव भांडवलवाल्यांचा होता. कामकरी व सैनिक यांच्या हातांतील सत्ता काढून घेण्याकरितां ही मध्यम वर्गांची परिषद भरली आहे अशी हाकाटी या परिषदेविरुद्ध सोशियालिस्ट पक्षानें केली. रशियातील राज्यक्रांतीला लाखो सैनिकाचें पाठबळ असल्यामुळे ही राज्यक्रांति कोणाच्यानेंहि उलथीपालथी करवणार नाहीं; व जर कोणी तसा प्रयत्न केला तर त्यास झारच्या वेळेप्रमाणें कडक शासन करण्यास आपण चुकणार नाहीं, अशी धमकी या परिषदेमार्फत सर्व रशियाला एम केरेन्स्की यानीं दिली. या परिषदेंत राज्यक्रांतीशी इमानें इतबारें वागण्याचा सर्वांचा निश्चय दिसून आला. पण त्याबरोबरच झारसाहेबांच्या वेळचे करडे नियम अमलात आणून सेनापति आलेक्सी, सेनापति कॉर्निलॉफ इत्यादि जुन्या सेनापतींची सत्ता लष्करांत स्थापिली गेली पाहिजे असें एक तऱ्हेच्या हट्टानें पण पर्यायानें मास्कोच्या परिषदेनें एम. केरेन्स्की यांच्या प्रधानमडळास फर्मविलें. सेनानायक व भांडवलवाल्यांचा वर्ग यांना उचलून धरणारी मास्कोची परिषद झाली. व्हालंटियरचें लष्कर आणि कोसॅक स्वारांचें लष्कर याचाहि पूर्ण पाठिंबा त्या परिषदेच्या वेळीं सेनानायकांना व भांडवलवाल्याना देण्यांत आला, पण त्यामुळे सोशियालिस्ट पक्षाचाहि हट्ट भांडवलवाल्याविरुद्ध पूर्वीहून अधिक वाढला. सोशियालिस्ट मतानीं सैन्याची शिस्त बिघडविली, पण इतरानी वेळीच सावध होऊन या सोशियालिस्ट सकटांतून रशियाचें संरक्षण केलें, असा मास्कोच्या परिषदेचा अर्थ होता. सोशियालिस्टांचीं मते रशियासारख्या विस्तीर्ण साम्राज्याचा भार सोसण्यास असमर्थ

होत. असें ही परिषद ठरवीत होती. मास्को परिषदेचें हे धोरण सोशियालिस्टांच्या तेव्हाच ध्यानांत आलें आणि स्वतःच्याच मार्गानें सैन्यांत शिस्त उत्पन्न करण्याचा त्याचा हट्ट त्यानीं तसाच पुढे चालविला. सैनिकांनीं नेमिलेल्या कमिट्या एका बाजूस सारण्यास ते तयार होईनात आणि या कमिटयावर सर सेनापति कॉर्निलॉफ याचा मोठा कटाक्ष. मुख्यप्रधान केरेन्स्की याना शिस्त हवी, पण ती सोशियालिस्ट पद्धतीनेच उत्पन्न झालेली हवी. जुन्या पद्धतीची नको. जुन्या पद्धतीची शिस्त म्हणजे जुन्या सेनानायकाची महती; मग सोशियालिस्टांना कोण विचारतो? अर्थात् सैनिकाच्या शिस्तीच्या प्रश्नाबरोबर रशियांतील राज्यसत्ता सोशियालिस्टाच्या हातात असावी का मध्यम स्थितीतील भांडवलवाल्यांच्या हातांत असावी, हा महत्त्वाचा प्रश्न सव लोकापुढे मास्कोच्या परिषदेने माडला. या तत्त्वाला मास्कोच्या परिषदेने वेशींवर टागलें खरें; पण तो तटा मिटविला नाहीं. एम. केरेन्स्की व सेनापति कॉर्निलॉफ यांमधील मतभेद मास्कोच्या परिषदेमुळे अधिक तीव्र मात्र झाला. मास्कोची परिषद सपते न संपते तो सप्टेंबरच्या प्रारंभाला रिगाचा प्रात जर्मन लष्करानें घेतला. सोशियालिस्ट मताने रशियाची कशी खराबी होत चालली आहे हे सर्वांच्या मनात बिंबविणारे जगी उदाहरण म्हणजे रिगाची पीछेहाट होय. हे उदाहरण घडून येण्याबरोबर सेनापति कॉर्निलॉफ याना असें वाटलें कीं राज्यसत्ता सोशियालिस्टाच्या हातून हिसकावून घेण्यास हीच योग्य संधि आहे. सोशियालिस्ट नालायक ठरलेले व सेनापति कॉर्निलॉफ लायक ठरलेले, अशा वेळीं राज्यसत्तेचा बराच भाग स्वतःचे पक्षाच्या पदरांत टाकण्याचा त्यांनीं उपक्रम करावा हे साहजिक होय. कोणी म्हणतात, सेनापति कॉर्निलॉफ ह्यानी स्वतःच्या एकट्याच्या हातांत सर्व राज्यसत्ता मागितली; कोणी म्हणतात, मुख्य प्रधान एम. केरेन्स्की याच्या बरोबर सारखेपणाच्या नात्यानें राज्यकारभार चालविण्याचा त्याचा हेतु होता; पण मध्यस्थांनीं एम. केरेन्स्की याच्या मनांत भलतेंच भरवून दिलें. कसेहि असो; सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यांत सेनापति कॉर्निलॉफ हे मुख्य सत्ताधिपति होऊं इच्छित आहेत असा एम. केरेन्स्की यांचा ग्रह होण्याबरोबर त्यांनीं सेनापति कॉर्निलाफ यांना मुख्य सेनापतीच्या जाग्यावरून एकदम काढून टाकलें! सेनापति कॉर्निलॉफ यांनीं आपला हुद्दा सोडण्याचें नाकारलें व काहीं सैन्यानिशीं पेट्रोग्राडवर चाल करून जाण्यास सुरुवात केली. अल्प प्रमाणावर आपापसांत रशियात लढाईस

सुरुवात झाली. सेनापति कॉर्निलॉफ यांचें सैन्य पेट्रोग्राडपासून चाळीस पन्नास मैलाच्या अतरावर जाऊन थडकलें; केरेन्स्की व कॉर्निलॉफ या दोन्ही पक्षामध्ये लहानशी चकमकहि झाली; पण सेनापति कॉर्निलॉफ यांचें सैन्य जसजसें राजधानी जवळ जात चाललें तसतसें सोशियालिस्ट पक्षाच्या उपदेशकांनीं त्यांना अधिकाधिक घेरलें. अखेरीस सोशियालिस्ट मताचा पगडा सैनिकांच्या मनावर बसला व त्यांनीं सेनापति कॉर्निलॉफ यांचा पक्ष सोडून एम. केरेन्स्की यांच्या पक्षाचा स्वीकार उघडपणें केला. शेवटीं सेनापति कॉर्निलॉफ यांना एम. केरेन्स्की यांच्या हातीं पडावें लागलें, व रशियांतील सोशियालिस्ट सरकाराविरुद्ध मध्यम स्थितींतील भांडवलवाल्यांच्यातर्फे करण्यांत आलेल्या पहिल्या बडाळीचा शेवट सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात लागला.

या बडाळीनें एक गोष्ट विशेष निदर्शनास आणिली, ती ही कीं, रशियांत जर कोणी सोशियालिस्ट मताचे विशेष चहाते व कैवारी असतील तर ते रशियन सैनिक होते. सेनापति कॉर्निलॉफ यांच्या विशेष विश्वासातलें सैन्यहि सोशियालिस्ट मताचें ठरलें. सेनापति कॉर्निलॉफ यांच्या बंडानंतर एम. केरेन्स्की यांचें सर्व प्रधानमंडळ सोशियालिस्टाचेंच बनलें, हे सांगणें नकोच. या प्रधानमंडळाला मध्यम स्थितीतील वर्गाच्या मदतीची अपेक्षा बाळगण्याचें आतां प्रयोजनच उरलें नाहीं. मुख्य सत्ता सोशियालिस्टाची व राज्यकारभाराला वळण लावण्याचा अधिकार पेट्रोग्राड येथील कामकरी व सैनिक यांच्या कमिटीचा, अशी स्थिति सप्टेंबर अखेरीस उत्पन्न झाली. पेट्रोग्राड येथील सोशियालिस्टांनीं सर्व सत्ता बळकाविली, असें दूषण लागूं नये म्हणून सप्टेंबर अखेरीस सर्व रशियाची मिळून एक सोशियालिस्टांची परिषद ऊर्फ डेमोक्रॅटिक कॉन्फरन्स पेट्रोग्राड येथे भरविण्यांत आली. या परिषदेने मध्यम स्थितीतील भांडवलवाल्याला किंवा व्हालंटियर लष्कराला किंवा कोसॅकचे लष्कराला सांप्रत राज्यसत्तेत भागीदार करावयाचें नाहीं असें उघडपणें ठरविलें. सैनिकानी या परिषदेसभोंवतीं जमून ताबडतोब लढाई संपवा अशी हाकाटी केली; आणि आक्टोबर प्रारंभाला या डेमोक्रॅटिक परिषदेनें तह जुळवून आणण्याकरितां एक पोट कमिटीहि नेमिली. मुख्यप्रधान एम्. केरेन्स्की यांचा कल भांडवलवाल्यापक्षाशी उघड विरोध करण्याकडे नसल्यामुळें त्यानी डेमोक्रॅटिक परिषदेला असें कळविलें कीं, दोनचार तरी भांडवलवाल्या पक्षाचे पुढारी प्रधानमंडळांत असल्याशिवाय

रशियाची अंतःस्थिति विशेष धोक्याची झाल्यावांचून राहाणार नाहीं व अशा स्थितींत आपण मुख्य प्रधानाचें काम करण्यास राजी नाहीं. तेव्हां एम. केरेन्स्की यांच्या हट्टावरून मास्कोचे दोन चार पुढारी बोलावून आणून प्रधानमंडळात त्यांना सामील करून घेण्याचें आक्टोबरच्या प्रारभीं ठरविण्यांत आलें. आक्टोबरच्या प्रारभीं रशियाची अंतःस्थिति थोडक्यात येणेंप्रमाणें दृष्टीस पडली. एक पेट्रोग्राडचा किंवा सोशियालिस्टांचा पक्ष, दुसरा मास्कोचा किंवा भांडवलवाल्यांचा पक्ष. सोशियालिस्टाच्या पक्षाला रणभूमीवरील सर्व सैनिक अनुकूल, तर भांडवलवाल्यांकडे स्वयंसेवकांचा व कोसॅक स्वारांचा ओढा. भांडवलवाले जर्मनीस जिंकण्याकरितां कंबर कसून बांधण्यास उत्सुक, तर सर्व सैनिक लढाईविषयी निरुत्साहानें व्यापलेले. सोशियालिस्टाचा ओढा जर्मनीवर जय मिळविण्याकडे विशेषसा नसून भांडवलवाल्याना राज्यसत्तेच्या मार्गांतून बाहेर हाकलून लावण्याकडे विशेष, अ णि या दोन तटामधील तटे विकोपास जाऊन आपसांत लढण्यापर्यंत पाळी पुनः केव्हा येईल याचा नियम नाही. अशा प्रकारच्या अंतःस्थ पेचात रशिया सर्व सप्टेंबर महिन्यात सापडलेला होता. रशियाच्या या अंतस्थ पेचामुळे एकट्या रशियाशीं स्वतंत्र तह जरी नाही तरी सर्वांचा मिळून ' त्वयार्धं मयार्धं ' असल्या अर्धवट स्वरूपाचा तह होण्याची वेळ जवळ आली आहे, असें जर्मनीस सप्टेंबरमध्ये वाटलें असल्यास त्यांस नवल नाहीं.

अशा प्रकारचा अर्धवट तह घडवून आणण्याच्या खटपटीस पोपसाहेबांनीं सप्टेंबर महिन्यात पुन्हा प्रारंभ केला, व पोपसाहेबाच्या उद्योगास जर्मनीच्या व ऑस्ट्रियाच्या बादशहानी व मुत्सद्यानी उघडपणें उत्तेजनहि दिलें. रशियाची जमीन कोपरानें खणण्याइतकी मऊ सांपडली म्हणून त्यांजवर जोराची चढाई केली असता चढाईमुळे अंतस्थ कलह विलयास जाऊन मऊ मऊ जमीन खडक बनण्याचा संभव आहे, हे जर्मनी पक्के ओळखून आहे. तेव्हा अंतस्थ कलहामुळे व लढण्याच्या बाबतींत रशियन सैनिकाना वाटत असलेल्या कंटाळ्यामुळे जर अर्धवट तहाचें फळ आपोआप पदरात पडण्यासारखें असेल तर ती संधि वाया जाऊ देण्याकडे जर्मनीचा सांप्रत ओढा नाहीं. आस्ट्रो–जर्मनाची सांप्रत स्थितीच अशी आहे कीं, येत्या हिंवाळ्यात जर अर्धवट स्वरूपाचा तह घडून आला नाही तर पुढील सालच्या वसंत कालानंतर अमेरिकेचें लाखो सैन्य व हजारो विमानें फ्रान्समध्ये आल्यावर दांती तृण धरून तहाची भिक्षा मागण्याशिवाय जर्मनीस गत्यंतर नाही. अशा प्रकारच्या अर्धवट तहास फ्रान्स व इटली अनुकूल नाहींत, पण हट्टानें विरोध करणारे नाहींत. पोप साहेबानीं चालविलेल्या वाटाघाटीवरून बेल्जम व फ्रान्सचा मुलूख सोडून

देण्यास आस्ट्रो–जर्मन तयार असून ट्रिस्टी बंदर, सर्व्हिया व रोमानिया याच्या संबधानेहि तडजोड स्वीकारण्यास ते तयार आहेत. रशियांत राज्यक्रांति झाली त्याच वेळीं नव्या रशियन सरकारनें स्वतःस काय पाहिजे, व काय नको हे उघड पणें जाहीर केले आहे. तेव्हा आस्ट्रो–जर्मनाचें व रशियाचें स्वतंत्रपणें आपसांत भागण्यासारखे आहे. या असल्या अर्धवट तहानें इटली व फ्रान्स यांचें प्रत्यक्ष नुकसान कांहींच नाहीं. जर्मनी, आस्ट्रिया, बल्गेरिया व तुर्कस्तान या चौकडीचा भारा मात्र असल्या तहाच्या रज्जूनीं घट्ट आवळला जाऊन इराण, आरबी समुद्र व इजिप्त ह्या तीन टापूसंबधाच्या त्याच्या महत्वाकाक्षा प्रज्वलित होणाऱ्या आहेत. तेव्हा असला अर्धवट तह होऊन जर वरील महत्वाकांक्षा उद्दीप्त झाल्या तर मुख्य नुकसान इग्रजी साम्राज्याचें व रशियातील भाडवलवाल्या पक्षाचें होणारें आहे. रशियातील भांडवलवाल्या पक्षास सोशियालिस्ट पक्ष सप्टेंबरात उघडपणें खाऊन टाकण्यास सिद्ध झाला आहे; व पुढील दोन तीन महिन्यात जर सोशियालिस्ट पक्षानें भांडवलवाल्या पक्षास पूर्णपणें खाऊन टाकले तर सोशियालिस्ट पक्षाच्या हट्टामुळे इंग्लडासहि, रणभूमीवर आपली सरशी असताना व पुढील साली जर्मनीची आपण खोड मोडू अशी मनाला खात्री वाटत असतानाहि, अर्धवट तहास आपली समति देणें कदाचित् भाग पडेल. रशियांतील सोशियालिस्ट पक्षानें भाडवलवाल्या पक्षास राज्यसत्तेतून दूर करू नये म्हणून, कटाळलेल्या रशियन सैन्यास उमेद यावी म्हणून, व पुढील सालच्या विजयाबद्दल कोणालाहि शका राहू नये म्हणून, आगस्ट महिन्याप्रमाणें सप्टेंबर महिन्यांतहि इग्रजानी बेल्जममध्ये यिप्रेसच्या टापूंत दोनतीन चांगले विजय जर्मनीवर मिळविले; आणि तोफखान्यात, पायदळाच्या मर्दुमकींत व विमानांच्या हल्ल्यांत जर्मनीवर इग्रजाची सरशी पूर्णपणें प्रस्थापित झाली. पोपसाहेबांच्या मध्यस्थीनें जर्मनीनें सुरू केलेले तहाचें बोलणें सफल होणें किंवा निष्फळ होणें हे रशियांतील सोशियालिस्ट व भाडवलवाल्या पक्षाच्या तटयावर अवलबून असल्यामुळे आक्टोबर महिना सपून हिंवाळ्याचा अम्मल युरोपखडभर सुरू होई तो, आपापसातील कलहात रशियात सोशियालिस्ट पक्षाचा विजय होवो असें चिंतीत जर्मनी पश्चिम रणागण कसेबसे सभाळून धरणार हे उघड आहे. तेव्हां आक्टोबर महिना एकदरीनें सप्टेंबर महिन्याच्या धर्तीचाच जाईल, हे सागणें नलगे.

———

# महायुद्धाचा चवथ्या वर्षाचा आक्टोबर-नोव्हेंबर महिना

सप्टेंबर महिन्याप्रमाणें आक्टोबर महिनाहि रशियासंबंधानें काळजीचा गेला आणि या काळजीत इटलीसंबंधाच्या दुःखदायक वार्तेची भर पडली. इटलीच्या पूर्व रणभूमीकडील इसांझो नदी व त्या नदीच्या तीरावरील डोंगराळ प्रदेशहि ओलांडून व्हेनीसच्या मैदानात आस्ट्रो-जर्मन सैन्य घुसलें. नोव्हेंबर महिन्यात सर्व व्हेनीसचा प्रांत आस्ट्रो-जर्मन सैन्य व्यापून टाकल्याशिवाय राहाणार नाही असें तज्ज्ञांचें मत प्रसिद्ध झालें आहे. इटलीच्या या पराभवामुळे पुढील सालच्या वसंतकाळीं अमेरिकेचें पांच दहा लाख सैन्य फ्रान्सच्या रणभूमीत उतरलें तरी जर्मन सेनेचा पुरा नाश होणें विशेषसें संभवनीय नाहीं. व्हेनीस प्रांत जर खरोखर आस्ट्रो-जर्मनांच्या हाती लागला तर १९१८ साली मिळावयाचा जय १९१९ सालच्या वसंतकाळानंतरच्या लढायांवर अवलंबून ठेवावा लागेल, यांत संशय नाहीं. इटलीचा हा आक्टोबर महिन्यांतील पराभव लष्करी धोरणाच्या दृष्टीनें फार मोठा आहे, व महायुद्धांतील दोन्ही पक्षांच्या लष्करी स्थितीवर त्याचे फार मोठे परिणाम झाल्यावाचून रहावयाचे नाहींत. गेल्या सालीं याच दिवसांत रोमानियाचा ज्या तऱ्हेचा पराभव झाला तसल्याच तऱ्हेचा हाहि पराभव आहे. लष्करी धोरणाच्या दृष्टीने पूर्व रणभूमीस रोमानियाच्या बुखारेस्टच्या मैदानाची जी किंमत होती तीच किंमत आज पश्चिम रणभूमीस व्हेनीसच्या मैदानाची आहे. रोमानियाचें मैदान गेल्यानें पूर्व रणभूमि लष्करीदृष्ट्या कमकुवत झाली व या कमकुवतपणाचा भलताच परिणाम रशियातील राजकीय परिस्थितीवर होऊन रशियांत राज्यक्रांति घडून आली. व्हेनीसचें मैदान जर आस्ट्रो-जर्मनांच्या हातांत गेलें तर त्या पालटलेल्या लष्करी स्थितीचा अनिष्ट परिणाम इटली व फ्रान्स येथील राजकीय वातावरणावरहि झाल्यावाचून रहाणार नाही. आतां दुसरा एक मोठा फरक या दोन्ही स्थितींत असा आहे कीं पश्चिम रणभूमीला इंग्लंड व अमेरिका या दोन बलाढ्य राष्ट्रांची प्रत्यक्ष मदत असल्यामुळे रशियातील राजकीय वातावरणाप्रमाणें पश्चिम रणभूमींतले राजकीय वातावरण तितकेसें बिघडणार नाहीं. इंग्लंड सांप्रत आपल्या लष्करी शक्तीच्या भर ज्वानींत आहे; आणि अमेरिकेनें तर अद्याप आपली लष्करी शक्ति उपयोगांतहि

आणलेली नाहीं. तेव्हां इटली व फ्रान्स या दोन देशांचे पाय जरी किंचित् लटपटूं लागले तरी त्यांच्या पायास स्थिरता येईतों त्यास सावरून धरण्यास एकटें इंग्लंड समर्थ आहे. इंग्लंड इटलीला सावरून धरील व पुढील सालच्या वसंतकाळची अमेरिकेची मदत इटलीचा हा पराभव धुवून काढण्यास पुरेशी होईल. अर्थात् जर्मनीच्या पराभवाचा बेत १९१९ सालावर टाकणें भाग आहे. इतर कारणामुळे मध्यंतरीं तह न झाल्यास इटलीच्या या पराभवामुळे महायुद्ध संपण्यास आणखी दोन वर्षे लागणार हे उघड आहे. ग्रीसचे मुख्यप्रधान एम्. व्हेनिझिलास हे नोव्हेंबर प्रारंभाला रोम शहरीं गेले असताना त्यांनीं वरील तऱ्हेचे उद्गार काढले. इंग्लंड व अमेरिका ही जोडी इतर कोणतीहि मदत नसली तरी महायुद्धात अखेरचें यश संपादन करून घेण्यास लायक आहे व तसा त्यांचा दृढनिश्चयहि आहे; तथापि महायुद्ध बराच काळपर्यंत लांबत राहाणार असें भविष्य एम्. व्हेनिझिलास यानीं वर्तविले. १९१८ सालच्या वसंतकाळीं अमेरिकेची मदत येऊन पोंचल्याबरोबर जर्मनीच्या जंगी पराभवास सुरुवात होईल असा अंदाज तज्ज्ञानीं एक महिन्यापूर्वी बांधलेला होता, तो अंदाज थंडीच्या मोसमाच्या प्रारंभीं अगदीं गारठून गेला. हे स्थित्यंतर इटलीच्या पराभवामुळे दृष्टीस पडलें. सेनापति मॅकेन्सन यांनीं ऑक्टोबर अखेरीस इटलीवर जो विलक्षण व अवचित जय संपादन केला त्याची हकीकत वाचकापुढे मांडण्यापूर्वी रशियाच्या रणभूमींत व फ्रान्सच्या रणभूमीत थोडासा फेरफटका करून येणें जरूर आहे.

आक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत रशियाच्या बाजूला जर्मनी मोठी हालचाल करतो किंवा कसें याविषयीं मोठी चर्चा तज्ज्ञात सुरू झाली होती. याचें कारण रिगाच्या आखाताच्या तोंडाशीं असलेल्या बेटावर जर्मन आरमारानें अकस्मात हल्ला करून तेथे सैन्य उतरविलें हे होय. सप्टेंबर महिन्यात रिगा घेऊन रिगाच्या टापूंत पन्नास साठ मैल पुढें सरकण्यास एक महिना होऊन गेल्यानतर रिगाच्या आखातांत जर्मन आरमारानें ही हालचाल केली. पेट्रोग्राडवर चाल करून जाण्याचा जर जर्मनीचा बेत असता तर ज्यावेळीं रिगा घेतले त्याचवेळीं आरमाराच्याहि हालचालीस सुरुवात झाली असती. पण तसें झालें नाहीं. आरमारांतील खलाशी लोकांवर सोशियालिस्ट मतांचा पगडा बसून दोन तीन लढाऊ जहाजावरील खलाशांनीं बंड केल्यामुळे जर्मनीस तसें

करतां आलें नाहीं. या आरमारी बंडामुळे पेट्रोग्राडवरील मोहीम जर्मनीस सोडून द्यावी लागली. याच्या उलट कांहींचें ह्मणणें असें पडलें कीं, पेट्रोग्राडवर चाल करून जाण्याचा बेतच जर्मनीचा नव्हता. हिंवाळ्याच्या बर्फापूर्वी रिगा बंदर व रिगाच्या आखातातील बेटेंहि काबीज करून स्वस्थ बसण्यापलिकडचें लष्करी धोरण जर्मनीनें आंखूनच ठेवलेलें नव्हतें. आरमारी बंडामुळे रिगाच्या आखातातील बेटें काबीज करण्यात जर्मनीस थोडा उशीर लागला इतकेच. आक्टोबरच्या दुसऱ्या व तिसऱ्या आठवड्यात रिगाच्या आखातातील सर्व बेटें जर्मनीनें आपल्या कब्जांत घेतलीं. आणि रिगाच्या आखातातून व फिनलंडच्या आखातातून जावयाचे समुद्राचे मार्ग जर्मनीच्या ताब्यात गेले. फिनलंडच्या आखातातील समुद्र डिसेंबर प्रारंभापासून गोठू लागतो व डिसेंबर अखेरीस रिगाचेंहि आखात बर्फमय होऊन जातें. तेव्हां फिनलंडच्या आखातात नोव्हेंबर महिन्यात जर्मनीच्या आरमारी हालचाली होण्यास सवड आहे. आक्टोबर महिन्यात रिगाच्या तोंडचीं बेटें घेत असतांना जर्मन आरमाराची व रशियन आरमाराची लढाई झाली. रशियाच्या आरमाराच्या मानानें जर्मन आरमार फार बलाढ्य असल्यामुळे ह्या लढाईत रशियाची निम्याहून अधिक जहाज बुडाली पण बाकीचीं जहाजे मोठ्या शिताफीनें फिनलंडच्या आखातांत निसटून गेली! जर्मनीचा हा आरमारी जय होऊन एक पंधरवडा झाला तरी फिनलंडच्या आखातात जर्मनीनें कांहींच हालचाल केली नाहीं. उलट रिगाच्या बाजूला ड्वीना नदी उतरून पलीकडे गेलेले सैन्य जर्मनीने ड्वीना नदीवर मागें परतवून घेतलें; आणि रिगाचें आखात व फिनलंडचें आखात याना जोडणाऱ्या खाडींत मून बेटाच्या समोर रशियाच्या भूमीवर उतरविलेलेंहि सैन्य जर्मनीने परत घेतलें. म्हणजे रशियाच्या बाजूला जर्मनीनें आपणहून ही पीछेहाट करून घेतली पण ही पीछेहाट केव्हा केली ? इटलीच्या बाजूचे लष्करी धोरण जेव्हां पूर्णपणें प्रकट झालें. तेव्हां ही पीछेहाट म्हणजे पेट्रोग्राडच्या मोहिमेचा आपण नाद सोडला असें जाहीर करण्यासारखेंच होय. रिगाचें बंदर घेतल्यापासून पेट्रोग्राडच्या नादानें जर्मनी त्या बाजूला कांहीं तरी मोठ्या उद्योगांत गुन्तलेला दिसत होता. खरा डोळा इटलीवर होता व मोठ्या खटाटोपाचा बाहेरचा देखावा पेट्रोग्राडच्या बाजूला होता. इसांझो नदीवरील इटलीची फळी फोडली जाईतो जर्मनी पेट्रोग्राडच्या स्वारींतच गुंग आहे असा बाहेरचा भपका दाखविण्यात येत होता.


पेट्रोग्राडपेक्षा इटलीकडे जर्मनीचें अधिक लक्ष कां असावें ? पेट्रोग्राडवरील स्वारीचें सोंग व खरी तयारी इटलीवरील स्वारी करण्यांची, यांत जर्मनीनें साधलें काय ? इटलीच्या व्हेनीस बंदराहून पेट्रोग्राडची काय कमी किंमत आहे ? ह्या प्रश्नांचा नीटसा खुलासा करावयाचा असल्यास आस्ट्रो-जर्मनांच्या राजकीय स्थितीचा विचार केला पाहिजे.

रशियातील राज्यक्रांतीनें सोशियालिस्ट मतांचा पगडा सर्व यूरोपखंडभर बसत चालला आहे. आस्ट्रो-जर्मन राज्यकर्त्यांची इच्छा ह्या मताला हाणून पाडण्याची आहे. आस्ट्रो-जर्मनांचा पुरा मोड जर या महायुद्धात झाला तरच रशियांतील सोशियालिस्ट पक्षाचा विजय सर्व युरोपखंडभर पसरेल. आस्ट्रो-जर्मन जर विजयी झाले, तर सोशियालिस्ट पक्षास उतरती कळा लागेल. विजयी होण्याची आशा आस्ट्रो-जर्मनांना आतां उरलेली नाहीं. कारण अमेरिकेपुढे एक वर्षानें नाहीं तर निदान आणखी दोन तीन वर्षांनीं तरी आपणास हार खावी लागणार हे ते पक्के ओळखून आहेत. अशा स्थितींत आपला विजय नाही झाला तर नाही, पण निदान पराभव तर झाला नाहीं, असें ठरवून घेऊन तह घडवून आणण्याच्या उद्योगात आस्ट्रो-जर्मन मुत्सद्दी-मंडळ गुंतलेलें आहे. अशा प्रकारच्या तहास रशिया बिलकूल विरुद्ध नाहीं. इतकेच नव्हे तर सर्वांचा मिळून तह होत असल्यास रशिया स्वतः चांगली झीजहि सोसण्यास तयार होईल. जर्मनीचा पुरा मोड होईतों तह करावयाचा नाहीं असा हट्ट रशियाचा नाहीं. हा हट्ट इटली, फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका यांचा आहे. या चौघांतहि इंग्लंडचा हा हट्ट विशेष आहे. फ्रान्स व इटली यांना अल्सास-लॉरेन्स व ट्रिस्टी हे प्रांत पाहिजे आहेत, पण रशियातील सोशियालिस्ट मताचा धक्का त्यांना आस्ते आस्ते जाणवू लागला असल्यामुळें इंग्लंडच्या हट्टाच्या अगोदर त्यांचा हट्ट विरघळू लागणारा आहे. तेव्हां स्वतः विजयी नाहीं तर नाहीं, पण निदान पराभूत तरी झालो नाहीं अशा स्थितींत जर जर्मनीला तह घडवून आणावयाचा असला तर इटली किंवा फ्रान्स या दोघांपैकीं, एकाला लुला करणें भाग आहे. गेले सात आठ महिने फ्रान्स इतक्या शौर्यानें लढलें आहे कीं, फ्रान्सवर विजय संपादन करून फ्रान्सला लुला करणें शक्यच नाहीं हें जर्मनीला पक्के कळून चुकलें आहे. इंग्लंडचें सैन्य तर स्वतःच्या बलातिशयामुळे विजयश्रीनें आतां नटू लागलें आहे. तेव्हा इंग्लंडला हात दाखविण्याची कल्पनाच जर्मनीच्या डोक्यांत येणें शक्य नाहीं. इंग्लंडनें जर्मनीवर पाणबुड्या बोटी सोडल्या आहेत, जमिनीवर

इंग्रजाचा समाचार घेण्याची महत्वाकांक्षा जर्मनीनें धरलेली नाहीं. तेव्हां राहाता राहिला विचारा इटली. गेल्या साली ट्रेंटिनो प्रांतांतून इटलीच्या व्हेनीसच्या मैदानावर उतरण्याचा प्रयत्न आस्ट्रियानें केला होता. पण त्यांत आस्ट्रियास यश आलें नाहीं. यंदा आगस्ट-सप्टेंबर महिन्यात इटलीनें इसांझोच्या टापूंत आस्ट्रियास बरेच मागे रेटलें, आणि कार्सोचा टापू ओलांडून ट्रिस्टी घेण्याच्या रगांत इटली आला. आस्ट्रियाला इटलीने गेल्या दोन वर्षांत बराच मार दिला खरा, पण जर्मनीची दृष्टि इतक्या दिवस इटलीकडे वळलेली नव्हती. आपण विजयी झालेलो आहो, आता हिंवाळ्याच्या प्रारंभीं आस्ट्रिया आपल्याकडे कसचा वळणार, अशा घमेंडींत यावेळी इटली होता. असली घमेंड इटलीला वाटणें साहजिक होय. कारण, आगस्ट-सप्टेंबरांत आस्ट्रियावर इटलीनें तसले विजय मिळविलेले होते. या घमेंडीमुळे हिंवाळ्यातील लढाईकडे दुर्लक्ष करून इटली अंतस्थ कलहाचा अधिक विचार करीत होता. इटलींतील सोशियालिस्ट पक्षानें हा अंतस्थ कलह उत्पन्न केला होता. रशियात ज्याप्रमाणें लवकर तह करा म्हणणारा सोशियालिस्टामध्ये एक पक्ष आहे त्याप्रमाणें इटलीमध्ये देखील ह्या हिंवाळ्यात तह झालाच पाहिजे असे उघडपणे प्रतिपादन करणारा एक पक्ष आहे. या पक्षात बरेच वजनदार पुढारी असून मजुराची व सामान्य सैनिकाचीं मने या पक्षाने कलुषित केलीं आहेत. महायुद्धात इटली सामील झाला त्यावेळीं सर्व पक्ष युद्धास अनुकूल होते; पण अंदाजाबाहेर युद्ध लांबल्यामुळे सोशियालिस्ट पक्ष युद्धास कंटाळून रशियांतील सोशियालिस्टाच्या नव्या मतानी पछाडला गेला.

याप्रसंगीं जर्मन हेरांनीं इटलींतील वरच्या वर्गाची नालस्ती करण्याचे काम झपाट्यानें चालविलें. इग्लंडांतील व अमेरिकेतील कोटयाधीशांच्या फायद्या-साठीं हे युद्ध पुढे चालविण्यांत आलेलें आहे, सामान्य जनतेचें हित यात कांहीं नाही, असें मजुराच्या मनावर बिंबविण्याची ही संधि जर्मन हेरांनी वाया जाऊ दिली नाहीं. वरील तऱ्हेचीं मते सोशियालिस्ट पक्षाच्या पुढा-ऱ्यानीं उघडपणें अंगिकारिली व त्याचा फैलाव करण्याचा झपाट्यानें उद्योग चालविला. सोशियालिस्टाची ही चळवळ देशद्रोही व राजद्रोही असून त्याच्यावर खटले करून ती बंद पाडली पाहिजे अशा तऱ्हेचा वादविवाद इटालियन पार्लमेंट मध्ये मोठया कडाक्यानें झाला; आणि या आत्मघातकी चळवळीकडे दुर्लक्ष केल्या-

बद्दल इटलीच्या प्रधानमंडळाला आपल्या जागा सोडाव्या लागल्या. इटलीनें इसाझोच्या रणभूमींत मोठा जय मिळविला असतांना लगेच सोशियालिस्टांची ही चळवळ सुरू झाली. त्याचें कारण असें कीं, पोप साहेबांनीं तहाची मध्यस्थी आरंभिली असतांना इटलीनें ती मध्यस्थी उचलून धरिली नाहीं. जर्मन हेरांच्या-बरोबर पोप साहेबांच्या रोमन कॅथोलिक संप्रदायाच्या धर्माधिकाऱ्यांचाहि पाठिंबा तहवाल्या सोशियालिस्टाना मिळाला. तहासंबंधानें राष्ट्रांत अशी दुही माजल्यामुळें रशियाप्रमाणें इटलीहि लष्करी दृष्टया कमकुवत होतो कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. ही भीति नाहींशीं करण्याच्या कामीं आक्टोबर महिन्यांत इटलीचे मुत्सद्दी व सेनानायक गुंतलेले होते. आस्ट्रियावर त्यांनीं नुकताच जय मिळविला होता आणि आस्ट्रियाची लढण्याची शक्ति खालावत चालली आहे हें त्यांच्या अनुभवास आलें होतें. इच्छेस येईल त्यावेळेला एकदोन आठवडयाच्या प्रयत्नांनीं ट्रिस्टी बंदर आपण आस्ट्रियापासून हिसकावून घेऊं अशी धमक त्यांना वाटत होती. ट्रिस्टी बंदर घेणें म्हणजे मोठेसें काम नव्हे, तें आपण हां हां म्हणतां पार पाडून टाकू, पण इटलींत जर पुन्हां पहिल्यासारखा एकोपा उत्पन्न झाला तर आस्ट्रियात शिरून व्हिएन्नास तंबी देऊन, जे यश संपादण्याची इच्छा झारचा सेनासागर करीत होता तें यश आपण मिळवू व महायुद्धाची परिसमाप्ति करण्याचा मान इटलीला मिळवून देऊं, अशा तऱ्हेच्या महत्त्वाकांक्षेत इटालियन सेनानायक व मुत्सद्दी गुंग झाले होते. या महत्त्वाकांक्षेचीं स्वप्नें त्यांना वृथा पडत होतीं अशांतला भाग नाहीं. गेलीं तीन वर्षे इटलीनें खरोखरच मोठी करामत करून दाखविली. तीन वर्षांत या चिमुकल्या राष्ट्रानें चाळीस लाख जवानांची भरती सैन्यांत केली, अवजड तोफा ओतणारे नवे प्रचंड कारखाने काढले, स्वतःचे सैन्यास पुरवून इतरांचेहि सैन्यास मदत करतां येईल इतकीं नवीं विमानें स्वतः बांधिली. शेकडो मैल लांबीचे आगगाडीचे फाटे तयार केले आणि शे-दोनशे ठिकाणीं नवे पूल निर्माण केले. इटलीला स्वतःच्या करामतीची घमेंड कां वाटू नये ? गेल्या सालच्या ट्रेंटिनोच्या पहिल्या धडकीशिवाय इतर सर्व ठिकाणीं व सर्व वेळीं इटलीनें आस्ट्रियाला मागेंच रेटलें. पण रशियन राज्यक्रांतिमुळें ह्मणा, लढाई फारच दिवस रेंगाळल्यामुळें ह्मणा, किंवा पोपसाहेबांच्या मध्यस्थीच्या उचलीमुळें ह्मणा, अंतस्थ फाटाफुटीस सुरुवात झाली. ही अंतस्थ फाटाफूट नाहींशीं केली की


आ स्ट्रि या
मिलन

पुढील सालच्या वसंतकाळीं आपण विजयाच्या शिखरास पोंचलों असें सप्टेंबर आक्टोबर महिन्यांत इटालियन मुत्सद्यांना व सेनानायकाना वाटल्यास नवल कोणतें ? सप्टेंबर महिन्यात आस्ट्रियावरील विजयानतर रणभूमीला विसावा देऊन थंडीचा मोसम अतस्थ कलहाचें मूळच उपटून टाकण्यांत खर्ची घालण्याचा त्यांनीं निश्चय केला. या अतस्थ कलहाची हिंवाळ्याची रात्र निघून जाईल आणि पुढच्या वसतकाळीं विजयाची कमलिनी फुलल्यावर आपण अंतस्थ कलहांतून आनदानें बाहेर पडूं अशा समजुतीनें निरनिराळया पक्षाच्या निरनिराळ्या पाकळयाच्या कोंडमाऱ्यांत स्वतःचा कोंडमारा करून घेणारा इटलीचा लष्करी भ्रमर हिंवाळ्याची रात्र सपेपर्यंत आपणांस भीति नाहीं असें मानीत रणभूमीकडे दुर्लक्ष करीत असताना "हा हत हन्त नलिनीं गज उज्जहार" अशी इटलीची स्थिति करण्याचा घाट जर्मनीनें घातला !

इटलीच्या अतस्थ कलहानें जर्मनीचें लक्ष इटलीकडे वेधलें. रशियांतला अंतस्थ कलह परिपक्व होऊन नासायला कुजायला लागलेला; रशियाचा सडलेला भाग रशियांत दुसरी राज्यक्राति होऊन कापला गेल्याशिवाय रशियांस लढणारे रक्त उत्पन्न होण्याची शक्यता नाही असे सर्वाच्या निदर्शनास येत चाललेलें; तेव्हा रशियास तसाच कुजत ठेवून कीड लागलेल्या इटलीकडे वळून रोमानियासारख्या एखाद्या मोठया विजयानें अतस्थ कलहाचें करट पिकवून रशियाप्रमाणें इटलीसहि महायुद्धात असून नसल्या सारखा करण्याची हांव जर्मनीनें धरली. रशियाच्या पेट्रोग्राडवर चाल करून जाण्यात जर्मनीला काय मिळणार ? पेट्रोग्राड पडल्यानें अतस्थ कलह एकदम मिटला असता आणि रशियातील सोशियालिस्ट लोकाच्या हातातील राज्यसत्ता सग्रही धनिकांच्या मध्यम वर्गाच्या हातात जाऊन सग्रही धनिकांचें मास्कोचें सरकार पेट्रोग्राड येथील सोशियालिस्टांच्या कामकरी व सैनिकांच्या कमिटीहून जर्मनीस अधिक भीतिदायक झालें असते. हिंवाळ्याच्या प्रारभाला रशियाची आज स्थिति काय आहे ? पेट्रोग्राड येथील लष्करी अंमलदारांनीं जाहीर केलें आहे कीं, रशियाचें लष्कर हयातींतच नाहीं असें मानण्यास हरकत नाही. दुप्पट, तिप्पट, पांचपट, दहापट मजुरी मजूर मागूं लागले आहेत, त्यामुळें सर्व उद्योगधदे बद पडण्याच्या बेतात आहेत. शेतकरी धान्य दाबून बसल्यामुळे आणि आगगाडयाचेंहि संप होऊं लागल्यामुळें दुष्काळाचें उग्र स्वरूप चोहोंकडे दिसूं लागलें आहे. रणमैदानावर

गोळा केलेल्या लोकांना दाणावैरण पुरविण्याची पंचाईत पडूं लागल्यामुळें उपास-मारीनें वैतागलेले सैनिक पोट भरण्याकरितां खेडोपाडीं लुटींत स्वतःच्या घरचा रस्ता सुधारतात कीं काय असें भेसूर चित्र रशियांतील ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध सेनानायकांना दिसूं लागलें आहे. तेव्हां रशियावर स्वारी करण्यापेक्षा स्वारी न करण्यानेच रशिया अधिकाधिक लुला होणार अशी खूणगांठ जर्मनीनें बांधिली. पण पुढील वसंतकाळीं अमेरिकेची मदत यावयाच्यावेळीं रशिया अधिक लुला न होतां जशाचा तसाच जर राहिला तर काय करावयाचें ? अमेरिकेचीं मदत येऊन पोहोचेपर्यंत स्वतःच्या लष्कराचा उपयोग करून कोठली तरी लष्करी शक्ति नष्ट करून अमेरिकेच्या मदतीच्या तोडीस तोड कशी द्यावी या विवचनेंत जर्मनी होता इतक्यांत रशियांतील सोशियालिस्टांचा चेला होऊं लागलेल्या इटलीकडे जर्मनीचें लक्ष गेलें, आणि गुरूला सोडून देऊन शिष्याला खाऊन टाकण्याचें जर्मनीनें योजिलें. गुरु अगडबंब व विस्तीर्ण. कितीहि खाऊन टाकला तरी पचायला कठीण आणि पुन्हां जशाचा तसाच मोठा शिल्लक ! शिष्य आटपशीर, चिमुकला आणि तसाच मोठा ' आ ' केला असतां दोन घासांत सहज खाऊन टाकतां येण्यासारखा. शिवाय या रोगाची सांथ शेजारधर्माप्रमाणें फ्रान्सच्या दक्षिण प्रांतांत सहज फैलावणारी ! असा अनुकूल योग पाहून आक्टोबर–नोव्हेंबर महिन्यांत रुमानियाच्या धर्तीवर इटलीला टोला देण्याचा निश्चय जर्मनीनें केला व सेनापति मॅकेन्सन यांना त्या कामगिरीवर नेमिलें.

सेनापति मॅकेन्सन यानीं आक्टोबरप्रारंभापासून सुमारे तीन लाख नवें सैन्य इसाझो टापूमध्ये आणिलें. कोणी म्हणतात, तीन लाख आणिलें नसून एक लाखच आणिलें. पण इटलीवर सेनापति मॅकेन्सन यांनीं जो विजय संपादन केला त्याकडे पाहतां तीन लाख सैन्य आणल्याची बातमी अधिक विश्वसनीय दिसते. पेट्रोग्राडच्या स्वारीची नुसती हूल यावेळीं जर्मनीनें उठविली होती, आणि रिगाच्या आखातांत बेटें घेण्यात जर्मनी गुंतला असल्यामुळें या हुलेवर दोस्त सरकारांचा विश्वास बसला असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. पेट्रोग्राडवर जर्मनीला चालून जातां येऊं नये म्हणून इंग्लडनें व फ्रान्सनें सर्व आक्टोबर महिन्यांत यिप्रेस नदीच्या टापूंत व ऐन नदीच्या काठीं जर्मनीवर मोठमोठे हल्ले केले. या हल्ल्यांत इंग्रजांना व फ्रेंचांना चांगलें यश आलें व जर्मनी मागें रेटला गेला. आक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यात तर काहीं महत्त्वाचीं ठाणीं आपण होऊन सोडून देऊन फ्रान्सपुढें जर्मनीनें बऱ्याच महत्त्वाची माघार घेतली. ॲंग्लो–फ्रेंच पश्चिम रणभूमींत जर्मनीचा चांगला समाचार

घेत असलेले आणि जर्मनी पेट्रोग्राडवर चालून जाण्याचा बहाणा करीत असलेला; अशा स्थितींत आपल्यावरच मोठी मोहीम होणार आहे असें दुष्ट स्वप्न इटलीला कोठून पडणार ! शत्रूच्या हालचालीवर टेहळणी ठेवण्याच्या कामीं इटालियन सेनानायकांची हेळसाड झाली, आणि सेनापति मॅकेन्सन यांना रशियाच्या बाजूचें मोठें सैन्य गुपचुपपणें इटलीच्या रणभूमींत आणता आलें. तारीख २३ आक्टोबर रोजीं इसांझ च्या टापूंत उत्तरेस अपारेटोच्या पर्वतापासून ट्रिस्टीच्या समुद्रापर्यंत एकदम तोफांचा भडिमार सेनापति मॅकेन्सन यानीं सुरू केला. अपारेटोपासून गार्जियापर्यंत इटलीचें दुसरें लष्कर उभे होतें. या दुसऱ्या व तिसऱ्या लष्करात मिळून इटलीचें निवडक दहा लाख सैन्य होतें, आणि इटलीजवळच्या तोफांचा मुख्य जमाव याच ठिकाणीं होता. दुसऱ्या व तिसऱ्या या दोन्ही लष्करांवर सेनापति मॅकेन्सन यानीं एकदम तोफांचा भडिमार सुरू केला खरा; पण अपारेटो व टालमिनो या दोन ठिकाणीं तोफा इटलीच्या वीसपट व सैन्य दसपट एकवटून ता. २४ रोजीं इसांझो नदी उतरून इटलीची फळी फोडली. ही फळी फुटतांच इसांझो नदीच्या पैलतीरावर दहा बारा मैल रुंदीचा टेकडाळ प्रदेश ओलांडून मैदानाजवळचें शिविडेल स्टेशन लाख दोन लाख आस्ट्रो–जर्मनांनीं गांठलें. इटलीत घुसलेला आस्ट्रो–जर्मनाचा लोंढा मोठा असून तो मैदानावर पसरू लागला आहे व त्यास पांच दहा मैलांवर आवरून धरतां येणें शक्य नाहीं असें पहाताच इटालियन सेनानायकानीं दुसऱ्या व तिसऱ्या लष्करास शत्रूनें पिछाडी ग्रासण्यापूर्वी मागे परतण्याचा हुकूम दिला. शिविडेलपासून आस्ट्रो–जर्मनानीं एकदम उडाईन जक्शनाचें स्टेशन गाठलें. इसांझोच्या रणभूमीच्या पिछाडीस जी इटलीची मुख्य आगगाडी आहे त्या आगगाडीचें केंद्रस्थान म्हणजे उडाइनचें जक्शन स्टेशन होय. सेनापति मॅकेन्सन यांनीं हें जक्शन स्टेशन गाठल्यामुळें इलीच्या दुसऱ्या व तिसऱ्या लष्करांस सुरक्षितपणें माघार खावयास सांपडते कीं नाहीं याविषयीं शंका उत्पन्न झाली; पण इटालीयन सैन्यानें इतक्या जलदीनें व शिताफीनें मागे पाय घेतला कीं, अवघ्या दोनतीन दिवसांत काहीं ठिकाणीं चाळीसपन्नास मैल तर काहीं ठिकाणीं पञ्चवीस तीस मैल मागे सरून उडाईन जंक्शनच्या पश्चिमेस १७ मैलांवर असलेल्या टॅग्लीमेंटो नदीच्या पलीकडे सर्व इटालियन सैन्य नोव्हेंबर प्रारभाला जाऊन पोंचलें ! या पीछेहाटींत हजार तोफाना व एक लाख सैन्याला इटली मुकला असें म्हणतात. नोव्हेंबरच्या प्रारंभाला टॅग्लीमेंटो नदीचा आश्रय

घऊन इटालियन सैन्यांत पुन्हां व्यवस्था उत्पन्न करण्यांत आली, पण टॅग्लीमेंटो नदी उत्तर टापूत ओलांडून या इटालियन सैन्याची डावी बगल पुन्हां मागें रेटण्याचा उपक्रम आस्ट्रो–जर्मनांनीं सुरू केल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. शिवाय इटलीच्या पाचर मारल्याप्रमाणें असलेल्या ट्रेंटिनो प्रांतांतील आस्ट्रो–जर्मन सैन्यानें हालचाल सुरू केल्याचें प्रसिद्ध झालें आहे. ट्रेंटिनो प्रातांतील आस्ट्रो–जर्मन सैन्य दोन दिशांनीं हालचाल करीत आहे. एक पश्चिम बाजूनें लोंबार्डीच्या मैदानाच्या रोखानें व दुसरी पूर्व बाजूनें व्हेनीसच्या रोखानें. यापैकीं कोणचीहि हालचाल यशस्वी झाली तरी इसाझोच्या फळी फुटण्याइतकेंच दुसरें मोठें संकट इटलीवर कोसळणारें आहे. लोंबार्डीच्या मैदानात आस्ट्रो–जर्मन घुसले तर इटलीचा व फ्रान्सचा संबंध तुटेल व सर्व इटलीला आस्ट्रो–जर्मन्स महिना दीड महिन्यांत खाऊन टाकतील. अर्थात् लोंबार्डीच्या बाजूला आस्ट्रो–जर्मनांना इटली कधींहि मैदानांत उतरू देणार नाहीं हें उघड आहे. लोंबार्डीचें संरक्षण करावयाचें, आणि ट्रेंटिनो येथून व्हेनीसच्या मैदानांत उतरून टॅग्लीमेंटोच्या कांठच्या इटालियन सैन्याची पिछाडी ग्रासू इच्छिणाऱ्या आस्ट्रो–जर्मनांना ट्रेंटिनो प्रांतांत डांबून ठेवावयाचें, हीं दोन कामे इटालियन लष्कराला सांप्रतच्या स्थितींत बरीच जड जाणारीं आहेत. शिवाय पराभूत झालेल्या सैन्यानें डावी बगल उघडी ठेवून विजयी शत्रूशीं तोंड देणें मोठ्या जोखमीचें काम आहे.

या सर्व अडचणी ओळखून इटालियन सैन्य व्हेनीसच्या दक्षिणेस ॲडिज नदीच्या पलीकडे जाऊन पोंचेपर्यंत इटलींत सुरक्षितपणा नाहीं असें तज्ज्ञांचें मत बनलें आहे. ट्रेंटिनोच्या टापूंत कांहीं आगलट न आल्यास दोनतीन आठवड्यात व्हेनीस प्रांत व्यवस्थेनें सोडून ॲडीज नदीच्या पलीकडे इटालियन सैन्य सुरक्षित जागीं जाऊन बसेल असा अंदाज आहे. सेनापति मॅकेन्सन यांच्या या वज्राघातानें इटलीचें अत्यंत नुकसान झालें ही गोष्ट खरी, पण त्यांतल्यात्यांत समाधानाची बाजू अशी आहे कीं ह्या पराभवामुळें इटलीचा अंतस्थ कलह एकदम मिटला आहे, आणि नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यांत इंग्लंड व फ्रान्स इटलीच्या मदतीस धावून गेल्यामुळे ॲडिज नदीच्या दक्षिण तीरीं, इटालियन सैन्याला हिंवाळ्यांत विश्रांति मिळून पुढील वसंतकाळीं इटली पुन्हां ताजातवाना होण्यास कांहीं हरकत नाहीं, असा विश्वास दोस्त सरकारांच्या मुत्सद्यांना वाटूं लागला आहे.

# महायुद्धाचा चवथ्या वर्षाचा नोव्हेंबर-डिसेंबर महिना

रशियांत राज्यक्रांति झाल्यापासून जी गोष्ट होईल म्हणून सर्वांस मोठी भीति वाटत होती,ती गोष्ट नोव्हेंबर महिन्यांत घडून आली. सोशियालिस्ट वर्गापैकी लेनिन-प्रभृति तहवाल्यांच्या हातांत पेट्रोग्राडची राजसत्ता जाऊन मुख्य प्रधान केरेन्स्की व त्याचें प्रधानमंडळ यांना अधिकारावरून काढून टाकण्यांत आलें. फिनलंडच्या आखातांतील जहाजावरील लेनिनचे अनुयायी पेट्रोग्राड शहरांत शिरले, व त्यानीं राजसत्ता आपल्या हातांत घेण्यास सुरुवात केली. त्यावेळीं नव्या सरकारनें नेमिलेलें पेट्रोग्राड शहराचें रक्षक सैन्यहि त्यांना मिळालें; आणि केरेन्स्की व प्रधानमंडळ यानी पेट्रोग्राड शहरांतून पळ काढला. पुढे केरेन्सी यांनीं कांहीं कोस्याक सैन्य मदतीला बोलावून पेट्रोग्राड शहरावर चाल केली. केरेन्स्कीचें सैन्य व लेनिनचें सैन्य याच्या दोनतीन लढायाहि झाल्या. या लढायात केरेन्स्कीच्या सर्व प्रधान-मंडळाचा लेनिननें कैद करून पेट्रोग्राड शहरीं आणलें. मास्को शहरांत व आस-पासहि लेनिन व केरेन्स्की या दोन पक्षांमध्यें बऱ्याच झटापटी झाल्या. मास्कोच्या लढाईत हजारों लोक बळी पडले, व मास्को येथील देवालयांवरहि तोफाचा भडि-मार करण्यांत आला. अशा रीतीनें आपसांत एकदोन आठवडे लढाया झाल्यावर मास्को व पेट्रोग्राड या दोन प्रांतात म्हणजे रशियाच्या मुख्य भागांत लेनिनच्या पक्षाची सत्ता प्रस्थापित झाली.रणभूमीवर उभे असलेले उत्तरेकडील व मध्याकडील अशीं दोन्ही सैन्यें लेनिनच्या पक्षाला मिळालीं. दक्षिणेकडील म्हणजे गॅलिशिया व रोमानिया या बाजूचें सैन्य मात्र डिसेंबर प्रारंभापर्यंत लेनिनच्या पक्षाला मिळालें नाही. केरेन्स्की यांनीं नेमिलेले मुख्य सेनापति व त्यांचें अधिकारी मंडळ यांनीं लेनिनची सत्ता स्वीकारण्याचें नाकारलें. तेव्हां पेट्रोग्राड येथून सैन्याची एक तुकडी त्याजवर पाठविण्यात आली व त्यास पकडण्यांत आलें. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात पेट्रोग्राड शहरीं लेनिननें राज्यक्रांति केली. तिची सत्ता नोव्हेंबर अखेरीस उत्तर व मध्य रशियांत स्थापित होऊन रणभूमीवरील दोन तृतीयांशाहून अधिक सैन्य या सत्तेला वश झालें.केरेन्स्की मात्र पळून गेले ते मिळाले नाहीत. त्याप्रमाणें अटकेत असलेले सेनापति कॉर्निलॉफ डिसेंबर प्रारंभाला पळून गेल्याची बातमी आली आहे.

दक्षिणेकडील कीव्ह ओडेसा प्रांतांतील लोकांनीं आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें आहे. ह्या प्रांताच्या पूर्वेस असलेल्या डॉन नदीकांठच्या टापूत कोस्याक लोकांची वस्ती असून सेनापति कॅलेडीन यांनीं तो प्रांत बळकावला असून त्यांच्या ताब्यांत असलेल्या कोळशाच्या खाणींतून मास्को व पेट्रोग्राड येथे कोळसे पाठविण्याचे त्यांनीं बंद केलें आहे. सैबिरिया प्रांतानेंहि आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें असून सैबेरियांत नवीन राजसत्ता निर्माण होऊं लागली आहे. आपल्या हातीं सत्ता येण्याबरोबर जर्मनीशीं स्वतंत्र तह करण्याचा उपक्रम या सोशियालिस्टांनीं केला. झारची सत्ता नष्ट होऊन केरेन्स्कीचें नवें सरकार रशियांत उदयास आलें त्यावेळेपासून ‘ लढाई थांबवा ’ म्हणूनच या पक्षानें एकसारखी ओरड आरंभिली होती. संग्रही मध्यम वर्गा-वाचून रशियांत नवी राजसत्ता टिकाऊ होणार नाहीं, असें केरेन्स्की यांचें मत पडल्यामुळें ती ओरड त्यावेळीं दाबून टाकण्यांत आली. तथापि त्या ओरडीचा परिणाम सैन्यावर व्हावयाचा तो झालाच; आणि गॅलिशिया व बुकोव्हिना येथील लढायांत रशियाचा पराभव झाला. त्या पराभवाचा फायदा घेऊन, रशियन सैन्य व रशियन लोक सोशियालिस्ट पक्षाला कंटाळलेले आहेत असें समजून सेनापति कॉर्निलॉफ यानीं पेट्रोग्राड येथे संग्रहवाल्या मध्यम लोकांची सत्ता स्थापण्याचा उद्योग केला. पण त्या उद्योगांत त्यांना यश न येतां केरेन्स्की यांच्या अटकेत त्याना सांपडावें लागलें. सेनापति कॉर्निलॉफ यांच्या पराभवानन्तर केरेन्स्की यांचें एकचक्री राज्य झाले. पण रिगाच्या आखातांत जर्मन आरमार शिरून रिगाच्या आखातांतील बेटें जर्मनीनें घेतल्यामुळें ‘ लढाई बंद करा ’ या ओरडीकडे पेट्रोग्राड शहरांतील सामान्य लोकांचें लक्ष अधिक वेधलें गेलें. अर्थात् पेट्रोग्राड शहराची शिबंदी केरेन्स्कीच्या पक्षापेक्षा लेनिनच्या पक्षाला अधिक अनुकूल झाली. ही संधि साधून फिनलंडच्या आखातांतील खलाशांची मदत घेऊन लेनिननें केरेन्स्कीवर मात केली. रशियांतील लोकांना लढाईचा आलेला कंटाळा व सोशियालिस्ट पक्षाला संग्रही मध्यम वर्गाच्या हातांत सत्ता जाते कीं काय म्हणून वाटत असलेली भीति या दोन पायावर लेनिनची सत्ता आज उभी आहे. अर्थात् ही सत्ता कायम टिकण्यास जर्मनीशीं होईल तितक्या लवकर तह घडवून आणणें लेनिनला इष्ट आहे. पेट्रोग्राड येथें लेनिनची सत्ता स्थापित झाल्याबरोबर जर्मनीशीं तहाचें बोलणें सुरू झाले व तारीख २ डिसेंबर रोजीं प्रिन्स लिओपोल्ड यांच्या गोटांत रशियांच्या

तर्फेचे वकील तहाचें बोलणें चालणें करण्यास दाखलहि झाले. तारीख दोन डिसेंबरपासून उत्तर लष्कर व मध्य लष्कर यांच्यामधील टापूपर्यंत गोळीबार बंद झाला असून दोहोबाजूच्या सैन्याचें एकमेकांशीं दळणवळण सुरू झालें आहे; व तहाची वाटाघाट फिसकटल्यास दोन दिवसांची आगाऊ सूचना दिल्याशिवाय कोणी कोणावर हत्यावर उचलावयाचें नाहीं असें ठरविण्यांत आलें आहे. डिसेंबर प्रारंभापासून रशिया व जर्मनी यांच्यामध्यें सुरू झालेल्या या तहाच्या वाटाघाटीचा शेवट काय होणार ? तह होणार का तह फिसकटणार ? रशियाला तह पाहिजे आहे; जर्मनीलाहि या तहावांचून सांप्रत गत्यंतर नाही. पुढील एकदोन वर्षांत रणभूमि नुसती पकडून जरी रशिया उभा राहिला तरी जर्मनीचा पराभव खात्रीनें होणारा आहे. तेव्हां हा पराभव चुकविण्याकरितां रशियाशीं कसेंहि करून तह करणें जर्मनीला भाग आहे. जर्मन पार्लमेंटमध्ये या तहासंबधानें बोलतांना जर्मन मुख्य प्रधानानें असें जाहीर केलें आहे कीं, रशियाविषयी सदिच्छा मनांत बाळगूनच आम्हीं हा तह करू व रशियाच्या आशिया खंडांतील हितसंबधाकडेहि दुर्लक्ष करण्यांत येणार नाहीं. याचा अर्थ असा कीं, रशियास अपमानास्पद होईल असला तह रशियावर लादण्याची जर्मनीची इच्छा नाहीं. रशियाकडून खंडणी घेण्यात येणार नाहीं हें उघड आहे. रशियांतल्या सांप्रतच्या अधिकाऱ्यापाशीं एक दिडकीहि नाहीं. तेव्हां खंडणी देणार तरी कोण आणि घेणार तरी कोण ? उलट जर्मनीलाच लेनिनचा खर्च चालवावा लागेल. आतां राहिली प्रांताची वाटणी. जर्मनीला पोलंड, कोर्लंड व रिगाच्या आखातांतील बेटे ही स्वतःच्या सत्तेखालीं पाहिजे आहेत. पण अशा रीतीनें मुलूख तोडून देणें हें रशियातील सामान्य लोकांनाहि अपमानास्पद वाटण्याचा संभव आहे. असले अपमान शब्दाच्या अवडंबराखालीं झाकून टाकण्याची युक्ति जर्मनीला पूर्णपणें अवगत आहे. पोलंड, रिगाचा टापू व रिगाचीं बेटे या प्रांताचें स्वातंत्र्य तहाच्या अटींत रशिया कबूल करील; आणि हें स्वातन्त्र्य अबाधितपणें राखण्याची हमी जर्मनीहि घेईल. मात्र या पूर्ण स्वतंत्र झालेल्या देशांना जर्मनीशी पाहिजे तसा तह करण्याची मुभा मिळेल. हे प्रदेश सांप्रत जर्मनीच्या ताब्यांत आहेत आणि स्वतःचा ताबा सोडून तेथे नवीन स्वतंत्र सरकार निर्माण करण्याचें कामहि जर्मनीच्या हातून झालें पाहिजे असें ठरविण्यांत येईल. अर्थात् हीं नवीन स्वतंत्र

सरकारें जन्मास येतांनाच जर्मन तहाच्या अटी ऊर्फ बंधनाच्या अटी त्यांच्या पायांत पडतील. कोर्लंड व पोलंड यांचीं स्वतंत्र राज्यें होऊन जर्मनीची सावली मात्र त्याच्यावर कायम राहील. अशा प्रकारचें स्वातंत्र्य या दोन प्रदेशास मिळाल्यास आपला अपमान झालासें रशियांतील सामान्य लोकांस वाटणार नाहीं.लेनिन प्रभृतींचें असें मत आहे कीं, रशियांतील पाहिजे त्या टापूनें स्वतःच्या इच्छेनें स्वदेशास स्वतंत्र करून घेतल्यास त्या गोष्टीस त्यांची आडकाठी नाहीं. बाहेरच्या लोकांनीं जबरदस्तीनें कोणी कोणास परतंत्र करूं नये म्हणजे झालें. तेव्हा कोर्लंड व पोलंड येथे स्वातंत्र्याचा बाहेरचा देखावा जर्मनीनें उभा केल्यास रशियाकडून तहाचें बोलणें फिसकटणें सांप्रत शक्य नाहीं. टर्कीचा कोणताच प्रांत रशियास नको आहे तेव्हां कॉकेसस्च्या बाजूला रशियानें व्यापलेला टर्कीचा भाग तहामध्ये सोडून देण्यास रशिया तयार होईल हे सांगणें नकोच. अशा रीतीनें तहाच्या अटीसबंधानें विचार केला असतां आणि दोन्ही पक्षाची तहाविषयीची आतुरता लक्षात घेतां, एक दोन महिन्यात जर्मनी व रशिया यांच्यामध्यें स्वतंत्र तह घडून येईल असें म्हणावें लागतें.

एकदोन महिन्यांत असा तह घडून आल्यास त्याचे परिणाम काय होतील याचा विचार करणें जरूर आहे. असल्याप्रकारचा कांहींना कांहीं तह घडून येणार हे लक्षात ठेवून नोव्हेंबर–डिसेंबरपासून इंग्लंड, फ्रान्स, इटली, अमेरिका, व जपान यानी आपलें पुढील धोरण आंखून ठेवण्यास सुरुवात केली आहे. लेनिनचा हा तहासंबधाचा उद्योग इग्लंड प्रभृति राष्ट्राना फार जाचक होणारा आहे यांत संशय नाही. पण रशियात राज्यक्रांति होऊन रशियांतील लष्कर लेनिन प्रभृतींच्या मताच्या विषानें दूषित झालें आहे असें अनुभवास आल्यापासून अशा प्रकारचें संकट आपणावर ओढवण्याचा संभव आहे हें इंग्लंडप्रभृती राष्ट्रे ओळखून होतीं. अर्थात लेनिनच्या तहाचा घाला त्यांच्यावर अवचित पडला अशांतला भाग नाहीं. या नव्या संकटालाहि टक्कर देण्याची इंग्लंडची तयारी आहे. लेनिनचा हा तह एकदोन महिन्यात झाल्यास इंग्लंडप्रभृति राष्ट्रावर नवें संकट कोणतें कोसळेल याचा आतां आपण विचार करूं. रशियाच्या बाजूला खुद्द रणभूमीवर आस्ट्रो–जर्मनीचें १५ पासून वीस लाख सैन्य गुंतलें असून चार पांच लाख सैन्य या रणभूमीच्या मदतीकरितां म्हणून आस्ट्रिया व जर्मनी या दोन देशांत निर-निराळ्या ठिकाणीं ठेवलेलें आहे. डिसेंबरांत तह झाल्यास उत्तर व मध्य बाजूचें

सैन्य जानेवारीचे पंधरा तारखेचे सुमारास पश्चिम रणभूमींत येऊन पोंचण्यास मुळींच हरकत येणार नाहीं. उत्तरेकडचें व मध्यावरचें रशियाचें सैन्य आपापल्या घरीं परत गेल्यावर दक्षिणेकडील उक्रेन प्रांतांत म्हणजे कीव्ह–ओडेसा प्रांतांत स्वतंत्रपणें युद्ध चालवितां येणें शक्य नाहीं. उक्रेन प्रात पेट्रोगाड पासून स्वतंत्र झाला आहे व त्याचें स्वातंत्र्य जर्मनीनें निराळ्या तहानें कबूल केल्यास जानेवारी फेब्रुवारी महिन्यांत जर्मनीचें रशियाच्या दक्षिणेकडीलहि सैन्य निकामें झाल्यावांचून राहाणार नाहीं. सर्व रशियाचा तह झाल्यानंतर सीरेथ नदीरलीकडील चिमुकल्या रुमानियन सैन्यानें लढाई पुढें चालविण्याची आशा धरणें व्यर्थ होय. म्हणजे जानेवारी फेब्रुवारी महिन्यात आस्ट्रिया, जर्मनी, बल्गेरिया व टर्की या सर्वांचें मिळून वीस पासून पंचवीस लाख सैन्य मोकळे होणार. ह्यापैकीं टर्कीचें सैन्य, इराण बगदाद व पॅलेस्टाईन या बाजूला जानेवारी फेब्रुवारी महिन्यांत वळेल; व या नवीन संकटाशीं टक्कर देण्याकरितां आस्ट्रेलिया व हिंदुस्तान येथून अंदाजाहून अधिक कुमक मेसापोटेमिया व इजिप्त या देशांकडे पाठवावी लागेल. बल्गेरियावर सॅलिनोकाच्या सैन्यास अडवून धरण्याचें काम पडून आस्ट्रिया–जर्मनीचें पंधरा वीस लाख सैन्य व हजारो तोफा इटली व फ्रान्स यांजवर चालून येतील या पधरा वीस लाख सैन्यापैकीं मोठा गट्ठा कोणत्या मर्मस्थानीं आदळण्यांत येईल याचा नियम नसल्यामुळे अमेरिकेची पुरी मदत येऊन पोचेपर्यंत इटली, फ्रान्स व इग्लड यांनीं डिसेंबरपासूनचे चार पांच महिने स्वतःचा बचाव करण्याच्या उद्योगांत अत्यंत काळजीनें घालवावे लागतील. पुढील वर्षाच्या मे जूनपर्यंत जर अँग्लो–फ्रेंच सैन्य स्वतःचा चांगल्या रीतीनें बचाव करूं शकलें तर रशियन तहाच्या संकटांतून ते पार पडले असें म्हणण्यास बिलकूल हरकत रहाणार नाहीं. ॲंग्लो–फ्रेंच व इटालियन सैन्य हल्ली आस्ट्रो–जर्मन सैन्यापेक्षा दहा पधरा लाखांनीं अधिक आहे. तेव्हां रशियाच्या बाजूचें सर्व सैन्य जरी फ्रान्स–इटलीकडे वळलें तरी जर्मनी सैनिकांच्या संख्येच्या दृष्टीनें मोठासा भारी होतो अशांतला भाग नाहीं. जर्मनीला जो फायदा मिळावयाचा आहे तो फायदा एखाद्या दुबळया मर्मस्थानीं चारपांच लाख सैन्याचा व हजार दोन हजार तोफाचा एकदम गट्ठा अवचित आदळण्यापासून मिळणार नाहीं. हा असला फायदा जर्मनीस मिळू नये म्हणून इंग्लंड, फ्रान्स व इटली या तिन्ही राष्ट्राची सैन्ये हुकमतीच्या दृष्टीने आणि

५

अन्नपाणी व दारूगोळा यांच्या पुरवठ्याच्या दृष्टीनें एकसूत्री करण्यांत आलीं आहेत. तिन्ही राष्ट्रांच्या सैन्याचे लगाम एका बोर्डाच्या हातांत गेल्यामुळे लुले दुवे फारसे शिल्लक राहाणार नाहीत. व एखाद दुसरा शिल्लक राहिला तर त्यापासून जर्मनीस फ्रान्समध्यें किंवा इटलीमध्यें बरेंच आंत घुसतां येण्याचा फायदा मिळणें शक्य नाही.

आक्टोबर नोव्हेंबर महिन्यांत इटलीची इसांझोची फळी फोडून जर्मनी ज्याप्रमाणें एकदम आंत घुसला त्याप्रमाणें पुढील तीन चार महिन्यांत जर जर्मनीनें ॲंग्लो फ्रेंचांची व इटलीची फळी फोडली नाहीं तर निभावलें. रशियाच्या बाजूच्या सैन्याच्या जोरावर जर ही फळी जर्मनीस दोन ठिकाणीं फोडतां आली तर अमेरिकेची मदत या महायुद्धात निरर्थक होणार आहे. पुढील चार पांच महिन्यांत आपली फळी धरून बसणें हेच मुख्य काम इंग्लड, फ्रान्स व इटली यांजकडे आलें आहे, आणि लष्करच्या एकसूत्री नवीन कारभारामुळे हे काम पार पाडण्यास हीं दोन्ही तिन्ही राष्ट्रें समर्थ झालीं आहेत ही संतोषाची गोष्ट होय. हें काम अत्यंत सकटाचें आहे, या विषयीं शका नाहीं. पुढील तीन चार महिन्यांत मिळविली तर मिळविली, गमावली तर सपशेल गमावली अशी आणीबाणीची वेळ आली आहे. या संकटांतून पार पडून अमेरिकेचें दहा लाख सैन्य फ्रान्सच्या रणभूमींत उतरलें ह्मणजे रशियन तहाचें अरिष्ट टळलें. दहा लाख अमेरिकन सैन्य येऊन पोंचल्यानंतर जर्मनीची फत्ते फ्रान्स इटलीमध्येहि होते कीं काय ही भीति नाहींशी होईल, म्हणजे १९१८ सालची अमेरिकेची मदत विजयाला कारणीभूत न होतां भीतीपासून मुक्त करणारी होईल; १९१९ सालची मदत जर्मनीला उलट भीति उत्पन्न करणारी होईल; व १९२०–२१ सालची मदत जर्मनीवर फत्ते मिळवील. इसांझोवरील पराभवामुळें महायुद्धाचें आयुष्य जर पांच वर्षांचें झालें तर रशियन तहामुळें तें सात आठ वर्षांचे होणारें आहे. इंग्लंडची लष्करी हिंमत आतां भरज्वानींत आहे. आणखी तीन चार वर्षें महायुद्ध चालविण्यास लागणारा पैसा अमेरिकेशीं भरपूर आहे, शिवाय तीन चार वर्षांत मिळून पन्नाससाठ लाख नवें सैन्य निर्माण करून तें युरोपांत उतरविण्याची धमकहि अमेरिकेमध्यें परिपूर्ण आहे. इंग्लंड व अमेरिका अशा रीतीनें कंबर बांधीत असतां त्यांच्या शेजारीं जिवापाड लढण्याचा निश्चय फ्रान्स व इटली यांनीं केलेला आहे. इटलीच्या पराभवामुळें व रशियाच्या तहामुळें

१९१८ सालीं अँग्लो-फ्रेंचांचा पक्ष जरी अंधारांत पडणारा असला तरी अमावास्येचे सांप्रतचे तीन चार महिने निघून गेल्यानंतर १९१९ सालीं प्रभातकाळ येऊन २०–२१ सालीं दोस्त सरकारांचा प्रकाश सर्व युरोपभर पडणार यांत सशय नाहीं.

लष्करी दृष्टया रशियन तहापासून उत्पन्न होणारें अरिष्ट वरील स्वरूपाचें आहे. या तहापासून आणखीहि दोनतीन निराळ्या स्वरूपाचीं संकटें उत्पन्न होणारीं आहेत. रशियाचा तह होऊन रशियन सैन्य डिसेंबर जानेवारी महिन्यांत घरोघर परत गेल्यानतर आस्ट्रिया, जर्मनी व रशिया यांच्यामध्ये लगेच व्यापारी दळवळण सुरू होईल. रशियातील मोठमोठ्या शहरांत व रणभूमीच्या टापूत आज दुष्काळ पडल्यासारखा आहे याचें कारण रशियांत पुरेसें धान्य नाहीं हे नव्हे, तर महायुद्धामुळे शेतकरी धान्य बाहेर काढण्यास तयार नाहींत व आगगाडयानाहि धान्याची ने–आण व्यवस्थितपणें करतां येत नाहीं हें होय. तह झाल्यानतर दोनतीन महिन्यात ही स्थिति पालटेल आणि आस्ट्रो–जर्मनांना धान्य–पुरवठा रशियाकडून चागला होईल. शिवाय रशियामध्यें तुर्कस्थान, आस्ट्रिया व जर्मनी या तीन राष्ट्राचे मिळून आठ दहा लाख तरी लष्करी कैदी असावेत व लष्कराच्या कामास उपयोगी पडणारे इतर देशाचे आठ दहा लाख जवान रशियन अटकेत असावेत असा अदाज आहे. हे पधरा वीस लाखाचें मनुष्यबळ आस्ट्रो–जर्मनाना वर्षदीडवर्षाच्या अवधींत बधमुक्त करून रणभूमीवर उपयोगात आणतां येण्यासारखे आहे. शिवाय सर्व काळासमुद्र मोकळा झाल्यामुळे निर्धास्तपणें जहाजात सैन्य भरून काकेशियस पर्वताच्या टापूंत उतरवून इराणची तेहरान राजधानी कबजांत घेऊन इराणलाहि स्वतःच्या पक्षात सामील करून घेणें तुर्कस्थानला सुलभ होणारें आहे. काळा समुद्र मोकळा होण्याबरोबर उत्तर इराण तुर्कस्थानला आपोआप बळी पडतो. आस्ट्रो–जर्मनाना अन्नसामग्री भरपूर मिळते, उत्तर इराण बळी पडतो. या दोन संकटाहून अधिक भयानक स्वरूपाचें तिसरे सकट या रशियन तहापासून उत्पन्न होणारें आहे. त्याचाहि थोडासा विचार करणें जरूर आहे.

रशियांतील लेनिनप्रभृति उच्छृंखल सोशियालिस्ट जर्मनीशीं तह करून रणभूमीवरील रशियन सैन्य घरोघर पाठविण्यास जरी आज समर्थ असले तरी राज्यक्रांतीमुळे उत्पन्न झालेला रशियातील अंतस्थ कलह मिटविण्यास समर्थ

नाहींत. जर्मनीशीं तह झाल्यानंतर ही रशियांतील यादवी सुरू रहाणारच. शिवाय जे सोशियालिस्ट स्वतःच्या देशांतील संग्रही लोकांचें भांडवल हिरावून घेण्यास तयार झाले आहेत ते सोशियालिस्ट परदेशचें काढलेलें कर्ज थोडेंच देणार आहेत ! गेल्या तीस वर्षांत फ्रान्सनें रशियाला अतोनात कर्ज दिलें असून रशियांतील मोठमोठे कारखाने व आगगाड्या फ्रान्समधील भांडवलानें बांधल्या गेल्या आहेत. लेनिनच्या तहानें या सर्व भांडवलावर फ्रान्सला पाणी सोडावें लागणार, शिवाय चालू महायुद्धांत इंग्लंड, अमेरिका व जपान यांनीं अब्जावधी रुपयांचें कर्ज प्रत्यक्ष रोकडीच्या रूपानें किंवा सामानसुमानांच्या रूपानें रशियास दिलेलें आहे. जर्मनीशीं स्वतंत्र तह झाल्यावर रशियांतील सोशियालिस्ट खांका वर करून या कर्जास नकार म्हणणार. अर्थात् जर्मनीशीं स्वतंत्र तह होण्याबरोबर इंग्लंड फ्रान्स अमेरिका व जपान हीं राष्ट्रें रशियाशीं तटस्थ वृत्तीनें न वागतां वैरभावानेंच वागूं लागणार. इंग्लंड व फ्रान्स याच्या हातांत महायुद्ध चालू असतांना रशियाचें प्रत्यक्ष नुकसान करण्याचें कांहींच साधन नसल्यामुळे इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका याजकडून रशियाच्या विरुद्ध लढाई पुकारली जावयाची नाही. हें खरें; पण जपानची तशी स्थिति नाहीं. जपानचा रशियाचा, मान्चुरिआ प्रांत हवाच आहे. कारण तो जपानी समुद्राला लागून आहे. आणि चीनच्या डोक्यावरचा रशियाच्या सैबिरियाचा भाग जपानला महिना दोन महिन्यांत सहज व्यापतां येण्यासारखा आहे. रोमानियातर्फे तर अशी सूचना करण्यांत आली आहे कीं, जपाननें सर्व सैबिरिया प्रांत व्यापून दक्षिण रशियांत उतरून तेथून रोमानियास मोठ्या सैन्याची कुमक पोंचवावी. रोमानियास कुमक पोंचविण्याच्या मिषानें म्हणा, किंवा स्वतःचें कर्ज वसूल करण्याकरितां म्हणा; मांचुरिया प्रांत बळकावून बसून सैबिरिया गिळवेल तितका गिळून टाकण्यास जपान यावेळीं मागेंपुढें पहाणारा नाहीं. रशिया व जर्मनी यांचा स्वतंत्र तह झाल्यास जपानची रशियाच्या सैबिरियावर स्वारी होणार हें निर्विवाद आहे. लेनिन-प्रभृतींना सैबिरियाचा प्रदेश टाकाऊ असल्यासारखाच आहे. तेव्हां जपानच्या स्वारीची फारशी फिकिरी त्यांना नाहीं. परंतु अंतस्थ कलह व बाहेरच्या शत्रूची ही दुसरी कटकट या दोन यातनांतून मुक्त करण्याकरितां रशियांतले लोक जर्मनीच्याच तोंडाकडे पहाणार आणि स्वतःच्या घराची नीट व्यवस्था लावण्याकरितां जर्मन सैन्याला स्वतःच्या घरांत बोलावून घेणार, म्हणजे रशिया जर्मनीच्या

बगलेंतलें राष्ट्र होऊन बसणार ! लेनिनच्या तहाचे परिणाम इतक्या दूर पल्ल्या-पर्यंत जाणारे असून इराण, अफगाणिस्तान, हिंदुस्थान, चीन व जपान या सर्व राष्ट्रांना ते भोवणारे आहेत. सारांश रशिया जर्मनीशीं तह करून गप्प राहील अशांतला भाग नसून महायुद्ध जर सात आठ वर्षें चाललें तर वर्ष सहा महिन्यांत जर्मनीच्या गट्टींत सामील होऊन सांप्रतच्या दोस्तांच्या विरुद्ध लढूं लागण्याचा संभव आहे, या सर्व गोष्टींचा विचार करितां डिसेंबरपासून मे महिन्यापर्यंतचे चार पांच महिने महायुद्धाच्या इतिहासांत अत्यंत आणीबाणीचे जाणार यांत संशय नाही.

रशियन तहाची वाटाघाट व त्यापासून उत्पन्न होणारीं कारस्थाने यांना डिसेंबर–जानेवारी महिन्यांत विशेष महत्त्व दिलें पाहिजे. हा तह व ही कार-स्थानें कोणाच्या किती उपयोगी पडतील हें फ्रान्स व इटली या दोन्ही देशांतील दोन तीन महिन्यांतील लढाया ठरविणार असल्यामुळे फ्रान्स व इटली येथील रणभूमि थंडीच्या ऐन मोसमांतहि म्हणजे डिसेंबर जानेवारी फेब्रुवारी महिन्यांत अत्यंत चिडलेली व भयंकर संतापानें पेटलेली दिसूं लागेल. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवडयांत इसांझोची फळी फोडून आस्ट्रो–जर्मन सैन्य व्हेनिस बंदरानजीकच्या प्लेव्ह नदीपर्यंत आलें. इटलीनें प्लेव्ह नदीवरच या सैन्यास नोव्हेंबर महिन्यांत व डिसेंबरच्या प्रारंभाला अडकवून धरिलें आहे. प्लेव्ह नदीवरील इटालियन सैन्याच्या डाव्या बगलेस वळसा घालतां यावा म्हणून ट्रेंटिनो प्रांतांतून ब्रेटना नदीच्या उगमाजवळच्या डोंगराळ प्रदेशांतून व्हेनिसच्या मैदानावर उतरण्याचा आस्ट्रो–जर्मनांनीं नोव्हेंबर महिन्यांत आटोकाट प्रयत्न केला, पण आशियागोच्या डोंगरांत आणि ब्रेटना व प्लेव्ह या दोन नद्याच्या उगमाजवळच्या डोंगरांत इटली इतक्या शौर्यानें लढला कीं व्हर्डून येथील फ्रेंच विजयाची आठवण इटलीनें सर्व जगास करून दिली ! डिसेंबरच्या पहिल्या आठवडयांत आशियागोच्या डोंगराळ प्रदेशांत व प्लेव्ह नदीवर आस्ट्रो–जर्मनांच्या मोठया तोफा येऊन पोचल्या असून प्लेव्ह नदीचें पाणी उतरून बऱ्याच ठिकाणीं उतारहि झालेला आहे. तेव्हां डिसेंबर महिन्यांत प्लेव्ह नदी सोडून व्हेनिसचा टापू आस्ट्रो-जर्मनीच्या हवाली करून एडिज नदीच्या अलीकडे आज महिना दीड महिना तयार केलेल्या मजबूत ठिकाणापर्यंत इटालियन सैन्य मागे सरकण्याचा संभव आहे. नोव्हेंबर महिन्यांत जर्मनीला आपलें सर्व फालतुक सैन्य इटलीवर पाठविता येऊं

नये म्हणून फ्रान्सच्या रणभूमींत सोम नदीच्या टापूत कॅंब्रैच्या प्रदेशावर इंग्रजानीं अवचित हल्ला चढविला. या हल्ल्यांत इंग्रजाना मोठा विजय मिळाला व जर्मनीला पांच सात मैल मागें हटावें लागून कॅंब्रै शहराजवळ दोन तीन मैलांवर इंग्रज जाऊन थडकले ! नोव्हेंबर अखेरीस व डिसेंबर आरंभाला रशियाच्या बाजूचें दोन तीन लाख नवें सैन्य आणून जर्मनीनें इंग्रजांवर उलट हल्ला केला. या उलट हल्ल्यात इंग्रजांना एक दोन मैल मागें हटावें लागलें खरें; पण जर्मनीच्या सैन्याची फार खराबी झाली. ॲंग्लो-फ्रेंचाना इटलीकडे मदत पाठवितां येऊं नये म्हणून इटलीशीं निकरानें लढत असतांना इंग्रजांवर तुटून पडण्याचा जर्मनीचा सांप्रत इरादा दिसतो, आणि रशियाच्या बाजूचें मोकळें होऊं लागलेलें सैन्य फ्रान्स व इटली या दोन्ही रणभूमीकडे पाठविण्यास जर्मनीनें सुरुवातहि केली आहे. डिसेंबर महिन्यांत एडिज नदीवर जर इटालियन मागे परतले आणि रशियाशीं स्वतंत्र तह झाला तर रशियाच्या बाजूचा दहा पंधरा लाख सैन्याचा गठ्ठा इटली व फ्रान्स यामधील संबंध प्रथम तोडण्याच्या कामीं आणि इटली एकटा पडल्यावर त्याचें सैन्य नाश करण्याच्या कामी जर्मनी खर्च करील असा तज्ज्ञाचा अंदाज आहे. महायुद्धाच्या प्रारंभी बेल्जममध्ये ज्याप्रमाणें जर्मनी अवचीत घुसला व बेल्जमच्या तटस्थ वृत्तीची व हक्काची पायमल्ली जर्मनीनें ज्याप्रमाणें केली त्याप्रमाणें रशियाशी स्वतंत्र तह होतांच दहा पंधरा लाख जर्मन सैन्य स्वित्झर्लंडमध्ये एकदम घुसेल व तेथून इटलीच्या लोंबार्डी प्रातात उतरून पो नदी ओलांडून जिनेवाचे आखातापर्यंत पसरील आणि तेथून व स्वित्झर्लंडमधून दक्षिण फ्रान्सावर जर्मनी स्वारी करील, असा काहींचा तर्क आहे. इटलीला जर फ्रान्सपासून अलग पाडता आलें आणि इटलीच्या वायव्य टोकातून व स्वित्झर्लंडमधून जर जर्मनीस दक्षिण-फ्रान्समध्ये उतरता आलें तरच अमेरिकेच्या प्रचंड मदतीवर जर्मनीस विरजण घालता येईल, व रशियाच्या स्वतंत्र तहामुळे जर्मनीला मिळणाऱ्या वर्चस्वास व वैभवास जर्मनीनें पचनीं पडल्यासारखे होईल. अर्थात् रशियाशीं स्वतंत्र तह होण्याबरोबर स्वित्झर्लंडमध्यें घुसून इटलीला अलग पाडून प्रथम इटलीला खाऊन दक्षिण फ्रान्समध्ये घुसण्यास जर्मनी चुकणार नाहीं. स्वित्झर्लंडमध्ये निम्मी वस्ती जर्मनांची आहे व निम्मी वस्ती फ्रान्स, इटली, आस्ट्रिया वगैरे देशांची आहे. स्वित्झर्लंडच्या चाळीस पन्नास हजार सैन्यात वीस हजाराहून अधिक सैनिक जर्मन

असल्यामुळें स्वित्झर्लंडमध्ये घुसणें व स्वित्झर्लंडच्या आगगाड्या ताब्यांत घेणें ही गोष्ट लष्करी दृष्ट्या जर्मनीस विशेष अवघड नाहीं. मात्र अशा रीतीनें स्वित्झर्लंडच्या हक्काची पायमल्ली करण्याचें पाप केल्यावर स्वतःचें लष्करी धोरण साधण्याकरिता दहापधरा लाख फालतुक सैन्य जर्मनीपाशीं असलें पाहिजे. रशियाशी स्वतत्र तह झाल्यावर दहापंधरा लाख फालतुक सैन्य जर्मनीपाशीं उरते, व त्याचा उपयोग वरील तऱ्हेनें केल्यावाचून जर्मनीचें एकदोन सालानतरचें मरण चुकत नाही. तेव्हां रशियन तहाच्या हकीकतीबरोबरच स्वित्झर्लंडकडेहि वाचकांनीं डिसेंबर–जानेवारी महिन्यात लक्ष पोचविलें पाहिजे अशी सूचना आहे.

# महायुद्धाचा चवथ्या वर्षाचा डिसेंबर--जानेवारी महिना

डिसेंबरच्या पहिल्या तीन आठवड्यांत इटलीची ट्रेंटिनो प्रांतांतील आशियागोच्या डोंगराळ प्रदेशांतील फळी फोडण्याचा प्रयत्न आस्ट्रो-जर्मनांनीं फार जारीनें केला पण तो सर्व निष्फळ झाला. अँग्लो-फ्रेंचांच्या मदतीनें इटलीनें याठिकाणीं चांगला पराक्रम दाखविला आणि व्हेनिस शहर व व्हेनिसचा प्रांत यांचें कायमचें रक्षण होईल असा बंदोबस्त इटलीस डिसेंबर महिन्यात करतां आला. व्हेनिस व व्हेनिसचा प्रांतहि डिसेंबर महिन्यांत शत्रूच्या हातीं लागणार असा सर्वांचा अंदाज होता, पण इटलीच्या शौर्यामुळें आणि अॅंग्लो-फ्रेंचांच्या तांतडीच्या मदतीमुळें इटलीवरील तें संकट डिसेंबर अखेरीस टळलें. इसांझोवरील पराभवानंतर इटलीचे अडीच लाख लोक कैदी झाले व अडीच हजार तोफा शत्रूच्या हातीं लागल्या. इतकी नुकसान सोसूनहि प्लेव्ह नदीवर व आशियागोच्या टापूंत आस्ट्रो-जर्मनांना इटलीनें थोपवून धरलें! हा इटलीचा पराक्रम लष्करीदृष्ट्या नांवाजण्यासारखा झाला असून राजकीय दृष्ट्या दोस्त सरकारांना उत्साहजनक झाला आहे. जानेवारी महिन्यात इटलीची फळी फोडण्याचा उद्योग विशेष जोरानें आस्ट्रो-जर्मन्स करतील असा रंग दिसत नाहीं. प्रयत्न होवो वा न होवो, इटलीला आतां भरपूर वेळ मिळाला आहे, आणि अॅंग्लो-फ्रेंचांनीं तोफांचाहि योग्य तो पुरवठा केला आहे. तेव्हा इटलीच्या बाजूचे विशेष काळजीचे दिवस आतां राहिले नाहींत असें म्हणणें उचित होय. इटलीवर हल्ला करीत असताना पश्चिम रणभूमींत इंग्रजांवरहि जर्मनींनं बरेच निकराचे हल्ले चढविले, पण ते सर्व हल्ले इंग्रजांनी परत फिरविले. किरकोळ फायद्याशिवाय जर्मनांना ह्या हल्ल्यांत कांहींच मिळालें नाहीं. अॅंग्लो-फ्रेंचांची मदत इटलीला पोहोंचूं नये हा या हल्ल्यांचा हेतु होता, पण तोहि फसला. रशियाशीं स्वतंत्र तह झाल्यानंतर फेब्रुवारी-मार्च महिन्यात फ्रान्सवर व इटलीवर जंगी चढाई करण्याची तयारी सेनापति हिंडेनबुर्ग यांनीं चालविली आहे असें प्रसिद्ध झालें आहे. अमेरिकेची मदत येऊन पोंहोचेपर्यंत आपला अनिष्ट काळ आहे हें अॅंग्लो-फ्रेंचांनीं ओळखलें असून या अनिष्ट काळीं न डगमगतां हिंडेनबुर्गचे सर्व डावपेंच फोल करण्याची हिंमत दोस्त सरकारांनीं धरिली आहे आणि डिसेंबर महिन्यातील

इटलीच्या पराक्रमाकडे पाहिलें असतां रशियाशीं स्वतंत्र तह झाला तरी पश्चिम रणभूमीची फळी फोडणें जर्मनीस मुष्किलीचें होईल असेंच म्हणावें लागतें. सैन्यात भरती करण्याचें काम इंग्लडांत अधिक जोरानें चालू आहे; आणि सक्तीच्या लष्करी नोकरीसंबधानें पूर्वी ज्यांना सवलती मिळाल्या होत्या त्याच्या सवलतीहि आतां कमी करण्यांत आल्या आहेत. नवीन तोफा व दारूगोळा तयार करणारे कारखानेहि झपाट्यानें वाढत असून आणखी दोन अडीच वर्षें महायुद्ध चालणार या धोरणानें सर्व सामानसुमानाची जुळवाजुळव चालू आहे. जर्मनीच्या पाणबुड्या बोटींचा त्रास हल्लींप्रमाणें पुढेहि असाच चालणार हें गृहीत धरून प्रजाजनांना रोजचें मिळावयाचें अन्नपाणी कायद्यानें लवकरच नियमित करण्याचा निश्चय इंग्लंडनें केला आहे. म्हणजे इटलीच्या पराभवानें उत्पन्न केलेला बागुलबोवा आणि रशियाच्या स्वतंत्र तहाची वाटाघाट ह्यामुळे इंग्लंडची कंबर न खचतां इंग्लंडचा उद्योग मात्र दुणावला आहे. इंग्लंडमध्यें सक्तीची नोकरी नव्हती, पण महायुद्धात जय मिळविण्याकरितां इंग्लडने ती पद्धती स्वीकारिली. लोकांचें अन्नपाणी कायद्यानें नियमित करून त्यांची वाटणीहि सरकारमार्फत करण्याची पाळी इंग्लडवर येईल असें कोणाच्या स्वप्नीहि नव्हते; पण जर्मनीच्या पाणबुड्याचा उपयोग निष्फळ करण्याकरितां खाण्यापिण्याच्याबाबतीत जर्मन लोकाच्या हालअपेक्षा अंशत: स्वत: सोसण्यास इंग्रज आज तयार झाले आहेत. इंग्लडची ही चिकाटी तारीफ करण्यासारखी असून अमेरिकेसहि या चिकाटीमुळे महायुद्धात यश मिळविण्याकरितां आपलें सर्वस्व खर्ची घालण्याची बुद्धि झाली आहे. महायुद्धात अखेर यश मिळविण्याकरिता इटली, फ्रान्स, इंग्लड, व अमेरिका या चार राष्ट्रांनीं शक्य तेवढे प्रयत्न करण्याचा निश्चय डिसेंबर महिन्यांत केला असून एक दोन वर्षांनीं ते विजयी होतील यांत शंका नाहीं. या एकोप्याबद्दल डिसेंबर महिना जसा महत्त्वाचा गेला तसा--

## तहाची वाटाघाट

सुरू होऊन दोन तीन महिन्यांच्या अवधींत सर्वांचाच तह होण्याची चिन्हें दाखविल्याबद्दलहि डिसेंबर महिना महत्त्वाचा गेला. नोव्हेंबर अखेरीस व डिसेंबरच्या प्रारंभाला रशिया व जर्मनी यांच्यामध्ये तहाची वाटाघाट सुरू झाली. डिसेंबर अखेरीस व जानेवारीचे प्रारंभाला या तहाचे वाटाघाटीस बरेंच स्पष्ट स्वरूप प्राप्त

होऊन वसंत काळचे सुमारास सर्वांचाच तह होण्याचीं अंधुक चिन्हे दिसूं लागलीं. जानेवारी फेब्रुवारी महिन्यांत डिसेंबर महिन्याप्रमाणेंच तहाच्या वाटाघाटीला विशेष महत्त्व प्राप्त होणार असल्यामुळे तहासंबंधाचीं चर्चा आतां करणें जरूर आहे. लेनिन प्रभृति सोशियालिस्टांनीं नोव्हेंबरच्या पहिल्या आठवडयात पेट्रोग्रॅड येथे दुसरी राज्यक्रांति करून केरेन्स्की प्रभृति रशियांतील नव्या सरकारच्या प्रधान-मंडळाला हाकून लावून उत्तर व मध्य रशियांतील राज्यसत्ता आपल्या हातीं घेतली. या सोशियालिस्ट सरकारनें नोव्हेंबर अखेरीस जर्मनीशी तहाचें बोलणें सुरू केलें. डिसेंबर प्रारंभाला लढाई तहकूब करण्याचा तह झाला. लढाईची तहकुबी जाने-वारीचे पहिल्या आठवडयाचे अखेरीपर्यंत ठरली व पहिल्या आठवडयानंतर तहाचें बोलणें फिसकटून पुन्हां लढण्याचा प्रसंग आल्यास दोन्ही पक्षांनीं एकमेकांस एक आठवडयाची आगाऊ नोटिस द्यावी असें ठरलें. या तहकुबीच्या अटी दक्षिण रशिया व रोमानिया यानाहि मान्य होऊन डिसेंबरचे दुसरे आठवडयापासून रशियाच्या सर्व रणभूमींत लढण्याची तहकुबी झाली. लगेच दोन्ही पक्षाचे वकील ब्रेसलिटोव्हस्क येथे तहाची वाटाघाट करण्यास एकमेकांस भेटले. पुढील वाटाघाटीस सुरुवात होण्यापूर्वी रशियानें असा आग्रह धरिला कीं, तहावर सह्या होईतों जर्मनीनें रशियाच्या बाजूचें आपलें सैन्य फ्रान्स इटलीकडे वळवू नये. रशियाच्या या अटीचा विचार करण्यास जर्मनीनें एक आठवडा घालविला. या अवधींत तरुण लढवय्यांचीं पलटणें रशियाच्या रणभूमींतून काढून घेतलीं आणि चाळीस वर्षांच्या वरचे सैनिक तेवढे रशियाच्या बाजूला ठेवून डिसेंबरच्या तिसऱ्या आठवडयात रशियाची वरील अट मान्य केली व लगेच तहाच्या मुख्य कलमांच्या वाटाघाटीस सुरुवात झाली. ‘ ना मुलुख ना खंडणी ’ या तत्त्वाचा अंगिकार करून नुसत्या रशियाशीं नव्हे, तर सर्व राष्ट्रांशीं तह करण्यास आपण राजी आहों असें जर्मन वकिलांनीं डिसेंबरच्या आठवडयांत जाहीर केलें. जर्मन अटींचें स्वरूप सामा-न्यतः येणेंप्रमाणें होतें:—( १ ) महायुद्धांत कोणी कोणाचा मुलुख जिंकला अस-ल्यास तो त्याचा त्यास परत द्यावा. जर्मनीला स्वतःच्या वसाहती परत मिळाल्याच पाहिजेत. ( २ ) लढाईच्या खर्चाबद्दल म्हणून कोणी कोणापासून खंडणी घेऊं नये. ( ३ ) ज्या देशांचें स्वातंत्र्य महायुद्धामुळे नष्ट झालें असेल, त्या देशांना व प्रांतांना त्याचें पूर्वीचें स्वातंत्र्य मिळावें. ( ४ ) रशियांतील निरनिराळया प्रांतांना आपापल्या

प्रांतांची राज्यव्यवस्था कशी असावी हें ठरविण्याचा व रशियाच्या मुख्य सत्तेपासून स्वतंत्र होण्याचाहि हक्क मिळावा. (५) पोलंड, ल्युथेनिया व कोर्लंड वगैरे रशियाचे ताब्यांत असलेले प्रांतात कोणत्या स्वरूपाची राज्यव्यवस्था सुरू करावयाची हें तेथील लोकाच्या मर्जीवर ठेवावें. (६) सर्व रशियामध्ये वीस वर्षेंपर्यंत आस्ट्रो–जर्मनाना व्यापार व उद्योगधंद्यासंबधानें इतर राष्ट्रांहून अधिक सवलती मिळाव्या. जर्मनीचीं हीं सहा कलमें पेट्रोग्राडच्या सोशियालिस्टाना पसंत पडलीं, आणि 'ना मुलूख ना खडणी' या तत्त्वाचा जर्मनीनें अंगिकार केल्याबद्दल त्यानीं जर्मनीचींहि स्तुतिस्तोत्रे गाईलीं. रशियाच्या दृष्टीनें इंग्लंड, फ्रान्स वगैरे देश अरेरावी वाण्याचे ठरले आणि जर्मनींत मात्र सामान्य जनसमूहाच्या कल्याणाची कळकळ दिसून आली !

रशिया अशा रीतीनें जर्मनीची पाठ थोपटीत असतां सुसरीचे काटे एकदम त्याच्या हाताला लागले. पोलंड वगैरे प्रातानीं स्वतःच्या इच्छे-प्रमाणें आपली राज्यव्यवस्था ठरवून घ्यावी असें एक कलम वरील यादींत आहे. पोलंडच्या लोकांची इच्छा काय आहे हे समजून कसें घ्यावयाचें ह्याविषयीं जेव्हा वाद सुरू झाला तेव्हा जर्मनीचा काटा रशियाच्या हातात घुसला व सुसरीचें खरें स्वरूप रशियाच्या ध्यानांत आले. ही तहाची वाटाघाट सुरू होण्यापूर्वी पोलंड वगैरे प्रांताना आस्ट्रो–जर्मन साम्राज्यांत मिसळून टाकण्याचा उद्योग जर्मनीनें आरंभिला होता, व त्या उद्योगास अनुसरून निरनिराळ्या सार्वजनिक संस्थाहि अस्तित्वात आणिल्या होत्या, इतकेच नव्हे तर, त्या संस्थाकडून सर्व प्रजाजनांच्यातर्फे असें वदविलें होते कीं, आस्ट्रो–जर्मन साम्राज्याच्या परिघाच्या आतलें स्वराज्य पोलंडला मिळाले असतां त्या राज्यव्यवस्थेस पोलंडची पूर्ण संमति आहे! तहाच्या वाटाघाटीच्यावेळीं जर्मनीनें रशियास सांगितलें कीं–'या पहा पोलंडात व कोर्लंडात लोकनियुक्त संस्था आहेत व आस्ट्रो–जर्मन परिघाच्या आतल्या स्वराज्यावर पोलंड वगैरे प्रांत संतुष्ट असल्याचें त्या संस्था जाहीर करीत आहेत. तेव्हा तुम्ही त्या संस्थाचे मताला मान्यता देण्यास कोणती हरकत आहे ?' पोलंड, कोर्लंड वगैरे देश स्वतःच्या साम्राज्यात जोडण्याचा हा डाव जर्मनीनें अशा रीतीनें पुढे मांडला; व त्यामुळे जानेवारीचे प्रारंभाला रशिया जर्मनीवर रागावला. रशियांतील सोशियालिस्ट पक्षाला पोलंड, कोर्लंड, वगैरे प्रांत रशियापासून स्वतंत्र झाल्यास त्याचें दुःख नाही; पण

ते प्रांत आस्ट्रो-जर्मनांच्या साम्राज्याच्या परिघांत पडल्यास त्याचें दुःख विशेष आहे. जर्मनीच्या सेनेनें हे प्रांत व्यापले असतांना तेथील लोकांना स्वतंत्र मत कोठून असणार ? जर्मन सेनानायकांनीं पोलंड वगैरे प्रांतांतील मध्यम स्थितींतील व वरिष्ठ स्थितीतील संग्रही लोक गोळा केले. या लोकांच्या सार्वजनिक व लोक-नियुक्त संस्था निर्माण केल्या आणि जर्मनीच्या लष्करी सत्तेचें जड जूं मानेवर असतांना त्यांनीं मतें विचारिलीं. आस्ट्रो-जर्मनांची साम्राज्य सत्ता कबूल करून स्वतःचें स्वराज्य मागण्यापलीकडे ते बिचारे दुसरें कोणतें मत देणार ? शिवाय रशियांतील सोशियालिस्ट सत्तेला तरी अनुकूलता याची कशी पडावी ? पेट्रोग्राड येथें स्थापन झालेली सोशियालिस्टांची सत्ता म्हणजे सडेसोट लोकांची सत्ता. व्यक्ति-विषयक सर्व तऱ्हेच्या संग्रहावर त्यांचा कटाक्ष.सरकारी किंवा निरनिराळ्या समूहाचा संग्रह या सोशियालिस्टांना मान्य आहे, पण व्यक्तीची मालमत्ता ते कबूल करीत नाहींत. संग्रही व सडेसोट यांच्यामध्ये रशियांत सांप्रत लढाई चालू असून रशियांतील हा तटा कोणत्याना कोणत्या तरी रूपानें आणखी दोन तीन पिढ्या केवळ रशियासच नव्हे, तर सर्व युरोप खंडास जाचक होणार आहे. तेव्हां अशा स्थितींत पोलंड व कोर्लंड या प्रांतांतील मध्यम स्थितींतील संग्रही लोक पेट्रोग्राड येथील सोशियालिस्टांपासून दोन हात दूर रहाण्याची इच्छा करीत असल्यास त्यांत नवल नाहीं; पण ते सोशियालिस्टांपासून दोन हात दूर रहाण्यास इच्छित असले तरी जर्मनीच्या बगलेंत जाण्यास खुषी आहेत हें ह्मणणें केव्हांहि न्याय्य होणार नाहीं. जर्मनांची लष्करी सत्ता पोलंडांत असतांना घेण्यांत आलेलें मत दूषितच समजलें पाहिजे. अर्थात् तें मत रशियास कबूल नाहीं. रशियाचें म्हणणें असें आहे कीं, जर्मनीनें आपलें लष्कर पोलंडमधून काढून घेतल्यावर पोलंडांतील संग्रही लोकांचेंच तेवढें नव्हे तर सर्व सडेसोट लोकांचें मत घेण्यांत यावें म्हणजे संग्रही लोकांचें वर्चस्व नष्ट होऊन पोलंडांतील लोकमत पेट्रोग्राड येथील सोशियालिस्ट पक्षाला अनुकूल आहे असेंच दिसून येईल. पेट्रोग्राडचें म्हणणे जर्मनीला मान्य नाही. ह्या अटीचा खल जर्मन पार्लमेंटमध्ये होऊन जर्मनीच्या मुख्य प्रधानानें तहाची वाटाघाट फिसकटली तरी दुःख मानण्याचें कारण नाहीं असें जाहीर केलें. या सर्व वादाचा योग्य निकाल जर्मनीच्या किंवा रशियाच्या हवेंत चांगलासा होणार नाहीं तेव्हां स्वीडनमध्ये जाऊन तेथे पुन्हा तहाची वाटाघाट सुरू करू असें रशियानें सुच-

दिलें. ही सूचना जर्मनीस मान्य झाली नाहीं. तेव्हां तारीख २ जानेवारी रोजीं काहींकाळ वाटाघाट बंद ठेवण्यांत आली आहे असें जर्मनीनें जाहीर केलें. पण तारीख पांच जानेवारी रोजीं ब्रेसलिटोव्हस्क येथे पुन्हां तहाच्या वाटाघाटीस सुरुवात झाली असून पेट्रोग्राड येथील सोशालिस्ट पक्षाचे मुख्य मि. ट्रॉट्स्की हे स्वतः या वाटाघाटीच्या वेळीं हजर राहिले आहेत.

पोलंडच्या या प्रश्नासबंधानें ही तहाची वाटाघाट जानेवारींत फिसकटेल किंवा कसें, असा येथे प्रश्न उद्भवतो. इंग्लंडचे मुख्यप्रधान मि. लाईड जॉर्ज यांनीं जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात तहासंबंधानें एक महत्त्वाचें भाषण केलें त्या भाषणांत त्यानीं भविष्य वर्तविलें आहे की, दोस्त सरकाराना न विचारतां किंवा त्यांची संमति न घेता रशियानें आपण होऊन स्वतंत्र तहाचा उद्योग करून स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेतला असल्यामुळे आणि सर्व तऱ्हेनें जर्मनीच्या पंजात सांपडल्याशिवाय रशियास गत्यंतर नसल्यामुळे, पोलंड वगैरे प्रांत, या नावानें नाहीं तर त्या नांवानें, जर्मनीच्या ताब्यांत गेल्यावाचून राहाणार नाहींत. मि. लाइड जॉर्ज यांचें हे भविष्य खरें ठरून जानेवारींत रशियाचा व जर्मनीचा तहनामा पक्का होईल असाच तज्ज्ञाचा अभिप्राय पडतो. पेट्रोग्राड येथील सोशियालिस्टांना जर्मनीशीं तह केल्याशिवाय आतां गत्यंतर नाहीं. त्याची स्थितीच तशी झाली आहे. जर्मनीशीं तह करावा नाहीं तर मरावें, तिसरा मार्ग नाहीं. दोन महिन्यापूर्वी रशियाची अशी स्थिति नव्हती, रशियात जर एकोपा नांदला असता आणि केरेन्स्की जर रशियाचे मुख्यप्रधान राहिले असते तर येत्या वसतकाळीं लष्करी दृष्ट्याहि रशियानें पुन्हां डोकें वर काढलें असतं, आणि जर्मनीस रशियाची भीति वाटली असती. पण दोन महिन्यांत लेनिन प्रभृतींनी रशियाचें पुरें वाटोळे केलें ! इंग्लड, अमेरिका, फ्रान्स वगैरे राष्ट्रांचा स्नेहसबध मोडण्यांत आला. आतां बाहेरून कोणीहि मदत करणार नाहीं. शिवाय रशियाचे तुकडे तुकडे झाले आहेत. फिन्लंड प्रांताचें स्वतंत्र रिपब्लिक झालें आहे व या रिपब्लिकला स्वीडन, फ्रान्स व जर्मनी या राष्ट्रानीं आपली संमति दिली आहे. दक्षिणेकडील युक्रेन प्रातहि स्वतत्र झाला असून युक्रेनचा व जर्मनीचा स्वतत्र तह लवकरच होईल असा अदाज आहे. युक्रेन प्रात गेलीं चाळीस पन्नास वर्षे रशियापासून स्वतंत्र होऊं पहात आहे. गेलीं चाळीस पन्नास वर्षे आस्ट्रो–जर्मनानीं

या कामीं त्यांना मदतहि केली आहे. या प्रांताची भाषा रशियन भाषेपासून निराळी असून आचार विचारांतहि बराच फरक आहे. युक्रेन प्रात सर्व रशियांत अधिक सुपीक असून सर्व रशियाचें धान्याचें कोठार हा प्रात समजला जातो. या प्रातानें आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें असून संगृही लोकाच्या ताब्यांतच तेथील राज्यसत्ता आहे. शिवाय युक्रेन प्रांताचे कीं कोणताहि भाग आस्टो-जर्मनानीं जिंकला नसून त्यांच्याशीं तह करतांना विशेष अडचणी येण्याचें कांहींच कारण नाहीं. युक्रेनचें व रोमानियाचें साप्रत बरेंच मेतकुट जमलें असून हे दोघेहि पेट्रोग्राड येथील सोशियालिस्ट पक्षाच्या सनिकांना आपापल्या प्रांतात खरपूस मार देत असतात. तेव्हा पेट्रोग्राड येथील सरकारनें तहाची वाटाघाट लांबणीवर टाकल्यास युक्रेन रोमानियाचा तह पेट्रोग्राडच्या तहाच्या अगोदर होईल; आणि तसें झाल्यास पेट्रोग्राडची स्थिति कशी होईल तें पहा. फिन्लड स्वतंत्र झाला; कोर्लंड, पोलड, वगैरे प्रात जर्मनीच्या हातात; युक्रेन स्वतत्र तहानें जर्मनीला चिकटलेला, बाकी काय शिल्लक ? पेट्रोग्राडचा प्रात, मास्कोचा प्रात, आणि कोसाकचा प्रात. या तीन प्रातात पेट्रोग्राड व मास्को या दोन प्रातामध्ये एकोपा असला तरी मास्कोच्या प्रातात सग्रही लोकांचा बराच मोटा भरणा आहे. कोसाक प्रातानें तर पेट्रोग्राडच्या विरुद्ध लढाई पुकारिली असून पूर्वीचे जुने सेनापति क्यालडिन, कॉर्निलॉफ वगैरे मडळी कोसाकाना मिळाली आहे, आणि पेट्रोग्राड येथील सोशियालिस्टांना पदच्युत करून झारची पुनः स्थापना करण्याचा कोसाक प्राताचा विचार आहे. तेव्हा पेट्रोग्राड येथील सोशियालिस्टांनीं पोलडसंबधानें जर्मनी काढील तशी समजूत काढून घेण्याचें जर नाकारले, आणि आपला रुसवा जर अधिक काळ लांबविला तर त्यांच्या अगोदर युक्रेनचा तह होईल आणि युक्रेन व जर्मनी मिळून कोसाकाना मदत करून सोशियालिस्टांना सर्वच सत्ता गमवावी लागेल. तेव्हा जानेवारी महिन्यात युक्रेनचा तह होत असतांनाच पेट्रोग्राडचाहि तह होईल आणि जर्मन पैशाच्या व सैन्याच्या मदतीनें पेट्रोग्राडचे सोशियालिस्ट कोसाकाच्या भीतींतून मुक्त होऊन पोलंड वगैरे प्रात आस्ट्रो-जर्मन साम्राज्याच्या परिघाच्या आंत प्रत्यक्षपणें पडतील, व इतर सर्व रशिया व्यापारी दृष्टीनें आस्ट्रो-जर्मन साम्राज्याच्या सांवलीखालीं जाईल. अशा तऱ्हेचा जर्मनीचा व रशियाचा तह जानेवारींत होणार अशीं स्पष्ट चिन्हें जानेवारी प्रारंभाला दिसू लागलीं आहेत. असा जर तह झाला आणि मोठी राज्यसत्ता या

दृष्टीनें रशियानें जर वाटोळें झालें तर युरोपखंडांतील अग्रपूजेचा मान जर्मन बादशहाच्या पायापाशीं लोटांगणें घालत जाईल यांत संशय नाहीं. हा अग्रपूजेचा मान मिळाल्यावर जर्मन बादशहा "ना खंडणी ना मुलूख" या तत्त्वाला अनुसरूनच नव्हे, तर या तत्त्वाच्या पलीकडेहि विशेष सवलतीच्या दृष्टीने इंग्लड, फ्रान्स वगैरे राष्ट्रांशीं तह करण्यास तयार होईल, असा काहींचा अंदाज आहे. जर्मनी जर रशिया–रोमानियाशीं स्वतंत्र तह झाल्यानंतर बेल्जमला पूर्ण स्वातंत्र्य देण्यास तयार होईल आणि अल्सॅक लॉरेन्स संबंधाचें फ्रान्सच्या हृदयांतील शल्य काढण्यास तयार होईल तर इतर बाबीसंबंधाने तडजोडीनें तह करण्यास इटली, फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका कबूल होतील, असा सूर इंग्लंडचे मुख्य प्रधान मि. लाईड जॉर्ज यांच्या जानेवारी प्रारंभाच्या भाषणावरून वाटू लागला आहे. मि. लाईड जॉर्ज यांचें भाषण स्पष्टपणाचें, न्यायी वृत्तीचें व कामकरी पक्षालाहि पटणारें असे झालें आहे. जर्मनीचें मन विनाकारण दुखविण्याचा इंग्लडचा बिलकूल हेतु नसून दुसऱ्याच्या मुलखाचा अपहार करण्याचीहि बुद्धि इंग्लंडास नाहीं. इंग्लंडास दुःख काय तें बेल्जमचें आणि फ्रान्सची सारी तडफड अल्सॅक लॉरेन्ससाठीं. रशियाशीं स्वतंत्र तह झाल्यावर जर जर्मनीने वरील दोन बाबीसबंधाने इंग्लंड व फ्रान्स यांचें समाधान केलें, तर फेब्रुवारी–मार्च महिन्यात पोपसाहेबांना मध्यस्थी करून सर्वांचाच तह का घडवून आणतां येऊं नये ?

# महायुद्धाचा चवथ्या वर्षाचा जानेवारी--फेब्रुवारी महिना

## तहाच्या वाटाघाटींचें मुख्य स्वरूप

जानेवारी महिन्यांत लढाई थंडावल्यासारखी होती. फ्रान्सच्या रणभूमींत किरकोळ झटापटी झाल्या आणि इटालीच्या रणभूमींत इटालीने आशियागोच्या बाजूची एक टेकडी शत्रूपासून घेतली. बाकीं चोहोकडे सामसूमच होतें. लढाई थडावली होती खरी, पण तहाची वाटाघाट जोरावली होती. रशिया व जर्मनी यांमधील स्वतंत्र तहाशिवाय दोस्त सरकार व जर्मनी ह्यांमधील तहाच्या बोलण्यास जानेवारी महिन्यात पर्यायानें सुरवात झाली! रशियाचा स्वतंत्र तह फेब्रुवारीचे पहिल्या पंधरवडयात घडून येईल आणि तसा तह घडून आल्यास फेब्रुवारीचे अखेरीस दोस्त सरकार व जर्मनी ह्याच्यामध्यें तहाचें बोलणें अधिक रीतसर सुरू होईल, असा फेब्रुवारीचे पहिल्या तारखेचा अंदाज आहे. हा अदाज व हीं तहाचीं बोलणीं वाचकाचें नीट ध्यानांत यावी म्हणून या वाटाघाटीच्या मुख्य स्वरूपाकडे वाचकांचें लक्ष वेधण्याचे ह्या लेखात योजिलें आहे. डिसेंबर आणि जानेवारी ह्या दोन महिन्यात दोन्ही पक्षांच्या वकिलांच्या रीतसर बैठकी होऊन रशिया व जर्मनी ह्याच्यामधील तहाची वाटाघाट सुरू झाली. फेब्रुवारी प्रारभाला शेवटच्या बैठकीचें काम चालू झालें असून ह्या बैठकींत कांहीं तडजोड निघून तह होईल असा अदाज आहे. रशिया व जर्मनी ह्याच्यामधील तहाच्या कलमाची चर्चा करण्यापूर्वीं ह्या अशा तहाच्या वाटाघाटीस सुरवात कशी झाली ह्याचा विचार करणे जरूर आहे.

दोन राष्ट्रे लढत असतांना आपण होऊन एकदम एकमेकांशी तहाच्या अटी बोलण्यास एकदम सुरवात करीत नाहींत. ह्या कामीं कोणी तरी मध्यस्थ लागतो. मध्यस्थाने विचारावें, "बाबानो फार लढलां, आतां कांहीं तडजोड करा" लढणारानीं म्हणावें "आम्ही आणखी लढणार, तुम्ही मध्यें कां पडतां?" असला प्रकार दोन चारदां झाल्यावर मग बोलणें चालणें करण्यास लढवय्ये तयार होत असतात. लहान मुलाच्या मारामाऱ्या मिटविण्याचा प्रकार आणि श्रेष्ठ गणल्या गेलेल्या राष्ट्राची युद्धे सरविण्याचा प्रकार सामान्यतः एकच स्वरूपाचा असतो. कोणी तरी मध्यस्थी करावी लागतेच. लहान मुलांच्या मारामारींत मध्यस्थीचे व न्यायाधिशाचें काम

थोरली माणसें चटदिशीं करून टाकतात. लहान सहान देशांच्या लढायांत थोरली राष्ट्रे मध्यस्थीचें व न्यायाधिशाचे काम करीत असतात. फरक एवढाच कीं, न्यायाधिशाचें स्वरूप बऱ्याच अंशानें झाकून ठेवलेलें असते. दोन मोठीं राष्ट्रे लढत असतांना इतर मोठी व बरोबरीचीं राष्ट्रें आपल्या न्यायाधीशपणाचा लोप करून केवळ मध्यस्थाचें काम करण्यास उत्सुक असतात, आणि तसल्या मध्यस्थ-वृत्तीस चांगलें यशहि येतें. मध्यस्थाला मध्यस्थ व्हावेसें वाटत असतेच आणि भाडणारांनाहि भाडता भाडतां कोणी मध्यस्थ भेटेल तर बरें असेंच वाटू लागतें. तेव्हां योग्यकाळीं सर्व काहीं नीट रीतीनें जुळून येतें. सांप्रतच्या महायुद्धात एक असा विलक्षण प्रकार झाला आहे कीं, मध्यस्थ होण्याच्या लायकीचें कोणचेही राष्ट्र युद्धाबाहेर उरलेलें नाहीं. अमेरिका महायुद्धात सामील झालेली नव्हती त्यावेळीं तेथे वेळीं अवेळीं तहाचा खल होत होता. अमेरिका सामील झाल्यापासून जगातील सर्वच घेडे महायुद्धात पडलीं. जी चारपाच तटस्थ वृत्तीचीं राष्ट्रे उरलीं आहेत तीं ‘ शाकाय वा लवणाय वा’ अशाच स्वरूपाचीं आहेत. या चिमकुल्या राष्ट्रांना मध्यस्थी करण्याइतकी ताकतही नाही. आपण मध्यस्थाच्या बुद्धीनें बोलणें सुरू करावें, पण चुकून एकादा गैरशिस्त शब्द तोंडावाटे निघून थोरामोठयाचा अपमान होऊन त्यानें रागाच्या भरांत चपराक लगावली तर कसें, त्या भीतीनें ही चिमकुलीं राष्ट्रें व्याकूळ झालेलीं आहेत. अशा प्रभगीं मध्यस्थाचें काम दोन्ही पक्षाला पूज्य असलेल्या एखाद्या निस्पृह साधुपुरुषानें करावें लागतें. पोपसाहेबांनीं याच दृष्टीनें मध्यस्थाचें कामास दोन महिन्यापूर्वी सुरुवात केली, पण त्याची मध्यस्थी सर्वांना पटली नाहीं. कारण ते जरी पूज्य असले तरी ते स्वतः सस्थानिक असल्यामुळे दोन्ही पक्षाना सारखेच निस्पृह वाटले नाहींत. बरोबरीचा कोणी माणूस मध्यस्थ होण्यासारखा नाहीं आणि सर्वांना निस्पृह दिसणारा कोणी पूज्य साधु नाहीं. या स्थितीमुळें सांप्रत युरोपात लायक मध्यस्थाची फारच गरज भासत आहे.

मध्यस्थ तर नाहीं आणि मध्यस्थाशिवाय तहाचें बोलणें कसें सुरू करावयाचें ? ही अडचण पेट्रोग्राड येथील लेनिन-ट्रॉट्स्की प्रभृति सडेसोट सोशियालिस्टांनीं कशी दूर केली ? त्यांच्या मनात जर्मनीपाशीं तह करण्याचें जेव्हां आलें तेव्हा त्यांना मध्यस्थ कोणी आढळला नाहीं. बरें, हातून लढवत नाहीं तेव्हां तह करूया. असें एकदम जर्मनीपाशीं बोलावें तर मानहानि होते; तसें बोलवत नाहीं. तेव्हां त्यानीं एक युक्ति

काढिली. काढली म्हणण्यापेक्षां निघाली. एखाद्या साधूला मध्यस्थ घालण्याऐवजीं एक मोठें राजकीय तत्त्व मध्यस्थ म्हणून पुढें केलें. 'ना मुलूख व ना खंडणी शिवाय प्रत्येक देशाच्या लोकांना आपापल्या राजसत्तेचें स्वरूप ठरविण्याचा हक्क, हें मोठें तत्त्व त्यानीं पुकारलें आणि या तत्त्वाच्या मध्यस्थीला अनुसरून आपण तह करण्यास तयार आहों असें त्यांनीं जाहीर केलें. सदर तत्त्व तारायंत्रावर किंवा बिनतारेच्या यंत्रावर आरूढ होऊन सर्व प्रमुख राजधान्यांतून मध्यस्थाच्या पेहरावात साप्रत उघडपणें फिरत आहे आणि या विदेही मध्यस्थाची कौतुकानें मुलाखत घेऊन सर्व जबाबदार मुत्सद्दी याच्याशीं कांहीं गोष्टी उघडपणें व काहीं गोष्टी गुप्तपणें बोलू लागले आहेत. रशियाला घाई होती म्हणून या अमूर्त मध्यस्थाच्या मार्फत जर्मनी व रशिया यांच्या वकिलाचें प्रत्यक्ष बोलणें मध्यस्थीस सुरुवात झाल्यापासून दहा पधरा दिवसातच होऊं लागलें. इग्लंड, फ्रान्स, अमेरिका वगैरे राष्ट्राना बिलकूल घाई नाहीं. किंबहुना दोस्त सरकारांशीं व्हावयाच्या तहात घाईची पाळी जर्मनीची आहे. रशियाशीं एकदां तह होऊन गेल्यावर तहासंबंधाचा तगादा जर्मनीचाच दोस्त सरकारांच्या मागे सदर विदेही मध्यस्थाच्या मार्फत लागेल यांत सशय नाहीं. तथापि महायुद्धातील सहारानें चिंताग्रस्त झालेल्या पार्वतीच्या विनतीवरून शंकरानीं सदय अतःकरणानें बोलून दाखविलेल्या महातत्त्वाला हातांत धरून प्रत्येक राजधानींत मध्यस्थ म्हणून नारदमुनी त्याची पूजाअर्चा करू लागल्यापासून मुत्सद्दीहि या अदृश्य बुवाचे नादीं लागले आहेत. डिसेंबर जानेवारी महिन्यांत या बुवांना उद्देशून इग्लंडचे मुख्य प्रधान मि. लाइड जॉर्ज, अमेरिकेचे प्रे. मि. विल्सन, जर्मनीचे मु. प्रधान मि. हार्टलिंग व आस्ट्रियाचे परराष्ट्रीय प्रधान मि. झरनिन यांचीं भाषणें झाली आहेत. जानेवारी महिन्याप्रमाणें फेब्रुवारी महिन्यातहि जर उत्तर प्रत्युत्तरादाखल ही अशींच भाषणें झालीं तर मार्च महिन्यांत कदाचित् रीतसरहि बोलणें सुरू होईल. मध्यस्थामार्फत चाचपडून पहाण्याचें काम साप्रत सुरू आहे. प्रत्यक्ष मध्यस्थ कोणींच नाहीं, पण एक महातत्त्व मध्यस्थ कल्पून एकमेक आपापल्या घरीं बसून आपल्या लोकांशींच बोलण्याचे मिष करून पर्यायानें शत्रूशीं बोलू लागले आहेत ! अजमावून पहाण्या-एवढें तरी बोलणें मध्यस्थानें सुरू करून द्यावें लागतें. महातत्त्व स्वरूपीं मध्यस्थानें जानेवारींत तेवढें बोलणें सुरू करून दिलें आहे; हा मध्यस्थीचा प्रकार जरा

चमत्कारिक खरा, पण सांप्रतचें महायुद्ध पूर्वीच्या सर्व युद्धाहून विलक्षण असल्यामुळें व्याख्यानद्वारां लांबून लांबून बोलण्यास सुरुवात व्हावी यात कांहीं आश्चर्य नाहीं.

जानेवारीच्या अखेरीस व फेब्रुवारीच्या प्रारंभी या तहाच्या वाटाघाटीची मजल कोठपर्यंत आली ते आपण आतां पाहूं या. तहाच्या वाटाघाटींत तंट्याचे विषय येणेंप्रमाणें आहेतः—(१) महत्त्वाकांक्षेच्या नादीं लागून युरोपची शातता कोणी मोडली? व ही शांतता मोडणाराला कोणचें प्रायश्चित्त द्यावयाचें? (२) बेल्जम (३) जर्मनीनें व्यापलेला उत्तर प्रांत (४) १८७० सालीं जर्मनीनें जिंकलेला फ्रान्सचा आल्साक लारेन्स प्रात (५) इटालियन भाषा बोलणारा पण आस्ट्रियाच्या सत्तेखालीं असणारे ट्रिस्टी वगैरे प्रात. (६) बाल्कन संस्थानें, रोमानिया, सर्व्हिया माऊंटनिग्रो वगैरे. (७) रशियाचे पोलंड, कोर्लंड व लुथियानिया हे प्रात (८) तुर्कस्थानचे आर्मिनिया, बगदाद, पालेस्टाईन व मक्कामदिना हे प्रांत. (९) दोस्त सरकारानीं जर्मनीच्या जिंकलेल्या वसाहती (१०) व्यापारी सवलत. या दहा मुद्या-संबधानें काहीं तडजोड निघाल्यास तह होण्याचा संभव आहे. तेव्हां प्रेसिडेंट विल्सन, मि. लाइड जॉर्ज, मि. हर्टलिंग, मि. झरनिन व इतर मुत्सद्दी याचीं जानेवारी महिन्यांत झालेलीं भाषणें सदर दहा मुद्यासंबधानें काय म्हणतात याचा आता आपण क्रमशः विचार करू. जर्मनीने तीस वर्षे लढाईची तयारी केली व या तयारीच्या गुर्मीमुळे सर्व जगभर प्रमुखपणा मिळविण्याची महत्वाकांक्षा जर्मनांत उत्पन्न झाली. तेव्हां रणागणावर जर्मनीची गुर्मी जिरविल्याशिवाय कुस्ती सोडणें युरोपच्या पुढील शांततेस धोक्याचें होणार आहे. हे मत दोन तीन महिन्यापूर्वी इग्लड वगैरे देशांत विशेष जोरानें प्रतिपादिलें जात होतें, पण अलिकडे त्यांत फेरबदल झाला आहे. जर्मनींत लष्करी बाण्याच्या लोकाचें प्राबल्य असलें काय किंवा इतराचें प्राबल्य असलें काय आपणांस काय करावयाचें आहे? जर्मनीचा उपद्रव इतरांना झाला नाहीं म्हणजे बस्स आहे. असें वरील मताचें रूपांतर होऊन जर्मनीच्या लष्करी उद्दाम वृत्तीला आळा घालण्याची कांहीं युक्ति निघाली तर ठीक होईल; असें लॉर्ड लॅन्सडाऊन यांनी प्रथम बोलून दाखविलें. सर्व राष्ट्रांचा एक संघ बनवावा व त्या संघानें जर्मनीच्या लष्करी उद्दामपणास आळा घालवा असें सुचविण्यात आले. अशा संघानें आळा घालणें ह्मणजे मोठमोठया राष्ट्रात पुन्हां दोन तट होऊन महायुद्धाची पुनरावृत्तिच करणें होय, असें मि. लाइड जॉर्ज यांचें मत पडलें. यानंतरच्या वादांत

जर्मनीचें सैन्य चुरडण्याचे विचार व राष्ट्रसंघाची कल्पना हे दोन्ही मुद्दे मागें पडून रशियन राज्यक्रातीनें पुढें आणलेलें ( Self-Detrmination ) स्वायत्ततेचें तत्त्व पुढें ढकलण्यांत आलें. प्रत्येक देशाच्या लोकानीं आपणास राज्यसत्ता कोणच्या प्रकारची पाहिजे हें स्वतः ठरवावें असें हें स्वायत्ततेचें तत्त्व आहे. या तत्त्वाला अनुसरून जमनीनें बेल्जम प्रांत सोडलाच पाहिजे. उत्तर फ्रान्स, आल्साक लारेन्स, हीं फ्रान्सला परत दिली पाहिजेत. पोलड, रोमानिया, सर्व्हिया, अरबस्थान, पालिस्टाइन वगैरे प्रांतांना स्वातंत्र्य दिलें पाहिजे; व जर्मन वसाहतींतील लोकांना त्याच्या मतानुसार राज्यपद्धति सुरू करण्याची परवानगी दिली पाहिजे. ह्मणजे दोस्तसरकार व्यापारविषयक बाबतींत स्वतःची सोय संभाळून जर्मनीवर बहिष्कार घालणार नाहीं, आणि आस्ट्रो-जर्मनांचा सेनाशकट मोडून लष्करी बलावर तेथील राज्यव्यवस्थेत फेरफार करण्याचाहि उद्योग करणार नाहीं. जर्मनीनें स्वायत्ततेचें तत्त्व कबूल करून त्याची अंमलबजावणी वरील धर्तीनें करण्याचें जर आश्वासन दिलें तर जर्मनीचा रणांगणावर पुरा मोड होण्यापूर्वी तह होण्यास हरकत नाहीं असें मि. लाइड जॉर्ज यांनीं सुचविलें. मि. लाइड जॉर्ज यांना प्रे. विल्सन यानीं दुजोरा दिला. आणि समुद्रावरचेंहि स्वातंत्र्य सर्व राष्ट्राना सारखे भोगण्यास मिळेल अशी पुस्ती जोडली. मि. लाइड जॉर्ज व प्रे. विल्सन याच्या भाषणांना जर्मन मुख्यप्रधान मि. हर्टलिंग व आस्ट्रियाचे परराष्ट्रीय प्रधान मि. झरनिन यानीं उत्तरें दिलीं. आस्ट्रियाच्या परराष्ट्रीय प्रधानाच्या मतें बाल्कन प्रदेशावर, आस्ट्रियाच्या स्लाव्ह लोकांच्या वस्तीवर व तुर्की साम्राज्यावर आपली छाप बसावी अशी महत्त्वाकांक्षा रशियानें धरली व त्यामुळे महायुद्धाचा प्रसंग ओढवला. आल्साक लारेन्सच्या लोभानें फ्रान्सनें रशियाच्या महत्त्वाकांक्षेस उत्तेजन दिलें. फ्रान्स व रशिया यांचा पराभव झाला असतां बाल्कन प्रदेश व तुर्की साम्राज्य यांवर जर्मनीची छाप बसवून इजिप्त व हिंदुस्थान येथील आपल्या सत्तेस धोका बसेल या भीतीनें इग्लंड महायुद्धांत पडलें; आणि आस्ट्रियन प्रांत आयते आपणास गिळावयास मिळतील या आशेनें इटली व रोमानिया हे देश आस्ट्रियाच्या विरुद्ध उठले. आस्ट्रियाच्या मतें महायुद्धाला कारणीभूत झालेल्या बऱ्याच बाबींचा निकाल महायुद्धानेंच लावला आहे. रशियाचा चुथडा झाला आणि रोमानिया व इटली यांचा लोभ महायुद्धाच्या भट्टींत विरघळून गेला. रशिया जर विरघळून गेला तर

पोलंड, बाल्कन प्रदेश व तुर्कस्थान यांच्या संबंधाचा निकाल आस्ट्रो–जर्मन्स लावतील तसाच लाविला पाहिजे. कारण महायुद्धनेंच तसा निकाल दिला आहे. येथें तडजोडीचें कार्य नाहीं, असें आस्ट्रियाचें ह्मणणें आहे. पोलंड, कोर्लंड वगैरे प्रांत स्वतःचे राज्यास जोडण्याची इच्छा आस्ट्रियास नाहीं. जर्मनीच्या मुख्य प्रधानाचें पोलंड संबधानें असें म्हणणें पडतें कीं, जर पोलंडला आम्ही रशियाच्या कचाट्यातून सोडविलें तर पोलंडांत पुढें कोणाची राज्यव्यवस्था असली पाहिजे हें ठरविण्याचा हक्क आमच्याकडे येतो; तो हक्क रशियाला मिळत नाहीं. आस्ट्रियाच्या मनात पोलंडला स्वातंत्र्य द्यावयाचें आहे. व जर्मनीच्या मनांत पोलडला स्वतःच्या पजात ठेवावयाचें आहे. रशियाच्या मनांत स्वतःच्या धर्तीचें स्वातंत्र्य पोलंडांत नांदावें असें आहे. रशियाची सांप्रत स्थिति अत्यत वाईट झाली आहे. फिनलंड, युक्रेनप्रात, ओसाकप्रांत, सर्व ठिकाणीं सडेसोट सोशियालिस्ट व संग्रही लोक याच्यामध्ये एक· सारख्या लढाया सुरू आहेत. मारामाऱ्या, लुटालूट व खून यांचा तर पूर आला आहे. सर्व आगगाड्या विस्खळित झाल्यामुळे चोहोंकडे दुष्काळ पडून नानाप्रकारच्या रोगांच्या साथी प्रबळ झाल्या आहेत. जर्मनीशीं तह करण्याचें आणखी काहीं काल जर लांबणीवर टाकण्यांत आलें तर रशियांतील अंतःकलहास मर्यादा न राहून रशियाची इतकी वाईट स्थिति होईल कीं, खुद्द रशियन लोकच जर्मन सैन्यास मोठ्या आर्जवाने स्वतःचे देशांत बोलावून नेऊन स्वतःच्या डोक्यावर बसू देतील. आजच युक्रेनच्या सैन्याशीं लढतांना सडेसोट सोशियालिस्टाच्या एका सेनापतीने जर्मन सैन्याची मदत मागितली, पण ती मदत जर्मन सेनापतीने देण्याचें नाकारलें. खुद्द रोमानिया व पेट्रोग्राडचे सोशियालिस्ट यांमध्ये लढाई सुरू झाली असून रोमानियाच्या राजाला कैद करण्याचा हुकूम पेट्रोग्राडच्या सोशियालिस्टांनीं सोडला आहे. रशियाची व रोमानियाची अशाप्रकारें दुर्दशा झाल्यामुळे आस्ट्रो–जर्मनांशीं तह करण्याशिवाय त्यांना गत्यंतरच नाहीं. पोलंड वगैरे प्रांतावर आपला लोभाचा डोळा ठेविल्याबद्दल जर्मनीला लेनिन प्रभृति सोशियालिस्टानीं यथेच्छ शिव्या देऊन घेतल्या, पण त्यांनीं अखेरीस असें ठरविलें कीं, सांप्रतच्या रशियाच्या स्थितींत नावडणाराहि तह जर्मनीशीं केला पाहिजे. औषधाची कडू गोळी गिळावयाची ह्मणून नापसंत अटीनाहि संमति देण्याच्या इराद्यानें ट्रॉट्स्की वगैरे रशियाचे वकील ब्रेसलिटोव्हस्क येथें फेब्रुवारीचे प्रारंभाला आले आहेत. अर्थात फेब्रुवारीचे पहिल्या पंधरवड्यांत

स्वतंत्र तह होईल असें मानण्यास हरकत नाहीं. या तहानें पोलंड, कोर्लंड वगैरे प्रांत एक तऱ्हेचे स्वतंत्र ठरले तरी जर्मनीच्या कच्छपी देशांतच त्यांचीं गणना होईल. रोमानियाचा डोब्रुजा प्रांत बल्गेरियाला मिळेल, आणि सर्व्हिया व माऊंटनिग्रो यांना बाल्कन युद्धापूर्वीच्या स्थितींत पोचविण्यांत येईल. टर्कीच्या आर्मेनिया प्रांतावर टर्कीची साम्राज्य सत्ता राहून आर्मेनियन लोकांना स्वराज्य मिळेल. तुर्कस्थानच्या साम्राज्याचीं पूर्वीचीं बंधनें नष्ट होऊन तुर्कस्थान जर्मन दोस्तींतील पूर्ण स्वतंत्र राष्ट्र समजलें जाईल. शिवाय इराणावरील रशियाची सावली काढून घेण्यात येऊन इराणचें पूर्ण स्वातंत्र्य कबूल करण्यांत येईल. आणि सर्व रशियन राज्यात आस्ट्रो–जर्मनांना व्यापारी सवलतीचे हक्क मिळतील. रशियाशीं अशा प्रकारचा तह होऊन गेल्यानंतर बेल्जम, उत्तर फ्रान्स, आल्साक लोरेन्स, आस्ट्रियानें व्यापलेल्या अर्धा व्हेनिसचा प्रांत, बगदाद, पालिस्टाइन व इंग्रजानीं घेतलेल्या जर्मन वसाहती येवढ्यासंबंधाचा काय तो प्रश्न रहातो. यासंबंधानें आस्ट्रियानें असे जाहीर केलें आहे कीं, ‘ कोणी कोणाचा मुलूख घेऊ नये व कोणी कोणापासून खंडणी घेऊ नये ’ या तत्त्वाला धरून वरील बाबीसंबधाने सर्वांचा तह होणें इष्ट आहे. ‘ना मुलूख, ना खंडणी’ या तत्त्वाला आस्ट्रियाने जशी संमति दिली आहे तशीच समति जर्मनीने अद्याप दिलेली नाहीं. रशियाचा स्वतंत्र तह होऊन गेल्यानतर जर्मनी तशी संमति देईलच असेंहि आज सांगतां येत नाहीं. जर्मनींतील लष्करीपक्षाचें असें ह्मणणें आहे कीं, रशियाचा स्वतंत्र तह झाल्यानतर थोड्या अवधीत फ्रान्सच्या व इटलीच्या रणभूमींत मोठा विजय संपादन करण्याची शक्ति आस्ट्रो–जर्मन सैन्याच्या अगीं आहे. मग बेल्जमला फार झालें तर स्वराज्य द्यावें, बेल्जमवरील साम्राज्य सत्ता जर्मनीने कां गमवावी ? हातीं पडलेल्या उत्तर फ्रान्सांतील कोळशाच्या व लोखंडाच्या खाणी जर्मनीने कां सोडाव्या ? व्हेनिस प्रांत व व्हेनिस बंदर इटालीनें आस्ट्रियाला का देऊं नये ? जर्मनीने जर महायुद्ध असेंच नेटानें पुढे चालविलें तर जर्मनीच्या वसाहतीच केवळ नव्हे, तर इजिप्त व ट्रिपोली हेहि प्रांत दोस्त सरकाराना सोडणें भाग पडेल. जर्मनींतील लष्करीपक्षाला अशा प्रकारची स्वप्नें पडू लागलीं आहेत. हीं स्वप्नें आहेत, त्यांच्या नादीं लागून सोय नाहीं हें जर्मनीचे जबाबदार मुत्सद्दी ओळखून आहेत; पण ‘ना मुलूख ना खंडणी ’ या मंत्राकडे, जर्मनीचा अद्याप ओढा दिसत नाहीं. बेल्जम, उत्तर फ्रान्स व व्हेनिसचा

भाग हे प्रांत आम्हांस पाहिजे आहेत असें नाहीं, तर आमच्याकडे ते गहाणवट आहेत असें आम्ही समजतों. आमच्या वसाहती व तुर्कस्थानचा जिंकलेला भाग याशिवाय वर आणखी कोणची अधिक किंमत देऊन हे गहाणवट प्रांत सोडवितां तें बोला, असें विचारण्याचा जर्मन मुख्य प्रधानाचे भाषणाचा रोख दिसतो. इंग्लडनें बगदाद, पालिस्टाइन व वसाहती सोडून द्याव्यात; फ्रान्सनें आल्साक्लारेन्स सोडून द्यावा; इटलीनें ट्रिस्टी वगैरे कांहीं मागू नये. इतकेच नव्हे, तर इंग्लडनें या सर्वांवर दक्षिणा म्हणून जिब्राल्टर, सुवेज, एडन वगैरे समुद्राचीं नाकीं सोडून द्यावीं म्हणजे बेल्जम, उत्तर फ्रान्स व व्हेनिसचा भाग आम्ही सोडून देऊं असें जर्मनीचें ह्मणणें आहे. रशियाशीं स्वतंत्र तह होऊन, बाल्कन प्रदेशाचा तटा हाता-निराळा झाल्यावर 'ना मुलूख ना खंडणी' हे तत्त्व 'शिरशावंद्य' मानण्यास आस्ट्रिया तयार आहे. जर्मनीहि तयार आहे, पण समुद्रावरील नाक्यांची दक्षिणा मागतो. फ्रान्स आल्साक लारेन्स वरील आपले रास्त हक्क सोडण्यास तयार नाहीं. बगदाद पालिस्टाइन वगैरे प्रांत तुर्की जुलमाखालीं पुन्हां आपणें इंग्लडला साहजिकच इष्ट वाटत नाही आणि जर्मन वसाहतींतील तद्देशीय लोकाचे स्वराज्याचे हक्क जर्मनीच्या पायाखालीं पुन्हा तुडविले जावेत याहि गोष्टीला इंग्रजांना संमति देववत नाही. रशियाशीं स्वतत्र तह झाल्यानंतर जर्मनीला मोठा विजय मिळेल या धमकीतहि काहीं अर्थ नाहीं. रशियाशीं स्वतंत्र तह झाल्यानंतर दोनचार महिने ॲंग्लो–फ्रेंचाना जड जातील हें खरें; पण त्या संकटाची तरतूद त्यांनीं आजच करून ठेविली आहे आणि एकदां त्या सकटातून ॲंग्लो–फ्रेंच पार पडून गेले म्हणजे अमेरिकेच्या मदतीने १९१९ सालापासून दोस्त सरकारांचें सेनाबळ जर्मनीहून अधिक वाढणार आणि अखेरीस जर्मनी जमीनदोस्त होणार यात संशय नाहीं. शिवाय आजच आस्ट्रियांत व जर्मनींत लाखो कामकरी लोकाचे संप होत असून 'ना मुलूख, ना खंडणी' या तत्त्वावर लढाई लवकरच बंद करा असा जर्मन सरकारच्या मागे लोकांचा तगादा लागला आहे. तेव्हा रशियाचा स्वतंत्र तह झाल्यावर पुढे लढाई चालविल्यानें अपशयच पदरीं पडणार हें ओळखून आस्ट्रियाच्या आग्रहामुळे आणि संपाच्या तगाद्यामुळे 'ना मुलूख ना खडणी' हें तत्त्व उघडपणें कबूल करून दोस्त सरकारांना आल्साक लारेन्स संबंधाच्या काहीं सवलती दक्षणा देण्यासहि राजी होऊन जर्मनी स्वतः तह करण्याची खटपट करूं लागेल. आणि मग प्रे. विल्सन याना या

खटपटीला दुजोरा देणें इष्ट वाटेल. वरील प्रकारें जर जर्मनांचा जोर उतरला तर जर्मनीकडे विशेष औदार्याच्या दृष्टीनें अमेरिका पाहूं लागेल यांत संशय नाहीं. आस्ट्रियानें आजच प्रे. विल्सनच्या मागे तहाचा तगादा लावला आहे. जर्मनी उद्यां तसेंच करील. रशियाच्या तहानें दोघांचेंहि तळिराम गार झाल्यावर 'ना मुलूख ना खंडणी' या तत्त्वाचा ते जप घेतील हें खरें, पण रशियानें आपण होऊन आपल्या पायावर धोंडा मारून घेतला त्याला प्रे. विल्सन काय करणार ? प्रे. विल्सन यांच्या अंतःकरणातील औदार्य बुद्धि आस्ट्रो–जर्मनांच्या वरील जयानें वाढत गेली तर ॲंग्लो–फ्रेंचानांहि आपला न्यायीपणा बऱ्याच अंशानें आवरून धरावा लागेल हे सांगणें नकोच.

# महायुद्धाचा चवथ्या वर्षाचा फेब्रुवारी-मार्च महिना

जानेवारी महिन्याप्रमाणें फेब्रुवारी महिनाहि रशियाच्या तहाच्या वाटाघाटींत जाऊन ता. ३ मार्च रोजीं रशिया व जर्मनी यांच्यामध्ये तह झाला. फेब्रुवारीचे तिसऱ्या आठवड्यात तहाच्या अटी मुक्रर ठरल्या, पण त्या अटी रशियास अप मानास्पद वाटल्यावरून लेनिन-ट्रॉटस्की प्रभृतींनी त्या अटीवर सह्या करण्याचें नाकारिले. तह करण्याचें नाकारल्या बरोबर पेट्रोग्राड येथील सडेसोट सरकारनें असें जाहीर केले कीं, जर्मनीशीं लढण्याची आमच्या अगीं ताकदहि नाहीं व आमची इच्छाहि नाही, तेव्हा महायुद्धाकरिता गोळा केलेल्या सैन्याला घरोघर जाण्यास निरोप देऊन जर्मनीशी चाललेली लढाई बद करून तहाच्या अटीस तोंडी संमति देतों पण कागदावर सह्या करीत नाहीं. रशियानें असें जाहीर केल्यानंतर आस्ट्रो जर्मनांचा व युक्रेन प्रातांचा स्वतत्र तह ठरला व फेब्रुवारीचे तिसऱ्या आठवड्यात या तहावर सह्या झाल्या. याच सुमारास युक्रेन प्रात व पेट्रोग्राडचें रशियन सरकार याच्यामध्यें युक्रेन प्रातातील निरनिराळ्या गावीं लहान सहान झटापटी होऊन युक्रेनवर सूड उगविण्याचा सपाटा सडेसोटाच्या ताबड्या सैनिकानीं चालविला. रशियाच्या सडेसोट अमलातून निसटून जाऊन सग्रही लोकाच्या कल्याणार्थ युक्रेननें स्वतत्र सत्ता स्थापिली, युक्रेनमधील धान्याचा साठा आपल्या हातीं पडावा म्हणून युक्रेनशीं आस्ट्रो-जर्मनानीं स्वतत्र तह केला; असें दूषण युक्रेन प्रानाला लावून युक्रेन प्रातातील धान्याचे साठे सडेसोटाच्या ताबड्या लष्करानें जाळून टाकावे व मग युक्रेनप्रात सोडावा असे हुकूम सडेसोटानीं सोडले. युक्रेन व आस्ट्रो-जर्मन्स याच्यामध्ये झालेला तह म्हणजे भाकरीसाठी केलेला तह होय. रशियाचा युक्रेन प्रांत म्हणजे रशियाचाच केवळ नव्हे, तर सर्व युरोपचा धान्याचा साठा समजला जातो. या प्रातात जितके मुबलक धान्य पिकतें तितके मुबलक युरोपात दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणीं पिकत नाही. या धान्यावर नजर ठेवून आस्ट्रो-जर्मनानीं स्वतःच्या ताब्यातील पोलड प्रातातील काहीं भागाची लाच युक्रेनला देण्याचें कबूल करून भाकरी मिळावी म्हणून युक्रेनशीं तह घडवून आणिला. या भाकरीच्या तहामुळें पोलडचे लोक नाखुष झाले व रशियातील सडेसोट

संतापले. पोलंडला नाखुष करण्याइतकी खुशामत आपण युक्रेनची केली याबद्दल आस्ट्रो-जर्मनांना लगेच पश्चात्ताप झाला आणि आस्ट्रियानें युक्रेनची समजूत घालून पोलंडचा काहीं भाग युक्रेनला देण्याविषयींची तहांतील अट रद्द करविली. अशा रीतीनें युक्रेन व पोलंड दोघेहि खुष झाले खरे, पण सडेसोटांचा संताप शमला नाहीं. फिनलंडमध्यें सडेसोटांनीं फिनलंडच्या स्वतंत्र सत्तेचें संरक्षण करणाऱ्या पांढऱ्या सैनिकाशीं लढाई चालविली. फिनलंडच्या आखाताच्या दक्षिण किनाऱ्याला व रिगाच्या आखाताच्या उत्तर-पूर्व किनाऱ्याला लागून असलेल्या प्रांतातील जर्मन लोकांच्या इस्टेटी काढून घेण्यास सुरवात केली. आणि युक्रेनमधील धान्याचा नाश आरंभिला. आस्ट्रो-जर्मनांशीं लढण्याचें आम्ही बंद केलें असें सडेसोटांनी जाहीर केलें खरे; पण त्या तसल्या तोंडी तहाचे फायदे अस्ट्रो-जर्मनांच्या पदरात न पडतील असे वर्तन सुरू केलें. तेव्हा फेब्रुवारीचे शेवटच्या आठवड्यात आस्ट्रो-जर्मनांनीं सडेसोटाना कळविलें कीं, तुम्ही लढाई बंद केली खरी, पण आम्ही लढाई बंद करण्यास राजी नसून तहावर सह्या करण्याचें तुम्ही नाकारिल्यामुळे लढाईच्या बंदीचे करार रद्द झाले आहेत व तुमच्या देशावर स्वारी करण्यास आम्ही आमच्या सैन्यास हुकूम केला आहे. लगेच रशियावरील जर्मनीच्या स्वारीस सुरुवात झाली. तीनचार दिवसांच्या अवधींत फिनलंडच्या आखाताच्या दक्षिण किनाऱ्यावरील बराच प्रांत जर्मनांनीं व्यापला आणि रिगा व पेट्रोग्राड यांच्या मध्यावरील पिस्काव शहर हस्तगत करून क्रोडो रुपयांचा लष्करी सामानाचा साठा जर्मनीच्या हातीं पडला. रशियन लष्कर कोठेच लढलें नाहीं. इतकेच नव्हे तर उलट रशियातील संग्रही लोकांनीं जर्मनीच्या या स्वारीस मदत केली. पांच दहा दिवसात पेट्रोग्राड शहर जर्मनीच्या हातीं पडते असे पाहून पेट्रोग्राड येथील सडेसोटांनीं लिहून पाठवाल त्या तहाच्या कागदावर आम्ही सह्या करतो पण लढाई थांबवा अशी शरण चिठी जर्मनीस पाठविली. तारीख १ मार्चपासून तीन दिवसाचे आत तहाचा निकाल लागला पाहिजे असें जर्मनीनें उलट कळवून सैन्याची पुढील चाल थांबविली. जर्मनीच्या आज्ञेप्रमाणें ता. १ मार्च रोजीं सडेसोटाचे वकील ब्रेसलिटोव्हास्क येथे आले व ता. ३ मार्च रोजीं सायंकाळीं पांच वाजतां जर्मनीनें तयार केलेल्या तहाच्या कागदावर त्यानीं निमूटपणें सह्या केल्या.

या तहानें फिनलंडचें स्वातंत्र्य रशियानें कबूल केलें. फिनलंडच्या आखाताच्या दक्षिणेकडील इस्थोनिया व लिव्होनिया या दोन प्रातांतून रशियानें आपलें सैन्य काढून घेण्याचें कबूल केलें. पिस्काप धरून पिस्कापच्या वरील दोन सरोवरे व खाली ड्विना नदीवरील ड्विन्स्क शहर ही या प्रांताची पूर्वेकडील सरहद्द समजावयाची आहे. हे प्रात बदोबस्ताकरिता जर्मन पोलिसाच्या ताब्यात रहावयाचे असून त्या प्रातांत योग्य सत्ता स्थापन होऊन लोकाची मालमत्ता व जीवित सुरक्षित झाल्यावर जर्मन पोलिस तेथून हलावयाचे. म्हणजे फिनलडप्रमाणें हेही प्रात स्वतत्र झाले असून त्याजवर जर्मनीची मात्र राजसत्ता या तहानें स्थापण्यात आली नाहीं येवढेच. त्यानतर रिगाचा प्रात, रशियाचा पोलड प्रात व या दोन प्राताना जोडणारे ग्रोडनो, कोव्हनो वगैरे जिल्हे हा येवढा टापू जर्मनीच्या राज्यास जोडण्यात आला. या टापूपैकी पोलड प्रातात व इतर ठिकाणीं आस्ट्रिया व जर्मनी याच्या समतीनें व तेथील रहिवाश्याचीं मतें घेऊन आस्ट्रो–जर्मन कक्षेतील पण स्वतत्र राज्यसत्ता स्थापण्याचा आपला इरादा जर्मनीनें जाहीर केला. पोलडच्या नतर पोलडला धरून पूर्वेस जाणाऱ्या प्रिपेट नदीच्या दक्षिणेकडील सर्व दक्षिण रशिया, पूर्वेस कीव्ह प्रात धरून खालीं दक्षिणेस क्रिमियाच्या द्विपकल्पासकट युक्रेनिया नावानें मोडणारा सर्व प्रात स्वतत्र करण्यात आला. आणि या प्राताबरोबर आस्ट्रो–जर्मनाचा झालेला तह रशियानें मान्य केला डॉन नदीकाठच्या कोसाक प्राताचा उल्लेख या तहात नाही. कोसाक प्रातानतर येणाऱ्या काळा समुद्र व कास्पियन समुद्र यामधील काकेशियस प्रातापैकीं काकेशियस पर्वताच्या दक्षिणेकडील इदशान, बाटूम व कार हे सर्व प्रात टर्कीला देण्यात येऊन रशियन व टर्किश आर्मिनिया प्रातात तेथील लोकाच्या समतीने योग्य ती राज्यव्यवस्था टर्कीनें सुरू करावयाची आहे. तीसपस्तीस वर्षापूर्वी रशियानें या बाजूला जिंकून घेतलेले टर्कीचे प्रात टर्कीला परत मिळाले आहेत. उत्तर इराणातून सर्व रशियन सैन्य परत जावयाचें असून इराण, अफगाणिस्थान वगैरे प्रातांत यथेच्छ व्यापार करण्यास आस्ट्रो–जर्मनाना रशियाकडून पूर्ण मुभा मिळाली आहे. शिवाय १९०४ सालच्या व्यापारी तहाप्रमाणें हरएक तऱ्हेच्या व्यापारी सवलती आणखी वीस वर्षे आस्ट्रो–जर्मनाना मिळावयाच्या असून पूर्वीचें व हल्लींचें आस्ट्रो–जर्मनाचें कर्ज सुरक्षित राहील व त्याच्या व्यापारविषयक व औद्योगिक हालचालीस अडथळा येणार नाहीं अशीत्र

व्यवस्था रशियन सरकारनें ठेवावयाची आहे. रशियन सरकारनें महायुद्धासाठीं गोळा केलेल्या सैन्यास ताबडतोब निरोप द्यावयाचा असून या सैन्याचें विसर्जन झाल्यानतर जर्मनीनें तहांत नमूद केलेल्या प्रांताबाहेरील रशियाचा मुलूख सोडावयाचा आहे. तारीख १५ मार्चच्या आंत सह्या झालेल्या कागदावर राष्ट्रीय शिक्कामोर्तब झाला पाहिजे व तदनतर स्नेहभावानें वागून कोणच्याहि पक्षानें दुसऱ्या पक्षातील राज्यसत्तेच्या स्वरूपाविरुद्ध चळवळ करण्याचें सोडून दिलें पाहिजे, असेंहि एक कलम आहे. तारीख ३ मार्च रोजीं रशियानें जर्मनीशीं केलेल्या तहांतील अटींचा गोषवारा येथपर्यंत झाला.

हा तह रशियास अत्यंत हानिकारक व अपमानास्पद झाला. कोणत्याहि युद्धात कोणत्याहि मोठ्या साम्राज्याला इतक्या वाईट अटी कबूल कराव्या लागल्याचें इतिहासात उदाहरण नाही. नेपोलियननें स्पेन, इटली वगैरे राष्ट्रात राजघराणी उलथीं पालथी केल्याचें उदाहरण आहे. पण स्पेन व इटली या देशाची गणना आजच्याप्रमाणेंच त्यावेळींहि मोठ्या राष्ट्रात होत नव्हती. या तहानें रशियाच्या साम्राज्याचे लहान लहान तुकडे केले असून सर्व तुकड्याना अशा प्रकारच्या बधनानीं जखडून टाकलें आहे कीं, परमेश्वरी इच्छेनें रशियाच्या बाहेरच्या कारणानीं जर्मनी उलथून पडतो. यापैकीं कोणताहि तुकडा रशियास पुन्हा पूर्वीच्या वभवास नेऊन पोचविण्यास समर्थ होणार नाहीं. फिनलड स्वतत्र झाला, पण ही स्वातत्रता आज जर्मनीच्या मदतीने मिळाली. फिनलड स्वतत्र झाला तरी फिनलडात सडेसोटाचें तांबडे लष्कर आज धिंगाणा घालीत आहे आणि या तांबड्या लष्करापासून स्वतःचा बचाव करण्याकरितां फिनलडने जर्मनीचें सैन्य स्वतःच्या देशात बोलाविलें आहे आणि या आमत्रणाप्रमाणें जर्मनीचे सैन्य फिनलडकडे मार्चच्या पहिल्या आठवड्यात रवानाहि झालें आहे. फिनलडच्या आखाताच्या दक्षिणेकडील व रिगाच्या आखाताच्या सभोवारचे प्रांत जर्मनीच्या हातात पडले आहेत. म्हणजे बाल्टिक समुद्रात खुद्द रशियाला पेट्रोग्राडजवळील मुलुखाशिवाय इतर थारा उरलेला नाहीं. फिनलडच्या आखाताचा उत्तर दक्षिण किनारा रशियाच्या हातून गेल्यामुळे रशियाचें आरमार असून नसल्यासारखे झालें आहे; आणि पेट्रोग्राड शहर नेहमीं शत्रूच्या मान्याखालीं या तहानें रहाणार यात संशय नाहीं. रशियाच्या फ्रेडरिक धी ग्रेटनें स्थापलेली पेट्रोग्राडची राजधानी या तहानें निस्तेज ठरविली असून राजधानी-

पदापासून भ्रष्ट झालेली आहे. पुढील कोणत्याहि लढाईत या राजधानीचें संरक्षण होणें शक्य नाहीं. रशियाच्या राज्यकर्त्यांना–मग ते संग्रही असोत किंवा सडेसोट असोत–ही राजधानी बदलून या तहामुळे मास्को येथे नेणें भाग आहे. सांप्रत पेट्रोग्राड येथे दुष्काळ पडला असून दुष्काळाच्या भयंकर यातनांपासून स्वतःचें संरक्षण करण्याकरिता पेट्रोग्राडचे लोक दाहीदिशा सैरावरा पळत आहेत. आणि पेट्रोग्राडच्या सडेसोट सरकारनें ही राजधानी मास्कोस नेण्याचें ठरविलें आहे. मास्कोस गेलेली राजधानी पुन्हां पेट्रोग्राडला दोनचार पिढयांनीं तरी परत येईल अशीहि आशा आता उरलेली नाहीं. या तहानें पोलंडला मुकावें लागलें, व पोलंड-पासून काळ्या समुद्रातील क्रिमियन द्वीपकल्पापर्यंत सर्व दक्षिण रशिया युक्रेनच्या नावाखालीं स्वतंत्र होऊन मध्य रशियापासून अलग झाला. फिनलंडचें रक्षण ज्याप्रमाणें जर्मन सैन्य करणार त्याप्रमाणें सडेसोटांच्या तांबडया लष्करापासून युक्रेनचें रक्षण आस्ट्रिया करणार. युक्रेनच्या आमंत्रणावरून आस्ट्रियाचें सैन्य मार्चच्या पहिल्या आठवडयात युक्रेनमध्ये चोहोंकडे पसरलेंहि आहे. म्हणजे फिन-लंड व युक्रेन हे देश जरी स्वतंत्र झाले तरी तेथील राज्यसत्ता जर्मनी, आस्ट्रिया याच्या सैन्याकडूनच स्थापिली जाणार. अर्थात् हे देश नावाचे स्वतंत्र होणार. युक्रेनच्या स्वातंत्र्यामुळे काळ्या समुद्रावरील रशियाची आरमारी सत्ता नामशेषच होणार यांत शंका नाहीं. म्हणजे रशिया बाल्टिक समुद्राला मुकला, काळ्या समुद्राला मुकला, आणि त्याप्रमाणें जमिनीवरहि युरोपखंडाचा व रशियाचा संबंध तुटला. रशियाचे पश्चिमेकडचे व दक्षिणेकडचे सर्व प्रांत रशियापासून अलग झाले. डॉन नदीच्या कांठच्या कोसाकाच्या मुलखाचा निर्देश या तहांत नाहीं; पण कोसाकाचें सैन्य व मास्को–पेट्रोग्राड येथील सडेसोटांचें तांबडे लष्कर यामध्ये सांप्रत लढाई सुरू असून युक्रेन प्रांताचा बंदोबस्त झाल्यावर मार्च–एप्रिल महिन्यांत कोसाकांना प्रथम दारूगोळयाची आणि पुढें त्याच्याच आमंत्रणावरून सैन्याची मदत आस्ट्रो–जर्मन करितील आणि कोसाकांना पुढे करून कोसाकाच्या मार्फत मास्कोच्या तख्तावर जुना झार किंवा त्याच्या घराण्यातील एखादें धाकटें मूल आस्ट्रो–जर्मन्स बसवतील असा काहींचा अंदाज आहे. आणि तसें झाल्यास फिनलंड, पोलंड, युक्रेन याप्रमाणेंच मास्कोचा मध्य रशियाहि आस्ट्रो–जर्मनांच्या सूत्राप्रमाणें हलणारें एक बाहुलें होऊन बसेल ह्यांत

संशय नाहीं. झारचें हे पुनरागमन एक दोन महिन्याच्या अवधींत होणें अगदीं शक्य आहे. प्रजाजनांच्या स्वातंत्र्याकरितां घडून आलेल्या रशियातील राज्यक्रांतीनें सडेसोटाना फाजील नाचू दिल्यामुळे एकमुखीं राजाचीं सिंहासनें युरोपांत अधिक दृढ केली ह्याहून दैवाचा दुर्विपाक आणखी दुसरा कोणता असणार ? लोकमुखी राज्यसत्तेला इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका ह्या देशांशिवाय दुसरीकडे आतां थारा उरलेला नाहीं. आणि ही लोकमुखी राज्यसत्ता अखेरचा विजय तरी ह्या महायुद्धात दोस्त सरकारच्या पदरीं पडो अशीं परमेश्वराची प्रार्थना ह्याप्रसंगी करीत असली पाहिजे ह्यात संशय नाहीं. असो. युरोपिअन रशियातील चांगल्या भागापैकीं निम्याहून अधिक भागाला आणि बाल्टिक समुद्र व काळा समुद्र येथील आरमारी सत्तेला रशिया ह्या तहानें मुकला इतकेंच नव्हे, तर काकेशियस पर्वत, इराण, अफगाणिस्थान आणि कास्पियन समुद्र व अफगाणिस्थान ह्यामधील तुर्कस्थान येथील मुसलमानाच्या वस्तीवरील वर्चस्वालाहि ह्या तहानें रशिया मुकला आहे. काकेशियस पर्वताच्या दक्षिणेकडील रशियन मुलूख टर्कीला देण्यात आला आहे. आणि कास्पियन समुद्र व अफगाणिस्थान ह्याच्यामधील बुखारा वगैरे प्रांतात मुसलमानांनीं आपलें स्वातंत्र्य पुकारिलें असून ह्या मुसलमानाच्या व टर्कीच्या तहाची वाटाघाट चालू आहे. सांप्रतच्या रशियन तहानें इराण, अफगाणिस्थान, बुखारा वगैरे सर्व मुसलमानानीं प्रांतात उद्योगधंद्याची हरएक सवलत आस्ट्रो–जर्मनांना व टर्कीला प्राप्त झालेली आहे. रशियन मुसलमानानीं पुकारलेल्या स्वातंत्र्यास जर सडेसोटाच्या तावडत्या टक्करनें अडथळा केला तर स्वतःच्या व्यापारी हक्काचें संरक्षण करण्याकरिता आस्ट्रो–जर्मन व तुर्की सैन्य काळ्या समुद्रातून काकेशियस पर्वताच्या आगगाडीनें कास्पियन समुद्रावर व कास्पियन समुद्रातून पुन्हा आगाडीनें बुखारा व अफगाणिस्थानची सरहद्द येथपर्यंत सर्व मुसलमानानीं मुलूख व्यापून टाकल्यावाचून राहाणार नाही. एप्रिल–मे महिन्यात हे मुसलमानी मुलखाचें प्रचंड कारस्थान परिपक्व होईल असा आजचा अंदाज आहे. रशियाचे मुसलमानी प्रांत एकदोन महिन्याच्या अवधीत अशा रीतीनें रशियापासून अलग होऊन तुर्की–जर्मनाच्या कह्यात जाणें हा आजच्या रशियन तहाचा सहज परिणाम होय व तो पश्चिम रणभूमींतला जर्मनीच्या मोठ्या पराभवाशिवाय दुसऱ्या कोणच्याहि इलाजानें थांबविला जाणें शक्य नाही.

दोन तीन महिन्यांत मास्कोच्या तख्तावर जर जर्मनीचें बाहुलें बसलें आणि कास्पियन समुद्राच्या दक्षिणेकडील व पूर्वेकडील मुसलमानी प्रदेशावर जर तुर्कोची मावली पसरली तर पश्चिमेस इंग्रजी समद्रापासून तो पूर्वेस जपानी समुद्रापर्यंत आणि उत्तरेस बाल्टिक समुद्रापासून दक्षिणेस भूमध्य समुद्रापर्यंत व आरबी समुद्रापर्यंत जर्मनीच्या कैसरची सत्ता सुरू झाली म्हणून समजावे. असली सत्ता पूर्वी कोणच्याहि बादशहानें पृथ्वीच्या पाठीवर चालविलेली नाही. रशियन तहाचा हा दुष्परिणाम पश्चिम रणभूमीवरील जर्मनीच्या पराजयानेंच नाहीसा व्हावयाचा आहे. पण १९१८ सालीं पश्चिम रणभूमींत रशियन तहामुळे जर्मनीचें सैन्यबळ अधिक असल्यामुळे यदा तेथे जर्मनीचा पुरा मोड होणें शक्य नाहीं. पुढील साली अमेरिकेचें सर्व सैन्य येऊन पोंचल्यावर जर्मनीचा पराभव होईल. अर्थात् ह्यापुढे दोन चार महिने जर्मनीस रशियात कोपरानें खणण्यासारखी मऊ जमीनच सापडणार आणि तेवढ्या अवधीत मास्कोचें तख्त आणि कास्पियन समुद्राच्या काठचे मुसलमानी देश ह्याना जर्मनी आपल्या सूत्रात गोवून घणार हे उघड आहे. जर्मनीची ही महत्वाकांक्षा विफल करणें साप्रत जपानच्या हातीं अशतः आहे. जपानने मांचुरियामध्ये दहा पधरा लाख सैन्य पाठविण्याचा जर निश्चय केला तर एकदोन महिन्याच्या अवधींत सैबिरियाची सर्व आगगाडी जपानास व्यापता येण्यासारखी आहे. आणि दोन तीन महिन्यानतर दरमहा एक लाख लोक जपानास युरोपातील रशियाकडे पाठवितांहि येण्यासारखे आहेत. मांचुरिया प्रांत व लेक बायकेलच्या पूर्वेकडील सैबिरियाचा प्रांत जपानला हवा आहे. जपानी मुलुखाजवळचा हा टापू आहे. तेव्हा जपानच्या वाढीला व वैभवाला तो फार हितकारक होणार आहे. हा प्रांत जपानला पुढे मागे सोडून द्यावा लागेल हे ओळखून जर मास्कोच्या सरकारनें जपानी दहा पधरा लाख फौजेची कुमक मागितली व तसें गुप्तपणें जर जपानशीं आज संधान बांधलें तर जर्मनीचा रशियातील डाव उधळून टाकता येणें अद्याप शक्य आहे. जर्मनीनें हें संकट ओळखल्यासारखे दिसते. कारण, जर्मनीनें असे जाहीर केलें आहे कीं, पूर्व सबिरियांत जपान जर घुसला तर तेथे जाऊन जपानला त्रास देण्याच्या उद्योगास आम्ही लागणार नाही, पण लेक बायकेलच्या अलीकडे येऊन जर्मन डावास धक्का लागणार असा जर समय आला तर तावडतोब बदोबस्त केल्यावाचून आम्ही राहणार नाहीं. ह्याचा अर्थ असा कीं, जर्मनीस दोन चार महिन्यांनींहि त्रासदायक होईल इतके अधिक

सैन्य जर जपाननें मांचुरिआंत उतरविलें तर पहिल्याच महिन्याला जबरदतीनें मास्को--पेट्रोग्राडचें सडेसोट सरकार उलथून पाडून तेथें झारशाही पुन्हां स्थापून रशियांतील संग्रही लोकांच्या मदतीनें जर्मनी लेक बायकेलच्या जवळच जपानशीं तोंड देण्यास पुढें सरसावेल. रशियांतील सडेसोट सरकार उलथून पडल्यावर रशियन सग्रही लोकांना जपानच्या कुमकेपेक्षा जर्मनीचीच मदत अधिक प्रिय वाटण्याचा सभव आहे. कोणाचें तरी सैन्य डोक्यावर नाचणार खरें; मग जर्मनीचेंच नाचलें म्हणून काय बिघडलें? अशा स्थितींत जपान सैबिरियांतून जर रशियाकडे स्वारी करूं लागला तर रशिया व जर्मनी एक होऊन सैबिरियांतच जर्मनीने पुन्हां जमविलेल्या रशियन सैन्याशीं जपानास यंदा मे महिन्यानतर व पुढील सालीं पश्चिम रणभूमीत दोस्त सरकाराचा पुरा जय होईपर्यंत लढतच रहावें लागेल एवढी मोठी लढाई लढण्यास जपानातील समान्य लोक आज उत्सुक नाहींत. लेक बायकेलपर्यंतचा सैबिरिया व्यापून स्वस्थ बसण्यापलीकडच्या भानगडींत जपान पडेल कीं नाहीं, ही शकाच आहे. अशा स्थितीत जपानला इष्ट वाटलें तर सदर प्रदेशात लुटालुट होऊं नये येवढ्यापुरतेंच जपानने सैन्य उतरावें, त्यास आमची अनुकूलता नाहीं, व प्रतिकूलता नाहीं असे जपानला अमेरिकेने कळविलें आहे. जपानचें सैन्य सैबिरियात उतरावें इतकेच नव्हे तर सैबिरियांत घुसून जपानने जर्मनीस शह द्यावा म्हणजे पश्चिम रणभूमींतील यदाच्या सालचें जर्मनीचें वजन कमी पडेल व पश्चिमेच्या बाजूला नवीन जय जर्मनीस न मिळता यदाचें साल निघून जाईल असा फ्रान्स व इग्लड येथील काहीं लष्करी तज्ज्ञाचा अदाज आहे. रशियन तहाचे सर्व फायदे जर्मनीच्या घशात उतरण्यास जपानचा मोठा अडथळा आहे, व त्याचा शहानिशा होईतों जर्मनी पश्चिम रणभूमींत मोठी चढाई करणार नाहीं हे उघड आहे. पश्चिम रणभूमींत साप्रत लहानसान झटापटी रोजच्या चालू आहेत व जपाननें जर शह दिला नाही तर एप्रिल–मे महिन्यांत पश्चिम रणभूमींत अंग्लो–फ्रेंचाची किंवा इटलीची फळी फोडण्याचा जर्मनी प्रयत्न करील असे तज्ज्ञाचें म्हणणें आहे. तेव्हा मार्च–एप्रिलात जपानच्या माचुरियातील हालचालीवर व तुर्कांच्या कास्पियन समुद्रा सभोंवारच्या हालचालीवर व रशियातील सडेसोटाच्या यादवीवर लढाईच्या बातम्या वाचताना वाचकांनीं विशेष लक्ष पोचवावें अशी सूचना आहे.

# महायुद्धाचा चवथ्या वर्षाचा मार्च-एप्रिल महिना

महायुद्धाच्या पश्चिम रणभूमींतील एका अत्यंत महत्त्वाच्या लढाईस ता. २३ मार्च रोजीं सुरुवात झाली; व ता. १० एप्रिलपर्यंत ही लढाई विलक्षण जोरानें चालू राहून, एप्रिल व मे हे दोन महिने सोक्षमोक्ष होईतों ही झुंज अशीच चालू रहाणार असेंहि एप्रिलच्या प्रारंभी स्पष्टपणें दिसून आलें. पश्चिम रणभूमीत केंब्राई-नच्या आसपास जर्मनांनीं दहा लाख सैन्याचा एक जमाव मार्चच्या पहिल्या पंधर-वड्यात तयार केला; आणि चाळीस पन्नास मैलाच्या तोंडावर मार्चच्या तिसऱ्या आठवड्यात एकदम जंगी चढाईस सुरुवात केली. केंब्राईनच्या पश्चिमेस दोन दिवस मोठ्या शौर्यानें लढून इंग्रजानीं जर्मनांना थोपवून धरिले, पण केंब्राईनच्या दक्षिणेस सेंट क्वेंटीन येथें एका इंग्रजाच्या अंगावर दहा बारा जर्मन येऊन आदळल्यामुळे दोन दिवसाच्या भयंकर लढाईनंतर इंग्रजाची फळी फुटली व जर्मन सैन्य आंत घुसलें. याचा परिणाम असा झाला कीं, सेंट क्वेंटीनच्या उत्तरेस केंब्राईनपर्यंतची व दक्षिणेस ऐन नदीपर्यंतची अँग्लो-फ्रेंचाची फळी मार्गे ओढून घेणें भाग पडलें. उत्तरेच्या व दक्षिणेच्या टोकाला ही फळी दहा दहा मैल मागें हटली आणि मध्यावर तीस पस्तीस मैलाची पीछेहाट झाली. रशियाची फळी ड्वाना नदीवर ज्याप्रमाणें आम्ही फोडली त्याचप्रमाणें अँग्लो-फ्रेंचाची फळी मार्च अखेरीस सेंट क्वेंटीन येथें आम्ही फोडली अशी जर्मनांनीं प्रौढीहि मारली. ह्या जंगी लढाईच्या वेळीं कैसरसाहेब स्वतः सेंट क्वेंटीन येथें सेनाध्यक्ष म्हणून हजर होते. शिवाय जर्मनीचे युवराज हेहि मदतीस आले होते. सेनापति हिंडेनबुर्ग, सेनापति लुडेनडॉर्फ वगैरे बडेबडे सेनानायकहि कैसरच्या सभोंवती जमले होते. सेंट क्वेंटिनच्या झडपेसाठीं दहा यार्डावर एक मोठी तोफ व एका इंग्रजाच्या छातीवर दहा जर्मन अशी विलक्षण तयारी करण्यात आली होती. दोन तीन दिवस जर्मन सैन्याच्या लाटा एकसारख्या इंग्रजावर आदळत होत्या. मोठ्या तुफानाच्या वेळीं खवळलेल्या दर्यामध्ये जसा कल्लोळ-कोलाहल माजून राहतो त्याप्रमाणें रणांगणावर एका बाजूचें लाखो सैन्य दुसऱ्या बाजूच्या लाखो सैन्याशीं टक्कर देत असताना विलक्षण गर्दी उसळून राहिली होती. इंग्रज जिवापाड लढले, पण जर्मन

तोफांच्या गर्दीपुढें व दसपट अधिक असलेल्या जर्मन पायदळांच्या चढाईपुढे इग्रजांना हार खावी लागली. आणि सेंट क्वेंटीनच्या टापूंतील इग्रजी सेना विस्खलित होऊन सहाशे तोफा जर्मनाच्या हातीं लागून ॲग्लो-फ्रेंचाची फळी फुटली. आणि सेंट क्वेंटीनपासून पारीसच्या रोखानें कॅपेनी स्टेशनच्या उत्तरेस नॉयानपर्यंत तेव्हां सोमनदीच्या मुखाच्या रोखानें अमीन्सच्या पूर्वेस पधरा मैलपर्यंत सेंट क्वेटीनच्या भोसक्यातून जर्मन सैन्याचा लोंढा आत घुसला. १९१५ सालीं सोम नदीच्या कांठीं जो तळ पडला होता त्याच्याहि पाठीमागे ॲग्लो-फ्रेंचाना यावें लागलें. १९१६ साली सोम नदीच्या जगी लढाईत इंग्रजानीं जर्मनांचा पराभव करून दहा पधरा मैल जर्मनाना मागें हटविलें. १९१७ सालच्या वसतकाळी ॲग्लो-फ्रेंचांच्या तयारीपुढें आपलें काहीं चालणार नाहीं हे ओळखून सेनापति हिंडेनबर्ग यांनीं सर्व देश उध्वस्त करीत जर्मनाची फळी आपण होऊन मागे हटविली. आणि सायसाजच्या उत्तरेपासून आरासपर्यंत जर्मन फळीची सरळ रेघ करून घेतली. १९१७ च्या पावसाळयात केब्राइनच्या बाजूला इग्रजानी हल्ले चढवून जर्मनाना पुन्हा मागें हटविलें. अशारीतीने गेलीं तीन वर्षे सोमनदीच्या या टापूंत जर्मनांचा एकसारखा पराभव होत होता आणि जर्मन सेनेची एकसारखी पीछेहाट होत होती. पूर्वेच्या बाजूला केवढेहि मोठे जय मिळविले तरी ते नवीन शस्त्रास्त्रात व नवीन युद्धकलेंत निपुण नसलेल्या रशियाशीं झुंजताना मिळविलेले. पश्चिम रणभूमीत १९१४ सालच्या पहिल्या अवचित हल्ल्यानतर एकसारखी जर्मन सैन्याच्या करामतीची रडकथाच ऐकू आली. तीन वर्षात यिप्रेसवर दोन दोन तीन तीन महिने टिकणारे दोन मोठे हल्ले जर्मनानीं चढविले; पण त्यात यश आलें नाहीं. व्हर्डूनवर तीन चार महिने टिकणारा जगी हल्ला केला पण तेथेहि दाद लागली नाही. सोम नदीच्या लढाईत इग्रजांनीं जर्मनांचा खरपूस समाचार घेतला. अशा दृष्टीनें पश्चिम रणभूमीचें अवलोकन करीत असताना तज्ज्ञाच्या दृष्टीस जर्मन लष्कराचा अखेरचा मृत्यु पश्चिम रणभूमींत दिसू लागला. रशिया सपशेल जमीनदोस्त झाल्यामुळे रशियाच्या रणभूमीतील दहा पधरा लाख सैन्य जर्मनीनें पश्चिम रणभूमीत फ्रान्सकडे आणिलें आणि गेलीं तीन वर्षे पुढे सरसावत चाललेला आपला मृत्यु टाळण्याकरिता सेंट क्वेंटीन येथे नव्या सैन्याला पहिल्या टक्करीची धडकी द्यायला सागून सेंट क्वेंटीन येथे ॲग्लो-फ्रेंचांच्या भितीत जर्मनीनें भोसका

पाडला. हा भोसका पडण्याबरोबर जर्मनीला वाटलें कीं, आपला मृत्यु टळला इतकेंच नव्हे तर मृत्यूचें तोंड आपण ॲंग्लो–फ्रेंचाकडे वळविलें. डुनाजीच्या पराभवानंतर आस्ट्रियाकडचें मृत्यूचें तोंड जसें रशियाकडे वळलें तसें सेंट क्वेटीनच्या पराभवानंतर ॲंग्लो–फ्रेंचांच्या लष्कराच्या साडेसातीस सुरुवात झाली, असें जर्मनांना वाटलें. डुनाजी नदीवरील जंगी जयासारखा जय आपण मिळविला असें जर्मनींत जर्मन सेनानायकांनीं मार्च अखेरीस जाहीर केले. जर्मनींत चोहोकडे आनंदोत्सव झाले; इंग्लंड व फ्रान्स येथे १९१४ च्या मॉन्सच्या पराभवानंतर जसली काळजी व उद्विग्नता पसरली होती तसली चिंता चोहोकडे पसरली. पण एप्रिल महिन्याच्या प्रारंभाला ही चिंता दूर झाली; व सेंट क्वेंटीन येथे जर्मनीनें मिळविलेला विजय डुनाजीच्या तोडीचा नसून पहिल्या धडकीस जरी जर्मनी पुढे सरकला तरी एप्रिल मे महिन्याच्या अखेरीस साप्रतची लढाई म्हणजे व्हर्डूनच्या लढाईची पुनरावृत्ति होय असें ठरविणारीं स्पष्ट चिन्हें दिसू लागलीं. सेंट क्वेटीन येथून निघून आईस नदीच्या तीरानें नॉयानच्या दक्षिणेस जर्मन्स आल्यावर नॉयानपासून माऊंट–टीडरपर्यंतच्या तोंडावर फ्रेंचानीं त्याना अखेरीस मार्च अखेरीस अडवून धरिलें, आणि एप्रिलच्या आठ दहा तारखेपर्यंतहि या बाजूला जर्मनाचें एकहि पाऊल पुढे पडलेलें नाही. तेव्हां सेंट क्वेंटीन येथे पडलेल्या भोसक्याचा पारीसच्या रोखाचा भाग एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात लिंपला गेला असें म्हणण्यास हरकत नाहीं. एप्रिलच्या पहिल्या आठ-
वड्यात लिंपला गेला असे म्हणण्यास हरकत नाहीं. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात जी लढाई जोरानें पुढे चालू राहिली ती सोम नदीच्या दक्षिणेस माऊंट टीडरपर्यंत व सोम नदीच्या उत्तरेस आरासपर्यंत. मार्च अखेरीस आरासवर जर्मनांनी फार मोठा हल्ला चढविला. आरास येथे इंग्रजांची फळी फोडण्याचा त्याचा हेतु होता, पण तो सिद्धीस गेला नाहीं. आरासच्या दक्षिणेस दोन पावलें त्याना पुढे सरकता आलें येवढेंच काय तें. एप्रिलच्या प्रारंभीं दोन तीन दिवस रणभूमीमध्ये थोडीशी शांतता होती, पण एप्रिलच्या तिसऱ्या चौथ्या तारखेपासून अमीन्सच्या पूर्वेस माऊंट टीडरपासून आल्बर्टपर्यंतच्या टापूंत रणभूमीनें पुन्हा पेट घेतला. अमीन्स शहर काबीज करणें हा जर्मनाचा साप्रतचा हेतु दिसतो. अमीन्स शहरासभोंवतीच्या टापूतील नद्याच्या व उंचसखल जमिनीच्या नकाशाकडे पाहिलें असता हे ध्यानात येईल कीं, माऊंट टीडर येथे टेकडाळ उंचवट्याला जो प्रारंभ

होतो तो उत्तरेस आल्बर्ट व आरास याच्यामधील टापूपर्यंत पसरून रहातो. या टेंकडाळ उचवटयातून सोम नदी बऱ्याचशा वळशा वळशानें वाहते व या सोम नदीला अमीन्सच्या पूर्वेस सात आठ मेलांवर ॲव्हर नदी जाऊन मिळते. एप्रिल महिन्यात ॲव्हर आणि सोम या दोन्ही नद्याच्या मार्गानीं अमीन्सवर चाल करून जाण्याचा जर्मनानीं उद्योग आरभिला. माऊट टीड·पासून आल्बर्टपर्यंतच्या टेंकडाळ मुलखात ॲंग्लो-फ्रेंच सैन्य मोठया नेटानें व निश्चयानें अडवून धरीत आहेत. जर्मनाचे हल्ले एक दिवस सोम नदीच्या उत्तरेस आरामपर्यंत होतात. तर दुसऱ्या दिवशीं सोम नदीच्या दक्षिणेस माऊट टीडरपयत होतात. जमनाचे रोजचे बरेच हल्ले निष्फळ होतात, पण एखाद दुसऱ्या हल्ल्यात जर्मन सैन्य हजार पांचशे यार्ड पुढें सरकतें. अशारीतीनें लढत लढत माऊट टीडरपासून आल्बर्ट·र्यंतच्या उचवटयापैकीं बराच भाग जर्मनानी एप्रिलच्या पहिल्या आठवडयात काबीज केला व अमीन्सच्या पूर्वेस आठ मैलपर्यंत जर्मन्स जाऊन पोचले. या टापूत चराची लढाई चालली नसली तरी ओढे, नद्या व टेकडया यानी हा टापू व्यापला असल्यामुळे हा टापू काबीज करणें जर्मनांना फार मुष्कलीचें आहे; आणि प्रत्येक यार्डाला हजारो लोकाचा बळी घेतल्याशिवाय ॲंग्लो-फ्रेंच सैन्य एक इंचहि मागे हटत नाहीं. या टापूमध्ये सैन्याची खराबी कल्पनातीत झाली तरी नव्या तोफाची व नव्या सैन्याची कुमक याच टापूकडे जर्मन सेनानायक रोजचे रोज पाठवीत आहेत. अमीन्स घेऊन सोमनदीच्या काठानें समुद्रापयत आपली फळी पुढे ढकलण्याचा जर्मन सेनानायकाचा निश्चय दिसतो व तसें करण्याकरिता लाखो सैन्याचा बळी देण्यास ते तयार आहेत असे दिसते. अमीन्स घेऊन सोमनदीचे मुख गांठण्याचा जसा जर्मनाचा निश्चय त्याप्रमाणें अमीन्सच्या टापूंत जर्मनाना पुढे सरकू न देण्याचाहि ॲंग्लो-फ्रेंचाचा निश्चय दिसतो. एप्रिल प्रारभापासून सर्व ॲंग्लो-फ्रेंच सैन्याचे सेनाध्यक्ष फ्रेंच सेनापति फॉक हे झाले आहेत; व साप्रतचा प्रसग ओळखून फ्रेंच सेनाध्यक्षाच्या हुकमतीखाली लढण्याची कबुली इग्रजी सेनापतीनी मोठया आपखुषीनें दिली आहे. अमीन्स घेण्यासबधानें जर्मनाचा इतका हट्ट का? अमीन्सचें संरक्षण करण्याकरिता ॲंग्लो-फ्रेंचानीं इतक्या जोरानें कबर का बाधिली आहे? नकाशाकडे पाहिले तर असें दिसून येईल कीं, आरासपासून अमीन्सपर्यंतचा जो टेंकडाळ उचवटयाचा टापू आहे त्याच्या पश्चिमेस वीस पचवीस

मैलपर्यंत सपाट मैदान आहे. अमीन्सपासून अबेव्हिलेपर्यंत मैदान असून अबेव्हिले-पासून समुद्रापर्यंत पुन्हा टेकडाळ उचवटयाचा मुलूख आहे. तेव्हां आजच्या लढाईत अमीन्स जर जर्मनांना गाठता आलें तर अबेव्हिलेपर्यंत जाण्यास त्याना विशेषसा त्रास होणार नाही. आणि एकदा त्यानीं अबेव्हिले घेतले म्हणजे नुसत्या तोफखान्याच्या जोरावर समुद्रापर्यंतचा टापू ते एक आठवडयात घेतील. म्हणजे एप्रिल महिन्यात जर अमीन्स जर्मनाच्या हाती गेलें तर या विजयाच्या जोरावर मे महिन्यांत ते सोम नदीचें मुख पाहिल्यावांचून रहाणार नाहीत. जर्मन सेना सोम-नदीच्या मुखापर्यंत, अमीन्स–आरास व सोमनदीचें मुख या त्रिकोणात पसरलें तर त्यात काय झालें ? जर्मनांनीं काय मिळविलें ? सोमनदीचें मुख पहाण्यास जर्मनाना पाच दहा लाख लोकाचे बळी द्यावे लागतील. येवढे नुकसान सोसून फ्रेंचाचा सेनाशकट त्यानीं मोडला असे बिलकूल होणार नाहीं. ऐन नदीपासून सोमनदीच्या मुखापर्यंत फ्रेंचाची फळी पूर्वीप्रमाणें भक्कम उभी राहाणार. मग जर्मनी काय मिळ-विणार ? अमीन्स घेऊन जर जर्मनांनीं समुद्र गाठला तर अबेव्हिले, आरास व यिप्रेस या टापूतील इंग्रजांची मुख्य सेना फ्रेंचापासून जर्मनानी अलग केल्यासारखे होईल. आणि कॅले–आरासच्या साठ मैल औरस चौरस जागेत इंग्रजाना एक तऱ्हेनं जर्मनानीं कोंडल्यासारखे होईल. आणि अशा रीतीनें जर इंग्रज सेना कोंडली गेली तर बेल्जमच्या किनाऱ्यापासून सोमनदीपर्यंत एकसारखी लढाई माजून राहून सर्व आस्ट्रो–जर्मन तोफा व सैन्य एकटया इंग्रजांच्या मागें लागतील. पारिस पडल्यानें राजधानीसंबंधाची फ्रेंचाची प्रौढी नाहींशी होईल, पण लष्करी दृष्टया मोठीशी हानि होईल अशांतला भाग नाही. पण अमीन्स–अबेव्हिले हा टापू जर्मनाच्या हाती गेल्यानें लष्करी दृष्टया फार मोठी हानि होणारी आहे. इंग्रज व फ्रेंच एकमेका-पासून अलग होतील व दोहोंमध्ये कमी सशक्त असलेल्यावर आस्ट्रो–जर्मनाना आपलें सर्व बळ टाकता येईल. इंग्रज व फ्रेंच हे फ्रान्सच्या रणभूमींत अलग झाले तरी प्रत्येक जण अमेरिकेची मदत येऊन पोंचेपर्यंत दोन चार महिने जर्मनाशीं झुंजत राहाण्यास समर्थ आहेत. तेव्हा आरास कॅलेच्या चौकटींत इंग्रजानीं चर खणून साठ सत्तर मैल औरस चौरस एक किल्लाच बनविला व अमेरिकेची मदत येऊन पोहोंचेपर्यंत जर जर्मनांना या किल्ल्यावर आपलीं डोकी फोडून घेऊ दिलीं तर अमेरिका रणांगणावर उभी ठाकण्याच्या वेळीं जर्मन सेना रक्तबंबाळ होऊन खालीं

पडण्याच्या बेतांत येणार नाहीं का ? प्रत्येक यार्डाला जर योग्य बळी अँग्लो–फ्रेंचांनी घेतला तर जर्मनांनीं समुद्र गाठल्यापासून व्हावयास पाहिजे तितकें नुकसान होणार नाहीं. अमेरिकेची दोन चार महिन्यानी मदत यावयाची नसती तर गोष्ट निराळी. पण पुढील चार पांच महिन्यांत पांच सात लाख अमेरिकन सैन्य फ्रान्सच्या रणभूमीत येऊन पोहोंचावयाचें आहे. आजच चार पाच लाख अमेरिकन सैन्य फ्रान्समध्ये आहे. तेव्हां सोमनदी गांठून एकटया इंग्रजाचा पिच्छा पुरविण्यात जर सर्व जर्मनसेना रक्तबंबाळ झाली तर अमेरिकेच्या हातून जर्मन सेनेचा व्हावयाचा मृत्यु इंग्रजानी अधिक जवळ आणल्यासारखे होईल. अशा दृष्टीनें विचार केला असता प्रत्येक इंचाला योग्य बळी घेऊन झालेली पीछेहाट अमेरिकेच्या अंतिम जयाला मदत करणारीच ठरल्यावांचून रहात नाहीं. पण सोमनदीचें तोंड जर्मनांनी गाठलें असता इंग्रज व फ्रेंच अलग होतात इतकेंच नव्हे तर इंग्लिश चॅनलवर जर्मनाचें ठाणें बसून तें ठाणें जर्मन पाणबुडया बोटींना आश्रयाचें स्थान होऊं शकेल. १९१४ सालीं जर्मन सैन्य ज्या वेळेस पारीसजवळ आलें व पारीस पडतें कीं काय अशी भीति उत्पन्न झाली त्यावेळीं पारिस जरी पडलें व ऐननदीच्या मुखापर्यंत इंग्लिश चॅनलचा फ्रान्सच्या बाजूचा भाग जरी जर्मनांनीं व्यापून टाकिला तरी महायुद्ध पुढे चालविण्यास कांहीं हरकत येणार नाहीं असें तज्ज्ञाचें मत पडलें होते. कारण त्यावेळीं समुद्रावरील अँग्लो–फ्रेंच जहाजाच्या संचाराला कोणताच प्रतिबंध नव्हता. त्यावेळीं जर्मन पाणबुडया बोटीचें भय हल्लीच्या इतके नव्हते. गेल्या तीन वर्षांत पाणबुडया बोटींमुळे समुद्रावरील मार्गांत विलक्षण क्रांति घडून आली आहे. जर्मन सेनेनें एप्रिल मे महिन्यात अमीन्सच्या रोखानें इंग्लिश चॅनल आज जरी गांठली तरी अमेरिकेच्या मदतीमुळे चार सहा महिन्याच्या अवकाशात निदान पुढच्या साली तरी रणभूमीवर सैनिकाच्या संख्येच्या दृष्टीने व तोफाच्या संख्येच्या दृष्टीने दोस्त सरकाराचें पारडे अधिक जड झाल्यावाचून रहाणार नाहीं. व या वजनाखालीं १९१९ साली नाहीं तरी १९२० सालीं तरी जर्मन सैन्य दडपले जाईल हे निश्चित आहे. पण आज एक दोन महिन्यात जर जर्मन पाणबुडया बोटींना इंग्लिश चॅनलवर बंदर मिळालें, तर हे सर्व वजन फ्रान्समध्ये उतरविण्याच्या कामीं हल्लींहून दुप्पट अडथळे उत्पन्न होण्याचा संभव आहे. आज रणांगणावर सैन्य दुभंगतें, इंग्रजी सैन्य अंशतः कोंडले जाऊन आस्ट्रो–जर्मनाचें सर्व वजन कांहीं काल एकटया

इंग्रजावर येऊन पडतें, व पुढील तयारींतील अडथळे दुपटीनें वाढतात. अमीन्स पडून जर्मन्स जर पुढे सरकले तर त्याचे अनिष्ट परिणाम वरील प्रकारचे असले-मुळे अमीन्सचें संरक्षण करण्याकरितां सेनापति फॉक हे दृढनिश्चयानें जर्मनाशीं लढत आहेत व व्हर्डूनच्या लढाईत जर्मन सैन्य जसें फजीत झालें तसेच फजीत अमीन्सच्याहि लढाईत होईल अशीं सुचिन्हे दिसत आहेत. एप्रिल-मे महिन्यात समुद्र गाठण्याकरितां अमीन्सच्या उत्तरेस व दक्षिणेस शक्य तेवढया मोठया प्रमाणावर जर्मनाचे एकसारखे हल्ले होत राहातील व जर्मनांना मदत करण्याकरिता आस्ट्रिया इटलीवरहि स्वारी करील, असा तज्ज्ञांचा अंदाज एप्रिलच्या पहिल्या आठवडयात प्रसिद्ध झाला आहे.

# महायुद्धाचा चवथ्या वर्षाचा एप्रिल–मे महिना

मार्च महिन्याप्रमाणें एप्रिल महिन्यातहि फ्रान्सच्या रणभूमींत भयंकर लढाया झाल्या. मार्च २० पासून एप्रिल प्रारंभापर्यंत दहा–बारा दिवस लढून सेंट क्वेंटिन येथे अॅंग्लो–फ्रेंचाची फळी फोडून जर्मन सैन्य आत घुसलें. या सैन्यास अमीन्सच्या पूर्वेस दहा मैलावर थांबवून धरण्यांत आले. या हल्ल्याचा रोख पारिसकडे नसून अमीन्सकडे होता. अमीन्स घेऊन सोमनदीचें मुख गाठावयाचें व त्या योगानें इंग्रजी लष्कर व फ्रेंच लष्कर हीं एकमेकापासून अलग करावयाचीं असा जर्मनाचा हेतु होता; पण हा हेतु सफल झाला नाही. अमीन्सपुढे आपलें काही चालत नाही असें पाहून आठ दहा दिवस विसावा घेऊन एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात जर्मनानी यिप्रेसच्या दक्षिणेस आर्मेंटियर्सच्या बाजूला दुसरा मोठा हल्ला चढविला. ह्या हल्ल्यामध्ये इंग्रजी सेनेच्या मध्यावर असलेल्या पोर्तु-गीज सैन्यावर जर्मनांचा सर्व भार येऊन पडल्यामुळे तेथे फळी फुटली; व दहा-बारा मैल इंग्रजाना मागे हटावें लागलें. पश्चिमेस मर्व्हिले व नीपचे जंगल ह्या टापूमध्ये इंग्रज मागे हटले; आणि वायव्येस बेलूलपर्यंत इंग्रजाची फळी मागे ओढून घ्यावी लागली. एप्रिलच्या दुसऱ्या व तिसऱ्या आठवड्यात मिळून आठ दहा दिवस ही लढाई चालली. नीपचे जंगल घेऊन पुढें पश्चिमेस किनाऱ्यापर्यंत जाण्याचा जर्मनाचा हेतु होता; पण तो ह्यावेळींहि फसला. नीपचे जंगलाचें संरक्षण इंग्रजी सेनेने फार शिताफीनें केलें, व बेलूल येथेहि जर्मनाना थोपवून धरिले. बेलूलच्या मार्गानें पुढे जावें तर केमेलपासून कॅसेलपर्यंत पसरलेली टेकड्याच्या रांगेची भिंत आडवी येते आणि पश्चिमेस नीपच्या जंगलाचा बाध! हे जंगल फोडून जर पुढे सरकावें तर केमेलपासून कॅसेलपर्यंत असलेल्या टेक-ड्याच्या भक्कम पायावर उभे राहून इंग्रज जर्मनाच्या उजव्या बगलेस सपाटून चोप देतील ही भीति! अशा स्थितींत केमेलपासून कॅसेलपर्यंतच्या टेकड्याची रांग हस्तगत केल्याशिवाय जर्मनांना नीपचे जंगलांतून पुढे सरकणें एक तऱ्हेनें धोक्याचें होते. नीपचे जंगल व बेलूल ह्या पट्ट्यावर जर्मन थोपवले गेल्यानंतर आठ दहा दिवसाची विश्रांति घेऊन जर्मनानी एप्रिल अखेरीस आपल्या तिसऱ्या


उत्तळीत प्रारंभ केला. ह्यावेळी केमेल टेकडीवर त्यांचा मुख्य रोख होता. दोन दिवस भयकर हल्ले करून त्यांनी अखेरीस केमेल टेकडी घेतली. केमेल टेकडी व लोकेगांव ही ठाणीं घेतल्यानतर केमेल नतरची दुसरी टेकडी घेण्यास त्यानी सुरुवात केली. ह्या दोन चार दिवसाच्या लढाईत ॲंग्लो–फ्रेंच सैन्य इतक्या निकरानें लढले की, जर्मनाना अखेरीस त्याच्यापुढे हात टेकावे लागले व दुसरी टेकडी घेण्याचा नाद त्याना सोडून द्यावा लागला. मार्च व एप्रिल ह्या दोन महिन्याच्या लढायांत जर्मनाच्या हाती बराच महत्त्वाचा मुलूख गेला ह्यात सशय नाही, पण त्याचा कोणताच हेतु सफल झाला नाहीं. अमीन्सची लढाई किंवा केमेल कॅसेल टेकड्याची लढाई ह्यापैकी कोणतीहि लढाई घेतली तरी जर्मन इष्ट जागेला पोंचले असे कोठेंच दृष्टीस पडत नाही. येथढी मात्र गोष्ट खरी की, इष्ट हेतु साध्य करण्याच्या मार्गाला ते लागले आहेत आणि त्यामुळे मार्च एप्रिल महिन्यांप्रमाणें मे–जून हे महिनेहि पश्चिम रणभूमीला विशेष काळजीचे गेल्यावांचून राहाणार नाहीत. सोमनदीच्या मुखाजवळ जाऊन इग्रज व फ्रेंच ही दोन लष्करें एकमेकापासून अलग करणें हा जर्मनाचा मुख्य हेतु. हा सिद्धीस न गेल्यास निदान कॅलेवर चाल करून जाऊन कॅलेच्या मार्फत इग्लण्डचें व फ्रान्सचें जे सुलभ दळणवळण चालू आहे ते बद पाडणें हा दुसरा हेतु. ह्या दोन हेतूंपैकीं पहिला हेतु साधणे फ्रेंचाच्या चिकाटीमुळे दुरापास्त झालेलें पाहून दुसऱ्या हेतूकडे जर्मन वळले. कॅलेकडे जाण्याला यिप्रेसच्या बाजूनें म्हणजे केमेल–कॅसेल टेकड्याच्या उत्तरेच्या टापूतून जावें तर तसा प्रयत्न दोन तीन वर्षांपूर्वी जर्मनानीं केलेला व फसलेला, शिवाय गेल्या दोन तीन वर्षांत यिप्रेसचाहि बदोबस्त फार चागल्या रीतीनें केलेला ! अशा स्थितीत केमेल–कॅसेल टेकड्याच्या उत्तरेकडचा मार्ग सोडून जर्मनानीं त्या टेकड्याच्या दक्षिणेकडे भोसका पाडून त्या टेकड्या घेण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नात त्याना थोडेसे यश आलें. केमेल टेकडी त्यांच्या हातीं गेल्यामुळे या उद्योगांतील त्याची उजवी बगल आता बरीच सुरक्षित झाली आहे. पण पुढील टेकड्या घेण्याचे कामात त्याना अपयश आल्यामुळें कॅलेच्या बारक्या त्रिकोणांत अवचित हल्ल्याच्या धडकीसरशी त्याना जाता येणें शक्य नाहीं. अमीन्सपासून यिप्रेसपर्यंतच्या रणभूमींतील अवचित हल्ल्याचे दिवस आता सपले. एखादा किल्ला घेण्याकरिता जसे प्रयत्न करावयाचे तसेच प्रयत्न जर्मनाना यापुढे करावे लागतील.

आरासपासून नीपचे जंगलापर्यंतचा टापू अद्याप या वावटळांत सांपडलेला नाही. तेव्हां जर्मनांच्या चौथ्या उसळीच्या वेळीं कदाचित् लढाईचें मुख्य तोंड या टापूंत लागण्याचा संभव आहे. गेल्या दोन महिन्यात जर्मन सैन्याची अतिशय खराबी झाली आहे. तथापि रशियाच्या बाजूचें सैन्य पश्चिम रणभूमींत आणून आणखी तीन चार महिने गेल्या दोन महिन्याप्रमाणेंच लढत रहाण्याचें सामर्थ्य जर्मनांच्या अगीं आहे असें ह्मणतात. तेव्हां या सामर्थ्याचा उपयोग करून इंग्लण्ड व फ्रान्स यामधील दळणवळणाचा सुलभ मार्ग नष्ट करणें जर्मनांना भाग आहे. पुढील दोन तीन महिन्यात आस्ट्रियाने इटलीवर स्वारी करून इटलीचा सेनाशकट मोडून फ्रान्सची उजवी बगल अधू करून ठेविली पाहिजे किंवा जर्मनीनें सोमनदीच्या तोंडापासून कॅलेपर्यंत कोठें तरी समुद्र गांठून इंग्रजाकडून फ्रान्सला होणारी मदत निर्बल करून ठेविली पाहिजे. फ्रान्स मध्यावर आहे; एका बाजूला इंग्लड व दुसऱ्या बाजूला इटली आहे. या बगलेपैकीं कोणती तरी एक बगल, साधल्यास दोनहि निस्सत्व करण्याचा उद्देश आस्ट्रो-जर्मनांचा आहे. हा उद्देश साधण्याकरिता गेल्या दोन महिन्यांप्रमाणें पुढील दोनतीन महिनेहि त्याच्याकडून जारीनें दोनहि बगलावर निकराचे हल्ले चढविण्यांत येतील. या हल्लयात जर त्यांना अपयश आलें तर पुढील साली अमेरिकेचें भक्कम सैन्य फ्रान्समध्ये येऊन उतरल्यावर अमेरिका, इंग्लड, फ्रान्स व इटली या चौकडीपुढे आस्ट्रो-जर्मनांचा निभाव लागणार नाही. दोन चार महिन्यांत कांहीं साधलें तर साधलें नाहीं तर पुढे पराभव ठरलेला, अशी आस्ट्रो-जर्मनांची साप्रतची स्थिति आहे. तेव्हां मार्च-एप्रिल महिन्याहूनहि अधिक नुकसानी सोसून इंग्लिश चॅनेलचा किनारा गाठण्यास किंवा आस्ट्रिया इटलीवर तुटून पडण्यास मे-जून महिन्यात कमी करणार नाहीं हे उघड आहे. एप्रिल-मे महिन्यात जर्मनीस थोपवून धरण्यात ॲंग्लो फ्रेंचानीं आपल्या शौर्याची कमाल केली आणि मोठ्या शिताफीनें व चिकाटीनें जर्मनांशीं लढून फळी फुटली असताहि आपली बाजू त्यानीं सावरून धरली. या दोन महिन्यातील लढाईचा निकाल दोस्त सरकाराना निराशाजनक नसून जर्मनीच्या उत्साहाचा भंग मात्र त्यानीं केलेला आहे. तथापि पुढील दोनतीन महिने दोस्त सरकाराना बऱ्याच काळजीचे जाणार हे निर्विवाद आहे. इटली व फ्रान्स येथील रणभूमि पुढील दोनतीन महिन्यात पेटलेली दिसेल यात संशय नाही. यावेळीं

सॅलिनोका, ईजिप्त व बगदाद या रणभूम्याचीहि स्थिति कशी होईल त्याचा थोडासा विचार येथे करणें जरूर आहे. सॅलिनोकांतील ॲंग्लो-फ्रेंच सैन्यानें पुढे सरकणें सोडून दिलें आहे. खुद्द फ्रान्सच्या रणभूमीमध्ये यिप्रेसच्या टापूंत इग्र-जाच्या मदतीसाठी फ्रेंचाना धावून यावें लागेल. अर्थात् त्यामुळे फ्रेंचाच्या शिल्लक सैन्यासबंधानें आखून ठेविलेली योजना बदलावी लागेल. १९ वर्षाच्या आतीलहि नवे सैन्य इग्रज रणभूमीकडे पाठवीत आहे. तसाच प्रसग आला तर यिप्रेस सोडून देणें इष्ट होईल असेहि काहींचें मत आहे, तेव्हा पुढील चार पांच महिन्यात फ्रान्सच्या रणभूमीत ॲंग्लो–फ्रेंच सैन्याची थोडीशी ओढाताणच होणार हे स्पष्ट दिसत आहे. अशावेळी सॅलिनोकाकडे अधिक फौज कोण पाठविणार ! शिवाय सॉलिनोकाचें सैन्य शेपन्नास मैल पुढे सरकलें तरी महायुद्धाच्या एकदर स्वरूपा-वर त्याचा परिणाम काय होणार ! काहीं नाही. रशिया सपशेल पडल्यानतर व रोमानियाचा तह झाल्याननर सॅलिनोकाचें सैन्य लष्करी धोरणाच्या दृष्टीनें निरर्थक झाले. ग्रीसवर बल्गेरियानें सूड उगवू नये येवढ्या पुरताच आज त्याचा उपयोग आहे. पण पुढील तीन चार महिन्यात आस्ट्रियाच्या जोराच्या हल्ल्यापुढे जर इटलीला पुन्हा माघार घ्यावी लागली तर इटलीला मदत कोठून पोचावयाची ? पूर्वीच्या वेळीं इंग्लड व फ्रान्स येथून इटलीला वेळेवर मदत पोचली; पण आज मदत करण्याची स्थिति इग्लडची नाही व फ्रान्सचीहि नाहीं. तसाच प्रसंग आला तर ग्रीसच्या सरक्षणाचें काम ग्रीसवरच सोपवून सॅलिनोका येथील ॲंग्लो–फ्रेंच सैन्यास इटलीच्या मदतीला धावून यावें लागेल. पालेस्टाईनच्या बाजूच्या इग्रजी सैन्याचीहि रशियाच्या अधःपातामुळे पुढील प्रगतीच्या दृष्टीने निरर्थकच स्थिति झाली आहे. या सैन्यानें इजिप्तचें सरक्षण केले व ईजिप्तवरील स्वारीचें भय नष्टहि केलें. शिवाय पॅलेस्टाईनचा टापू काबीज करून आपली इज्जतहि वाढविली. आणखी शेपन्नास मैल पुढे जाईतो तुर्कस्थानच्या मुख्य लष्करी शक्तीवर या सैन्याचा कांहींच परिणाम होणार नाही. ह्या सैन्यास मदत इंग्लडातून चालू साली मिळणें शक्य नाहीं. तसाच प्रसग आल्यास सॅलिनोकातून सैन्य काढून इटलीकडे पाठविलें असता जसें एका दृष्टीनें चालण्या-सारखे आहे तसे मात्र चालणें पॅलिस्टाईनमध्यें शक्य नाहीं. ग्रीसच्यापेक्षा ईजिप्त व सुवेजचा कालवा याचें महत्त्व महायुद्धात विशेष आहे. या बाजूचें इग्रजी सैन्य

हलकें झालें आहे, असें जर तुर्कांना व जर्मनांना समजलें तर इजिप्तच्या स्वारीची पुन्हां उठावणी करण्यास ते चुकणार नाहींत, इतकेंच नव्हे, तर पश्चिम रणभूमींत आपले हेतू सफल होणें दुरापास्त आहेत असें जर्मनांच्या अनुभवास आल्यानंतर आणि फ्रान्सांत नवे चर खणून स्वतःचा बचाव करण्याचा उद्योग त्यानें आरं-भिल्यानंतर इजिप्तकडे त्यांचे डोळे पुन्हां वळल्याशिवाय रहाणार नाहींत. आपण अशी कल्पना करूं कीं, अँग्लो–फ्रेंचांच्या लोखंडी भिंतीवर गेले दोन महिने जर्मनीनें जसें डोकें आपटून घेतलें तसेंच आणखी दोन तीन महिने आपटून घेऊन यश न मिळतां जर्मनी रक्तबंबाळ झाला. पुढें जर्मनीनें स्वतःचा बचाव कसा करावा? पुढील सालीं अमेरिकेचें सैन्य फ्रान्समध्यें पूर्णपणें उतरून अँग्लो–फ्रेंचांच्या चढा-ईची तयारी होईतों आपल्या चरांची व्यवस्था वगैरे जर्मनी लावीलच; पण तसें करीत असतांनाच इतर रीतीनें अँग्लो–फ्रेंचांची तयारी परिपूर्ण न होऊं देण्याची शक्य ती खटपट जर्मनी केल्यावांचून रहाणार नाहीं. अँग्लो–फ्रेंचांच्या तयारीवर विघ्न घालण्याचें काम जर्मन पाणबुडया बोटींकडे सोंपविण्यांत आलेलें आहे. पाण-बुडयांच्या या उद्योगास दुजोरा जर दुसऱ्या कोणत्या गोष्टीमुळें मिळण्यासारखा असला तर तो सुवेज कॅनॉल ताब्यांत घेण्यानेंच मिळणार आहे. तेव्हां पश्चिम रणभूमींत जसजशी जर्मनीची अधिक निराशा होईल तसतशी अधिक कुमक इजिप्तच्या स्वारीकरितां जर्मनीकडून तुर्कांना मिळेल. अशा स्थितींत मे–जून महिन्यांत पॅलेस्टाईनच्या बाजूला तुर्क थोडेसे सबल झालेले दृष्टीस पडतील व त्यानंतर तुर्क आपण होऊन चढाई करण्यास आरंभ करितील असा अंदाज आहे. सॅलिनोकाच्या रणभूमीप्रमाणें पॅलेस्टाईनची रणभूमि मृतवत् रहाणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर फ्रान्सची रणभूमि जसजशी विझत जाईल तसतशी अधिक पेट पॅले-स्टाईनची रणभूमि घेईल असा संबंध या दोन रणभूमींमध्यें दृष्टीस पडतो. रशियाच्या अधःपातामुळें सॅलिनोकाची रणभूमि जशी निरर्थक झाली आहे तशीच निरर्थक मेसापोटेमियाचीहि रणभूमि झाली आहे. बगदाद घेऊन पुढें रशियाच्या सेनेशीं संलग्न होणें हा मेसापोटेमियांतील इंग्रजी लष्कराचा मूळचा हेतु होय. पण वर आतां रशियाच नाहींसा झाला आहे. काकेशियस पर्वताच्या दक्षिणेचा रशियाचा प्रांत रशियन तहानें तुर्कांना मिळाला असून तेथील आगगाडयांसकट तो प्रांत तुर्कांनीं कब्जांतहि घेतला आहे. शिवाय काकेशियस पर्वताच्या उत्तरेकडील

# हिंदुस्थानवरील स्वारीचा जर्मनीचा धाक—



आणि कास्पियन समुद्र व अफगाणिस्थान याच्यामधील मुसलमानी प्रदेशहि आता स्वतंत्र झाले असून तुर्को–जर्मन सदर टापूत घुसले असून आपल्या पाखरुणाखालीं लहान लहान मुसलमानी संस्थाने तेथे स्थापण्याचा त्याचा क्रम सुरू झाला आहे. काळ्या समुद्रातील क्रिमिया द्विपकल्प व सेबास्तपूल ही आरमारी मुख्य ठाणी जर्मनांनीं काबीच केली असून रशियाची बहुतेक सर्व लढाऊ व व्यापारी जहाजे जर्मनाच्या हाती पडलीं आहेत. अशा स्थितीत बगदाद येथील सैन्य वर सरकत सरकत जरी काळ्या समुद्रापर्यंत गेलें तरी तुर्की लष्करावर त्याचा काहीं इष्ट परिणाम होणार नाहीं. हे जसजसे वर सरकतील तसतसे तुर्क मागे हटतील. काळ्या समुद्राजवळ जवळ जात चालले म्हणजे मात्र तुर्क जोराने अगावर उलटून पडतील. बगदादच्या उत्तरेकडील आजचें तुर्की सैन्य स्वतःच्या आगगाड्यापासून किंवा काळ्या समुद्रातील आगबोटींपासून फार दूरवर जगलांत पडण्यासारखे आहे. मागे हटण्यात या सैन्याचें नुकसान नाही. इराणच्या बाजूला जर तुर्कांना कांहीं धामधूम करावयाची असली तर त्यांना तेहरानकडे जाण्याकरितां एशिया–मायनरातून पूर्वीचा खुष्कीचा रस्ता उपयोगात आणण्याची जरूर नाहीं. काळा समुद्र आतां त्याचा झाला आहे. आगबोटीतून बसून ते काकेशियस मुलखात उतरतील व तेथून आगगाडींत बसून तेहरानच्या वायव्येस ८०।९० मैलावर ते पोंचतील. अशा स्थितीत बगदाद येथील इंग्रजी सैन्यानें एशिया मायनरकडे वळणें निरर्थक, मोसल–अर्झरूम या रोखानें काळा समुद्र गांठणें निरर्थक व काकेशियस प्रांतांतील तुर्की आगगाड्याजवळ बगदादपासून शेकडो मैल दूरवर जाऊन धडकणेंहि संकटाचें आहे. बगदाद घेतल्यानें ह्या सैन्याचें काम संपलें आहे. हिंदुस्थानवर जर तुर्को–जर्मनाची स्वारी होऊ लागली तरच मात्र दक्षिण इराणात या सैन्याचा उपयोग होणार आहे. हा उपयोग कशास्वरूपाचा होईल, हे ठरविण्याकरितां आता आपण तुर्को–जर्मनाच्या हिंदुस्थानातील स्वारीच्या चर्चेकडे वळू या. एप्रिल महिन्यात इंग्लंडचे प्रधान लॉईड जॉर्ज यानी हिंदुस्थानला असा निरोप पाठविला कीं, जर्मनाची दृष्टि एशियाखंडाकडे वळण्याचा संभव आहे, व त्यावेळीं हिंदुस्थाननें जर्मनीच्या मार्गात किल्ल्याप्रमाणें उभे राहून जर्मनाचे दुष्ट हेतू विफल केले पाहिजेत. हा निरोप आल्यानतर राजेरजवाड्याचा व लोकांच्या पुढाऱ्यांचा एक दरबार लाटसाहेबानीं दिल्लीस भरविला. त्यावेळी

खुद्द बादशहानींहि वरील आशयाचा एक निरोप पाठविला. हिंदुस्थानावरील जर्मनीच्या या स्वारीचा प्रतिकार करण्यास हिंदुस्थानचे लोक उत्सुक व सज्ज आहेत असे आश्वासन या दरबारतर्फे इंग्लडास देण्यात आले. या दरबाराच्यावेळी जर्मन स्वारीची भीति कशी व कां वाटत आहे यासंबंधीची हकीकत लाटसाहेबानी लोकांना सांगितली; रशियाच्या अधःपातामुळे दक्षिण काकेशियस प्रांत तुर्कांच्या ताब्यात गेला असून कास्पियन समुद्रापर्यंत तुर्को-जर्मनांचा अमल बसला आहे. कास्पियन समुद्रापासून अफगाणिस्थानापर्यंत मुसलमानांच्या वस्तीचा मुलूख असून या सर्व मुलखांत आतां रशियन सत्ता नष्ट झाल्यामुळें बेबंदशाही माजलेली आहे. तुर्को-जर्मन कारस्थानीं लोक या मुलखात सांप्रत ठाणें देऊन बसले असून तेथील मुसलमान सरदारांना तुर्को-जर्मनांच्या छत्राखाली ओढू लागले आहेत. हे त्यांचें कारस्थान जर सफल झालें तर रशिया ज्या मार्गानें हिंदुस्थानवर स्वारी करील म्हणून पूर्वी भीति होती तोच मार्ग आज तुर्को-जर्मनांना मोकळा झाल्यासारखा होईल. मध्य एशियातील म्हणजे कास्पियन समुद्र व अफगाणिस्थान यामधील टापूतील जर्मनांचे कारस्थान एप्रिल-मे महिन्यात सफल झाल्यासारखे आहे, असे धरून चालण्यास हरकत नाहीं. कारण, ते विफल होण्यास सदर मुलखात कोठेच विरोध नाहीं. इराणचे शहा व अफगाणिस्थानचे अमीर हे दोघे राजे स्वतः इंग्रजांना अनुकूल आहेत; पण त्यांच्या प्रजाजनांत धर्मवेडे लोकांचा भरणा विशेष असून या धर्मवेडेपणामुळे इराण व अफगाणिस्थान येथील लोकांचें पाठबळ तुर्कस्थानास अधिक मिळणारें आहे. हिंदुस्थानावर जर्मनी स्वारी करून येणार तो-तुर्कांच्या मुसलमानी निशाणाला पुढे करून येणार. खुद्द तुर्कांना व मध्य एशियातील मुसलमानांना रशियाच्या अमलापासून व भीतीपासून सोडविणारा तुर्कांचा मित्र असलेच सोंग जर्मनी याप्रसंगी घेणार हे उघड आहे. अर्थात् तुर्को-जर्मन सैन्य जसजसें अफगाणिस्थानच्या पश्चिमेस व इराणच्या उत्तरेस मे-जून महिन्यापासून जमा होत जाईल तसतसा त्यांचा जयजयकार मध्य एशिया, इराण, अफगाणिस्तान, बलुचिस्थान व सरहद्दीवरील पठाण यांच्यामधील धर्मवेड्या मुसलमानांत होत जाईल व त्यामुळे एका मोठ्या मुसलमान टापूतील मनुष्यबल तुर्को-जर्मनांना सहज मिळेल. शिवाय रशियाच्या अधःपाताचें उदाहरण या लोकांपुढे प्रत्यक्ष असल्यामुळे जर्मनांचा जय चालू महायुद्धात झाला व होणार अशी

भ्रांति या वेडेपीरांना होऊन दिल्लीस पुन्हा मुसलमानी तख्त स्थापण्यास आपण जात आहों असें वारें त्याच्या अंगात भरेल. रशियानें जर ती स्वारी केली असती तर-धार्मिक वेडेपणाचें व गतकालीन वैभवाच्या धंदीचें पाठबळ त्यास मिळालें नसतें. रशिया सपशेल पडल्यामुळे व इस्तंबूलच्या खलिफाचें निशाण पुढे करून जर्मनी वाट चालत असल्यामुळे जर्मनीला आयतें पाठबळ विलक्षण प्रकारचें मिळणारें आहे. जर्मनीच्या मार्गांत अडचणी आहेत व त्या फारच मोठ्या आहेत. फक्त पाठबळ किंवा बाजारबुणगे त्याला लागेल तितके मिळेल; पण खाशा स्वारींतच फारसा दम राहिलेला नाहीं. पश्चिम रणभूमीत जर्मनीची एकसारखी खराबी होत असल्यामुळे हिंदुस्थानावरील स्वारीस पाठविण्यास त्याजपाशी विशेषसें सैन्य शिल्लकच नाहीं. रुमानियाच्या उरावर ठेविलेले सेनापति मॅकेन्सन याच्या हाताखालील लाख दोन लाख जर्मन काय ते या स्वारीकरिता उपयोगात येण्यासारखे आहेत. रशियाच्या सैबेरिया प्रांतात असलेले आस्ट्रो–जर्मन कैदी जर रशियानें जर्मन म्हणतील त्या मार्गानें परत पाठविले तर कदाचित् पांच सहा लाख आस्ट्रो–जर्मन्स बुखारा, समरकंद या टापूंत पुढील पांचसात महिन्यात येऊन पोंचण्याचा संभव आहे. कास्पियन समुद्रापासून एक आगगाडी निघून इराणच्या उत्तरेकडून अफगाणिस्तानच्या वायव्य कोपऱ्यापर्यंत येते. मर्व्ह या जंक्शन स्टेशनापासून हिरातच्या जवळ पेजडेपर्यंत या आगगाडीचा फाटा आलेला आहे. मर्व्हपासून उत्तरेकडे ही आगगाडी जाऊन अफगाणिस्तानच्या वायव्य व उत्तर सरहद्दीपासून ती आगगाडी बुखारा, समरकंद व ताशकंद या शहराकडे जाते. अफगाणिस्तानचा उत्तर भाग, काश्मीर, पामीर व काश्मीरच्या डोक्यावर असलेले चायनीज तुर्कस्तान इतक्या टापूंना या आगगाडीचा शह बसतो. असा शह दिल्यानंतर ही आगगाडी अॅरल सरोवराकडे जाऊन तेथून कास्पियन समुद्राच्या उत्तरेकडून रशियातील मुख्य आगगाड्यांना मिळते. सैबेरियातील आस्ट्रो-जर्मन कैदी मास्कोच्या मार्गानें जर्मनींत पोंचविण्यास जितका वेळ व जितक्या लांबीचा प्रवास करावा लागेल तितक्याच वेळांत तितक्याच लांबीच्या प्रवासानें सदर कैदी किंवा आस्ट्रो–जर्मनांचें हे सैन्य बुखारा, समरकंद या टापूंत येऊन पोंचेल. सांप्रत सैबेरियातील मनुष्य-बळाच्या हालचाली वक्तशीर होणें दुरापास्त आहे. एप्रिल अखेरपर्यंत सर्व युक्रेन प्रांत जर्मनीच्या मुठींत गेला असून सेबास्तपूलचें आरमाराचें ठिकाण व क्रिमिया

द्विपकल्प जर्मनीच्या हातांत पडलें आहे. सर्व काळा समुद्र जर्मनांचा झाला आहे. कोसाकाच्या मुलखातील डॉन नदीचें मुखहि जर्मनांनी ताब्यांत घेतलें असून मे जून महिन्यांत कोसाकाचा व जर्मनीचा तह होऊन मास्कोच्या सरकारास आस्ट्रो-जर्मन कैदी बुखारा-समरकंदकडे परस्पर पाठवितां येणें शक्य होईल. म्हणजे जुलई महिन्यापासून आगगाडीची व्यवस्था लागून मर्व्ह, बुखारा, समरकंद या टापूंत तुर्को-जर्मनांचें सैन्य उत्तरेकडून व पश्चिमेकडून जमूं लागेल. दक्षिण काकेशियस प्रांतांत तुर्कांचें लाख दोन लाख सैन्य सांप्रत असून रशियानें सोडलेले तुर्कांचे कैदी लाख दोन लाखांपर्यंत तेथें जमण्याचा संभव आहे. शिवाय पालेस्टैनकडे दुर्लक्ष करण्याचें जर तुर्कांनीं योजिलें तर आणखी दोन लाख सैन्य कास्पियन समुद्रावर तुर्कांचें येऊन पोंचेल. आस्ट्रो-जर्मन निकोप सैन्य एक लाख, आस्ट्रो-जर्मन कैदी दोनतीन लाख व तुर्की सैन्य तीन चार लाख असे सर्व मिळून पाच-सात लाख बऱ्यापैकी सैन्य व बरोबर तीन चार लाख मुसलमानी धर्मवेड्याचें बाजारबुणगे अशी दहा लाखाची स्वारी येत्या हिंवाळ्यांत किंवा हिंवाळ्यानंतर हिंदुस्थानवर होण्याचा रंग आहे. चायनीज तुर्कस्तान, पामीर किंवा काश्मीर ह्या मार्गानें हिंदुस्थानांत उतरणें दुरापास्त आहे. तेथील गडबड चिमटे घेण्याच्या स्वरूपाचीच होणार. खरी स्वारी म्हणजे मर्व्ह, पेंडजे ह्या आगगाडीनें हिरात-कंदाहार-काबूल किंवा हिरात कंदाहार-क्वेट्टा ह्या मार्गानेंच होणार. ह्या मुख्य स्वारीस मदत म्हणून दक्षिण काकेशियस प्रांतांतले कांहीं सैन्य तेहरानकडे वळून तेथून खालीं दक्षिणेकडे उतरून इस्पाहानच्या मार्गानें दक्षिण इराणांतून बलुचिस्तानवर चाल करून येण्याचा संभव आहे. पण ही दुय्यम स्वारी होय. मुख्य स्वारी हिरातच्या मार्गानेंच झाली पाहिजे. काळा समुद्र, काळ्या समुद्रांतील शेंकडो रशियन जहाजें आणि काळ्या समुद्राच्या कांठचा कोळसा व राकेल तेल हीं सर्व एप्रिल अखेर जर्मनीच्या हातीं लागल्यामुळे रुमानिया किंवा कान्स्टान्टिनोपल येथील सैन्य व युद्धसामग्री अनायासें व फुकटच्या फुकट कास्पियन समुद्रापर्यंत नेऊन पोंचविल्यासारखें झालें आहे. फुकटचीं जहाजें, फुकटचा कोळसा व फुकटचें तेल! लष्करीदृष्ट्या ह्या जहाजांचा दुसरीकडे कुठेंहि उपयोग करतां येण्यासारखा नाहीं. रुमानिया आणि कान्स्टान्टिनोपल हींच कास्पियन समुद्रावर नेऊन ठेवल्यासारखी कृती काळ्या समुद्रांत अवचित केली आहे. हा काळ्या समुद्रांतील चमत्कार

लक्षात घेतला म्हणजे एशियामायनर ओलांडून आगगाडीनें पालेस्टैनकडे जाण्या- पेक्षा हिरातकडे येणें तुर्को–जर्मनांना अधिक सोपे, सोईचें व कमी खर्चाचें झालें आहे असें म्हणावें लागतें. तेव्हा पश्चिम रणभूमींत स्वतःचा बचाव करून बसण्याची पाळी जर्मनांवर आल्यास येत्या हिंवाळ्यात हिंदुस्थानवरील स्वारीचें पहिलें पाऊल प्रकट होईल, ह्यांत संशय नाहीं. दक्षिण इराणांतून जी दुय्यम स्वारी होईल तिला विरोध करण्याचें काम मेसापोटेमियातील सैन्याकडे सोपविलेलें दिसते. कारण एप्रिल महिन्यात ह्या सैन्यानें उत्तरेकडील मोसलच्या रोखापेक्षा इराणातील हमदानच्या रोखानें बगदादपासून ईशान्येकडे पुढे सरकण्यास प्रारंभ केला आहे. हिरातवर चाल करून येणाऱ्या पांचसात लाख खाश्या सैन्यापैकी लाख दोन लाख लोक दुय्यम स्वारीकडे वळतील व त्याचा समाचार मेसापोटेमियातील सैन्य परस्पर घेईल. हिरातवर कायते चार पांच लाखच सैन्य चाल करून येणार. ह्या सैन्यास अडवून धरण्यास हिंदुस्थान सरकार व अफगाणिस्तानचे अमीर ह्यांज- पाशीं आजच पुरेसे सैन्य आहे, व हिंदुस्थान सरकार आजपासूनच पुढच्या तयारीला लागलेले असल्यामुळे ह्या पांचसात लाखाच्या स्वारीची तितकीशी फिकीर करण्याचें कारण नाहीं. पश्चिम रणभूमींत किंवा इटलीच्या रणभूमीत जर मे–जून महिन्यात आस्ट्रो–जर्मनांची सरशी झाली तर मात्र अमेरिकेचें पूर्ण स्वरूप प्रकट होईतो म्हणजे आणखी वर्ष दीड वर्षपर्यंत दहा पधरा लाख आस्ट्रो–जर्मन सैन्य इतर सुलभ कामगिरी करता वापरता येणें जर्मनीला शक्य आहे. मार्च एप्रिलातील अँग्लो–फ्रेंचांच्या शौर्याकडे, शिताफीकडे व चिकाटीकडे पाहिलें असता तशी संधि जर्मनांना मिळण्याचा योगच दिसत नाहीं.

# महायुद्धाचा चवथ्या वर्षाचा मे-जून महिना

मार्च-एप्रिल या दोन महिन्याप्रमाणें मे महिनाहि काळजीचा गेला. मे महिन्याच्या चौथ्या आठवड्यात सायसन्स आणि ऱ्हीम्स या दोन शहरामधील ऐन नदीच्या उत्तरेस चारपांच मैलांवर असलेली फ्रेंचाची फळी जर्मनानीं क्रॅआन येथे फोडली. २६ मे रोजी या पट्ट्यावर रात्रभर जर्मनानीं तोफांचा भडिमार केला आणि २७ तारखेच्या पहाटेला पायदळाचा हल्ला सुरू होऊन २४ तासांत बारा मैल जर्मन सेना पुढे सरकली. ऐन नदीवरील हा हल्ला अवचित घाला पडावा त्याप्रमाणे पडला युद्धाचें वजन या बाजूला फेंकण्यात येईल असा फ्रेंचांचा अदाज नव्हता. २१ मार्च रोजीं सेंट क्वेंटीन येथे लढाई होऊन जर्मन सेना पुढे सरकली ती अमीन्सच्या रोखानें; अमीन्सच्या पूर्वेस आठ दहा मैलावर जर्मनांना थाबावें लागले. त्यानतर एप्रिलांत दुसरा हल्ला होऊन आर्मेंटेरीस येथून जर्मन पुढें सरकले ते दहा पधरा मैलावरच थाबले. या हल्ल्याचा रोख कॅलेच्या टापूतला समुद्र किनारा गाठण्याकडे होता, मे प्रारभाला हा हल्ला थाबला. त्यानतर तीन आठवडे जर्मनाची एकसारखी तयारी चालली होती. अमीन्सचा टापू व यिप्रेसचा टापू येथे त्यांचें मुख्य सैन्य व अवजड तोफा गोळा झाल्या होत्या. अमीन्सपासून यिप्रेस-पर्यंत एका हल्ल्यांत कोठेंहि वीस पचवीस मैल पश्चिमेस जर ते पुढें सरकले तर त्यानीं समुद्र किनारा गाठल्यासारखेच होईल. समुद्र किनारा जर्मनानी गाठण्याचें सकट टाळता यावें म्हणून मुख्य सेनापति जनरल फॉक यानी शिल्लक सैन्य अमीन्सच्या टापूत सोम नदीच्या उत्तरेस व दक्षिणेस गोळा करून ठेविले होते, आणि या टापूतील जर्मनाच्या हल्ल्याची ते वाट पहात होते. मे महिन्यातील पहिले तीन आठवडे चांचपटून पहाण्याकरिता या सर्व टपूवर ठिकठिकाणीं धक्के देण्यात जर्मनानीं घालविले. ॲंग्लो-फ्रेंचानीहि बऱ्याच ठिकाणी उलट धक्के दिले. या धक्काबुकीत शत्रु सावध व मजबूत आहे असे दोघाच्याहि अनुभवास आले. विमानाच्या बाबतीत ॲंग्लो-फ्रेंचाची सरशी असल्यामुळे ॲंग्लो-फ्रेंच विमानें जर्मन सेनेवर नेहमीं फिरतीं रहात आणि जर्मन सेनेच्या ठिकठिकाणच्या ठाण्याचे फोटो घेत. या फोटोवरून अशी माहिती मिळाली कीं, जर्मन सेनेचा मुख्य जमाव अमीन्स यिप्रेसच्या टापूतच तळ देऊन बसला आहे. अमीन्सपासून ऱ्हीम्सपर्यंतच्या

टापूवरून ॲंग्लो–फ्रेंच विमानें उडून कित्येक मैल अंतरपर्यंत टेहळणी करूं लागलीं तर त्यास जर्मन विमानें हटकीतहि नसत. हा टापू तितका कांहीं महत्त्वाचा नाहीं व या टापूवर हल्ला करण्याची जर्मनाची तयारीहि नाहीं, असा बाहेरचा देखावा विमानांतून टेहळणी करणाराना दिसला; पण ते फसले. मे महिन्यातील पहिले तीन आठवडे या बाजूला सामानसुमान आणून ठेवण्यात जर्मनांनीं घालविले. ही तयारी रात्रीची चाले. त्यामुळे टेहळणी करणाऱ्या विमानाना ती समजली नाहीं सैन्याचे मोठे तळ या बाजूला पडलेच नाहींत; त्यामुळें टेहळणी करणारे चकले. दारूगोळा तोफा व इतर सामानसुमान रात्रीचें आणून ठिकठिकाणी जमिनीखालीं चरातून साठवून ठेवावयाचें आणि आयत्यावेळीं दहा वीस तासात मोठे लष्करच्या लष्कर शेपन्नास मैलावरून आगगाड्याच्या सहाय्यानें अगदीं तांतडीनें लढण्याच्या जागेजवळ आणून सोडावयाचें, अशी व्यवस्था जर्मनानीं केली आहे. आगगाड्याची ही व्यवस्था तारीफ करण्यासारखी आहे, आणि या व्यवस्थेच्या जोरावरच जर्मनीला थोडासा जय पश्चिम रणभूमींत मिळत आहे. शिवाय ज्या त्रिकोणाच्या दोन बाजूंवर जर्मन सेना आज लढत आहे, त्या त्रिकोणाच्या आंतल्या बाजूला जर्मनाचा तळ असल्यामुळे आणि ॲंग्लो-फ्रेंच सेनेला त्रिकोणाच्या बाहेरच्या बाजूनें हालचाल करावी लागत असल्यामुळे, एका बाजूवरून दुसऱ्या बाजूवर सैन्य नेण्यास जर्मनाना जितके अंतर चालावें लागतें, त्याच्याहून दुप्पट तिप्पट अंतर ॲंग्लो–फ्रेंचांना चालावें लागते. ॲंग्लो–फ्रेंचांची या बाबतींत मोठी गैरसोय आहे. या गैरसोईचा फायदा घेऊन लढण्याच्या ठिकाणापासून शे पन्नास मैल दूर अंतरावर जर्मनाना आपला मुख्य तळ पाडता आला व ऐन नदीवर हल्ला करण्याचा आपला बेत गुप्त ठेविता आला. आगगाड्याच्या कडेकोट बंदोबस्तामुळें या हल्ल्याचीं बाह्य चिन्हे लढण्याच्या जागीं जर्मनांनीं दिसू दिलीं नाहींत इतकेच नव्हे, तर मुख्य सेनापति जनरल फॉक हेहि चकले आहेत, असें त्याच्या उलट निदर्शनास आलें. तारीख २१ मार्च रोजीं सेंट क्वेंटीन येथे फळी फोडताना जर्मनांनीं कांहीं इंग्रजी पथकाना जोरानें मागें रेटलें. हीं पथके त्यावेळीं मोठ्या शौर्याने लढलीं, पण त्यांचें फार नुकसान झालें. या लढाईत चार पांच दिवस निकराने लढल्यावर सदर पथकाना लढाईतून मागे घेण्यांत आलें, आणि त्यांची तात्पुरती डागडुजी करून आमें-

टरीसच्या बाजूला त्यांना विसाव्याकरिता पाठवून देण्यांत आलें. हे तेथें जाऊन पोंचतात न पोंचतात तों त्या बाजूच्या जर्मन हल्ल्यास सुरुवात झाली आणि तेथेहि त्यांना निकरानें चारपांच दिवस लढावें लागलें. दोनदां लढाईच्या भयंकर वावटळींत सांपडलेलीं हीं दुर्दैवी पथकें पुन्हा वावटळींत सांपडूं नयेत म्हणून त्यांना ऐन नदीवर सायसन्स व ऱ्हीम्स यामधील टापूत तोंडावर उभें करण्यात आलें. गेले दोन तीन महिने रणभूमि इतक्या प्रखरतेनें पेटली आहे कीं, दोनदोनदा होरपळलेल्या पथकानाहि खरी विश्रांति देणें शक्य राहिलेलें नाहीं. ज्या टापूत लढाई भरांत येणार नाही असें सेनापतींना वाटत असते त्या टापूत तोंडावर उभे राहण्यास मिळालें ह्मणजे विश्रांतीच मिळाल्यासारखी होय, अशी बिकट स्थिति पश्चिम रणभूमींत दृष्टीस पडत आहे. सेंट क्वेंटीन व आर्मेंटेरीस येथें निकरानें लढून थकलेली इंग्रजी पथकें फ्रेंचानी सांभाळावयाच्या ऐन नदीच्या टापूत तोंडावर उभीं राहिलेली पाहून आपला गुप्त बेत फ्रेंच सेनापतींनीं अदाजानें ताडलेला नाहीं अशी खूणगांठ जर्मनानीं मनाशीं बांधिली. ऐन नदीवर हल्ला होणार असा जर तर्क फ्रेंचांनी काढला असता तर विसाव्याकरिता थकलेल्यांना तेथें का पाठविण्यात आले असतें ? थकले भागलेले इंग्रज फ्रेंचांनीं तेथें उभे केले. अर्थात् ती जागा विसाव्याची होय लढण्याची नव्हे, अशा धोरणानेंच त्यानी सैन्याच्या हालचाली चालविल्या असल्या पाहिजेत, असें जर्मनानी उघड ओळखिलें. अवचित हल्ला करण्यास हीच जागा योग्य होय, असें ठरल्यानतर २६ तारखेच्या रात्रीं क्रॅआनच्या रणभूमींत सैन्य उभविण्यात आले व २७ तारखेला सकाळीं लढाईस सुरुवात झाली. या लढाईंत अवजड तोफखान्याचा जर्मनानीं विशेषसा उपयोग केला नाहीं. दूर अतरावरून विषारी धुराचे गोळे टाकण्यांत आले, जवळच्या चरांतील तोफांच्या माऱ्यानें काटेरी तारा तोडण्यांत आल्या; आणि पहाटेच्या अंधःकारांतच समुद्राच्या लाटा प्रमाणें पायदळाच्या झुण्डी एकामागून एक चाल करूं लागल्या. याचा परिणाम असा झाला कीं, विषारी धुराच्या त्रासानें अशा स्थितीत, ॲंग्लो-फ्रेंच सैन्य असताना जर्मनाची लाट जवळ येऊन ठेपली. ३२ मैलाच्या पट्ट्यावर हा हल्ला चढविण्यात आला. या ३२ मैलांपैकीं कांहीं ठिकाणीं एकाला सहा तर कांही ठिकाणीं एकाला दहा किंवा बारा इतक्याहूनहि अधिक पटीनें जर्मन सैन्य ॲंग्लो-फ्रेंचाच्या अगावर चालून गेलें. इतक्या अधिक सख्येनें जर्मन अंगावर तुटून पडल्यामुळे

अँग्लो–फ्रेंचांना क्रॆआन जवळच्या टेकड्या सोडून दक्षिणेस तीन चार मैलांवर सकाळीं ऐन नदीच्या अलीकडे यावें लागलें. ऐन नदीच्या दोन्ही तीरांना मैल अर्धा मैल सपाट मैदान असून नंतर उंचवट्याचा व टेंकड्याचा मुलूख आहे. नदीला उतार कोठेंच नसून मध्यावर १५ फूट खोल पाणी आहे. अर्थात् ऐन नदी शत्रूला अडविण्यास चांगलें ठिकाण होय. पण पहिल्या धडक्रीसरशीं जर्मन सेना इतक्या जोरानें आंत गेली कीं; ऐन नदीवर त्याना अडविता आलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर ऐन नदीच्या दक्षिणेस तीन चार मैलांवर असलेल्या व्हेसेल नदीच्या पलीकडेहि पहिल्याच चोवीस तासात जर्मन सेनेपैकीं काहीं भाग गेला. दुसऱ्या दिवशीं व्हेसेल नदीवर मोठी निकराची लढाई झाली, पण याहि वेळीं जर्मन सैन्य संख्येनें फार अधिक असल्यामुळें अँग्लो–फ्रेंचाना मागें हटावें लागलें. पहिल्या दोन दिवसात जर्मन सेना सोळा मैल पुढें गेली व पुढील तीन चार दिवसांत दहा पंधरा मैल पुढें जाऊन मार्न नदीवर चाटेथेरी गावाजवळ जर्मन पोंचले. चाटेथेरी गाव अर्धा दक्षिण व अर्धा उत्तर किनाऱ्यावर आहे. चाटेथेरी गांवाच्या पूर्वेस दहा बारा मैल व पश्चिमेस चार पाच मैल मार्न नदीचें उत्तर तीर जर्मनाच्या हातीं गेलें आहे. जून महिन्याच्या दुसऱ्या तिसऱ्या तारखेस मार्न नदी ओलांडण्याचा जर्मनानीं प्रयत्न केला, पण त्यांत त्यास यश आलें नाहीं. या हल्ल्यातील मध्यावरचा भाग क्रॆआनपासून चाटेथेरीपर्यंत पोचत असताना पांच सात दिवसात दोही बाजूच्याहि बगला जर्मनांनीं पुढें सरकविल्या. पश्चिमेची बगल लगेच सायसन गावा जवळ आली. तेथें निकराची लढाई होऊन सायसन गांव जर्मनाच्या हातीं गेलें. सायसनपासून नॉयानपर्यंतचा टापू म्हणजे ऐन व ऑयीस या दोन नद्यांच्या दुआबात जर्मनांचें पाऊल फारच सावकाश पुढें पडलें. पाच सात दिवसात मिळून चारपाच मैल ते पुढें आले असें म्हणण्यास हरकत नाहीं. ऐन नदीच्या दक्षिणेस या टापूत जर्मनाची विशेष गति झाली नाहीं. सायसन्सच्या पश्चिमेस पांच मैल व दक्षिणेस पांच सात मैल येवढेंच काय तें जर्मनाना पुढें सरकायला मिळालें. पूर्वेकडची बगल ऱ्हीम्स शहराच्या उत्तरेला, पश्चिमेला व पूर्वेला येऊन पोंचली. ऱ्हीम्स शहराला तीन बाजूनीं जर्मनानीं वेढा दिला, पण जूनच्या पांचसहा तारखेपर्यंत ऱ्हीम्स जर्मनाच्या हातीं लागलें नाहीं. पूर्वेच्या बगलेवर जर्मनानीं तितका जोरच केला नाहीं. जोर केला मध्यावर व पश्चिम बगलेवर. यापैकीं मध्यावर पहिल्या धडकीनच

विशेष यश आल्यामुळे मार्न नदीवर चाटेथेरीपर्यंत जर्मनांना चार पांच दिवसांत जातां आलें. पण पश्चिम बगलेंत फ्रेंचांचें शिल्लक सैन्य तावडतोब येऊन पोचल्या· मुळे जर्मनांचें पाऊल जलदीनें पुढे पडलें नाहीं. मध्याने मार्न नदी गाठल्याबरोबर मध्यावरच्या जर्मन सेनेपैकीं काही भागानें पूर्वेकडे तोंड वळविलें, मुख्य सेनेनें पश्चिमेकडे तोंड वळविलें. पूर्वेकडच्या सैन्यानें चाटेथेरीच्या पूर्वेस दहा बारा मैलां-वर मार्न नदीवर असलेल्या डार्मन गांवापासून ऱ्हीम्सपर्यंत जाणारा रस्ता ताब्यात घेतला, व या रस्त्याला धरूनच जूनच्या पहिल्या आठवड्यात या सैन्यानें तळ दिला. पश्चिमाभिमुख झालेल्या भागानें मार्न नदीला धरून पश्चिमेस पाच सहा मैलच पुढे पाऊल टाकलें. मध्यावर आरेक नदीच्या उत्तरेकडच्या टापूंत व्हिलि-यम–काटेरेटच्या रोखानें हे सैन्य जोरानें पुढे जाऊं लागले. तारीख १ जूनपासून तारीख ५ जूनपर्यंत व्हिलियम–काटेरेटला पोचण्याकरिता जर्मनानीं पराकाष्ठा केली, पण फ्रेंचांचें शिल्लक सैन्य या टापूंत वेळेवर आल्यामुळे व्हिलियस काटेरेटच्या उत्तरेस, पूर्वेस व दक्षिणेस तीन चार मैल पसरलेल्या जंगलाच्या जवळ जाण्या-पलिकडे जर्मनांना यश आले नाही. व्हिलियस–काटेरेट येथे चार पाच ठिकाणच्या आगगाड्या व पांच सात ठिकाणचे रस्ते येऊन मिळतात. सायसन्सच्या दक्षिणेस पारीस शहरापर्यंत आयीस नदी व मार्न नदी याचा जो दुआब आहे त्या दुआबाचें केंद्रस्थान व्हिलियस–काटेरेट होय. हे केंद्रस्थान हातीं पडावे म्हणून जर्मनानीं जूनच्या दुसऱ्या व तिसऱ्या तारखेस भयंकर हल्ले केले. पण त्यात त्याना यश आले नाही. चौथ्या पाचव्या तारखेस उत्तरेकडून व दक्षिणेकडून व्हिलियस काटेरेटला वळसा देण्याचा त्यांनीं उद्योग आरंभिला, या कामी त्याना थोडेसे यश आलें, पण जूनच्या ६ व्या तारखेस मोठ्या तोफांची वाट पहात त्याना ही लढाई मंद करावी लागली.

अशारीतीनें २७ मेपासून सुरू झालेली ऐन व मार्न या दोन नद्या मधील लढाई ७ जूनला मंदावली. या दहा दिवसांच्या लढाईनें जर्मनानीं रणभूमीची स्थिति बरीच पालटून टाकली. व ॲंग्लो-फ्रेंचांना काळजीचें नवें एक कारण उपस्थित करून ठेविलें. मार्न नदीवर चाटेथेरीनतर दुआबच्या मध्यावर व्हिलियस–काटेरेट आणि त्यानतर शापेन जक्शन स्टेशनच्या उत्तरपूर्वेकडील टापू अशी नवी फळी धरून मार्न नदी व आयीस नदी याच्या दुआबांत पारीसला

अभिमुख होऊन ते आज उभे राहिले आहेत. पारीसपासून या फळींतील सर्वांत लांबचा भाग म्हणजे पश्चिमेकडील बगल चाळीस मैलांवर आहे; मध्य सदतीस मैलांवर आहे; व पूर्व बगल पचवीस तीस मैलांवर आहे. या दुआबांत जर जर्मनांनीं आणखी पांच सात दिवसांत नवें सैन्य व नव्या तोफा आणिल्या आणि पुन्हां धडकी दिली तर पारीसपासून दहा बारा मैलांवर जर्मन सेनेचा तळ जून महिन्यातच पडण्याचा संभव आहे. पारीस शहरापासून दहा बारा मैलांवर जर हा तळ पडला तर पधरा वीस मैल पल्ल्याच्या तोफांच्या भडिमाराखालीं पारीस शहर जमीनदोस्त करण्यास जर्मनी चुकणार नाहीं. म्हणजे लांब पल्ल्याच्या तोफांच्या माऱ्यात पारीस शहर जाण्याबरोबर पारीस शहराचा विध्वंस आजच तरी करून घेतला पाहिजे, किंवा पारीस शहर जर्मनीच्या हवालीं करून पारीसच्या दक्षिणेस फ्रेंचानीं निघून गेले पाहिजे. पारीस शहराचा बचाव जर फ्रेंचानी केला नाही आणि जर्मनांच्या हवालीं करून जर ते खालीं निघून गेले तर पारीस शहरच्या सुंदर इमारती महायुद्धाच्या आगींत जळल्याशिवाय रहातील, याची तरी खात्री कोठें आहे? आपण अशी कल्पना करूं कीं, पारीस शहर आज तोफांच्या भडिमारास न देता फ्रेंचानी ते सोडून दिलें आणि राजधानीचें शहर गेलें तरी अखेरचा विजय मिळे तोंपर्यंत जिवापाड लढण्याचा फ्रेंचानी निश्चय केला आणि पुढील साली अमेरिकेची भरपूर मदत येऊन जर्मनांची पीछेहाट सुरू झाली; त्या पीछेहाटीच्या वेळीं पारीस शहराची पूर्ण लूट करून पारीस शहरावर गाढवाचे नांगर फिरविल्याशिवाय जर्मन सेना मागे परतेल काय? पारीस शहरचें सौंदर्य जसेंच्या तसेंच कायम ठेवून पराभवानतर मागे परतण्याइतके सौजन्य जर्मनीच्या अंगीं खात्रीनें नाही. तसला धर्म महायुद्धात जर्मनीनें कोठेंच पाळलेला नाहीं. म्हणजे पारीसपासून पधरा वीस मैलांवर जर्मन सेना आली कीं, फ्रान्सनें तह तरी केला पाहिजे किंवा पारीसची राखरांगोळी स्वतःच्या डोळ्यानीं पाहण्याइतके मन घट्ट करून अमेरिकेच्या सहाय्याची वाट पहात महायुद्ध नेटानें तसेंच पुढे चालविलें पाहिजे. ऐन व मार्न नदी वरील आजच्या लढाईनें उद्या पारीस गांठलें जाण्याचा संभव उत्पन्न झाला आहे; आणि जर त्यांनीं खरोखरच पारीस जून महिन्यात गांठलें आणि भडिमार सुरू करण्यापूर्वी फ्रान्सशीं सवलतीचा तह करण्यास आम्ही राजी आहोंत असें जर्मनीनें जाहीर केलें, तर फ्रेंच लोकांच्या मनाची स्थिति काय होईल?

शेंकडो वर्षांच्या परिश्रमानें तयार झालेलें जगांतील सर्वांत सुन्दर शहर व फ्रेंच लोकांच्या उपजीविकेचे तेथील प्रचंड कारखाने यांचा समूळ नाश आज करून घ्यावयाचा, का जर्मनीच्या सवलती आज धुडकावून देऊन पारीसच्या नाशानंतर मिळणाऱ्या विजयाची अपेक्षा करावयाची ? हा प्रश्न मूर्तिमंत पुढें उभा राहिला म्हणजे फ्रेंच राष्ट्र कोणत्या बाजूला झुकेल ? फ्रेंच मुत्सद्दी व सेनानायक कसे वागतील असा प्रश्न नाहीं; लोक कसे वागतील असा प्रश्न आहे. पारीस जळलें तरी पुढें लढलेंच पाहिजे व त्यातच फ्रान्स देशाचा मोठेपणा आहे; हे फ्रेंच मुत्सद्यांना व पुढाऱ्यांना समजते. पारीस पडलें तरी अखेर पर्यंत लढून विजय संपादण्यातच खरी तलवारबहादुरकी आहे, असा फ्रेंच सेनानायकाचा आज निश्चय आहे. तेव्हां मुत्सद्दी व सेनानायक पारीसला वेढा पडला असतांना जर्मन तहास अनुकूल होतील असातला भाग नाहीं. पण लोक कसे वागतील, ही मोठी विवंचना आहे. मोठ्या संकटाच्या वेळीं सामान्य लोकांची दृष्टि पुढाऱ्यांच्या दृष्टींहून वेगळीं होते. भयंकर संकट पुढें येऊन उभें राहिलें असताना, ज्या पुढाऱ्यांना हे संकट टाळतां आलें नाही, तेच पुढारी असला अपमृत्यु सोसून महा मृत्यू तून पार पाडून नेण्यास समर्थ आहेत, असें अनुयायांना वाटत नाहीं. सामान्य अपजयानेंहि त्यांच्या कर्तृत्वाविषयी मन साशंक होते, आणि मोठ्या संकटामुळे तर मुत्सद्यांचें व सेनानायकांचें सामर्थ्य लोकांस न पटून लोक त्यांना सोडून दूर जाऊं लागतात. मुत्सद्यांची विचारसरणी लोकांना समजते, पण मुत्सद्दी नालायकच आहेत आणि असल्या नालायकांच्या नादी लागणें म्हणजे अधिकाअधिक संकटे ओढवून घेणें होय, अशी लोकांची मनोवृत्ति बनत चालली म्हणजे ते राष्ट्र लढण्यास निरुपयोगी होतें. ही वृत्ति बनत चालली असताना जर पुढाऱ्यांनीं लढाई हट्टानें पुढें तशीच चालविली तर रशियाची जी गत झाली तीच गत त्यांच्याहि राष्ट्राची होते. पारिसच्या जवळ जर्मन येऊन ठेपल्यास फ्रान्सपुढे जो प्रश्न येऊन पडेल त्या प्रश्नाचें स्वरूप वरील तऱ्हेचें आहे. असला प्रश्न होईल तितका दूर ठेवणें, राष्ट्रापुढे येऊच न देणें हे आज प्रत्येक फ्रेंच मुत्सद्याचें व मुख्य सेनानायकांचें काम आहे. कारण तसा प्रश्न जर लोकांपुढे प्रत्यक्ष उभा राहिला आणि पुढारी नालायक आहेत, असे एकदां त्यांच्या मनानें घेतले म्हणजे मग त्यांच्या त्या वृत्तीस कोण व कसा आळा घालणार ? त्या वृत्तीच्या अंधाराचें ग्रहण तीन चार वर्षे लढून थकलेल्या राष्ट्रास हा हां म्हणतां

लागेल. तशी स्थितीच न आणण्यास फ्रेंच सेनानायकांनीं यावेळीं हर प्रयत्न केले पाहिजेत. एक वेळ जर्मन सेना इंग्लिश चानलच्या किनाऱ्याला पोंचली तर चालेल. पण पारिसच्या जवळ आठ दहा मैलावर येतां कामा नये, अशी ही नाजूक स्थिति आहे. इंग्लिश चानलचा दक्षिण किनारा जर्मनानी गाठला असताना इंग्रजाची व फ्रेंचाची तातातूट होते ही गोष्ट खरी, पण तसल्या अपयशानें इंग्लंडातहि पुढा ऱ्याच्या नालायकीचें बंड माजणार नाही आणि फ्रान्सातहि माजणार नाहीं. पारीस वेढले गेल्यावर मात्र फ्रान्समध्ये हे बंड माजण्याचा विशेष संभव आहे. खात्रीनें माजेल असें नाहीं, मग असल्या विषाची पारख मुख्य सेनापति फॉक यानी का करावी ? अर्थात् पारीसपासून, जर्मनाना दूर ठेवणें हें फ्रान्सच्या दृष्टीनें, समुद्र किनाऱ्यापासून जर्मनाना दूर ठेवण्याहून अधिक इष्ट आहे. पारिसपासून जर्मनाना दूर ठेवण्याकरिता जनरल फॉक हे आपल्या जवळच्या शिल्लक सैन्याचें मुख्य वजन पारिसच्या आसपास आणल्यावाचून राहाणार नाहीत. हे वजन जर पारिसच्या आसपास आले तर त्याचे सांप्रत–इतके सामर्थ्य आहे कीं, जर्मन लांब पल्ल्याच्या तोफाच्या बाहेर पारीस सहज राहू शकेल. हे वजन पारीसच्या जवळ आलें आहे असें रणभूमीवर प्रत्यक्ष अनुभवास येईतो जर्मन पारिसचा नाद सोडणार नाही. तेव्हा जून महिन्यात मार्न व आयीस ह्या दोन नद्याच्या दुआबामध्ये किंवा ह्या मध्याच्या उजव्या किंवा डाव्या बगलेवर जर्मन सेना जोर करील आणि जनरल फॉक ह्याना शिल्लक सैन्याचें वजन पारिसच्या जवळ आणावयास भाग पाडील; असे तज्ज्ञाचे मत आहे. शिल्लक सैन्याचें वजन पारिस जवळ गेल्यास अमीन्सपासून यिप्रेस पर्यंतच्या पट्ट्यावर जर्मनाचे निकराचे हल्ले सुरू होतील. आणखी दोन तीन महिने फ्रान्सची रणभूमि सारखी पेटलेली राहील, ह्यात संशय नाहीं. पारिस शहरच्या रोखानें जर्मन सेना चाल करून जात असताना इटलीवरहि आस्ट्रिया स्वारी करील असा पूर्वीचा अंदाज होता. पण तसें घडून आलें नाही. सांप्रत इटलीच्या रणभूमीत आस्ट्रियन सेना फार मोठया प्रमाणावर गोळा करण्यात आली आहे आणि जून महिन्यातील फ्रान्समधील दगलीच्या वेळीं इटलीस स्वस्थता मिळणार नाहीं, असा तज्ज्ञानीं पुन्हा अंदाज बांधला आहे, पण आस्ट्रियाचे बादशहा लढाईच्यापेक्षा तहाच्या वाटाघाटींत अधिक गुंग आहेत असे म्हणतात. तेव्हा लढता लढता जर्मनी विसावा घेऊ लागला म्हणजे मधल्या फुरसतीच्या

वेळीं आस्ट्रिया तहासंबंधाच्या कानगोष्टी पोप साहेबाशीं करील, असा कांहींचा तर्क आहे. इकडे रशियाची स्थिति न सुधारतां दिवसेंदिवस अधिकच वाईट होत चालली आहे. डॉन नदी व काकेशियस पर्वताच्या उत्तरेकडील प्रांत येथील कोसाकांनीं मास्कोच्या सरकारविरुद्ध लढाई पुकारली असून कीव्ह येथें युक्रेन प्रांताची म्हणजे जर्मनीची मदत मागण्यास ते आले आहेत. कास्पियन व अफगाणिस्तान ह्यामधील मुसलमानांनींहि स्वतंत्र स्वराज्य स्थापलें असून तेहि जर्मनांची मदत मागतील व जर्मनीहि त्याना मदत करील, हें उघड आहे. खुद्द मास्को येथील सडेसोट सोशियालिस्टांचा अधिकार मास्को व पेट्रोग्राड येथील टापूतही फारसा चालेनासा झाला आहे. मध्यम स्थितींतील लोक आपले अनुयायी गोळा करून लेनिन प्रभृती सडेसोटाची सत्ता झुगारून देऊं लागले आहेत. त्यांनाहि जर्मनीच्या मदतीची अपेक्षा आहे. अशा स्थितींत लवकरच रशियांत पुन्हां राज्यक्रांति होऊन पेट्रोग्राड किंवा मास्को येथे जर्मनीच्या वतीचा राजा राज्यावर बसेल आणि फिनलंड, पोलंड, युक्रैन, कोसाक प्रांत, काकेशियस प्रांत व ट्रान्सकास्पियनप्रांत हीं निरनिराळी राज्यें होऊन तेथेहि जर्मनीच्या वतीचे राजे गादीवर बसतील, अशीं चिन्हे दिसत आहेत.

# महायुद्धाचा चवथ्या वर्षाचा जून-जुलई महिना

जून महिन्याचा प्रारंभ दोस्त सरकारांना जरी विशेष काळजीचा गेला तरी जूनचे अखेरीस संकटाची स्थिति न राहून पुन्हां हुरूप येण्याइतकी रणभूमीची स्थिति सुधारली. जून महिन्याचे पांच सहा तारखेला मार्न नदीवर चाटेथेरीपर्यंत जर्मन सेना ऐननदीवरून खालीं उतरली, पण सायसन्स व पारिस याचे रस्त्यावरील विलियर्स-काटेरेटच्या केंद्रस्थानासभोंवारच्या जगलाचा आसरा घेऊन फ्रेंचांनीं जर्मनांना अडविल्यामुळें जर्मनांना तेथेच मुक्काम करावा लागला. सायसन्स, विलियर्स-काटेरेट व चाटेथेरी या पट्टयावर आपलें काहीं चालत नाही असें पाहून कॅपेनीच्या ईशान्येच्या टापूवर आयिस नदीच्या पश्चिमेकडील भागांत जर्मनांनीं अवचित हल्ला चढविला; आणि एक दोन दिवसांत कॅपेनीच्या रोखानें जर्मन सेना सात मैल खालीं उतरली. या ठिकाणीं फ्रेंच सेना फार सावध होती आणि रण-भूमीवर कुमकेचें सैन्य तावडतोब येऊन पोंचल्यामुळे जर्मनांवर जोराचे उलट हल्ले करण्यांत आले व जर्मनीला काहीं ठिकाणीं एक दोन मैल मागें हटावें लागलें. आयिस नदीच्या पश्चिम भागात जर्मनी अशा रीतीनें चारपाच मैल पुढे सरकल्या-मुळे आयिस नदीच्या पूर्व भागांतहि म्हणजे आयिस व ऐन या दोन नद्यांच्या दुआब्यांतहि फ्रेंचांना दोन चार मैल मागे हटावें लागलें. कॅपेनीच्या वायव्येस, उत्तरेस व ईशान्येस आठ दहा मैलांवर जर्मन सेना थोपविली गेल्यानतर कॅपेनीच्या पूर्वेकडून म्हणजे सायसन्सपासून कॅपेनीपर्यंतच्या टापूवर जर्मनांनीं जोराचे हल्ले पुन्हां सुरू केले. या हल्ल्यात दोन तीन मैलच जर्मनाना पुढे जाण्याची संधि मिळाली आणि विलियर्स-काटेरेटच्या जगलाला त्यांनीं उत्तरेकडून अशत: वळसा दिला; पण याहि बाजूला फ्रेंच सेना मोठ्या शौर्यानें लढल्यामुळें जर्मनाचें विशेषसें चाललें नाहीं. इतक्यांत जूनच्या दुसऱ्या आठवड्याचे अखेरीस आस्ट्रियानें इटलीवर एकदम मोठी चढाई सुरू केली. आशिआगोचा डोंगराळ प्रदेश व पियेव्ह नदी या दोन्ही ठिकाणीं जोराचे हल्ले सुरू करून पियेव्ह नदीच्या उगमा-जवळील माऊटेलोचा डोंगराळ टापू बराचसा काबीज केला. पियेव्ह नदीला मुखापर्यंत चौदा ठिकाणीं पूल बाधून बरेचसें आस्ट्रियन सैन्य पहिल्या धडकीसरशी

पियेव्ह नदी ओलांडून अलीकडे आलें. पहिल्या दोन दिवसांत माऊंटेलोच्या डोंगरांपैकीं कांहीं भाग आस्ट्रियाच्या ताब्यांत गेला आणि सर्व डोंगर ओलांडून खालीं मैदानावर उतरून पियेव्ह नदीचा उजवा किनारा डळमळीत करतो कीं काय अशी भीति इटलीला वाटूं लागली. पण यावेळीं इटालियन सैन्याची तयारी फार चांगली होती. जरूर त्या ठिकाणीं एकसारखी कुमक पाठविण्यांत आली व लगेच निकराचे उलट हल्ले इटलीनें चढविले. याचा परिणाम असा झाला कीं, माऊंटे-लोच्या टापूंत आस्ट्रियाला माघार घ्यावी लागली आणि पियेव्ह नदी उतरून आलेल्या आस्ट्रियन सैन्यास पुढें पाऊल टाकतां आलें नाहीं. या हल्ल्याच्या दुसऱ्या तिसऱ्या दिवशींच पियेव्ह नदीला मोठा पूर आला व आस्ट्रियानें टाकलेले बरेच पूल वाहून गेले. नदीच्या अलीकडे आलेल्या आस्ट्रियन सेनेला विशेष कुमक मिळणें शक्य नाहीं असें पाहून इटलीनें जोराचे उलट हल्ले करून नदीच्या अली-कडील सर्व आस्ट्रियन सैन्य नामशेष करण्याचा चांगला उद्योग केला. पण पांच सहा दिवस मोठ्या निकरानें लढून आस्ट्रियन सेना आली तशी स्वस्थानीं परत गेली. माऊंटेलोचाहि सर्व भाग इटलीनें पुन्हां काबीज केला व जून अखेरीस आस्ट्रियाला नसता उपद्व्याप केल्याचें चांगलें प्रायश्चित्त मिळून पुन्हां पूर्वीच्याच ठिकाणीं हिरमुसलें तोंड करून स्वस्थ बसावें लागलें. जुलैच्या पहिल्या आठवड्यात तर आस्ट्रियाच्या या पराभवाला पूर्ण स्वरूप प्राप्त झालें आणि यंदाच्या सालीं निदान इटलीच्या बाजूला आस्ट्रिया पुन्हां गडबड करणार नाहीं अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. जून अखेरीस आस्ट्रियावरच इटली उलट चढाई करण्यास समर्थ आहे असें प्रत्ययास आलें. पण इटलीनें सामर्थ्य असताहि ते चढाईचे विचार सोडून दिले आणि पियेव्ह नदी व आशियागो डोंगर संभाळून बसण्याचें लष्करी धोरण इटलीनें स्वीकारिलें.

आस्ट्रीयाचा हल्ला व तदनंतर आस्ट्रियाची झालेली पीछेहाट यांचा पश्चिम रणभूमीं-तील लष्करी धोरणावर मोठा परिणाम झाल्यावाचून राहणार नाहीं. मार्च महिन्यांत जर्मनीनें पश्चिम रणभूमींत जे हल्ले केले व पुढें एप्रिल–मे महिन्यांत त्या हल्ल्याच्या ज्या दोन आवृत्त्या आणखी जर्मनीनें काढल्या त्या सर्वांत जर्मनीला एकप्रकारचें यशच आलें. जर्मनीनें जो कित्ता घालून दिला तोच कित्ता आस्ट्रियानें गिरविला असतां आस्ट्रियास मात्र अपयश आलें. असा फरक होण्याचें कारण काय? आस्ट्रियाचे सेनापति जर्मन सेनापतींइतके वाकबगार नाहींत आणि आदल्यावेळीं

यिप्रेव्ह नदीला पूर येऊन बरेच पूल वाहून गेल्यामुळें आस्ट्रियाचें यशहि वाहून गेलें. तेव्हां हा लष्करी डावपेचांतील दोष नसून व्यक्तीचा दोष आहे व आगांतुक संकटाचें फळ होय, असा कांहींचा अभिप्राय पडतो. कांहींचें म्हणणें असें पडतें कीं व्यक्ती व दुर्दैव ही एका बाजूस ठेविली तर जर्मनांनी हल्ल्याचे जे डावपेच शोधून काढले आहेत ते केव्हांहि आठ दहा मैलांपुरते निदान योग्य तयारी केली असतांना यशस्वी झाल्यावांचून रहणार नाहींत. हे डावपेच कोणते? महायुद्धाच्या पहिल्या वर्षांत आणि चौथ्या वर्षात लष्करी डावपेंचांत कोणते फेरफार झाले? पहिल्या वर्षाकडे जर आपण पाहिलें तर आपणास असें दिसून येईल कीं, पश्चिम रणभूमीवर ऐन नदीच्या कांठीं चरांचे चक्रव्यूह रचून जर्मन सेनेनें जमीन पकडल्यावर एक प्रकारची स्थिरताच पश्चिम रणभूमीस प्राप्त झाली. ऐन नदीची फळी फ्रेंचांना फोडतां आली नाहीं आणि यिप्रेसच्या टापूंत दोनवेळां भयंकर हल्ले चढवूनहि जर्मनांना हात टेकावे लागले. चरांची फळी फोडावयाची असेल तर एकामागें एक दोन तीन मैल पसरलेल्या चरांच्या रांगावर तोफांच्या गोळयांचा भयंकर वर्षाव करून चर उध्वस्त करून फळी फोडली पाहिजे, असें त्यावेळीं लष्करी तज्ज्ञाचें मत पडलें. १९१५ सालच्या प्रारंभाला इंग्रजांनीं तसा प्रयत्न केला. भयंकर भडिमारानें चरांचा विध्वस होऊं शकतो हें त्या प्रयत्नांत ठरलें, पण असला प्रयत्न यशस्वी होण्यास असंख्यात तोफा व दारूगोळयांचे पर्वत तयार करून ठेविलेले असल्याशिवाय भागत नाहीं असें अनुभवास आलें. तोफा व दारूगोळा यांची तयारी नसल्यामुळे १९१५ सालीं अँग्लो-फ्रेंचांना गप्प बसावें लागलें. या गप्प बसण्याच्यावेळेचा फायदा घेऊन सेनापति मॅकेन्सन यांनीं तोफांच्या जोरावर रशियाची फळी फोडली आणि रशियास कायमचें लुलें करून सोडलें. १९१६ सालीं व्हर्डूनच्या बाजूला फळी फोडण्याच्या याच युक्तीचा उपयोग जर्मनीनें केला, पण पहिल्या पांच सात मैलांनंतर फ्रेंचांची कुमक व तोफा वेळेवर येऊन पोहोंचल्यामुळें जर्मनीचें कांहीं चाललें नाहीं. व्हर्डून येथील जर्मनीच्या पराभवानंतर १९१६ सालीं सोमनदीच्या कांठीं इंग्रजांनीं तोफांचा भडिमार करून जर्मनांना मागें हटविलें. तेव्हां १९१६ साल अखेरीस लष्करी डावपेचासबधानें एक गोष्ट दोन्ही पक्षांच्या अनुभवास आली; तोफांचा मोठा जमाव जर एकजागीं आणला आणि दारूगोळयाचा पर्वत खर्च केला तर पांच सात मैल आंतपर्यंत

शत्रूच्या फळींत घुसतां येतें, पण या पांचसात मैलांगलीकडे जर शत्रूच्या चरांची फळी आणखी एखादी शिल्लक राहिली तर हल्ला करणाऱ्याची गति खुंटून शत्रूच्या तोफांचा जमावहि याच्या बाजूकडे धांवत येण्यास फुरसत मिळते. दोहो बाजूचे तोफांचे जमाव सारख्या तोलाचे झाल्यावर कोणासच कांहींच करतां येत नाहीं. रणभूमीवरील डावपेचांचें हे स्वरूप १९१६ सालच्या अखेरीस पूर्णपणें व्यक्त झालें. असल्या स्वरूपांत कोणचा पक्ष विजयी होऊं शकणार? ज्या पक्षापाशीं तोफा अधिक, ज्या पक्षापाशीं दारूगोळा अधिक, आणि ज्या पक्षापाशीं रिक्रूट मिळविण्याचें सामर्थ्य अधिक तोच पक्ष अखेरीस विजयी होणार असा सिद्धांत निघाला. एका जागीं तोफांचा भडिमार करून पांचसात मैलांची जागा मिळाल्यावर जो पक्ष दोन तीन महिने पुन्हां दम खाऊ शकतो आणि या अवधीत तोफा पुढें सरकवून नुसत्या तोफांच्या जोरावर पुन्हां पांचसात मैल शत्रूला मागे लोटतो, तोच जय मिळविणार. दोस्त सरकारांच्या तोफा वाढत चाललेल्या; दारूगोळाहि वाढत चाललेला; आणि मनुष्यबळाच्या नव्या नव्या खाणी दोस्त सरकारांच्यापाशीं शिल्लक असलेल्या; तेव्हां वरील सिद्धांत १९१६ सालच्या अखेरीस दोस्त सरकारांस प्रोत्साहन देणाराच ठरला. पहिल्या भडिमाराच्यावेळीं पुढील चरांच्या रांगेत असलेल्या लष्कराचा नायनाट होतो असें सोमनदीच्या पहिल्या लढाईच्यावेळीं जर्मनीच्या अनुभवास आलें. दर दोन महिन्यांनीं जर हे तोफांच्या भडिमाराचें गिरमिट सुरू झालें, एका ठिकाणी फ्रेंचानीं व एका ठिकाणीं इंग्रजांनीं जर तोफाना सरबत्ती दिली, व जर दर दोन महिन्यास दोन या हिशोबानें वर्षाच्या नायनाटाच्या बारा पाळ्या जर्मनीस सोसाव्या लागल्या, तर दीड दोन वर्षांच्या अखेरीस जर्मनीचें मनुष्यबल आटलेंच पाहिजे; असल्या स्वरूपाचें संकट जर्मनीपुढें १९१७ सालच्या प्रारंभाला दत्त म्हणून उभें राहिलें. या संकटाची तरतूद कशी लावावयाची? १९१७ सालच्या प्रारंभाला ॲंग्लो-फ्रेंच सैन्य जर्मन सैन्याहून पश्चिम रणांगणांतहि बरेंच अधिक होतें. तोफा अधिक, दारूगोळा अधिक, आणि तोफांच्या जोरावर पांच सात मैलपर्यंत शत्रूच्या सैन्याचा नायनाट करण्याची युक्ति सिद्ध झालेली. अशा प्रकारच्या संकटांतून जर्मनी कसा निभावून जातो याकडे त्यावेळीं सर्व लष्करी तज्ज्ञांचें डोळे लागले.

या संकटामुळे ठरीव डावपेचांत जर्मनांना फेरबदल करावा लागला.

१९१५ व १९१६ या दोन सालीं हल्लयाच्या व रक्षणाच्या दोनहि तऱ्हेच्या डावपेचांना एकप्रकारचें ठरीव वळण प्राप्त झालें. ठरीव वळण प्राप्त झाल्यानें त्या वळणाला अनुकूल अधिक सामग्री ज्या बाजूकडे त्या बाजूकडे विजय असेंच ठरलें. चरांचें युद्ध व त्या संबंधाचें ठरीव वळण याची पूर्ण माहिती महायुद्ध सुरू होण्यापूर्वी जर्मन सेनानायकांना होती आणि याच लष्करी ज्ञानाच्या जोरावर त्यांनीं १९१५–१६ सालीं अँग्लो-फ्रेंचांना पश्चिम रणभूमींत थोपवून धरिलें आणि पूर्व रणभूमींत रशियाला मागें लोटून देऊन रशियाचा मोठा पराभव केला. पण १९१७ सालच्या प्रारंभाला हा ज्ञानांतील फरक नष्ट झाला. डावपेंचांचीं वळणें ठरीव झालीं; दोन्हीं पक्षांना सारखीच अवगत झाली; आणि रशियाच्या पराभवानंतरहि दोस्त सरकार मनुष्यबलाच्या व सामग्रीच्या दृष्टीनें अधिक ठरलें. ज्ञानासंबंधाचा जर्मनीचा वरचढपणा नष्ट झाला. आतां पुढें जर्मनीनें काय करायचें ? या संकटाचेवेळीं म्हणजे १९१७ सालच्या प्रारंभाला जर्मन सेनापति हिंडेनबुर्ग व लुडेनडार्फ यानीं लष्करी डावपेचांत नव्या युक्त्या सुरू केल्या. या नव्या युक्त्याचा पूर्ण प्रभाव दीड वर्षानें म्हणजे १९१८ सालच्या मे–जून महिन्यांत दृष्टीस पडल्यामुळें आज दोन्ही पक्षाच्या सैन्यांत या दोन जर्मन सेनापतींच्या नांवाची येवढी तारीफ होत आहे.

या नव्या युक्त्या कोणत्या ? लष्करी डावपेंचांतील हे फेरफार कोणते ? पूर्वी चरांच्या रांगा एकेक मैलाच्या अंतरावर तीन असत व चरांच्या जाळ्यानें त्या एकमेकांशीं संलग्न केल्या जात. ही पद्धत सेनापति हिंडेनबुर्ग यानीं सोडून दिली. पहिल्या रांगेच्या मागें अर्ध्या मैलावर दुसरी रांग व या दोन रांगा मिळून एक चरांचा पट्टा हल्लीं तयार केला जातो. या चरांच्या पट्टयांत पूर्वीप्रमाणें भरपूर लोक ठेवीत नाहींत. सैन्याच्या संख्येपेक्षां मशिनगन्सच्या संख्येवर अधिक भिस्त ठेवून या पहिल्या पट्टयाचें संरक्षण केलें जातें. अशी व्यवस्था करण्यांत हेतु हा आहे कीं, नुसत्या पायदळाचा हल्ला झाल्यास बराच वेळपर्यंत या पट्टयामुळें पायदळास अडथळा व्हावा आणि तोफांच्या भडिमाराखालीं हा पट्टा उध्वस्त करण्याचा प्रयत्न शत्रूनें केला तर फार थोडेच लोक त्या वावटळांत सांपडले जावेत. तोफांच्या भडिमारामुळें होणारा नाश या युक्तीनें टळला; पण अंगावर चालून येणाऱ्या शत्रूची गति कुंठित कशी करावयाची ?

पहिला पट्टा म्हणजे खऱ्या अडथळयाची जागा नव्हे. या पट्टयामागें पांच मैल-पर्यंतचा मुलूख चरांशिवाय मोकळा ठेवण्यांत येतो; व पांच मैलानंतर पुन्हां दोन चरांच्या रांगा व चरांच्या जाळयाचा एक मैलाचा पट्टा तयार करून ठेविलेला असतो. पांच मैल सोडलेल्या जागेंत ठिकठिकाणीं लहान लहान चरांचे किल्ले तयार करून ठेवितात. या किल्लयांत मशीनगन्स व तोफा भरपूर ठेवून कोण-त्याहि दोन किल्लयांमधील मोकळें मैदान गोळयांच्या वर्षावानी हां हा म्हणतां सहज झोडपून काढतां येईल अशी व्यवस्था केलेली असते. हे लहान लहान चरांचे किल्ले हुडकून काढून उध्वस्त करतां येणें शत्रूकडील तोफखान्याला मुष्किलीचें असल्यामुळे पहिला पट्टा ओलांडून आंत घुसलेलें शत्रूचें सैन्य या किल्लयांच्या माऱ्याखालीं आयतेंच सांपडतें. शत्रूच्या पायदळाचा लोंढाचा लोंढा जर आंत घुसला तर हे किल्ले सर करिता करतां निम्याहून अधिक सैन्याची शत्रूची नासाडी होते; आणि दुसऱ्या पट्टयाजवळ सैन्य पोंचण्याच्या वेळीं शत्रू निर्बल होतो. दुसऱ्या पट्टयाच्या मागें मोठया तोफा असतात; व पुन्हां पांच मैलाचें मैदान चराच्या लहान लहान किल्लयांनीं व्यापलेलें असतें. आणि त्यानंतर म्हणजे तोंडाच्या पट्टयाच्या मागें तिसरा पट्टा असतो. रक्षणाची ही नवी पद्धत फार उपयोगी पडते. पहिला पट्टा उध्वस्त झाला तरी सैन्याची विशेष खराबी नाहीं व भयहि नाहीं. पाच मैलातील किल्ले काबीज करीत असतांना शत्रू मेटाकुटीस येतो, आणि तेवढया अवधींत नवीन कुमक आणून शत्रूला पूर्वस्थळीं मागे रेटतां येतें. बरें, शत्रूनें तसा जोर केला तर दुसऱ्या पट्टयामागील मोठया तोफा तिसऱ्या पट्टया मागे नेण्यास फुरसत मिळते. आणि दुसऱ्या आणि तिसऱ्या पट्टयामधील किल्लयाच्या माऱ्याखालीं शत्रू मेटाकुटीस येतोच येतो. १९१७ सालीं रक्षणाची ही नवी पद्धत जर्मन सेनेनें पश्चिम रणभूमींत सुरू केल्यामुळे सबंध सालभर ॲंग्लो-फ्रेंच सैन्य जरी जवळ जवळ दुपटी इतके अधिक होतें तरी जर्मनांची फळी फुटली नाहीं. १९१७ सालीं दोन चार वेळां ॲंग्लो-फ्रेंचांनीं ही फळी फोडण्याचा प्रयत्न केला, पण त्या प्रयत्नात सैन्याची विशेष खराबी झाल्यामुळें अमेरिकेची मदत येऊन कुमकेच्या सैन्याशिवाय फळी फोडण्याच्याच कामाकरितां दहा पंधरा लाख जादा सैन्य हातीं असल्याशिवाय चढाई करावयाची नाहीं, असें ॲंग्लो-फ्रेंच सैन्यानें १९१७ सालच्या अखेरीस ठरविलें. रक्षण करण्याच्या नवीन डावपेचांचा हा असा अनुभव

एक वर्षात जर्मन सेनेस आला. याच वेळीं त्यांनीं हल्ला चढविण्याचीहि पद्धत बदलून टाकली. लांब पल्ल्याच्या तोफांच्या भडिमाराखालीं चर उध्वस्त करण्याचा नाद त्यांनीं सोडून दिला. त्यामुळें दारूगोळयाच्या पर्वतांची सामग्री तयार करावयाची जरुरी राहिली नाहीं. लांब पल्ल्याच्या तोफांनीं हल्ल्याच्या वेळीं तोंडाच्या चरांच्या पट्टयावर व पिछाडीवर पांच सात मैलपर्यंत दोन तीन तास भडिमार करण्यांत येतो, पण या तोफांच्या गोळयात मोहरीचा धूर भरलेला असतो. गोळा फुटला म्हणजे हा धूर शत्रूला त्रस्त करून सोडतो, आणि अशा त्रस्त स्थितींत शत्रू असतांना पायदळाचा झोत पूर्ण जोराने शत्रूवर सोडण्यांत येतो. १९१७ सालीं रशियाच्या बाजूला फारशी लढाई नव्हती. त्या विश्रांतीच्या वेळीं शत्रूवर एकदम चाल करून जाऊन लहान लहान चराचे किल्ले हातातील बॉंब गोळयाच्या सहाय्यानें कसे सर करावे, हल्ला करून जाणाऱ्या पायदळानें मशीनगन्सचा कसा उपयोग करावा, लहान लहान तोफांच्या तुकडया या पायदळाबरोबरच पुढे कशा नेण्यांत याव्या व अडथळा करणाऱ्या शत्रूवर या हलक्या तोफखान्याचा मारा कसा करावा, खोल चरांत दडून बसलेल्या शत्रूवर धुराचे बॉंबगोळे टाकून धुराच्या त्रासाने शत्रूला चरांच्या भुयारांतून बाहेर येण्यास कसें भाग पाडावें वगैरे नानाप्रकारच्या चढाईच्या युक्त्यांत जर्मनांनीं आपलें सैन्य तरबेज करून ठेविलें. मोठा तोफखाना धुराच्या गोळयाखालीं ठेवून चलाख पायदळ व हलक्या तोफखान्याची रेलचेल यांच्या सांगडीवर शत्रूची फळी फोडण्याचें काम त्यांनीं सोपविलें. मोठा तोफखाना कमी लागल्यामुळें व असंख्यात तोफाहि आयत्यावेळीं रात्रीच्या बारा तासांत एका ठिकाणाहून पन्नास पाऊणशें मैल दुसऱ्या ठिकाणीं नेण्याची व्यवस्था जर्मन आगगाडयाना करितां येत असल्यामुळे पूर्वी जशी चढाईची तयारी टेहळणी करणाऱ्या विमानांना दृष्टीस पडे तशी आतां दृष्टीस पडत नाहीं. या नव्या पद्धतींत अवचितपणा उत्पन्न होतो; आणि सुटसुटीतपणा अधिक असल्यामुळें चरांतच पडून राहाण्याची सवय झालेल्या शत्रूच्या सैन्यास ह्या असल्या हल्ल्याच्यावेळीं गोंधळल्यासारखें होतें. हलक्या तोफा वापरावयास शिकलेलें मुबलक शिलकेचें सैन्य हल्ल्याच्या जागांच्या आसपास असल्यास पांचसात मैलांहून अधिक फायदा या नवीन पद्धतीच्या चढाईनें होत नाहीं. पण शिल्लक सैन्य जर आसपास नसलें तर मात्र वीस–पंचवीस मैल आंत घुसण्यास अडचण

पडत नाहीं इतकेंच नव्हे, तर हल्ला करणाऱ्याच्या सैन्याचीहि विशेष खराबी होत नाहीं. हल्ला करण्याच्या या नव्या पद्धतीचा अनुभव जर्मनांनीं १९१७ सालींच रिगाच्या बाजूला घेतला व कार्सोच्या टापूंत इटलीचा मोठा पराभव याच पद्धतीच्या जोरावर करून इटालियन सैन्याला पियेव्ह नदीच्या अलिकडे येणें भाग पाडलें. त्यावेळीं नवी पद्धत सुरू झाली आहे हें दोस्त सरकारांना समजलेंच नाहीं. जुन्या पद्धतीनेंच जर्मन सैन्य लढत आहे अशी भावना परवापर्यंत होती. यामुळे १९१८ सालच्या प्रारंभाला रशियाच्या बाजूचें सैन्य फ्रान्सकडे येऊं लागलें त्यावेळीं या नव्या आलेल्या सैन्याचा गठ्ठा कोठ तरी जुन्याच पद्धतीनें १९१८ सालभर जर्मनी आपल्या अंगावर टाकील व चढाईंत हा गठ्ठा खर्च होऊन जाऊन जर्मनांना कांहींच फायदा १९१८ सालीं मिळणार नाहीं अशी अटकळ अँग्लो-फ्रेंचांनीं बांधलेली होती. पण नव्या पद्धतीची चढाई सुरू केल्यामुळें दोन ठिकाणीं पंचवीस तीस मैलपर्यंत, एका ठिकाणीं बारापधरा मैलपर्यंत जर्मनांना आंत घुसतां आलें. नव्या पद्धतीवर उलट उपाय म्हणजे हलका तोफखाना व शिल्लक सैन्य यांची कुमक हल्ल्याच्या जागेला जलदीनें पंचविणें येवढाच आहे. जर्मनीच्या नव्या पद्धतीचें पूर्ण स्वरूप लक्षांत घेऊन हा उपाय दोस्त सरकारांचे मुख्य सेनापति जनरल फॉक यानीं मुक्रर ठरविला आहे. हा उपाय चांगला लागू पडतो असें जून महिन्यांत दोनवेळा अनुभवास आलें. कॅपेनीच्या केंद्रस्थानाला आयिस नदीच्या पश्चिम बाजूनें गांठण्याचा जेव्हां जर्मनांनीं प्रयत्न केला तेव्हां ते पांचसात मैल पुढे आले खरे, पण हलक्या तोफखान्यानिशीं फ्रेंच शिल्लक सेना जेव्हां पुढें सरसावली तेव्हां त्यांना दोन पावलें मागेंच हटावें लागलें. आस्ट्रियाचा पराभव जून महिन्यांत वरील उपायामुळेच झाला. जर्मनीच्या हल्ल्याच्या नव्या युक्तीमुळें मोठ्या तोफांचें अवडंबर जरी माजत नसलें तरी हलक्या तोफखान्याला बगलेंत मारून चालणाऱ्या पायदळावर, मोहरीच्या धुराचा फायदा संपल्यानंतर, शिल्लक हलक्या तोफांचा व पायदळाचा उलट उपाय चालत असल्यामुळे यापुढे आतां जर्मनांनीं पारीस गांठणें किंवा इंग्लिश चानलचा किनारा गांठणें मुष्किलीचें झालें आहे. शिवाय अमेरिकन सैन्याचीहि मुबलक मदत फ्रान्समध्ये येऊं लागली आहे. आस्ट्रियाच्या भीतींतून इटली आतां मुक्त झाल्यामुळे इटलीकडूनहि लाख-दीड लाख सैन्याची कुमक पारिसला मिळणारी आहे. अशा दृष्टीनें विचार करतां पारिस शहरचें संकट टळलें असेंच

म्हणावें लागतें. तथापि पारिस किंवा इग्लिश चानलचा किनारा गांठण्याचा नाद जर्मनी आणखी दोन तीन महिने सोडील असें वाटत नाहीं. रशियांत विशेष गडबड उडाली तर मात्र जर्मनीचें लक्ष पश्चिमेकडून पूर्वेकडे जाईल. रशियाच्या सैबेरियन प्रांतांत आस्ट्रियन स्लाव्ह युद्धाच्यावेळीं कैद करून नेऊन ठेवण्यांत आलें होतें. हें आस्ट्रियन सैन्य स्लाव्ह जातीचें असल्यामुळे आस्ट्रो–जर्मनांच्या विरुद्ध असलेल्या रशियन पक्षास मिळालें आहे. हा पक्ष मास्को येथील लेनिन प्रभृति सडेसोटांच्या विरुद्ध असून सैबेरियांत या पक्षानें आपली सत्ता स्थापविली आहे. लेनिन प्रभृति मंडळींनीं पेट्रोग्राड येथें दुसरी राज्यक्रांति करून केरेन्स्की याना हांकूनहि दिल्या-नतर मि. केरेन्स्की हे जे गुप्त झाले ते जून महिन्यात इग्लडमध्ये प्रकट झाले. दोस्त सरकारांच्या मदतीनें मि. केरेन्स्की लडन–पारिस येथून सैबेरियांतील नवीन चळवळ हलवीत आहेत, असें म्हणतात. सैबेरियातील हें स्लाव्ह सैन्य कोसाकांच्या मदतीनें मास्कोवर चाल करून जाऊन तेथे दोस्त सरकारच्या वतीचा झार रशियाच्या तक्तावर बसवील, असा कांहींचा अदाज आहे. उलट कांहींचें असें म्हणणें आहे कीं, लेनिन प्रभृतीना मदत करण्याच्या मिषानें जर्मन सैन्य पेट्रोग्राड व मास्को येथे अगोदर पोचेल आणि मनगटाच्या जोरावर लेनिन–प्रभृतींना मास्कोतून पिटाळून लावून तेथे आपल्या वतीचा झार रशियाच्या तक्तावर बसविल्यावाचून रहाणार नाही. सांप्रत सर्व फिनलड जर्मन सेनेने व्यापलें असून उत्तरेकडील व्हाइटसी-जवळचीं रशियाचीं बदरें जर्मनी लवकरच ताब्यांत घेईल असें म्हणतात. फिनलडच्या पूर्व सरहद्दीवर सांप्रत जर्मन सैन्य असल्यामुळे पेट्रोग्राड जर्मनीच्या पजातच असल्यासारखे आहे. कोसाकाच्या भीतीनें मास्को येथील सडेसोटांचें सरकारच जर्मन सेनेला मास्को येथे बोलावून नेईल, असा सांप्रत रग दिसत आहे.

# महायुद्धाचा चवथ्या वर्षाचा जुलै-आगस्ट महिना

## पारीसवरचें संकट तिसऱ्या वेळीं टळलें

जुलई महिन्यापूर्वी मार्च महिन्यापासून एकसारखे चार महिने पश्चिम रणभूमीसंबंधानें जी काळजी उत्पन्न झाली होती ती काळजी जुलई महिन्यांत नष्ट होऊन आगस्ट प्रारंभाला फ्रान्समध्यें दोस्त सरकारांची मुखश्री टवटवीत दिसूं लागली. पारिसचें संकट टळलें, अमीन्सचें संकट टळलें, यिप्रेसचेंहि संकट टळल्या-सारखेंच झालें, आणि सेनापति फॉक यांना मार्न नदीवर मोटा जय मिळून १९१४ सालीं मार्न नदीवर सेनापति जफ्रे यांनीं फ्रान्सची जी सेवा केली तीच सेवा जुलई महिन्यामध्यें सेनापति फॉक यांच्या हातून घडली. १९१४ सालीं पारिस घेऊन येथें फ्रेंचांना तह करण्यास भाग पाडण्याचा जर्मनांचा उद्देश होता, पण सेनापति जॉफ्रे यांनीं तो बेत फिसकटविला आणि जर्मनांना ऐन नदीवर मागें लोटून फ्रान्सची अब्रू त्यांनीं बचाविली. जे १९१४ सालीं साधलें नाहीं तें १९१६ सालीं पुन्हां घडवून आणण्याचा प्रयत्न जर्मनीनें व्हर्डून येथें केला, पण त्याहि उद्योगांत जर्मनीला अपयशच आलें. १९१४ व १९१६ या दोन सालीं जें फसलें तें तिसऱ्यांदा पुन्हां घडवून आणण्याचा प्रयत्न १९१८ सालीं मार्च महिन्यापासून आगस्ट महिन्यापर्यंत पांच महिने जर्मनीनें एकसारखा केला आणि आगस्ट प्रारंभाला या तिसऱ्याहि जंगी उद्योगांत आपण अपयशी ठरलों असें जर्मनीला कबूल करावें लागलें. झालें; इजा, बिजा, तिजा, झालें. रणांगणात अँग्लो-फ्रेंचांच्या छातीवर गुडघा ठेवून आपण सांगूं तसा तह फ्रान्समध्येंच अँग्लो-फ्रेंचांना कबूल करावयास लावण्याचे बेत तीन वेळां लयास गेले! आतां यापुढें असला प्रयत्न पश्चिम रणभूमींत होणें शक्य नाहीं. पश्चिम रणभूमींतच महायुद्धाची परिसमाप्ति करण्याची जर्मनीची रग जुलई महिन्यांत कायमची जिरली, आणि अँग्लो-फ्रेंचांनीं फ्रान्समध्यें लष्करी इज्जत गमावण्याचे दिवस कायमचे टळले. याबद्दल जुलई महिना महायुद्धाच्या इतिहासांत फार महत्त्वाचा समजला जाईल यांत शंका नाहीं. जुलई महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत मार्न नदीवर आणि ऱ्हीम्सच्या पूर्वेस व पश्चिमेस मिळून चाळीस मैलांच्या तोंडावर जर्मनांनीं आपल्या चौथ्या चढाईस सुरुवात

# निर्वाणीच्या युद्धाचें फ्रान्समधील रणक्षेत्र—



केली. मार्च महिन्यांत पहिल्या चढाईंत जर्मन सेना अमीन्सच्या जवळ गेली आणि त्यामुळें दक्षिणेस पारिसकडे वळणें किंवा पश्चिमेस सोम नदीच्या मुखाजवळचा इंग्लिश चानलचा किनारा गांठणें हे दोनहि मार्ग जर्मनांना खुले झाले. एप्रिल महिन्याच्या चढाईंत यिप्रेसच्या दक्षिणेस इंग्रजांच्या फळीत घुसून कॅलेच्या आसपासचा समुद्रकिनारा गाठण्याचा त्यानीं उद्योग केला. त्या दुसऱ्या चढाईमुळें पारिसपेक्षा समुद्र किनाऱ्यावरच जर्मनांचा रोख अधिक आहे असे वाटून अँग्लो-फ्रेंचानीं त्या बाजूची विशेष खबरदारी घेतली. यामुळे मे–जून महिन्यातील सायसन्स व ऱ्हीम्स यांमधील ऐन नदीवरच्या अवचितपणाच्या जर्मनाच्या तिसऱ्या चढाईच्या वेळीं जर्मनांना चांगलें फावलें आणि सायसन्स व ऱ्हीम्स यामधील जर्मनाची फळी ऐन नदीवरून दक्षिणेस २५ मैलांवर मार्न नदीवर आली. ऐन नदीवरून मार्न नदीपर्यंत जर्मनांचें जें पोट पुढे फुगलें त्या फुग्यामुळे पारीसवरच जर्मनाचें संकट येणार असें स्पष्ट झालें. जर्मनांच्या एकदोन चढाईच्या आटोक्याच्या आंत पारिस शहर आल्यामुळे पारिसच्या रोखानें जर्मनांची पुढील चढाई होणार हे ओळखून जनरल फॉक यानीं आपल्या सैन्याची रचनाहि त्याच अनुरोधानें ठेविली. जर्मनांची तिसरी चढाई चालली असतानाच फ्रेंच सैन्याचें मुख्य वजन व शिल्लक बळ सायसन्स--चाटेयेरी या पट्ट्यावर येऊन पोंचलें होते; आणि तिसऱ्या चढाईच्यावेळीं जर्मनाचे हल्ले थाबल्यावर चाटेयेरीच्या आसपास अमेरिकन सेना जर्मनांना उलट त्रास देऊं लागली होती. फ्रेंचांचा असा बंदोबस्त असतांना पारीस शहर गांठता यावें ह्मणून जर्मनानीं चौथ्या चढाईचा फांसा टाकला. या चौथ्या चढाईच्यावेळीं सायसन्सपासून चाटेयेरीपर्यंतच्या टापूवर त्यांनीं हल्ले चढविले नाहींत. तेथें फ्रेंच सैन्य भरपूर असून त्यांच्या मागेहि शिल्लक सैन्य जय्यत तयार आहे हें जर्मन सेनापति ओळखून होते. तेव्हा त्यानीं हल्ल्याची जागा सायसन्सपासून ऱ्हीम्सपर्यंत आणि ऱ्हीम्सच्या पूर्वेसहि दहापधरा मैल ठरवून येवढया तीसपस्तीस मैलाच्या पट्ट्यावर हल्ला चढविला. हेतु असा कीं, चाटेयेरीच्या पूर्वेस मार्ननदी उतरून येपर्नी गाव घ्यावें व ऱ्हीम्सच्या दोन्ही बाजूनीं ऱ्हीम्सला चापांत धरून ऱ्हीम्सपासून येपर्नीपर्यंतचा मुलूख कबजांत घेऊन चाटेयेरीपासून येपर्नीपर्यंत सर्व मार्न नदी ओलाडून मार्न नदीच्या दक्षिणेकडून येपर्नी ते पारिस या रस्त्यानें चाल करून जाऊन चाटेयेरीची दक्षिण बगल मारावी. पहिल्या एक

दोन दिवसाच्या झटक्यांत जर येपर्नी आणि ऱ्हीम्स या दोन्ही जागा जर्मनांना घेतां आल्या असत्या तर मार्न नदीला दक्षिणेकडून वळसा देऊन सायसन्सपासून चाटेथेरीपर्यंत जी फ्रेंचाची भक्कम फळी बसली होती ती त्याना डळमळीत करतां आली असती. ह्या दक्षिणेकडचा वळसा चुकविण्याकरिता सायसन्स, चॅटेथेरी, कॅपेनी व पारिस या चौकोनातील शिल्लक सैन्य फ्रेंचाना मार्न व सीन या नद्यांच्या दुआबांत नेणें भाग पडलें असतें आणि नतर सायसन्स ते चाटेथेरी आणि सायसन्स ते कॅपेनी या दोन्ही बाजूनीं जर्मन सेना पारिसच्या रोखानें पुढे सरकली असती. चौथ्या चढाईच्यावेळचे जर्मनाचे डावपेच सेनापति फॉक यानीं आगाऊ ओळखले होते. हे डावपेच हाणून पाडण्याकरिता त्यानीं ऱ्हीम्सच्या टापूत भरपूर सैन्य ठेविलें होतें आणि सायसन्स–चाटेथेरी या टापूतील शिल्लक सैन्याचें वजन त्यानी बिलकूल कमी केलें नव्हतें. जनरल फॉक अशा रीतीनें सावध असल्यामुळे जर्मनाची चौथी लढाई नुसती फसली असें नाहीं, तर उलट आगलट आली. पहिल्या धडकीसरशी चाटेथेरीच्या पूर्वेस जर्मनांनीं मार्न नदी गांठली; आणि आठदहा मैलांच्या पट्ट्यावर पाचसात ठिकाणीं मार्न नदी ओलाडून तिसरे दिवशीं मार्ननदीच्या दक्षिणेस चार पाच मैलपर्यंत जर्मन सेना खालीं गेली. पण तीन दिवस झाले तरी ऱ्हीम्सच्या बाजूला जर्मनाचें कांहीं चालेना. ऱ्हीम्स शहरला पूर्वीच तिन्ही बाजूनीं वेढा पडला होता. ऱ्हीम्स शहर घेऊन ऱ्हीम्सच्या दक्षिणेस उतरून थेट येपर्नीपर्यंत जर्मनानीं दोन दिवसांत यावयास पाहिजे होते. पहिल्या दोन तीन दिवसांत ऱ्हीम्सच्या बाजूला काहीं होत नाहीं असें पाहून मार्न नदीच्या दक्षिणोत्तर तीरानेंच येपर्नीपर्यंत जाण्याचा आणि ऱ्हीम्सलाहि दक्षिणेकडून वळसा देण्याचा जर्मनानीं आणखी दोन तीन दिवस प्रयत्न केला. या २–३ दिवसात रोज मैल अर्धा मैल या पलीकडे जर्मनाची प्रगति झाली नाही. एक आठवडा झाला तरी येपर्नीपासून जर्मन सेना बरीच दूर राहिली आणि ऱ्हीम्सच्या त्रिकोणावरहि काहीच परिणाम झाला नाहीं. एक आठवडाभर खस्त खाऊन जर्मन सेना चाटेथेरीपासून ऱ्हीम्सपर्यंत थकण्याच्या बेतांत येत चालली आहे असे पाहून सेनापति फॉक ह्यानीं आपल्या सैन्याचें मुख्य वजन चाटेथेरी सायसन्स ह्या पट्ट्यावर जुलईच्या तिसऱ्या आठवड्यात जर्मन सेनेवर टाकलें. ह्या बाजूला उलट हल्ला येईल अशी जर्मन सेनेची अटकळहि नव्हती व त्यामुळे ते एक तऱ्हेनें बेसावधच होते, पहिल्या झटक्यासरशी सर्व पट्ट्यावर फ्रेंच सैन्य एक

दोन दिवसांत पांचसात मैल आंत घुसलें. मार्न नदीच्या दक्षिणेस गेलेलें जर्मन सैन्य परत घ्यावें लागलें तरी फ्रेंचांचा दाब कमी होईना. जुलईच्या तिसऱ्या आठवड्यात सायसन्स चाटेथेरीचा आगगाडीचा रस्ता फ्रेंचांचे ताब्यांत गेला आणि सायसन्सच्या जवळ एक मैलावर फ्रेंच सैन्य आलें. ह्याच सुमारास मदतीस आलेले इंग्रजहि ऱ्हीम्सच्या टापूत प्रकट झाले आणि तेथून त्यानीं जर्मनावर उलट हल्ले चढविण्यास सुरवात केली. अशारीतीने सायसन्सपासून ऱ्हीम्सपर्यंतच्या टापूंत जर्मनाचें जे पोट मार्ननदीपर्यंत पुढे गेलें होते त्या पोटाच्या दोन्ही बाजूवर पूर्वेकडून व पश्चिमेकडून चागला दाब बसत गेल्यामुळे त्या पोटाची दामटी होण्याचा प्रसग आला. हा प्रसग ओळखून जुलईच्या चौथ्या आठवड्यात जर्मनानीं पोटाच्या भागांत पीछेहाट करण्यास सुरवात केली. परत जातांना जर्मनानीं सर्व खेडीपाडीं जाळून टाकलीं: आगस्ट प्रारंभाला सायसन्स पुन्हां फ्रेंचांच्या ताब्यात गेलें; आणि सायसन्सपासून ऱ्हीम्सपर्यंत जवळ जवळ सरळ रेषेत व्हेसेली नदीचा उत्तर किनारा पकडून जर्मन सेना बसली. मार्न नदीवर पुढे गेलेले पोट जर्मनांनी याप्रमाणें मागे घेतलें इतकेच नव्हे तर आगस्टच्या पहिल्या आठवड्यांत माऊंटीडरपासून अमीन्सपर्यंतच्या टापूतहि दोन चार मैल लांब ॲंग्लो–फ्रेंचाचा दाब नसतांहि जर्मन सेना आपखुषीनें मागें हटली. उत्तरेस यिप्रेस–लाबासीच्या टापूंत अशाच रीतीनें जर्मन सेनेचे पीछेहाटीची हालचाल होत असल्याचीं बाह्य चिन्हें दिसू लागलीं आहेत. या पीछेहाटीचा अर्थ काय ? अमेरिकन सेना मार्च महिन्याच्या पूर्वी चार पांच लाखांपर्यंत होती व गेल्या चार पांच महिन्यांत आठ दहा लाख नवें अमेरिकन सैन्य फ्रान्समध्ये उतरल्याचें प्रसिद्ध झालें आहे. हे सर्व तेरा चौदा लाख अमेरिकन लोक लढवय्ये म्हणूनच जुलई महिन्यात रणभूमीवर उभे होते अशांतला भाग नाहीं. पांच सहा लाख तरी अमेरिकन सैन्य जुलई महिन्यात प्रत्यक्ष लढत असलें पाहिजे असें गृहीत धरून चालण्यास हरकत नाहीं. जर्मनांनीं जी चौथी चढाई केली ती अमेरिकन बलाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याकरितांच केली. अमेरिकेचें बल जर येवढे मोठे नसते तर या चौथ्या चढाईत जर्मनांना यश आलें असतें. अमेरिकेचें बल फ्रान्समध्ये गेल्या चार महिन्यांत फार चांगल्या रीतीनें वाढल्यामुळें ऱ्हीम्सच्या बाजूला भरपूर सैन्य ठेवून सायसन्स–चाटेथेरीच्या टापूत शिल्लक सैन्याचें वजन सेनापति फॉक याना

जरेच्या तसें ठेवतां आलें. अमेरिकेच्या वाढत्या बलानें ही मान नदीवरील लढाई जिंकली असें म्हणण्यास हरकत नाहीं. शत्रूचे डावपेंच ओळखून त्याप्रमाणें आपल्या सैन्याचें वजन तसा काळ येण्याबरोबर शत्रूच्या अंगावर योग्य जागीं फेकण्यांत सेनापति फॉक यांनीं जर्मन सेनापतीच्या तोडीचें प्रसंगावधान व चातुर्य दाखविलें याबद्दल ते सर्व दोस्त राष्ट्राच्या प्रशंसेस पात्र झाले आहेत. याप्रसंगीं त्यांची तारीफ करावी तेवढी थोडीच होय. पण या मार्न नदीवरील यशाचें मुख्य श्रेय अमेरिकेलाच दिलें पाहिजे. इतक्या तांतडीनें व उत्साहाने जर सैन्याची कुमक अमेरिकेनें पाठविली नसती तर पारिस व समुद्र किनारा हीं आतां सुरक्षित झालीं असें म्हणण्याची वेळ आगस्ट महिन्यांत खात्रीने आली नसती. अमेरिकेनें ॲंग्लो-फ्रेंचाची अब्रू बचाविली; इतकेच नव्हे, तर पुढील सालच्या वसंतकाळात वीस पंचवीस लाख अमेरिकन सैन्य एकसारखे झुंजू लागल्यावर जर्मनांचा पराभव आपण करूंच करूं अशी खातरजमा दोस्त राष्ट्राना अमेरिकेनें आज पटविली. अमेरिकेचें भरभक्कम बल फ्रान्समध्यें येऊन पोचलें आहे, असें मार्न नदीवर अनुभवास येण्याबरोबर जर्मनांनीं आपलें घर संभाळून बसण्याचा उद्योग आरंभिला. आता यापुढे पश्चिम रणभूमींत जर्मनांची मोठी लढाई बिलकूल होणार नाहीं. घर सभाळून लहान सहान हल्ले जेवढे करावे लागतात तेवढेच ते करतील असा अदाज आहे. जर्मन सेनापति लुडेन डॉर्फ यांनीं या प्रसंगासबधानें असें जाहीर केलें आहे कीं वाजवीहून फाजील मनुष्यबळ खर्च होऊ नये म्हणून जर्मनांनीं ही पीछेहाट केली असून यापुढे अत्यंत काटकसरीने मनुष्यबळाचा उपयोग करण्यात येईल. मार्न नदीवर जर्मनांचा जुलई महिन्यांत पराभव होऊन स्वसंरक्षणाच्या पंथाला जर्मन सेना लागल्याबरोबर इंग्लंडात लॉड लॅन्सडाऊन यानीं

## तहाची वाटाघाट

पुन्हा सुरू केले. लॉर्ड लॅन्सडॉऊन यांचें असें म्हणणें आहे कीं, मार्न नदीवर जर्मनीचा पराभव झाल्यामुळे आमचा लष्करी नांवलौकिक निष्कलक झाला आहे, तेव्हा अशा वेळीं जर्मनी चारीमुडे चीत करण्याच्या नादास न लागतां देवघेवीच्या दृष्टीनें जर्मनीशीं तह करण्यास आतां कांहीं हरकत नाहीं.लॉड लॅन्सडॉऊन यांचें हे मत, मि. लाईड जॉर्ज व मि. चर्चिल या दोघांनाहि बिलकूल मान्य नाहीं. मि. लाईड जॉर्ज यांचें असे म्हणणें आहे कीं पांचव्या वर्षाच्या प्रारंभीं आम्ही

आमची सरशी रणभूमीवर स्थापित केली असतांना बरोबरीच्या नात्यानें देवघेवीचें बोलणें आम्हीं का ऐकून घ्यावें? वर्ष दोन वर्षे जर इंग्लडनें अशीच कळ सोसली तर जर्मनी चारी मुंडे चीत होईल आणि जर्मनीच्या लष्करशाहीच्या त्रासांतून सर्व युरोपखंडाला कायमचें सोडविल्यासारखे होईल. आज जर बरोबरीच्या नात्याचा तह केला तर सर्व रशिया जर्मनीच्या पचनी पडून आठ दहा वर्षांनीं महायुद्धाच्या तापानें आमच्या मुलांमाणसांना पुन्हा त्राहीत्राही करून सोडण्यास जर्मनीची लष्करशाही बिलकूल मागेपुढें पहाणार नाही. खुद्द जर्मनीमध्येहि लष्करशाही बुडविली पाहिजे. जर्मनींत जर लष्करशाही हल्लींप्रमाणें नांदेल तर फ्रान्स व इंग्लड याना तहानंतर ती कधीहि चैन पडू देणार नाहीं. तेव्हां आज हातांत बाण आहे तोंपर्यंत जर्मनीची लष्करशाही रणांगणावरच जमीनदोस्त करून टाकणें जरूर आहे. मि. लॉईड जॉर्ज व मि. चर्चिल याचे विचार करील तऱ्हेचे आहेत. हे विचार इंग्लड, फ्रान्स, अमेरिका व इटली येथील मुत्सद्याना व सामान्य लोकाना आज पसंत पडणारे असल्यामुळे लॉर्ड लॅन्सडाऊन याच्या मताप्रमाणें एकदोन महिन्यात तहाची वाटाघाट सुरू होणें शक्य नाहीं. लॉर्ड लॅन्सडाऊन याच्या देवघेवीच्या वाटाघाटीस आस्ट्रो—जर्मन अनुकूल आहेत. 'ना खंडणी ना मुलूख' अशा स्वरूपाच्या तत्त्वावर दोस्त राष्ट्रांशीं जर्मन सघाचा तह घडवून आणण्यास आस्ट्रिया तत्पर होता व आजहि आहे असे आस्ट्रियाने जलई महिन्यात जाहीर केलें आहे. इंग्लड तडजोडीच्या तहाला कबूल नाही म्हणून पाचव्या वर्षीहि आम्हाला लढाई पुढे चालू ठेवावी लागत आहे, असे जर्मनीच्या कैसरनें सर्व प्रजाजनांना कळविले आहे. तडजोडीच्या तहाला कैसर अनुकूल आहे; लॉर्ड लॅन्सडाऊनसारखे काहीं मुत्सद्दीहि अनुकूल आहेत; मग नडतें आहे कुठे? रशियाला जर्मनीनें खाऊन टाकला आहे आणि तो खाल्लेला भाग नडतो आहे. लाईड जॉर्ज याचें असे म्हणणें आहे कीं, या नव्या खाद्य पेयानें जर्मन लष्करशाही फार घष्टपुष्ट होईल आणि मग आठ दहा वर्षांनीं हल्लींच्या इतक्या तयारीनें शत्रूचा पराभव करता येणार नाहीं. तेव्हा जर्मनीनें जे आज खाल्ले आहे तें जर्मनीच्या मानगुटीवर बसून आजच लाथा बुक्या मारून जर्मनीस ओकावयास लावणें भाग आहे. आपल्या जाळयातून रशियाचें सावज सोडावयास जर्मनी आज तयार नाहीं. इतर बाबींसंबधानें मात्र तडजोडीचें व देवघेवीचे बोलणे बोलण्यास जर्मनीची कबुली आहे. पश्चिम रणभूमींत ॲंग्लो—फ्रेंचांचा पराभव करून आपल्या तहाच्या शर्ती त्याना मान्य

करावयास लावण्याइतकें बळ जर्मनीपाशीं नाहीं हें जुलई महिन्यांत सिद्ध झालें आहे. ही गोष्ट जर्मनीसहि नाकबूल नाहीं. यानंतर जर्मनीचें असें म्हणणें आहे कीं, पुढील सालीं वीस लाख जरी अमेरिकन सैन्य फ्रान्सच्या रणभूमींत उतरलें तरी फ्रान्स–बेल्जम मधून जर्मनीला हाकून देऊन खुद्द जर्मनींत शिरून जर्मनीच्या पजांतून रशियाला बाहेर ओढून काढण्याची ताकद ॲंग्लो–फ्रेंच व अमेरिकन सैन्याच्या अंगांत नाहीं. फ्रान्स बेल्जममध्ये आम्ही आणखी दोन वर्षे लढत राहू आणि तेवढ्या अवधींत पाणबुड्या बोटींचा त्रास कायम ठेवून इजिप्त, इराण व हिंदुस्थान या तीन ठिकाणीं इंग्रजाना इतके सतावून सोडू कीं, आमच्याच ह्मणण्याप्रमाणें इंग्रजाना तह करणें इष्ट वाटू लागेल. लॉर्ड लॅन्सडाऊन याना जर्मनीच्या वरील ह्मणण्यांत नुसती फुशारकी दिसत नाहीं, म्हणूनच ते सांप्रतच्या विजयाच्या वेळींच तडजोडीच्या तहाचें घोडे पुढें ढकलीत आहेत.

## हिंदुस्थान–इजिप्तवर स्वारीची शक्यता ?

अमेरिकन व ॲंग्लो–फ्रेंच सैन्य जर्मनीला कोणत्या वेगानें पश्चिम रणभूमींत मागे रेटू शकेल आणि इजिप्त, इराण व हिंदुस्थान याच्या-संबंधानें जर्मनी किती त्रास देईल याचा अंदाज कोणासच नाहीं. कांहीं जर्मन सेनानायकाचें असें म्हणणें आहे कीं, पश्चिम रणभूमींत घर संभाळून राहून जर दोन तीन लाख लोक आस्ट्रो–जर्मनांना ईजिप्त किंवा हिंदुस्थान याच्या स्वारीवर पाठविता आले आणि त्यांच्याबरोबर भरपूर तोफा, मशीनगन्स, विमानें, विषारी धुराचे गोळे आणि इतर सर्व शस्त्रास्त्रे यांच्या सामग्रीची रेलचेल जर करतां आली तर पश्चिम रणभूमींत इंग्लंडवर जें यश मिळविता आलें नाहीं तें यश ईजिप्त किंवा हिंदुस्थान या बाजूला जर्मनीला खात्रीनें येईल. रशियाचा फिनलंड भाग जर्मनीच्या तंत्रानें वागत आहे; कोर्लंड व पोलंड हे प्रांत जर्मनीच्या आज ताब्यात आहेत; युक्रेन प्रांत जर्मनीचा दोस्त झाला असून तेथे जर्मनीची लष्करी सत्ता पसरलेली आहे; कोसाक प्रांत व कॉकेशियस पर्वताच्या जवळचा जार्जिया प्रांत यांनीं जर्मनीशीं सगनमत केलें असून कास्पियन समुद्र व अफगाणि-स्थान याच्यामधील रशियन तुर्कस्थानच्या मुसलमानानीं स्वतंत्र रिपब्लिकचा आखाडा घातला आहे आणि तेहि जर्मनीच्या ताब्यांत सांपडल्यासारखे आहेत. म्हणजे काळा समुद्र व कास्पियन समुद्र यांच्या मार्गानें हिरातपर्यंत केवळ आगगाडीनें

जर्मन सेना हिंदुस्थानवर स्वारी करण्याकरितां येणारी आहे. रशियाचे जे भाग आज जर्मनीच्या ताब्यांत सापडले आहेत तेथून आणि इराण व अफगाणिस्थान येथील धर्मवेड्या मुसलमानातून पांच सहा लाख भाडोत्री सैन्य हिंदुस्थानच्या स्वारीकरितां जर्मनीस मिळणारें आहे. शिवाय रशियाशीं लढत असलेलें व रशियाच्या तहानतर मोकळे झालेलें दोनतीन लाख तुर्की सैन्य ईजिप्तच्या किंवा हिंदुस्थानच्या स्वारीच्या मदतीला घेता घेण्यासारखें आहे. हिंदुस्थान व ईजिप्त यावर स्वारी करून इग्लंडला लाबून चिमटे घेण्याचा जर्मनीचा वरील बेत जपानच्या मदतीनें निष्फळ ठरणार आहे. रशियाची सैबेरियन आगगाडी व सैबेरियन प्रात दोस्त सरकाराना अनुकूल असलेल्या झेकोस्लाव्हाच्या ताब्यात गेला असून जपाननें जर पधरा लाख सैन्य रशियात उतरविलें तर रशियाचे लोक लेनिन प्रभृति सडेसोटाची सत्ता झुगारून देऊन जपानला मिळतील आणि खुद्द रशियातूनच रूसो–जपानची स्वारी जर्मनीवर होईल. पूर्व रणभूमींतले हे सर्व रग स्पष्ट दिसू लागण्यास आणखी चार पांच महिन्यांची अवधि आहे. जपान किती सैन्य सैबेरियांत उतरवितें, लेनिन जर्मनीच्या तत्रानें कितपत वागतो आणि केवढे मोठे सडेसोटाचे सन्य सैबेरिया मध्ये झेकोस्लाव्हावर आणि जपानी सैन्यावर पाठवू शकतो, जर्मनीच्या ताब्यांतील रशियाच्या प्रातातून आणि इराण–अफगाणिस्थान–बुखारा–समरकद वगैरे मुसलमानी टापूतून किती भाडोत्री सैन्य तुर्को–जर्मनांना मिळू शकतें, इत्यादि गोष्टींचा अदाज चार पाच महिन्यांनीं ॲंग्लो–फ्रेंचांना बाधतां येण्यासारखा आहे. हा अदाज बाधून आणि चार पाच महिन्यात पश्चिम रणभूमींत जर्मनानीं किती मागे रेटलें हे पुढील डिसेंबरात प्रत्यक्ष पाहून १९१९ सालाच्या जानेवारींत लॉर्ड लॅन्सडाऊन याच्या तडजोडीच्या तहाचा खरा विचार होईल. हिवाळ्यापर्यंत तहाची वाटाघाट प्राधान्ये करून पुढे येणें शक्य नाहीं.

**चवथा भाग समाप्त**

॥ श्री ॥

# पहिलें महायुद्ध

( भाग ५ वा )

## महायुद्धाचा पांचव्या वर्षाचा आगस्ट–सप्टेंबर महिना

जुलै महिन्यांत जर्मनांची जी पीछेहाट सुरू झाली ती आगस्ट महिन्यांत एकसारखी सुरू राहून सप्टेंबरच्या पहिल्या आठवडयातहि थाबली नाहीं. मार्न नदीवर फ्रेंच व अमेरिकन सेनेनें जर्मनाचा पराभव केल्यानतर आणि व्हीम्सच्या सभोवती निकराचे हल्ले करून जर्मन सेना थकल्यानंतर मुख्य सेनापति फॉक यानीं सायसन्स चॅटेथेरी या टापूंवर उलट हल्ले चढविण्यास सुरवात केली. असले उलट हल्ले आपले अंगावर येतील हें जर्मनाच्या अटकळींत पूर्वी न आल्यामुळें सदर टापूंत त्यांची फळी फुटली. याचा परिणाम असा झाला कीं, ऐननदी व मार्न नदी याच्यामध्ये जर्मनांचें पुढें आलेलें पोट जर्मन सेनापतींना मागें घ्यावें लागलें; आणि आगस्टचे पहिले आठवडयांत व्हेसेले नदीपर्यंत जाऊन अमेरिकन सैन्य थडकलें. व्हेसेले नदीवर जर्मन सेनेनें त्याना थोपवून धरिलें, म्हणजे आगस्टचे दहा तारखेचे सुमारास जर्मनांची पहिली पीछेहाट थाबली. त्यावेळीं तिसऱ्या चढाईपैकीं तीन चतुर्थांशाहून अधिक भाग जर्मनांना सोडून द्यावा लागला. ऐन नदीच्या उत्तरेकडील चारपांच मैल आणि ऐन नदी व व्हेसेले नदी यांच्यामधील टापू येवढाच काय तो भाग जर्मनाच्या हातीं शिल्लक राहिला. सायसन्स फ्रेंचानी घेतले आणि कॅपीन व सायसन्स याच्या उत्तरेकडील आइस नदी व ऐन नदी यांच्या त्रिकोणातील जर्मनानीं घेतलेला भाग पुन्हां परत घेण्याकरिता फ्रेंचाचे हल्ले दहा आगस्टपासून सुरू झाले. या हल्लयात विशेषसें यश फ्रेंचाना आलें नाहीं. हे हल्ले सुरू असतांनाच सेनापति फॉक यांनीं ॲंग्लो–फ्रेंचाच्या

मुख्य चढाईची तयारी माऊंट टीडर व अमीन्स यांच्या बाजूला सोमनदीच्या दक्षिणेस सुरू ठेविली होती. ही तयारी पुरी होतांच सायसन्स व व्हेसेले नदीवर जर्मन सेना पुरी गुंतली असतांना चौदा आगस्टचे सुमारास अवचित हल्ला अँग्लो–फ्रेंच सेनेनें सुरू केला. या हल्ल्यात जर्मनांची फळी फुटून पुन्हां जर्मनांची पीछेहाट सुरू झाली. राय, चॅनेस या दोन ठिकाणापर्यंत जर्मनाना पहिल्या एकदोन दिवसांतच मागें हटावें लागलें, व तेथून पुढें आगस्टच्या तिसऱ्या व चौथ्या आठवडयांत जर्मन सेना आठदहा मैल व्यवस्थेनें मागे हटली. माऊट टीडरचा हल्ला प्रमुख हल्ला नव्हता. प्रमुख हल्ला आगस्टच्या चौथ्या आठवडयात इंग्रजी सेनेनें सेनापति हेग यांच्या नेतृत्वाखालीं चढविला. हा हल्ला सोम नदीच्या उत्तरेस तीस मैलांच्या तोंडावर चढविण्यात आला. सोमनदीच्या दक्षिणेकडील हल्ला माऊट टीडरपासून ज्याप्रमाणें सुरू झाला त्याप्रमाणें सोम-नदीच्या उत्तरेकडील हल्ला आल्बर्टपासून सुरू झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या हल्ल्यात इंग्रजी सेनेनें बापूम घेतलें आणि पेरोनच्या जवळ जवळ आलेल्या दक्षिणेकडील सैन्यास मदत करून बापूम–पेरोन रस्ता कबजात घेतला. सोमनदीच्या उत्तरेकडील व दक्षिणेकडील या दोन चढाईंत मिळून माऊंट टीडर–राय–नेसेल–पेरोन आणि बापूम येथपर्यंतचा टापू अॅंग्लो-फ्रेंचाच्या हातीं लागून या टापूच्याहि पुढे तीन तीन चार चार मैलपर्यंत अॅंग्लो–फ्रेंचाची प्रगति झाली. जर्मन सेना सोम नदीवर अशा रीतीनें मागे हटत असतांना तिला मार्च महिन्याच्या पूर्वीच्याहि ठिकाणीं म्हणजे हिंडेनबुर्गनें तयार केलेल्या खंदकाच्या आश्रयानेंहि उभे रहातां येऊं नये म्हणून आरास व सायसन्स या दोन्ही टोकापासून प्रचंड हल्ले आगस्ट अखेरीस आणि सप्टेंबरच्या प्रारभाला चढविण्यास अॅंग्लो-फ्रेंचांनीं सुरवात केली. आरासच्या पूर्वेस तीन चार मैलपर्यंत इंग्रजाना जातां आलें. या दोन्ही ठिकाणीं जर्मनानीं निकराचे उलट हल्ले करून मोठी लढाई लढण्यास आपण तयार आहों असें स्पष्टपणें दर्शविलें. सोमनदीच्या काठीं बापूम–पेरोन–नेसेल यांच्याहि मागे शत्रू सेना आल्यामुळे आणि सायसन्सच्या उत्तरेस व्हेसेलीच्या जवळ फ्रेंच सेना पोहोंचल्यामुळें आइस नदीच्या दोन्ही कांठानीं जर्मन सेनेला मागें हटावें लागलें. आगस्ट अखेरीस व सप्टेंबर प्रारंभाला लासीग्नी–राई-बकी या पट्ट्यावर जर्मन सेना मागे हटत जाऊन सप्टेंबरचे पहिले आठवडयात

लासीग्नीपासून लाफेरेपर्यंतच्या टापूत बराच भाग जर्मनीनें सोडून दिला. म्हणजे मार्च महिन्यांत पहिली जगी चढाई जी जर्मनीनें केली त्या चढाईंत मिळविलेल्या मुलखापैकीं जवळ जवळ सात अष्टमांश भाग आगस्ट महिन्यांत व सप्टेंबरचे पहिले आठवडयात जर्मनीस ओकावा लागला. एप्रिल महिन्यातील जर्मनीच्या दुसऱ्या चढाईच्या वेळी जर्मनीनें गिळलेला भागहि म्हणजे यिप्रेसच्या दक्षिणेचा आणि आर्मेंटरीसच्या आसपासचा भागहि जर्मनीच्या पोटांत पचून राहिलेला नाहीं. आगस्टच्या अखेरीस व सप्टेंबरच्या प्रारभाला आरासच्या पूर्वेस ज्यावेळीं इग्रजांचा मोठा हल्ला सुरू झाला त्यावेळीं यिप्रेसच्या टापूतहि इग्रजानीं पुढें पाऊल टाकण्यास सुरुवात केली. केमेल टेकडी इग्रजाच्या हातीं लागली. आणि आर्मेंटरीसच्या घासापैकीं निम्मा घास ओकावा लागला. आगस्ट आरभाला व्हेसेले नदीवर येऊन थाबलेल्या अमेरिकन सेनेनें व्हेसेली नदी सप्टें-बरचे पहिले आठवडयांत ओलाडली असून व्हेसेले नदी व ऐननदी यामधील गावांना आग लावून दिल्याची बातमी आली आहे. म्हणजे सप्टेंबरचे दुसरे आठ-वडयांत व्हेसेले नदी व ऐननदी याच्यामधील टापू काबीज करून ऐननदी अमेरिकन सेना गांठील असा अदाज आहे. सोमनदी व आइसनदी याच्या टापू-तील जर्मनांची पीछेहाट पुरतेपणी थाबलेली नसून सप्टेंबर अखेरपर्यंत ती तशीच चालू राहील असा अदाज आहे. सप्टेंबर अखेरीला आर्मेंटेरीसच्या बाजूचा बहुतेक भाग जर्मन सेना सोडून देऊन मार्च महिन्यांत केब्राय–सेंट क्वेंटीन लाफेरे असे जे तोड संभाळून जर्मन सेना बसली होती तेंच तोंड पुन्हां सभाळून आक्टो-बरच्या प्रारंभाला बसेल आणि सायसन्सच्या पूर्वेस सायसन्स व ऱ्हीम्स याच्यामध्ये ऐन नदी गांठावयास सांपडली येवढाच काय तो क्षुल्लक नफा सप्टेंबर अखेरीस जर्मनांच्या जवळ शिल्लक राहील असा कांहींचा अदाज आहे. नुसत्या आगस्ट महिन्यात सव्वा लाखाहून अधिक कैदी, पांचसातशें तोफा आणि दीड दोन हजार मशिनगन्स इतकी लूट अमेरिकन व ॲग्लो–फ्रेंच सेनेला मिळाली आहे. हल्लीं सुरू असलेले दोस्त सरकारांचे हल्ले सप्टेंबर अखेरपर्यंत कमी जास्त प्रमाणानें सुरू रहातील आणि मार्च, एप्रिल, मे व जून या तीन साडेतीन महिन्यांत जर्मनीनें जितके मिळविलें तितकेंच जुलै, आगस्ट, सप्टेंबर व आक्टोबर या तीन साडेतीन महिन्यात जर्मनीस सव्याज ओकावें लागेल.

१९१८ सालीं पश्चिम रणभूमींत जितके मिळविलें तितकेंच गमावलें, इतक्यावरच आक्टोबर अखेरीस भागेल काय ? पश्चिम रणभूमींत लढण्याचा मोसम अजून दीडदोन महिने आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवडयानंतर हिंवाळयाचा खरा अंमल डिसेंबर, जानेवारी व फार झालें तर अर्धी फेब्रुवारी इतक्या दिवस असतो. तेव्हां नोव्हेंबर प्रारंभापासून सेनापतींना मोठया लढाया टाळून हिंवाळयातील वस्तीला सोईस्कर अशा जागा पाहून आपलें तोंड आखावें लागते. जर्मन पीछेहाटीसंबधानें सेनापति हिंडेनबर्ग यांचें असें म्हणणें आहे कीं, सोमनदीच्या कांठच्या ओसाड व निर्जन बनविलेल्या मुलखात ॲंग्लो-फ्रेंच सेनेचें मुख्य बल आयतें पुढे येत असल्यामुळे जर्मनाची पीछेहाट जर्मनांना हितावह झाल्यावाचून राहाणार नाहीं. सोम नदीच्या काटच्या मुलखात रस्ते नाहींत, पूल नाहींत, झाडझुडूप नाहीं व घरेंदारें नाहींत. ॲंग्लो-फ्रेंच सेनेचें मुख्य बल जर याच ठिकाणीं गोळा झालें तर त्यांना दारूगोळयाचा व अन्नपाण्याचा पुरवठा करण्यास मोठी पचाईत पडेल आणि हिंवाळयात तर या सेनेचे हाल झाल्यावाचून रहाणार नाहींत. ऐन नदी व मार्न नदी या दोन नद्यामधील मुलूखहि जर्मनांनी जाळून पोळून उध्वस्त केला असल्यामुळे व्हेसेले नदी व ऐन नदी याच्यामध्ये बसलेल्या अमेरिकन सेनेचेहि हाल हिंवाळयामध्यें झाल्यावाचून रहाणार नाहींत. हे हाल टाळणें व या उध्वस्त झालेल्या मुलुखात नवीन आगगाडया बांधून पुढील सालच्या चढाईची तयारी करणें या कामीं सर्व हिंवाळा ॲंग्लो-फ्रेंचांना व अमेरिकन सेनेला खर्च करावा लागेल. मार्न नदीवर पराभव झाल्यावर अमेरिकन सैन्य व ॲंग्लो-फ्रेंच सैन्य हीं मनुष्यबलानें फार अधिक आहेत असें जर्मनीच्या अनुभवास आलें आणि पीच्छेहाट करून सोईच्या जागा पकडून बसण्याशिवाय जर्मनीस गत्यतर नाहीं असें जर्मनीचें लष्करी धोरण मुक्रर ठरलें. मार्न नदीपर्यंत वाढलेलें पोट मागे आलें, मार्न नदी ते टीडरपर्यंत फुगलेला भाग पुन्हा स्वस्थानीं आला, आणि यिप्रेसच्या दक्षिणेकडील सूजहि उतरली. आगस्ट अखेरपर्यंत सोळा लाख अमेरिकन सैन्यानें अमेरिकेचा किनारा सोडल्याचें प्रसिद्ध झालें आहे, आणि दर महिन्यास दोन अडीच लाख नवें अमेरिकन सैन्य अमेरिकेतून बाहेर रवाना करण्याची व्यवस्था झालेली आहे. अशा स्थितींत पश्चिम रणभूमींत जर्मनाची नेहमीं पीछेहाटच होत रहाणार हे निर्विवाद आहे. आम्ही आपलें घर

संभाळलें म्हणजे मिळविलें, फ्रान्समधून बाहेर पडलों तरी हरकत नाहीं, बेल्जम सोडावें लागलें तरी हरकत नाहीं, पण खुद्द जर्मनीच्या भूमीवर अँग्लो-फ्रेंचांना आणि अमेरिकनांना आम्ही पाय ठेवूं देणार नाहीं अशा तऱ्हेची भाषा जर्मन सेनानायक वापरू लागले आहेत. पारिस शहर घेणें स्वप्नवत् झालें, इंग्लिश चॅनेलचा किनारा गांठण्याच्या गोष्टी मागे पडल्या, आणि बेल्जमची ठेव वसाहती मिळाल्याशिवाय आम्ही परत करणार नाही हाहि कोटीक्रम पुढें येण्याचे बंद झालें. जर्मनींत शिरूं देणार नाहीं अशी धमकी आता पुढें आली आहे. अमेरिकन सेनापतीचें तर असें म्हणणें आहे कीं मुख्य बल फ्रान्सच्या रणभूमींतच चाळीस लाखापर्यंत वाढविलें जाईल आणि चाळीस पन्नास लाखाचें हे सैन्य एकदां पुढे चालू लागलें म्हणजे बर्लिन गाठून तेथे जर्मनीची लष्करशाही मोडून अमेरिका लिहून देईल तसल्या तहावर जर्मनीस सही करणें भाग पडेल. अमेरिकेच्या सैन्यास जर्मनीच्या देशात शिरू न देण्याकरिता ज्या तजविजी करावयास पाहिजेत त्या तजविजींपैकींच सांप्रतची पीछेहाट हा एक भाग होय. १९१७ सालच्या प्रारभाला पश्चिम रणभूमींत जी स्थिति होती, हिंडेनबुर्गनें आखलेल्या ज्या टापूंत जर्मन सेना पूर्वी होती, त्याच स्थितींत आणि त्याच टापूंत जर १९१९ च्या प्रारभीं म्हणजे पुढील सालच्या फेब्रुवारी मार्च महिन्यात जर्मन सेना दृष्टीस पडली तर उत्तर फ्रान्स व बेल्जम येथून बाहेर जाण्यास दोन वर्षे लागून जर्मन सरहद्दीजवळ १९२१ च्या मार्च महिन्यात अँग्लो-फ्रेंच व अमेरिकन सेना येईल असा जर्मनांचा अदाज आहे. अमेरिकेनें एकदरीनें जरी चाळीस-पन्नास लाख सैन्य उभारिलें तरी अमेरिका लढाईत पडल्यानतर चार वर्षांनीं अमेरिकन सेनेच्या दृष्टीस जर्मनभूमि पडावयाची आहे व त्यावेळीं ऱ्हाईन नदी ओलाडतांना आम्ही अमेरिकन सेनेचे डोळे पांढरे करू, अशी जर्मनीस घमेड वाटत आहे. सर्व उत्तर फ्रान्स व बेल्जम उध्वस्त करीत जर्मन सेना मागे हटते, आणि या उध्वस्त केलेल्या मुलखातील पूल व आगगाड्या बांधता बांधता आणि चढाई करून आणाऱ्या सैन्यास विसाव्याच्या जागा तयार करता करतां अँग्लो-फ्रेंचांना व अमेरिकनांना पुरेसे होऊन जाईल असा जर्मनींच्या पीछेहाटींतला कावा आहे. आणखी दोन वर्षे उत्तर फ्रान्स व बेल्जम सोडण्यास लागतील असें जर्मनीचें म्हणणें आहे. उलट

पक्षी लष्करी तज्ज्ञांचें असें मत पडतें कीं, आगस्ट सप्टेंबरमधील पीछेहाट म्हणजे मोठया पराभवाची प्रस्तावना होय, आणि आक्टोबर–नोव्हेंबरमध्येच जर्मनीचा पश्चिम रणभूमींत मोठा पराभव होऊन १९१४ सालीं महिना दीड महिन्याच्या अवधींत बेल्जम व उत्तर फ्रान्स आक्रमून जर्मन पुढे आला याप्रमाणें अमेरिकन सेनाहि जर्मनाचा मोठा पराभव एकदम करून महिना दोन महिन्यांत जर्मनीची सरहद्द गांठल्यावाचून राहाणार नाहीं. अशा रीतीनें गेल्या डिसेंबरांतच जर जर्मनीची सरहद्द गाठली गेली तर निम्याहून अधिक जर्मन सैन्य जमीनदोस्त होईल व तीन चतुर्थांशाहून अधिक तोफांना व मशिनगन्सना जर्मनीला मुकावें लागेल.

येवढा मोठा पराभव झाल्यानंतर जर्मनी स्वतःच्या देशाचें संरक्षण तरी काय करणार ? अर्थात् येत्या हिंवाळयांत जर्मनीला अमेरिका सांगेल त्या अटींवर तह करणें भाग पडेल. आगस्ट सप्टेंबरमधील जर्मनांची पीछेहाट मोठया पराभवाची प्रस्तावना आहे काय ? सेनापति हिंडेनबुर्ग म्हणतात तसें नाहीं. आम्ही आमची सेना अधिक बंदोबस्ताच्या जागीं नेत आहोत आणि तेथे ती गेल्यावर अमेरिकेचीं हाडे खिळखिळीं होईपर्यंत त्याच्याशी लढल्यावांचून जर्मन सेना रहाणार नाहीं. जर्मन सेना अमेरिकन सेनेहून संख्येनें कमी आहे आणि सेनापति फॉक यांच्यापाशीं सांप्रत जेवढें मोठें सैन्य आहे तेवढें जर जर्मन सेनानायकांच्यापाशीं असतें तर सर्व जगाला जर्मनांनीं पादाक्रांत केलें असतें. जर्मन सेनानायकाच्या कुशलतेची ही प्रौढी एका बाजूस ठेविली तर येवढी गोष्ट त्यातून निःसशय सिद्ध होते की, मनुष्यबळात जर्मनीचें पारडे हलकें ठरलें असून पुढील वर्षी अमेरिकन वजनाखाली जर्मनी चांगला दडपला जाईल. अमेरिकेपाशीं मनुष्यबल आहे, द्रव्यबल आहे आणि बुद्धिबलहि आहे. अशा शत्रूशीं दोन दोन तीन तीन वर्षे लढून अखेरीस त्याच्या म्हणण्याप्रमाणें तह करण्यास कबूल होण्यापेक्षां आजच तसा तह करून पुढील दोनतीन वर्षांचें नुकसान तरी टाळणें शहाणपणाचें नाहीं काय ? दोन तीन वर्षांनीं छातीवर गुडघा ठेवून तह करण्यास अमेरिका भाग पाडील, हा सिद्धातच जर्मनीस कबूल नाहीं. सांप्रतची पीछेहाट म्हणजे मोठ्या पराभवाची प्रस्तावना नव्हे, असें जर्मन सेनानायकांचें म्हणणें आहे. ह्या म्हणण्यांतील खरेखोटेपणा एक दोन महिन्याच्या अवधींतच दृष्टीस पडावयाचा असल्यामुळें त्यासंबधानें अदाज बाधीत

बसण्यात हशील नाहीं. आणखी दोन वर्षें फ्रान्स–बेल्जममध्यें आम्ही लढू आणि नंतर दोन वर्षे अमेरिकेला जर्मनीची सरहद्द ओलांडू देणार नाहीं, अशी शेखी जर्मन मिरवीत आहे. या शेखींत तथ्यांश किती ? एक दोन वर्षांनीं जरी अमेरिकेनें जर्मनीची सरहद्द गांठली, तरी पुढे एका दुसऱ्या वर्षांत जर्मनीचा स्वतःचा देश उध्वस्त करण्यास अमेरिका असमर्थ टरेल काय ? अमेरिकेपाशीं युद्धसामग्री इतकी भरपूर आहे कीं, आणखी चार पांच वर्षें महायुद्ध असेंच पुढें चालविण्याचा प्रसंग आल्यास अमेरिका बिलकूल डगमगणार नाही. अमेरिका जर डगमगणार नाही तर तेवढया अवधींत जर्मनीची लष्करशाही मोडली जाऊन जर्मनींत राज्य-क्राति होऊन रशियाची आज जी स्थिति झाली आहे तीच स्थिति जर्मनीचीहि झाल्यावाचून राहणार नाहीं. जर्मन लष्करशाहीच्या पुरस्कर्त्यांपुढे स्वजनाचा हा असला संहार आज उभा राहिला आहे.

अमेरिकेच्या मर्जीप्रमाणें तह करून त्यांनी हा संहार कां टाळू नये ? समूळ नाश होईतों लढत राहण्यास आशातन्तु कोणता ? जर्मनीला आज आशा वाटत आहे ती मुख्यतः दोन गोष्टीमुळेच वाटत आहे. जर्मनीच्या पाणबुडया बोटींमुळे अमेरिकन सैन्य फ्रान्सच्या रणमूमींत उतरण्यास जरी अडथळा झाला नाहीं आणि त्यामुळे जर्मनीची निराशा झाली असली तरी अन्नपाण्याच्या बाबतींत फ्रान्सचे व इंग्लडचे बरेच हाल होत आहेत. या हालांत उत्तर फ्रान्स व बेल्जम या दोन प्रदेशांची राखरागोळी होण्याची भीति जर्मन व्यवस्थेशीर पीच्छेहाटीमुळे पडली आणि अखेरच्या जयाच्यावेळीं अमेरिका कोणालाच दुसऱ्याचा मुलूख घेऊं देणार नसल्यामुळे द्रव्यनाशाची भरपाई होण्याची जर आशा उरली नाहीं, तर दोन तीन वर्षे अधिक हाल अपेष्टा सोसण्यास इंग्लंड व फ्रान्स येथील मजूरवर्ग तयार होणार नाहीं, असे जर्मनीस वाटत आहे. असल्या अदाजावर जेथे युद्ध पुढे चालविलें जाणार तेथे प्रत्यक्ष अनुभवाचीं ठेंच लागेपर्यंत कोणचाहि पक्ष हार जाणार नाही हे उघड आहे. तेव्हा याबाबीसंबंधाने प्रत्यक्ष अनुभव जसा येईल त्याप्रमाणें महायुद्ध आटपेल किंवा लांबेल. जर्मनीचा दुसरा आशातंतु याहून निराळया स्वरूपाच्या आहे. रशियातूनच जर्मनीस खावयास मिळेल येवढीच जर्मनीस आशा नसून रशियाचें मनुष्यबळहि दोस्त सरकारच्या विरुद्ध वापरावयास सांपडेल अशी जर्मनीस फार

आशा आहे. जो रशिया दोस्त सरकारांतील महत्त्वाचा भाग या नात्यानें जर्मनीच्या विरुद्ध या महायुद्धात पडत होता तोच रशिया याच महायुद्धात जर्मनीच्या बगलेंतलें राष्ट्र म्हणून लढू लागेल अशी जर्मनीस आज फार आशा वाटत आहे. रशियाचा जर तसा उपयोग करावयास सांपडला तर अमेरिकेच्या तोडीसतोड आपण केली असें जर्मनीस वाटल्यावांचून राहणार नाहीं. आगस्ट महिन्यात रशियात ज्या गोष्टी घडून आल्या त्यामुळे जमनीची आशा निराधार आहे, असेंहि म्हणता येत नाही.

जुलै महिन्यात मास्कोच्या पूर्वेस झेकोस्लावाचा पक्ष बराच प्रबळ झाला होता. डान नदीच्या काठचे कोसाक मास्कोवर चाल करून जाण्यास उद्युक्त झाले होते. मास्को व पेट्रोग्राड या टापूंतील प्रमुख लोक लेनिनच्या व सडेसोटाच्या सत्तेविरुद्ध उठले होते. उत्तरेस आर्चेगलच्या उपसागरात ॲंग्लो–फ्रेंचाचें सैन्य आले होते. लेनिन घाबरून जाऊन त्याने जर्मन सैन्याचाहि आश्रय घेतला होता. अशा रकटांत सापडल्यामुळे आगस्टच्या प्रारंभीं स्वतःच्या देशांतील धामधूम बद पाडण्याकरिता लेनिनच्या पक्षानें जर्मन पैशाची व जर्मन सैन्याची मदत घेतली. आगस्टमध्ये युरोपांतील झाकोस्लावांचा पुरा मोड झाला. कोसाकाचे पुढारी सेनापति ब्रुसेलॉफ याना मास्को येथे कैद करून आणलें. नवी क्रांति करूं पाहणाराचे शेकडों पुढारी लेनिननें गोळी घालून ठार मारले आणि ५ हजाराहून अधिक लोक पेट्रोग्राड येथे तुरुगांत टाकले. अशा रीतीनें जर्मन पैशाने व जर्मन सेनेनें आगस्टच्या पहिल्या पधरवडयात सडेसोटाचा अमल रशियात पुन्हां प्रस्थापित केला. आगस्टअखरीस लेनिननें जर्मनीशीं नवा तह केला असून आणखीहि काहीं मुलूख ह्या नव्या तहानें जर्मनीस देण्यात आला आहे आणि जर्मनीनें केलेल्या मदतीबद्दल आर्चेगलच्या बाजूला जर्मनीचा मित्र म्हणून ॲंग्लो–फ्रेंचाशीं लढण्यास लेनिनने या तहांत कबुली दिली आहे. सर्व रणभूमींत शक्त्यनुसार मदत करण्याची कबुली लेनिननें अद्याप दिलेली नाहीं परतु तो त्या मार्गावर आहे असे आगस्ट अखेरीच्या नव्या तहावरून म्हणता येते. सडेसोटाची सत्ता रशियांत खबीर झाल्यानें रशियातील चांगल्या लोकाचा जाच अधिक वाढतो हे जर्मनीला माहित आहे. पण हा जाच वाढवून वाढवून ज्याचा कित्येक पिढया द्वेष करण्यांत आला तो जर्मनी सडेसोटाहूनहि अधिक बरा असें वाटावयास लावणाऱ्या मनोवृत्तीस जर्मनी समजून

उमजून उत्पन्न करीत आहे. लेनिनचें व अॅग्लो–फ्रेंचांचें चांगलेंच वांकडें जर्मनीनें आणलें आहे. आगस्ट महिन्यांत रशियात स्थिरस्थावर झाल्यावर मास्को येथें लेनिन गेला असतांना लेनिनवर गोळी घालण्यात आली आणि लेनिन मेला असेंहि प्रसिद्ध झालें. पण या गोळीच्या जखमेतून लेनिन वांचला. या खुनाच्या प्रयत्नाचा फायदा घेऊन जर्मनीनें सडेसोटांच्या मनात असें बिंबविलें कीं, अॅग्लो–फ्रेंचाच्या मदतीनें व चिथावणीनें असल्या खुनाची तयारी होत असते. सप्टेंबर प्रारंभाला पेट्रोग्राड व मास्को येथील अॅग्लो–फ्रेंचाचे वकील व त्यांचे गणगोत यांना रशियन सरकारनें कैद केलें. या झटापटींत पेट्रोग्राड येथील इंग्रजी वकील मारला गेला आणि लेनिननें अॅग्लो–फ्रेंच सरकारला असें कळविलें कीं, जर यापुढें रशियात सडेसोटाच्या मुत्सद्याच्या खुनाचा प्रयत्न दृष्टीस पडला तर खुद्द इंग्लंडात व फ्रान्समध्ये इंग्रजी व फ्रेंच मुत्सद्याचे खून पडल्यावाचून राहाणार नाहीत. आगस्ट अखेरीस व सप्टेंबरच्या प्रारंभी अॅग्लो–फ्रेंचाविषयीं रशियांत सडेसोटांच्या मनांत जर्मनीनें चांगला द्वेषाग्नि पेटविला यांत संशय नाहीं. या द्वेषाग्नीचा फायदा घेऊन एव्हांपासूनच रशियात भाडोत्री सैन्याची भरती करण्यास जर्मनीनें सुरुवात केली असली पाहिजे असा अंदाज आहे. शिवाय वर्षसहा महिन्यांच्या अवधींत सर्व रणभूमींत जर्मनीचा मित्र म्हणून लढण्याची कबुलीहि लेनिनकडून मिळण्याचा संभव आहे. उत्तर फ्रान्स व बेल्जम येथून पाय काढून जर्मन सेना स्वतःच्या सरहद्दीवर पोंचली असतांना जर वरील प्रकारची कबुली रशियाकडून मिळाली तर आस्ट्रियाच्या व रशियाच्या सहाय्यानें अमेरिकन सेनेला स्वतःच्या देशाबाहेर थोपवून धरण्याला जर्मनी समर्थ होईल. रशियाची मदत न मिळाल्यास जर्मनीच्या अगीं तसलें त्राण राहणें शक्य नाहीं. रशियाकडून भाडोत्री सैन्याची व सर्व राष्ट्राची मदत पुढील सालीं होऊं नये म्हणून रशियातील नव्या क्रांतिकारकांस पुन्हां उत्तेजन देण्याकरितां जपान, अमेरिकन व कॅनेडियन सैन्य सैबेरियाच्या बाजूनें आस्ते आस्ते रशियाकडे येत आहे. या जपानी चढाईचा परिणाम पुढील वसंतकाळीं रशियाच्या अंतःस्थितीवर झाल्यावांचून रहाणार नाहीं. अमेरिकेच्या पंजांतून स्वतःची सुटका कशी करून घ्यावयाची याच विवंचनेंत सांप्रत जर्मनी सांपडलेला असल्यामुळें येत्या हिंवाळ्यांत किंवा पुढें लगेच वसंतकाळीं तुर्को–जर्मनांची स्वारी हिंदुस्थानवर होण्याचा फारसा संभव नाहीं. जर्मनीच्या सांप्रतच्या अडचणीचा फायदा घेऊन

बगदाद येथून व बलुचिस्थानांतून पुढे सरकून सर्व इराण व्यापून काकेशियस पर्वताच्या टापूंतील राकेल तेलाच्या खाणी इंग्रजांनीं आपल्या कबजांत घ्याव्यात आणि कास्पियन समुद्र व अफगाणिस्थान यांमधील आगगाडीला इराणातून शह देऊन हिंदुस्थानावरील स्वारीचें मूळच या संधीस इंग्लंडनें उपटून टाकावें अशी लंडन टाइम्सची सूचना आहे. तेव्हां येत्या हिंवाळयात तुर्को-जर्मनांची स्वारी हिंदुस्थानवर न होता बगदादच्या टापूंतून व बलुचिस्थानातून इंग्रजांची स्वारी इराणावर व कास्पियन समुद्रावर होईल व बलुचिस्थान या स्वारीचा मुख्य पाया बनेल असा रंग दिसत आहे.

# महायुद्धाचा पांचव्या वर्षाचा सप्टेंबर-आक्टोबर महिना

आगस्ट महिन्याप्रमाणें सप्टेंबर महिनाहि दोस्त सरकारांना विजयाचा गेला. फ्रान्समध्ये जर्मनांची पीछेहाट आगस्ट महिन्याप्रमाणें जलदीची झाली नाहीं. गति बरीच मंद झाली, पण बंद पडली नाहीं. आगस्टच्या दुसऱ्या पंधरवड्यात पालेस्टैनच्या बाजूला तुर्की सैन्यावर इंग्रजांनीं मोठा विजय मिळवून साठ—सत्तर हजार तुर्कांना कैद केलें आणि दमास्कस शहर घेऊन उत्तरेस आलेपोच्या रोखानें कूच करण्यास प्रारंभ केला. या मोठया विजयाच्या सुमारासच सालिनोका येथील सैन्यानें मासिडोनियामध्ये बल्गेरियन सैन्याचा पराभव करून बल्गेरियाला शस्त्रे खालीं ठेवण्यास लाविलें. ता. ३० सप्टेंबर रोजीं बल्गेरियानें दोस्त सरकारांना शरण जाऊन शस्त्रे खालीं ठेवण्याचा स्वतंत्र तह दोस्त सरकारांशीं केला आणि महायुद्धातून आपलें अंग काढून घेतलें. फ्रान्समधील पीछेहाट, पालिस्टैनमधील पराभव आणि बल्गेरियाचें घरीं बसणें या तीन गोष्टींमुळें महायुद्धाचें स्वरूप आक्टोबर प्रारंभाला पालटलें आणि जर्मनी व आस्ट्रिया या दोन देशांत मोटी विचारक्रांति होऊन दोघांनीं मिळून आक्टोबर प्रारंभाला प्रे. विल्सन यांजपाशीं तहाचें बोलणें सुरू केलें. वरील तीन रणभूमींत लष्करी स्थिति कशी पालटली व या पालटलेल्या स्थितीचा तहाच्या बोलण्यावर आक्टोबर—नोव्हेंबर महिन्यात कोणता परिणाम होणार आहे याचा आपण आतां क्रमशः विचार करू.

फ्रान्सच्या रणभूमीसंबंधानें १९१५ सालच्या वसंतकाळांत कोणती स्थिति होती? १९१५ सालीं स्वित्झर्लंडपासून बेल्जमच्या किनाऱ्यापर्यंत जर्मनाची जी फळी बसली त्या फळीमध्यें १९१६ सालीं व्हर्डूनच्या लढाईच्या वेळीं, आणि सोमनदी व शापेन प्रांत येथील लढायांच्या वेळेला, थोडासा फेरबदल झाला. व्हर्डूनच्या लढायांच्या वेळेला जर्मनी व्हर्डूनच्या रोखानें पांचसात मैल पुढें सरकला, पण तेथेंच जर्मनीला थांबावें लागलें. सोम नदीच्या लढायांच्या वेळेला जर्मनीची पीछेहाट झाली आणि त्यामुळें १९१७ सालच्या वसंतकाळांत सोमनदीवरचें तोंड सेनापति हिंडेनबुर्ग यांनीं सेंट क्वेंटिन केब्रायच्या पट्ट्यापर्यंत मागें ओढून घेतलें. १९१७ सालीं अशा प्रकारें नवीन हिंडेनबुर्गी तोंड जर्मनीनें स्थापिल्यानंतर या तोंडाच्या दोन्ही टोकाला

म्हणजे उत्तरेस केंब्रायच्या टापूंत व दक्षिणेस सायसन्स व ऱ्हीम्स यांमधील ऐन नदीच्या टापूंत इंग्रजांनीं व फ्रेंचांनीं जर्मनांवर मोठे हल्ले चढविले. केंब्रायच्या बाजूला इंग्रजांना जय मिळाला, पण लगेच उलट हल्ले करून जर्मनांनीं इंग्रजांनीं घेतलेल्या मुलखापैकीं बराच मुलूख परत घेतला. ऐन नदीच्या कांठीं सायसन्स आणि ऱ्हीम्स ह्याच्या मधील टापूंत फ्रेंचांनीं ऐन नदीच्या उत्तरेस शापेन प्रांतात चारपांच मैलपर्यंत पुढे पाऊल टाकलें; पण त्यावेळीं ही गति फार प्राणनाशक वाटल्यामुळें फ्रेंचाचे हल्ले बंद पडले. म्हणजे १९१८ च्या वसंतकाळापर्यंत हिंडेनबुर्गनें आपण होऊन केलेल्या पीछेहाटीशिवाय जर्मनीच्या तोंडांत विशेषसा फेरफार झाला नाहीं. १९१८ सालच्या वसतकाळीं मार्च, एप्रिल आणि मे हे तीन महिने मिळून तीन चढाया करून जर्मनीनें सोमनदीचें तोंड १९१५ सालच्या पुढे म्हणजे अमीन्सच्या जवळ जवळ नेलें, सायसन्स आणि ऱ्हीम्स ह्याच्या मधील ऐन नदीचें तोंड मार्न नदीला भिडविलें, आणि उत्तरेस आर्मेंटेरीस व यिप्रेस ह्याच्यामध्यें इंग्रजांच्या तोंडातील लहानसा मुलख घेतला. जून महिन्यांतील ऱ्हीम्स–मार्न बाजूच्या चौथ्या चढाईच्या वेळीं जर्मनांना पराभव होऊन से. फॉक ह्यानीं सोम नदी व ऐन नदी ह्याच्या टापूंत जर्मनांनी तीन महिन्यात जे गिळले होते ते बहुतेक सर्व जून, जुलई व आगस्ट ह्या तीन महिन्यांत ओकावयास लाविलें; आणि सप्टेंबर प्रारंभाला १९१७ सालीं जी रणभूमीची स्थिति होती तीच स्थिति जवळ जवळ दिसूं लागली. केंब्राय व सेंट क्वेंटिन ह्या दोन्हीं महत्त्वाच्या ठिकाणापासून सातआठ मैलावर ॲंग्लो–फ्रेंच सैन्य सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात आले होतें. सर्व सप्टेंबर महिना ह्या ठिकाणीं तुंबळ युद्ध होऊन सेंट क्वेंटिन फ्रेंचानीं काबीज केलें. इंग्रज केंब्रायच्या उत्तरेस, पूर्वेस व दक्षिणेस मैल दीड मलावर आक्टोबरचे पहिल्या आठवड्यात आले असून गाभूळलेल्या फळासारखी केंब्रायची स्थिति झालेली आहे. सेंट क्वेंटिन व केंब्राय ह्या दोन टापूमध्ये प्रत्येक फूटभर किंवा यार्डभर जमिनीसाठीं जर्मन आटोकाट मेहनत करून लढत आहेत, इतकेंच नव्हें तर सवड मिळताच एकसारखे उलट हल्ले करून कालव्याचा लहानसा भाग, एखादा महत्त्वाचा उंचवटा किंवा जंगलाचा टापू परत घेण्यास हजारो बळी देण्यास कमी करीत नाहींत. सर्व सप्टेंबर महिन्यांत व आक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात फ्रान्समध्यें दोन्ही पक्षाचे मिळून चाळीस लाख सैन्य अशा

रीतीनें झुंजत राहिल्यामुळें सप्टेंबर–आक्टोबरांतील फ्रान्सांतील लढाया रक्तस्रावाच्या दृष्टीनें बाकीच्या सर्व लढायांना मागे टाकितील ह्यात शंका नाहीं. सेंट क्वेंटिन गाव जर्मनांनीं उध्वस्त केलें आणि गावाचा प्रत्येक भाग लढवीत ते बाहेर पडले. केंब्रायहि त्यानी उध्वस्त केलें आहे आणि केंब्राय घेण्याकरितां अत्यंत भयंकर लढाया रोज इंग्रजाना लढाव्या लागत आहेत. केंब्राय व सेंट क्वेंटिन हा सोम व आयीस नदीच्या काठचा भाग जर्मन तोंडातील मध्यभाग आहे. ह्या पट्ट्यापासून हिंडेनबुर्गचें तोंड सुरू होतें. अर्थात् ह्या तोंडातील लढाया बिकट स्वरूपाच्या व्हाव्यात ह्यात काहीं आश्चर्य नाहीं. पूर्वीच्या चढायांकरितां ह्याच टापूच्या मागे जर्मनानी आपलें मनुष्यबल व यंत्रबळ गोळा करून ठेवलेलें असल्यामुळे जर्मनांच्या शक्तीचें हे केंद्रस्थान आहे. केंब्राय व सेंट क्वेंटीन ह्याच्यामागे दहापधरा मैलावर जर्मन बलाच्या साठ्याचीं मुख्य ठिकाणें आहेत. तीं ठिकाणें जर नोव्हेंबर पधराच्या आत ॲंग्लो–फ्रेंचांच्या हातीं पडलीं तर मागे सरकणाऱ्या जर्मन सेनेला हिंवाळ्यात आगाऊ तरतूद न केलेल्या जागेत पडावें लागेल, इतकेंच नव्हे तर मागच्या केंद्रस्थानाचा व पुढच्या तोंडाचा व्यवस्थित संबंध न जुळल्यामुळे हिंवाळ्यातच पीछेहाट सुरू ठेवून सैन्याची अत्यंत खराबी करून घ्यावी लागेल. केंब्राय, सेंट क्वेंटीन ह्या तोंडावर जर नोव्हेंबर पधरापर्यंत म्हणजे बर्फाचा मोसम सुरू होईपर्यंत जर्मन राहू शकले तर ह्या तोंडामागची त्याची आजचीं केंद्रस्थाने सुरक्षित राहातील आणि हिंवाळ्यातच तीन चार महिन्यात सांप्रतच्या केंद्रस्थानाच्या मागेहि नवीं केंद्रस्थानें निर्माण करून त्या केंद्रस्थानापासून लहान लहान आगगाड्याचे फाटे काढून पुढील सालच्या वसंत काळाच्या नव्या पीछेहाटीची त्याना तरतूद करता येईल. यंदाच्या पीछेहाटीची पूर्वीच तरतूद झालेली होती. आता खुद्द जर्मनीच्या सरहद्दीपर्यंत त्याना पीछेहाट करीत मागे सरकावयाचें आहे; आणि येवढ्या मोठ्या पीछेहाटीची मागच्या बाजूची व्यवस्था करण्यास त्याना फुरसत मिळालेली नाहीं. हिंडेनबुर्गी तोंड फोडून जर ॲंग्लो–फ्रेंच सेना आंत घुसली व आजची जर्मनांच्या पिछाडीचीं केंद्रस्थानें त्यांनीं हस्तगत केलीं तर जर्मनाची एकंदर पीछेहाट दिरगाईची न होतां अव्यवस्थित स्वरूपाची होईल आणि स्वतःची सरहद्द गांठल्यावरहि तेथे लढण्याची धमक त्याच्या अंगांत रहाणार नाहीं. पुढील सालच्या वसंत काळानंतरच्या लढायांच्या सात आठ महिन्यांच्या मोसमात फार झालें तर

अर्धा बेल्जम व अर्धा उत्तर फ्रान्स अम्ही सोडू अशी घमेंड जर्मन लष्कराला वाटत आहे. सेंटक्वेंटिन व केब्राय ह्या हिंडेनबुर्गी तोंडाला धरून जर पंधरा नोव्हेंबरपर्यंत जर्मन सेना बसू शकली तर त्याच्या घमेडीपैकीं कांहीं भागात तथ्यांश आहे असें अनुमान काढण्यास हरकत येणार नाहीं. तेव्हां सप्टेंबरमध्ये ह्या टापूत ज्याप्रमाणें प्रत्येक पावलासाठीं ते निकरानें लढले त्याप्रमाणें आक्टोबर–नोव्हेंबर महिन्यांतहि ह्या ठिकाणीं अत्यंत तुंबळ युद्ध माजून राहील. ह्या टापूत कोणी कोणास विसावा देणार नाहीं. कारण आक्टोबर–नोव्हेंबर महिन्यांत ह्याठिकाणीं ज्या लढाया होतील त्यावर सर्व पश्चिम रणभूमीचें पुढील सालचें स्वरूप अवलंबून आहे. सप्टेंबर महिन्यांत हा मध्य भागच तेवढा पेटलेला होता असें नाहीं तर व्हर्डूनपासून बेल्जमच्या किनाऱ्यापर्यंतची सर्वच रणभूमि पेटलेली होती. व्हर्डूनच्या पूर्वेस जर्मन तोंडात एक धाकटीशी पाचर पुढे आलेली होती. अमेरिकन सैन्यानें ही पाचर घेऊन जर्मनाचे तोंड सरळ केलें. त्याचप्रमाणें व्हर्डूनपासून ऱ्हीम्सपर्यंत जर्मन तोंडाला थोडेसें पुढे पोक आलेलें होतें तेहि पोक जर्मनीला मागे घेणे भाग पडलें. ह्या टापूत फ्रेंच व अमेरिकन सैन्य जर्मनाच्या पुढे उभे असून त्यांच्या रोज झटापटी जर्मनीशीं होत आहेत. नदी नाल्याचा जेथें आश्रय मिळेल त्या ठिकाणीं जर्मन सेना हट्टानें उभी राहत आहे. अँग्लो–फ्रेंच टॅंक्समुळे किंवा चालत्या बुरुजामुळें अँग्लो फ्रेंचांना विजय मिळतो. तेव्हा हे चालते बुरूज अगावर न येऊ शकतील अशाच ठिकाणीं जर्मनाना उभें राहावें लागतें. कालवा, लहानशी नदी किंवा ओढा ह्याचा आश्रय घेऊन जर्मन सेना उभी असल्यास तेथें टॅंकाचे कांहीं चालत नाहीं. तोफा व मशीनगन्स ज्यांच्यावर बसविलेल्या आहेत आणि जाड पोलादी पत्र्यानें जे झाकलेले आहेत असे लहान लहान बुरूज स्वतःच्या इंजिनाच्या गतीनें रस्ते नसले तरी उंच सखल जमिनीवर पाहिजे तेथे जाऊ शकतात. असले हजारो लहान मोठे बुरूज किंवा टॅंक अँग्लो–फ्रेंचानी तयार केलेले आहेत आणि गेल्या तीनचार महिन्यांत ह्या टॅंकच्याच जोरावर कित्येक ठिकाणीं जर्मनाची फळी फोडण्यांत आली. ते बुरूज पाण्यात रुतून बसतात किंवा पुढे उभीच भिंत आली तर त्यांना पंचाईत पडते. टॅंकना अडथळा होण्याकरितां जर्मनांनीं ऱ्हीम्सच्या पूर्वेकडील तोंडावर कित्येक ठिकाणीं भिंतीसारखेच चनेगच्ची बांध घालून ठेविले आहेत आणि कांहीं भागांत सुरुंग फेकणाऱ्या तोफा

आगल्या असून आसपास टँक आल्यास सुरुंग टाकण्याची व्यवस्था केली आहे. टँकाच्या विरुद्ध योजिलेले उपाय ऱ्हीम्सच्या पूर्वेस दृष्टीस पडत आहेत. ऱ्हीम्सपासून व्हर्डूनपर्यंतच्या टापूंत सप्टेंबर महिन्यांत फ्रेंच व अमेरिकन सैन्याची गति पांच सात मैलांहून अधिक झाली नाहीं. आक्टोबर आरंभाला त्या टापूंत लढाई मंदावल्यासारखी दिसली. तथापि आक्टोबरमध्ये फ्रेंच व अमेरिकन सेना पुन्हा जोर केल्यावाचून राहाणार नाहीं. ऱ्हीम्सपासून सेंट क्वेंटीनच्या टापूंत ऱ्हीम्सच्या पश्चिमेस सर्व ऐननदी अमेरिकन सेनेनें अद्याप गाठलेली नाहीं. १९१८ सालच्या प्रारंभापेक्षा येथेंच काय तो अधिक मुलुख जर्मनाच्या ताब्यांत राहिलेला आहे, पण सेंट क्वेंटिनच्या दक्षिणेकडून जर्मन सेनेवर फ्रेंच सेना जोराची चढाई करीत असल्यामुळे ऱ्हीम्सच्या पश्चिमेकडील ऐन नदीचाहि भाग जर्मनांना एकदोन आठवड्यात सोडावा लागेल असा अंदाज आहे.

व्हर्डूनच्या पूर्वेकडील तोंडापासून केंब्रायपर्यंतच्या तोंडाचा येथपर्यंत विचार झाला. फ्रान्सच्या रणभूमींतील जर्मनाची फळी पंचमुखी आहे. व्हर्डूनच्या पूर्वेकडील पहिलें तोंड, व्हर्डूनपासून ऱ्हीम्सपर्यंत दुसरें तोंड, ऱ्हीम्सपासून सेंट क्वेंटिनपर्यंत तिसरें तोंड, सेंट क्वेंटिनपासून केंब्रायच्या उत्तरेस लेन्सपर्यंतचें चौथें तोंड आणि लेन्सच्या उत्तरेस बेल्जमच्या किनाऱ्यापर्यंतचें पांचवें तोंड, अशीं हीं पांच तोंडे आहेत. ह्या पांच तोंडापैकीं ऱ्हीम्सपासून केंब्रायपर्यंतच्या मधल्या तोंडावर म्हणजे तिसऱ्या चवथ्या तोंडावर भयंकर लढाया सप्टेंबर महिन्यांत झाल्या आणि आक्टोबर व नोव्हेंबर महिन्यांत येथेंच अत्यंत उग्र स्वरूपाचें रणकंदन माजून राहिल्यावांचून रहाणार नाहीं. ह्या मधल्या तोंडावरील लढाई महायुद्धाची परिसमाप्ति करणारी आहे. व्हर्डूनच्या पूर्वेकडील तोंड आल्सासलारेन्सला चिकटून असून जर्मनी व आस्ट्रिया–हंगारी ह्या दोन्ही राष्ट्रांना सर्वांत जवळचें तोंड आहे. येथें कांहीं एकदम विशेष फेरबदल झाल्यास खुद्द जर्मनींतील व आस्ट्रियांतील कुमक तातडीनें पाठवितां येण्यासारखी आहे. शिवाय म्यूझनदी व सरहद्दीवरील बंदोबस्ताचीं ठिकाणें ह्याचाहि आसरा ह्या तोंडाला आहे. हे पहिलें तोंड दोस्तसरकाराच्या मुख्य बलाच्या केंद्रस्थानापासून सर्वांत अधिक दूर अंतरावर असल्यामुळे मनुष्यबल व यंत्रबल ह्याचा साठा अवचितपणें तेथें नेतां येणें कठीण आहे. फ्रान्सची रणभूमि इंग्लंड व अमेरिका ह्या दोन ठिकाणांतून

पोसली जाते. अर्थात् इंग्लिश चानलचा फ्रान्सचा किनारा व पॅरिस शहर ही दोस्त सरकाराची स्वतःच्या फळीच्या मागचीं निरनिराळ्या साठ्याचीं केंद्रस्थानें होत. हीं केंद्रस्थानें व्हर्डूनच्या पूर्वेच्या व पश्चिमेच्या तोंडाना म्हणजे पहिल्या व दुसऱ्या तोडाना दूर अंतरावर असल्यामुळे अवचितपणाचें किंवा बल एकगठ्ठा करण्याचे डावपेंच गेल्या चार वर्षात ह्या ठिकाणीं व्हर्डूनच्या झुन्जेशिवाय इतर प्रसंगीं फारसे दृष्टीस पडले नाहींत. हीं दोनहि तोंडे गेलीं चार वर्षे एका दृष्टीनें अचलच राहिली असें म्हणण्यास हरकत नाहीं. अलिकडे तीन चार महिने नव्या आलेल्या अमेरिकन सैन्याकडे हीं अचल तोंडे सोपविलीं असल्यामुळे तेथें थोडीशी हालचाल दिसू लागली आहे. ह्या बाजूची अमेरिकन सेना सबंध तोंडावर हल्ला चढवून तोंडातील एकाद दुसऱ्या अधु दातावर एकदम मोठ्या गठ्ठ्याचा घाव मारून दात पाडून भोंसक्यातून तोंडात शिरण्याइतकी अद्याप प्रबल झालेली नाहीं. पुढील सालच्या वसंतकाळीं सर्व तोंड दाबून धरून एकेक दात ठोका मारून पाडण्याची शक्ति अमेरिकन सेनेच्या अंगीं येईल. तोपर्यंत व्हर्डूनपूर्वेकडील तोंड आक्टोबर नोव्हेंबरच्या लढायापुरते अचलच राहणार असे धरून चालण्यास हरकत नाहीं. व्हर्डूनच्या पश्चिमेकडील दुसरें तोंड अमेरिकन फ्रेंच सैन्यानें दाबून धरलेले आहे. ह्या तोंडाचे अंगात दात पाडण्याची शक्ति अद्याप आलेली नाही. तोंड दाबून धरण्यापलिकडे ह्या बाजूला विशेष काहीं करण्याचा सेनापति फॉक ह्याचा विचार दिसत नाहीं. कारण, ह्या ठिकाणी जोराचे ठोके मारून दोन चार दात पाडून आत जरी घुसलें तरी मागे सरणाऱ्या जर्मन सेनेला ऐन नदीचा आसरा बऱ्याच ठिकाणीं मिळणारा असल्यामुळे फळी फोडण्यापासून प्राप्त होणारें सांठ्याचीं केंद्रस्थानें गाठण्याचें श्रेय फ्रेंचांच्या पदरात पडत नाहीं. तेव्हां आक्टोबर नोव्हेंबरच्या लढायांत हें दुसरें तोंड बऱ्याच अंशाने अचल राहणार असें धरून चालण्यास हरकत नाहीं. ह्या तोंडावर फ्रेंचाचा दाब मात्र जोराचा आहे. तिसरें व चौथे तोंड जर थपडा मारून एकदम मागें फिरविता आलें तर दुसऱ्या तोंडावरील दाब जर्मनीच्या पहिल्या दोन तोंडावरील बत्तीशीच्या बत्तीशी एकदम खिळखिळी करण्यास फार उपयोगी पडणार आहे, व ह्याच धोरणानें सेनापति फॉक ह्या दुसऱ्या तोंडाचा उपयोग करतील. खरीं लढणारीं तोंडे म्हणजे ऱ्हीम्सपासून केब्रायपर्यंतचीं दोन तोंडे होत. ह्या दोन तोंडांतून जर्मनानीं दोन जिव्हा एक अमीन्सकडे व एक मार्ननदीकडे अशा बाहेर

काढल्या होत्या. ह्या जिव्हाच्या सभोवती चराच्या दाताच्या बत्तीशीचा कोट बांधल्या जाण्यापूर्वी सेनापति फॉक ह्यानीं सप्टेंबर प्रारभाला दोन्ही जिव्हा मोठया शिताफीनें कापून टाकल्या. सप्टेंबर अखेरपासून ह्या दोन तोडानी हिंडेनबर्गी दांत पाडण्याचें कार्य सुरू झालें आहे. सेंट क्वेंटिनचा दांत पडला व केंब्रायचा दात हालू लागला. पण ह्या ठिकाणीं प्रत्येक पडणाऱ्या दाताच्या मागें चिकटून दुसरा दांत उभारण्याची व्यवस्था जर्मनानी केलेली असल्यामुळे तोडाला भोसका पडत नाहीं आणि हल्ला करणाऱ्या सैन्याला दातांत सापडूनच काम करावें लागत असल्यामुळें बरेंच सैन्य दाढाखालीं चिरडू द्यावें लागतें. शिवाय एकाददुसरा दांत पडला तर लगेच उलट हल्ले करून ती खिंड भरून काढण्यास जर्मन अत्यत तत्पर होऊं लागले आहेत. हिंडेनबुर्गी बत्तीशी उपटून टाकावयाची ह्या निश्चयानें सेनापति फॉक ऱ्हीम्सपासून केंब्रायपर्यंत सप्टेंबर अखेरीपासून लढू लागले आहेत; आणि हे दात हालू द्यावयाचे नाहींत निदान ह्या हिंवाळ्यापुरते तरी ह्या तोंडांत खिंड पडू द्यावयाची नाहीं अशा हट्टानें जर्मनी ॲंग्लो–फ्रेंचाशीं लढत आहे. हिंडेनबुर्गी दात पडतात का शाबूत रहातात ह्या गोष्टीकडे आक्टोबर–नोव्हेंबर महिन्यात सर्व जगाचें लक्ष लागून राहील. युरोपची राजकीय परिस्थिति अशी नाजूक चमत्कारिक माप्रत झाली आहे, कीं जर्मनीच्या ह्या तिसऱ्या व चौथ्या तोंडांतील कोणच्याहि हिंडेन बुर्गी दाताकडे कोणासहि दुर्लक्ष करून भागावयाचें नाहीं. ऱ्हीम्सपासून केंब्रायपर्यंतचे क्षेत्र मुख्य रणक्षेत्रच होणार. कारण ह्या रणक्षेत्राला दुसरें व पाचवे तोंड मदत करीत रहाणार. दुसरें तोंड जसें सप्टेंबर महिन्यांत गप्प बसलेलें नव्हतें तसें पाचवेंहि तोंड सप्टेंबर महिन्यांत गप्प बसलेलें नाहीं. लेन्सपासून यिप्रेसपर्यंतच्या भागात इंग्रजानीं जर्मनावर हल्ले चढविले आणि आर्मेंटेरिसच्या चढाईंत जर्मनांनीं गिळलेला मुलूख सगळा ओकावयास लाविला. यिप्रेसपासून बेल्जमच्या किनाऱ्यापर्यंत ॲंग्लो–फ्रेंच व बेल्जम सेनेनें डिक्स्मूर घेऊन जर्मनांची फळी पांचसात मैल मागे रेटली. तसाच प्रसग आल्यास बेल्जमचा किनारा सोडून आस्ते आस्ते मागें सरकण्याची जर्मनीची तयारी चालू झाली आहे. बेल्जम किनाऱ्यावरील अवजड तोफा जर्मनीनें काढून नेल्या आहेत, व आपल्या पिछाडीच्या बेलजियन खेडयाना व गांवांना आगी लावून बेल्जियन प्रांत उध्वस्त करण्याचा सपाटा सुरू केला आहे. यंदाच्या हिंवाळयात पहिलें व दुसरें तोंड अचल ठेवावयाचें आणि हिंडेनबुर्गी दोन तोडांत निकरानें

लढून कांहीं दांत पुढेमागे होण्याशिवाय इतर फेरफार होऊं द्यावयाचा नाहीं व वेल्जमच्या तोंडांत प्रसंगानुसार पांच दहा मैल मागें सरकावयाचें असें हिवाळयांपर्यंतचें जर्मनीचें धोरण आक्टोबर प्रारंभाला दृष्टीस पडतें.

हे धोरण जर जर्मनीस डिसेंबरपर्यंत अमलांत आणतां आलें तर पश्चिम रणभूमींतील पुढील सालच्या वसंतकाळचा मृत्यु लांबणीवर टाकतां येण्यासारखा आहे. पुढील सालच्या वसंतकाळीं पाचहि तोंडावर दोस्त सरकारचें सैन्य भरभक्कम होऊन प्रत्येक तोंडांतील दांत ठोके मारून पाडण्यास समर्थ होईल. त्यावेळीं पहिलें तोंड जर्मनीला निकरानें लढवावें लागेल. हे पहिले तोंड अचल ठेवून दुसरें तोंड जर प्रारंभी एकदोन महिने लढून ऐन नदीवर अचल करता आलें तर पुढील सालच्या वसंतकाळच्या तीनचार महिन्यांत जर्मनीला दुसरें, तिसरें व चौथे तोड मिळून व्हर्डूनपासून लिलेपर्यंतच्या सरळ रेषेत मागें नेतां येईल; व पुढील सालच्या जुलैपासून नोव्हेंबरपर्यंत ह्या सरळ रेषेच्या तोडांतील नवे दांत पुन्हां निकरानें लढतील. व्हर्डूनपासून लिलेपर्यंतची सरळ रेषा आणि लिलेपासून ॲटवर्पपर्यंत सरळ रेषा असा नवा जबडा नवे दांत बसवून येत्या हिवाळयात तयार करावयाचा आणि त्या नव्या जबडयाला पोचावयाला वसतकाळचे चार महिने घालवून पुढील चार महिने तो नवा जबडा लढवावयाचा, अशा रीतीने पश्चिम रणभूमीतील पुढील सालचा खात्रीचा मृत्यु टाळावयाचा हे काय ते जर्मनींचें लष्करी धोरण पश्चिम रणभूमीत आतां शिल्लक राहिलेलें आहे. हिंडेनबुर्गी दांत आक्टोबर–नोव्हेंबर महिन्यात जर जागच्या जागीं राहिले तर हिंवाळयाच्या सुट्टींत नवा जबडा जन्मास आणण्याच्या गोष्टी ! आक्टोबर नोव्हेंबर महिन्यात हिंडेनबुर्गी दांतच शिल्लक ठेवावयाचे नाहींत आणि ज्या जागी नवा जबडा जन्मास यावयाचा आहे तीच जागा नोव्हेंबरात व्यापून टाकून पुढील सालीं मृत्यु टाळण्याच्या जर्मनीच्या आशाच नष्ट करून टाकावयाच्या अशा निश्चयानें सेनापति फॉक हे हिंडेनबुर्गी दातावर आक्टोबर आरंभापासून थपडा मारू लागले आहेत. नवा जबडा तयार करण्यास फुरसद मिळून पुढील सालींहि पश्चिम रणभूमीत मृत्यु टाळतां येणें आम्हास शक्य आहे, हें आक्टोबर नोव्हेंबर महिन्यात जर्मनीस सिद्ध करावयाचें आहे. असलें बल शत्रूच्या अंगीं नाहीं असें सेनापति फॉक यांना पुढील महिन्या दीड महिन्यांत सिद्ध करावयाचें आहे. या झुंजींत कोणाचा

मुद्दा सिद्ध होतो या गोष्टीवर इतर ठिकाणची रणभूमि व तहाची वाटाघाट पूर्णांशाने अवलंबून असल्यामुळें ही झुंज अत्यंत निकराची होईल हें सांगणें नकोच.

या झुंजीला इतकें विलक्षण महत्त्व आजच कसें प्राप्त झालें आहे हें नीट ध्यानात येण्याकरिता बल्गेरियाच्या घरीं बसण्याकडे आणि तहाच्या वाटाघाटीकडे आता आपण पाहू या. पश्चिम रणभूमींत जर्मनीची पीछेहाट सुरू झाल्यामुळे बल्गेरियन लोकाच्या विचारांत जुलई महिन्यापासूनच क्रांति सुरू झाली होती. जर्मनीकडचा ओढा कमी होऊन अमेरिकेच्या बाजूला बल्गेरियाचा कल ढळू लागला होता. शिवाय रशियांतील बोल्शेव्हिक ऊर्फ सडेसोटांचीं मतं बल्गेरियांत पसरू लागल्यामुळे लढाईचा कटाळा बल्गेरियास आला होता. यामुळे जर्मनीच्या बाजूचें प्रधानमडळ लोकांना अप्रिय होऊन इम्रजाच्या वतीचे मुख्यप्रधान आगस्ट महिन्यांत बल्गेरियन पार्लमेंटनें अधिकारारूढ केलें. अशा स्थितींत सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात सालिनोका येथील ग्रीशन, सर्व्हियन व ॲंग्लो-फ्रेंच सैन्याने बल्गेरियन सैन्यावर एकदम चढाई करून मासिडोनियामध्यें मोनास्टिरच्या उत्तरेस बल्गेरियाचा मोठा पराभव केला व बल्गेरियास उत्तरेस यूस्कपर्यंत मागे पिटाळून लाविलें. तारीख २३ सप्टेंबरला बल्गेरियाचा राजा झार फर्डिनड याने जर्मनीची मदत मागितली, पण पश्चिम रणभूमींत जर्मनो स्वतःचाच प्राण बचावण्याची लढाई लढत असल्यामुळें बल्गेरियन सैन्याला व लोकाना आस्ट्रो-जर्मनावर विश्वास टाकून पुढे लढाई चालविणें इष्ट वाटलें नाहीं. तेव्हां नव्या मुख्यप्रधानानें ॲंग्लो-फ्रेंचाशीं तहाचें बोलणें करून तारीख ३० सप्टेंबर रोजी तहावर दोन्ही पक्षाच्या सह्या झाल्या. या तहानें शस्त्रास्त्र खाली ठेवून बल्गेरियन सैन्याने घरी बसण्याचें कबूल केलें. तीस हजार पायदळ व तीन चार घोडेस्वाराच्या तुकड्या येवढेच सैन्य बल्गेरियानें खडें ठेवावयाचें आहे. एक महिन्याच्या आंत आस्ट्रो-जर्मनानीं बल्गेरिया सोडून गेलें पाहिजे व बल्गेरियन आगगाड्याचा उपयोग दोस्त सरकारांना करण्याची परवानगी मिळाली पाहिजे अशी एक अट तहात आहे. शिवाय सर्व राष्ट्राचा मिळून जो मोठा तह होईल त्या तहात ठरेल त्याप्रमाणें मुलखाची वाटणी करून घेण्यास बल्गेरियानें कबुली दिली आहे. हा तह झाल्याबरोबर झार फर्डिनड यांनीं आपली गादी सोडिली व युवराज बोरीस हे राजे झाले. ग्रीसमध्ये किंग कान्स्टंटाईन याना प्रधानमंडळाच्या धाकामुळे जशी गादी सोडावी

लागली तशीच स्थिति किंग फर्डिनंड यांची झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. अमेरिकेस मिळत चाललेला जय, महायुद्ध लांबल्यामुळे लढाईचा आलेला कटाळा, जर्मनीचा पराभव, शेवटीं बल्गेरियन सेनेची झालेली दाणादाण, या चार कारणामुळें बल्गेरियांत राज्यक्रांति घडून येऊन बल्गेरियानें घरीं बसण्याचा तह केला व बाल्कन प्रदेशातील महायुद्धाचें स्वरूप एकदम पालटविलें. या बल्गेरियन तहाचें महत्त्व पश्चिम रणभूमींतील विजयाइतकेच मोठें आहे. आक्टोबर महिन्यांत बल्गेरियाच्या आगगाड्या जर दोस्त सरकारांच्या हातीं गेल्या तर तुर्कांचा जर्मनीशीं असलेल्या आगगाड्याचा संबंध तुटतो आणि कान्स्टांटिनोपलवर बल्गेरियातून हल्ला करणें सोपें होतें. तुर्कांचा पालिस्टैनमध्यें मोठा पराभव होऊन दमास्कस इंग्रजाच्या हातीं पडून हिवाळ्यांत आलेपोवर चाल करून जाण्याची इंग्रजांची तयारी चालू आहे. हिंवाळ्यात फ्रान्समध्यें जरुरी लागणार नाहीं असें पाचसात लाख सैन्य दोस्त सरकारांच्या पाशीं शिल्लक राहणार. हे सर्व शिल्लक सैन्य जर नोव्हेंबरमध्यें सालिनोका येथें उतरलें आणि बल्गेरियाच्या आगगाड्या दोस्त सरकाराच्या हातीं पडून कान्स्टांटिनोपलवर चढाई झाली तर डिसेंबरांतच बल्गेरियाप्रमाणें तुर्कांनाहि शस्त्रास्त्रें खाली ठेवून इंग्रजांच्या स्वाधीन होणें भाग पडेल. तुर्क गळाठले म्हणजे दार्दानेलीसची सामुद्रधुनी खुली होऊन काळया समुद्रावर इंग्रजी आरमार खेळूं लागेल. काळया समुद्रामार्फत व बल्गेरियामार्फत रुमानियाची व रशियाची पुन्हा उठावणी करण्यात येईल आणि सर्व्हिया, रुमानिया व रशिया या तिन्ही बाजूंनी आस्ट्रो–जर्मनावर पुन्हां हल्ले सुरू होतील. महायुद्धाची पहिलीं तीन वर्षें पूर्व, दक्षिण या दोन दिशा शांत करून चौथ्या वर्षापासून जर्मनी पश्चिमेच्या एका दिशेसच लढत आहे. बल्गेरियाच्या आगगाड्या जर आस्ट्रो–जर्मनांनीं आपल्या ताब्यात ठेविल्या आणि यूस्कपच्या वरच्या सर्व्हियास जर त्यांनीं सोडलें नाहीं तर या नव्या मोठ्या अनर्थापासून त्याचा काही काळ बचाव होणार आहे.

इराणात घुसण्याकरितां काकेशियस पर्वताच्या टापूंत टर्कीनें मोठें सैन्य गोळा केले आहे. शिवाय रुमानिया व युक्रेन या काळया समुद्राच्या काठच्या प्रांतांत जर्मनीचें तीन चार लाख सैन्य आहे. काळया समुद्राच्या कांठच्या रशियावर धाक बसविण्याकरितां व प्रसंगविशेषीं काळा समुद्र व कास्पियन समुद्र या मार्गानें इराण व अफगाणिस्थान यांच्या सरहद्दीवर हे सैन्य

आणून हिंदुस्थानावरील किंवा इराणावरील स्वारींत टर्कीस मदत करण्याकरितां जर्मनीनें हे सैन्य ठेविलें आहे. मास्कोच्या पूर्वेस व्होलगा नदी व उरल पर्वत याच्या टापूत रशियांतील लेनीनचें सैन्य जर्मन सैन्याच्या मदतीनें पुढे सरकत आहे. झाकोस्लवाचा पराभव करावयाचा, झाकोस्लवाना उरल पर्वताच्या पूर्वेस लांब दूरवर हाकून लावावयाचे व नंतर लेनिनचें आणि स्वतःचें सैन्य रशियातून मास्कोओरेंबर्ग–समरकद–बुखारा या आगगाडीनें अफगाणिस्थानच्या सरहद्दीवर आणावयाचें असा डाव जर्मनी रशियात खेळत आहे. काकेशियसच्या बाजूचे तुर्क व काळया समुद्रावरील तीन चार लाख जर्मन हे जर सर्व्हियाच्या व बल्गेरियाच्या रणभूमीकडे धावून आले तरच बल्गेरियन तहामुळे बाल्कन प्रदेशात जर्मनीची झालेली नाचक्की काही काळ थांबणार आहे. आक्टोबरचे पहिल्या आठवड्यात बल्गेरियाच्या आगगाड्या जर्मनीनें ताब्यांत घेतल्या; पण बल्गेरियन तहानें इराण व हिंदुस्थान या देशावरील स्वारीचे बेत ढासळले. इतकेंच नव्हे, तर दक्षिणेच्याहि बाजूनें आस्ट्रो–जर्मनाना चांगलाच भुंगा लागला. या पेचातून आस्ट्रो जर्मनाना जर पार पडता आलें नाहीं तर पश्चिम रणभूमीत ते कितीहि निकरानें लढले तरी ते लढणें पूर्व व दक्षिण पुन्हा पेटल्यानें अगदीं निरर्थक होणार आहे. बल्गेरियन तहाचा हा विलक्षण परिणाम आस्ट्रो–जर्मनानी ओळखला असून आक्टोबरच्या पहिल्या आठवडयात त्यानीं प्रे. विल्सन याजकडे तहाचें बोलणें सुरू केलें आहे. आगस्ट महिन्यात आस्ट्रियानें हे बोलणें लाविलें होतें; पण प्रे. विल्सन यानी आस्ट्रियाला धुडकावून लाविले. जर्मनींत जबाबदार राज्यपद्धति सुरु होऊन जर्मनीच्या प्रधानमंडळाशीं बोलणें म्हणजे लोकाशी बोलणें होय, असे सिद्ध झाल्याशिवाय जर्मनीशीं काहींच बोलावयाचें नाहीं असे अमेरिकेनें ठरविलें होते. आस्ट्रियातील व जर्मनीतील लोक बल्गेरियाप्रमाणेंच लढाईला कटाळले असून ही लढाई केव्हा थांबेल असें त्याना झालेलें आहे. शिवाय लढाई जिंकली तरी वरच्या लोकानाच काय तो फायदा आणि खालच्या लोकाना काहींच हक्क नाहीं अशी त्याची समजूत आहे. लोकांची ही समजूत दूर करण्याकरिता व अमेरिकेने तहाचें बोलणें निदान धुडकावून तरी लावू नये या उद्देशाने जर्मनी व आस्ट्रिया दोन्ही देशांच्या बादशहांनी आपापल्या देशांतील पार्लमेंटच्या विश्वासाचें प्रधानमंडळ नेमण्याचा क्रम सप्टेंबर अखेरीस अमलांत आणून जर्मनी व आस्ट्रिया

येथें जबाबदार राज्यपद्धति सुरू केली आणि लगेच आक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात जर्मनीचे नवे मुख्यप्रधान प्रिन्स मॅक्स यांनीं अमेरिकेकडे तहाचें बोलणें सुरू केलें. बेल्जमला पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत येईल, आल्साक्लारेन्सला स्वराज्य देण्यात येईल, पोलड लुथिआनिआ वगैरे प्रातांना स्वसमतीचें तत्त्व पूर्णपणें लागू करण्यात येईल, आस्ट्रियाच्या गॅलिशियापैकीं काही भाग पोलडला देण्यात येईल, बोसनिया हरगोव्हिना व हगारीचे पोट विभाग याना स्वराज्य देण्यांत येईल आणि इतर सर्वांना ‘ ना खडणी ना मुलूख ’ हे तत्त्व लागू करण्यात येऊन सर्व ठिकाणीं सर्वांना व्यापाराचे व समुद्रावरील हालचालीचे सारखेच हक्क मिळून सर्व राष्ट्राचा एक सघ स्थापून त्या सघामार्फत राष्ट्राराष्ट्रातील तटे मिटविण्यांत येतील. आस्ट्रो–जर्मनांच्या नव्या तहाच्या बोलण्यानें स्वरूप वरील आकाराचें असून प्रे. विल्सन यांचीं बहुतेक सर्व तत्त्वें त्यानीं मान्य केली आहेत. अशा प्रकारें तह झाल्यास तो बरोबरीच्या नात्याचा तह होईल आणि रशियाच्या विनाशामुळे महायुद्धातून जर्मनी एकटा अधिक धष्टपुष्ट बाहेर पडून सर्वांवर जर्मनीचाच वरचष्मा राहील. वरील तहाचा अखेर परिणाम असा होत असल्यामुळे इग्लड, फ्रान्स व अमेरिका येथील प्रमुख वर्तमानपत्रानी वरील तहाचें बोलणें धिडकारिलें आहे. उत्तर फ्रान्स व बेल्जम सोडून स्वदेशांत जाऊन जर्मनीनें शस्त्र खालीं ठेविल्याशिवाय त्यांच्याशीं तह होणें अनिष्ट होय असें सर्वांचें एकमत झाले आहे. अर्थात् प्रे. विल्सनहि जर्मनीचें तहाचें बोलणें उचलून धरणार नाहीत. तेव्हा तहाच्या वाटाघाटीकडे लक्ष पुरवीत असताना पश्चिम रणभूमीत जर्मनी हिंडनबर्गी तोंड कितपत धरून बसू शकतो आणि बाल्कन प्रदेशात बल्गेरियानें पाडलेलें भित कितपत पुन्हां सावरू शकतो याकडे वाचकानीं अधिक लक्ष पोचवावें, अशी सूचना आहे.

— —

# महायुद्धाचा पांचव्या वर्षाचा आक्टोबर--नोव्हें. महिना

## युद्धतहकुबी झाली

तारीख ११ नोव्हेंबर १९१८ रोजीं सकाळीं पाच वाजतां तात्पुरती लढाई तहकूब ठेवण्याच्या तहावर जर्मनी व दोस्त सरकार याच्या सह्या होऊन त्याच दिवशीं ११ वाजतां चोहोंकडे लढाई बंद झाली. या तात्पुरत्या बंदीनंतर फ्रान्समध्ये पारिस येथे सर्व लढवय्या राष्ट्रांचे वकील जमून तहाची वाटाघाट व्हावयाची आहे. प्रे. विल्सन हे स्वतः अमेरिकेतून फ्रान्समध्ये या वाटाघाटीस यावयाचे असून त्यांच्या अध्यक्षतेखाली तहाचीं कलमें ठरतील आणि डिसेंबर–जानेवारी महिन्यात पक्या तहावर सर्वांच्या सह्या होऊन महायुद्धाची परिसमाप्ति होईल. तात्पुरत्या तहावर जर्मनीची सही होण्यापूर्वी आक्टोबर महिन्यात टर्की व आस्ट्रिया यानीं इंग्लंडशी व इटलीशी तात्पुरत्या बंदीचे तह करून घेतले. सप्टेंबर अखेरीला बल्गेरियानें आपल्या पुरता तात्पुरता तह केल्यानंतर जर्मन संघातील अंतस्थ दुबळेपणा सर्वांच्या नजरेस आला आणि अखेरीस जर्मन संघाची भव्य इमारत ढासळून जाऊन दातीं तृण धरून तह केल्याशिवाय जर्मनीला गत्यंतर राहाणार नाहीं, असें सर्वांच्या नजरेस आलें. आगस्ट व सप्टेंबर या दोन महिन्यात पश्चिम रणभूमींत जर्मन सेनेची जी पीछेहाट झाली त्या पीछेहाटीवरून महायुद्ध जर्मनीच्या आंगलट येऊं लागलें असें सर्वांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. अमेरिका दर महिन्यात दोन अडीच लाख सैन्य फ्रान्समध्ये पाठवूं लागल्यामुळे जर्मनांची वरचढ होण्याची आशा मुळीच उरली नाहीं. वरचढ नाहीं तर नाहीं निदान बरोबरीच्या नात्याचा तह कसा घडवून आणितां येईल याची विवंचना आस्ट्रो-जर्मन मुत्सद्दी करूं लागले. प्रे. विल्सन यानी सर्वांना समतेनें व न्यायानें वागवून स्वसमतीचा तह घडवून आणण्याची आपली प्रतिज्ञा दोन तीन वेळा जाहीर केली होती. या प्रतिज्ञेकडे शत्रूंच्या मुलखातील सर्व प्रजेचें लक्ष जाऊन जो तो असें विचारूं लागला कीं प्रे. विल्सन याच्या मताप्रमाणें तह झाल्यास त्यांत मानहानि कोणाची ? जर्मनीतील लष्करशाहीच्या मनातून प्रे. विल्सन यांच्या बुद्धीवर विसंबून न राहतां रणांगणावर प्रथम बरोबरीचें नातें कबूल करून घ्यावयाचें होतें आणि नंतर समतेच्या आणि स्वसमतीच्या तहाच्या वाटाघाटीस बसावयाचें होतें. आस्ट्रियाच्या लष्कर-

शाहीच्याहि मनांत तसेंच होतें. पण प्रजाजनांना तितका दम निघेना. रणांगणावर बरोबरीचें नातें दोस्त सरकारानींहि कबूल करावयाचें म्हणजे हें काय ? ह्याचा अर्थ असा आहे की ज्याप्रमाणें सप्टेंबर आक्टोबर महिन्यांत आस्ट्रो–जर्मन तह करण्यास उत्सुक झाले होते त्याच प्रमाणें एकदाचा तह होवो अशी विवंचना दोस्त सरकारांसहि जर उत्पन्न झाली असती तर रणभूमीवर बरोबरी ठरली असती. हिंडेनबुर्गच्या तोंडावर जर जर्मन सेनेला ठामपणें उभे राहाता आलें असतें तर कदाचित तसली प्रबल इच्छा दोस्त सरकारांतहि दृष्टीस पडली असती. पण सप्टेंबर महिन्याप्रमाणें आक्टोबर महिन्यांतहि जर्मनाची पीछेहाट सुरूच राहिली. मग बरोबरीच्या नात्याचा भास जर्मन लष्कराला कोठून झाला ? जर्मन सेनानायकांचें असें म्हणणें पडेल कीं ही पीछेहाट होतां होतां म्यूज नदीवर किंवा ऱ्हाइन नदीवर जर्मन सेना पोहोचल्यावर जर्मन तोंड अरुद होईल. आणि मोठया नदीचा आश्रय मिळाल्यामुळे वर्ष दोन वर्षे जागा पकडून बसण्यास जर्मन सेनेस अडचण होणार नाहीं. एखाद्या किल्ल्यास वेढा पडावा आणि एक दोन वर्षे वेढा देऊनहि किल्ला सर न झाल्यास बरोबरीचें नाते कबूल करण्यास ज्याप्रमाणे वेढा देणारे तयार होतात त्याप्रमाणें दोस्त सरकारहि आणखी एकदोन वर्षे लढून कटाळा आल्यावर बरोबरीचें नाते आपण होऊन कबूल करण्यास तयार होतील, अशा धोरणानें जर्मन सेना सप्टेंबरपासून लढत होती. जर्मन सेनेच्या कर्तृत्वासंबधानें विचार करताना तारीख ११ नोव्हेंबर रोजी तात्पुरत्या बंदीचा तह होईपर्यंत वरील धोरणाला धरूनच अखेरपर्यंत निकरानें जर्मन सेना लढली आणि वरील धोरण अमलांत आणण्याचें सामर्थ्यहि आपल्या पुरतें जर्मन सेनेनें दाखविले हे नमूद करून ठेवणें इतिहासकारांना भाग आहे. पण सर्व गोष्टींवर जर्मन सेनेची सत्ता नसल्यामुळे दाती तृण धरून शरणचिठीचा अपमानकारक तात्पुरत्या युद्ध बंदीचा तह जर्मन सेनेस करावा लागला.

जर्मन सेनेच्या सत्तेबाहेरच्या ज्या गोष्टीमुळें जर्मनीचा लष्करी डोलारा अखेरीस ढासळला त्या गोष्टीचा आतां विचार करूं. सक्तीच्या लष्कराची पद्धत अमलांत येऊन एकेका राष्ट्राचें चाळीस–चाळीस पन्नास–पन्नास लाख सैन्य झालें असता सैन्याचें शौर्य, आज्ञाधारकपणा व सेनानायकाचें चातुर्य येवढ्यावरच युद्धातील जयापजय अवलंबून रहात नाहीं. एक सैन्य दुसऱ्या सैन्याशीं लढत नसून एक सबंध राष्ट्र दुसऱ्या सबंध राष्ट्राशीं हल्लींच्या काळीं लढत असते. रणभूमीवर उभे असलेल्या तीस

चाळीस लाख सैन्यास दारूगोळ्याचा व अन्नपाण्याचा एकसारखा पुरवठा करण्याकरितां तीस चाळीस लाख लोकांनीं निरनिराळ्या कारखान्यातून रात्रंदिवस खपावें लागते. दरसाल पाचसहा लाख नवीन तरुणांची भरती सैन्यात करावी लागते, आणि त्याचप्रमाणें निरनिराळ्या कारखान्यातूनहि काम करण्याकरितां नवीन पाच सहा लाख लोक पुढे यावे लागतात. या मजुराना व सैनिकांना भरपूर खावयास मिळावें म्हणून बाकीच्या सर्व राष्ट्राला स्वतःच्या पोटास चिमटा घ्यावा लागतो. शिवाय पैशाची तरतूद करताना लोकानीं एकसारखे सरकारी कर्जरोखे विकत घ्यावे लागतात. पैसे द्या, मजूर द्या, रिक्रूट द्या, आणि तुम्ही उपाशी रहा अशी मागणी सरकारची एकसारखी सुरू असते. या मागणीप्रमाणें पैशांचा, मजुरांचा, अन्नपाण्याचा आणि रिक्रूटचा पुरवठा जर राष्ट्रास करिता आला नाहीं तर जमीन धरून बसून दमानें लढून बरोबरीची कुस्ती सोडविण्याचें धोरण अखेरीस आगलट येतें. आगस्ट महिन्यांत जर्मनीची पीछेहाट व्हावयास लागल्याबरोबर दारूगोळ्याचा तुटवडा पडला, ॲंग्लो–फ्रेंचांच्या टॅंकाच्या ऊर्फ चालत्या बुरुजांच्या विरुद्ध नवीन टॅंक जर्मनींत तांतडीनें उत्पन्न होईनासे झाले, आणि महायुद्धाकरिता जर्मनींतील मजुरांचा पक्ष फाजील कष्ट सोसण्यास राजी होईना! इग्लड व फ्रान्स या दोन देशात मजुरांसबधी व पैशासबधीं जी मदत लष्करला झाली त्या मदतीच्या मानानें जर्मन मजुराची मदत फारच कमी पडली. इग्लडात याचवेळीं मजुराचे मोठमोठे सप झाले ही गोष्ट खरी; पण सपवाल्याच्या सर्व अटी कबूल करून पाण्यासारखा पैसा खर्च करून इग्लड मजुरीच्या सकटांतून पार पडलें. जर्मनींत मजुराच्या नाखुषीबरोबरच पैशाची व अन्नाची टचाई वाढूं लागली. असलें अतस्थ सकट सर्व राष्ट्राच्या स्वयस्फूर्तीच्या मदतीनेंच टळत असते. ही स्वयस्फूर्तीची मदत फ्रान्समध्ये अत्यंत तेजस्वीपणानें महायुद्धाच्या काळात दृष्टीस पडली. फ्रेंच राष्ट्र स्वयंस्फूर्तीच्या निकरानें जितके लढलें, स्वयस्फूर्तीच्या मदतीनें जितके राबलें आणि स्वयस्फूर्तीच्या तपश्चर्येनें जितके उपाशी राहिलें तितके या महायुद्धाच्या काळात दुसरें कोणतेहि राष्ट्र लढलें नाहीं, राबलें नाहीं, किंवा उपाशी राहिले नाहीं. ही स्वयस्फूर्तीची मदत फ्रान्समध्येंच कोठून आली? फ्रान्समध्यें खरी लोकशाही असल्यामुळे लष्कर निराळे, मुत्सद्दी निराळे, असले तीव्र मतभेद नाहींत. जर्मनींत कैसरची सत्ता अरेरावी स्वरूपाची पडल्यामुळें लष्कर व लष्करी व्यवस्था तेवढी

कैसरच्या व त्याच्या हाताखालील सेनानायकांच्या विलक्षण कर्तृत्वामुळें उत्तम प्रकारची राहिली. पण मुत्सद्दी, मजूर व सामान्य लोक यांचें या लष्करशाहीवर प्रेम न राहून पोटाला चिमटा घ्यावयाच्या वेळीं लागणारा आपलेपणा लष्कराशिवायच्या बाकीच्या राष्ट्रात स्वाभाविकपणें दिसून आला नाहीं. पश्चिम रणभूमींत पीछेहाट सुरू होण्याबरोबर आणि दमाची लढाई लढणें भाग आहे असें दृष्टीस पडल्याबरोबर जर्मनींतील लष्करशाहीनें जर्मनींत लोकशाही निर्माण करण्याचा उद्योग आरंभिला. युद्ध अंगलट येत चाललें असतां राष्ट्रात लोकशाही जर नसेल तर लष्करशाहीचा हां हां ह्मणता चुराडा होतो, हे रशियाच्या राज्यक्रांतीनें आस्ट्रो–जर्मन मुत्सद्याच्या व सेनानायकाच्या लक्षात आलें होतें. त्याचप्रमाणें लढाई अंगलट आली तरी एक प्रकारच्या विलक्षण चिकाटीनें लढण्याचें सामर्थ्य लोकशाहींत उत्पन्न होतें हे फ्रान्सच्या उदाहरणावरून सिद्ध झालें होतें.

रशियात राज्यक्रांति होण्याबरोबरच स्वतःचे देशांत बादशाही सिंहासन कायम ठेवून इंग्लंडप्रमाणें लोकशाही सुरू करण्याचा मार्ग आस्ट्रो–जर्मनांनीं आपण होऊन स्वीकारावयास पाहिजे होता. पण रशिया सपशेल पडल्यामुळे आस्ट्रो–जर्मनांच्या लष्करशाहीला आपला काळ जवळ आला असें न वाटतां आपण अधिक सबळ झालों असेंच वाटले. रशियाच्या जागीं अमेरिका दोस्त सरकाराच्या बाजूला जरी उभी राहिली तरी अमेरिकेस आपण थोपवून धरू शकू असें आस्ट्रो–जर्मन लष्करशाहीला वाटणें सहाजिक होतें. रशियांत जर राज्यक्रांति झाली नसती तर एकदर रणभूमीची जी स्थिति राहिली असती ती स्थिति अमेरिका महायुद्धात पडल्यानें कायम राहिली. रशियात राज्यक्रांति झाली नसती तर रणभूमीची कोणती स्थिति झाली असती? रशियाचा दोनदा मोठा पराभव झाला होता खरा; पण रशियाचा सेनाशकट कांहीं मोडलेला नव्हता; आणखी थोडकी पीछेहाट करून दमानें लढण्याची ताकद रशियाच्या लष्करात कायम होती. आक्टोबरात पश्चिम रणभूमीमध्ये जर्मन सेनेची जी स्थिति तीच स्थिति राज्यक्रांतीपूर्वी पूर्व रणभूमीत रशियाची होती. रशियातील लोकांनीं राज्यक्रांति करून रशियांतील लष्करशाही मोडून जर्मनसेनेच्या पदरीं मोठा विजय टाकिला. जर्मन सेनेनें तो रणांगणावर मिळविला नाहीं. तसला विजय रणांगणावर मिळविण्यास जर्मनीमध्ये व विशेषतः आस्ट्रिया हंगेरियामध्ये जे लोकांचें पाठबळ लष्करास मिळावें लागते ते पाठबळ लोकशाहीच्या

अभावीं मिळण्यासारखे नव्हतें. रशियाशीं लढतांना आस्ट्रिया–हंगारीची कितीतरी तारांबळ उडाली! सर्व्हियावरहि आस्ट्रिया–हंगारीला जय मिळवितां येईना. कार्पेथियन पर्वत रशियानें जवळ जवळ कबजांत घेतल्यासारखा केला होता. आस्ट्रिया–हंगारीच्या या तारांबळीच्या वेळी जर्मन सेनेची कुमक पोचून रशियाची दोनदां मोठी पीछेहाट झाली, सर्व्हियाचा पराभव झाला, रुमानियाचा पराभव झाला आणि इटलीच्या व्हेनीस प्रांतांत आस्ट्रियन सेनेस तळ देऊन बसता आलें. आस्ट्रिया-हंगारींत लोकशाही नसल्यामुळे लोकांच्या स्वयंस्फूर्तीची मदत या महायुद्धात आस्ट्रियाच्या लष्करशाहीस बिलकूल झाली नाहीं. जर्मनींत लोकशाही जरी नव्हती तरी मजुरांचें शिक्षण, खाणेंपिणें व आरोग्य या बाबींकडे इतर देशापेक्षा अधिक लक्ष पुरविलें गेल्यामुळें जर्मन लष्करशाहीविषयीं आपलेपणाचे प्रेम जरी नसलें तरी सामान्य लोकांत आदर व सहानुभूति मात्र होती. या आदराच्या व सहानुभूतीच्या जोरावरच आस्ट्रिया हंगारींतील व्यंग जर्मनीस झाकून ठेविता आलें. पण रशियन राज्यक्रांति होऊन रशियांत मजुरांची सत्ता स्थापन झाल्यावर आस्ट्रो-जर्मन लोकांची स्थिति फार निराळी झाली. झारची प्रचंड सत्ता नष्ट झालेली त्यानीं पाहिली; मोठमोठे अमीर उमराव लयाला गेलेले त्यानीं पाहिले, आणि सामान्य मजूर राज्यकारभार चालविताना रशियात त्यांनीं पाहिले. अशी रशियाची संगत आस्ट्रो–जर्मनांना लागल्यामुळे मजुरांचा व सामान्य लोकांचा ओढा लोकशाहीकडे विशेष वाढू लागला.

ही क्रांति इतर ठिकाणापेक्षां हंगेरींत फार झपाट्यानें होऊं लागली. वारवार पराभव पावल्यामुळे हंगारींतील मध्यम स्थितींतील लोकांतहि जर्मनांचा मत्सर वाढू लागला लष्करचे अधिकारी या मध्यम स्थितींतील लोकांमधूनच घेतलेले असतात. रणांगणावर हे हंगारीचे अधिकारी नालायक ठरले. रशियानें यांना झोडपलें, रुमानियानें याना चोपलें, सर्व्हियानें याना थाबूनच धरिलें आणि इटालीनें यांना मागें लोटिलें. या सर्व पराभवाच्या व अपमानाच्या प्रसंगीं जर्मन सेनेने व अधिकाऱ्यांनीं यांची अब्रू बचाविली. नालायक अधिकाऱ्यांची अब्रू दुसऱ्यानें येऊन बचावली असता मत्सराग्नीनें येऊन तो फारच जळू लागतो. हंगेरियन लष्करी अधिकाऱ्यांची अशी स्थिति झाली. हंगेरियन लष्करनें कोठे व कसें लढावयाचें हें ठरविण्याचें काम जर्मन सेनानायकांच्याकडे गेले आणि जर्मन सेनानायकाचे हुकूम पाळले जाण्या-

इतकी शिस्त लष्करांत ठेवण्याची तेवढी कामगिरी हंगेरियन अधिकाऱ्यांकडे आली. लष्करी धोरणाच्या व डावपेंचांच्या दृष्टीनें हंगेरियन सैन्याची मालकी जर्मन सेनानायकांच्याकडे आली आणि हंगेरीयन अधिकाऱ्यांकडे स्वतःचें लष्कर बेदिल किंवा नाखुष होऊन बंडावा करतें कीं काय हे पहाण्याचें पोलिसचें काम तेवढे शिल्लक राहिले. नालायक हंगेरीयन अधिकाऱ्याचा मत्सर दिवसानुदिवस अधिक वाढत चालला आणि जर्मनीची लायकी व थोरवी नाकबूल करण्यांत त्याना आनद वाटू लागला. या मत्सराग्नीमुळे जर्मनीच्या महत्त्वाकांक्षेला आपला देश बळी पडत आहे अशी हंगेरींतील मध्यम वर्गाची समजूत होऊं लागली. रशियन राज्यक्रांतींतील लेनिनशाहीच्या सोशियालिस्टांचीं मते सर्व आस्ट्रिया–हंगारींत सगतीमुळे आस्ते आस्ते पसरत चाललेलीं असतांना त्यात हंगेरीच्या मध्यम वर्गाच्या मत्सरबुद्धीची भर पडली. रशियातील राज्यक्रांतीमुळे जर्मनींतीलहि सोशियालिस्टपक्षाला आतून जोर आला. पण जर्मनीच्या विलक्षण विजयामुळे या पक्षास गेल्या मार्च एप्रिल महिन्यात वाचा फुटली नाहीं. हंगारींत मध्यम वर्ग जर्मनीच्या विरुद्ध गेल्यामुळे सोशियालिस्टपक्षाला गेल्या मार्चपासून वाचा फुटली आणि हंगेरीतील मध्यम वर्ग व सोशियालिस्ट पक्ष मिळून लोकशाहीचीं तत्त्वे उघडपणें बोलू लागले. हंगेरियन अधिकाऱ्यांच्या मत्सरामुळे स्वतःची नालायकी झाकून टाकण्याकरिता बरेच हंगेरीयन लष्करी अधिकारी लोकशाहीच्या पक्षाला झपाट्यानें मिळू लागले. हंगेरीतील लोकशाहीचें मुख्य तत्त्व जर्मनीशीं संबध नको, आपल्यापुरते आपण स्वतंत्र असावें अशा स्वरूपाचें बनत चाललें. म्हणजे मध्यमवर्ग खालच्या वर्गाला मिळाला तो खालच्या वर्गाच्या हातीं सत्ता जावी म्हणून नव्हे, तर बादशहा व अमीरउमराव यांच्यामार्फत जर्मनीशीं जडलेला संबध बादशहा व अमीर उमराव याच्याबरोबरच नष्ट व्हावा म्हणून सर्व लोकाच्या हातात सत्ता जावी म्हणून खालचे लोक बादशहा व अमीर उमराव याच्या विरुद्ध होते; आणि ज्याच्यापुढे आपलें तेज पडत नाहीं त्या जर्मनांचा संबध तुटावा म्हणून मध्यमस्थितीतील लोक मजुराच्या मताला पुरस्कार करू लागले. अशा रीतीनें ज्या रशियावरील विजयामुळेच जर्मनाचा येवढा बोलबाला झाला ते रशियावरील विजय हंगेरींत राज्यक्रांतीस सुरुवात करण्यास कारणीभूत झाले. रशियन तत्त्वांनीं खालच्या लोकांना पछाडलें आणि मत्सरानें वरच्या लोकांना ग्रासून टाकिलें. गेल्या मार्च महिन्यापासून आस्ट्रिया–

हंगेरीचे बादशहा आणि जर्मनीचे केसर या दोघांच्याहि लक्षात ही स्थिति आली आणि या स्थितीचा प्रतिकार करण्याच्या उद्योगाला ते लागले. हंगेरियाची अंतःस्थिति सुधारून हंगेरियांतील मध्यम स्थितींतील लोकांना आपलेकडे ओढून घेण्या करितां आस्ट्रियाच्या बादशहानें नाना प्रकारच्या युक्त्या योजिल्या. पण त्या कामीं त्यांस यश आलें नाहीं. तेव्हां ही सर्व कटकट मिटविण्याकरितां फ्रान्सकडे व अमेरिकेकडे आस्ट्रियाच्या बादशहानें तहाचें बोलणें लाविलें. रशियाशीं केलेल्या तहांतील फायदे सोडून देण्यास आणि आल्साकलारेन्स प्रदेशावरील आपलें स्वामित्व सोडण्यास जर्मनी तयार होईना, त्यामुळें चालू सालच्या प्रारंभीं आस्ट्रियानें केलेलें तहाचें बोलणें फिके पडलें. गेल्या वसंत काळच्या प्रारभीं जर्मनीपुढें असा प्रश्न येऊन पडला कीं, रशियाचे फायदे सोडून देऊन आलसाक्लारेन्स सोडून देऊन प्रे. विल्सन याच्या मताप्रमाणें तह तरी करावा किंवा आस्ट्रियांतील गडबड शांत होऊन पश्चिम रणभूमींत मोठा विजय मिळेल अशा मार्गास तरी लागावें. आस्ट्रियांतील गडबड शांत करण्याचें काम जर्मनीनें आस्ट्रियन बादशहावर सोंपविलें आणि पारिसवर चाल करून जाण्याची कामगिरी स्वतः पत्करली. वसंत काळीं पारिसच्या रोखानें जर्मनीचे हल्ले चढत असताना, आस्ट्रियन बादशहानें अंतःस्थ गडबड शांत करण्याकरितां वारंवार आपले प्रधान बदलून पाहिले. या निरनिराळ्या प्रधानांच्या हातून ही गडबड शांत झाली नाहीं, इतकेंच नव्हे तर जून–जुलई महिन्यात जर्मनांची पीछेहाट सुरू होण्याबरोबर हंगेरींतील स्वातंत्र्याची चळवळ पडदा दूर सारून उघडपणें पुढें आली. आस्ट्रियांतील घाण वेशीवर टांगली गेली; आणि इकडे जर्मनीचें पाऊल दिवसानुदिवस मागेंच पडत चाललें.

आस्ट्रियांत अंतस्थ भांडणें विकोपास जाण्याबरोबर आस्ट्रियाकडून किंवा जर्मनीकडून मोठ्याशा सैन्याची कुमक आपणांस मिळणें शक्य नाहीं हे बल्गेरियाच्या तेव्हांच ध्यानात आलें, आणि बल्गेरिया सप्टेंबर अखेरीस स्वतंत्र तह करून लढाईच्या कटकटींतून मोकळा झाला. बल्गेरियाच्या या तहाची आस्ट्रियांतील लोकांनीं वाहवाच केली, आणि हंगेरियानें तर आपलें स्वातंत्र्य उघडपणें जाहीर करण्याचा ठराव पास केला. आक्टोबर महिन्यात मॅसिडोनियातील सर्व्हियन सैन्य आणि आल्बेनियांतील इटालियन सैन्य यानीं आस्ट्रो–जर्मन सैन्यास बेलग्रेडपर्यंत मागें रेटलें. त्यावेळी हंगेरीनें सैन्याची बिलकूल मदत केली

नाहीं, इतकेंच नव्हे तर रणभूमीवरील सैन्य शस्त्रास्त्रे ठेवून घरीं परत ज्या योगानें येईल अशीच आपली वागणूक एकसारखी चालू ठेविली. आस्ट्रियन बादशहा पेचात सापडला. हंगेरीला स्वतंत्र सैन्य, स्वतंत्र जकाती व स्वतंत्र परदेशचे संबंध ठेवण्यास त्यानें परवानगी दिली; आणि बोसनिया, हर्गोविना, ज्युगोस्लाव, झेकोस्लाव, जर्मन व आस्ट्रियन असें आस्ट्रियाच्या राज्याचे निरनिराळे तुकडे करून सर्वांना स्वराज्य देऊन आस्ट्रियाच्या संयुक्त संस्थानाचें साम्राज्य स्थापण्याची योजना आस्ट्रियन बादशहानें तयार केली. आस्ट्रियाची ही धडपड पाहून टर्कीचा धीर सुटला आणि बल्गेरियाचें अनुकरण करून टर्कीनेंहि इंग्लंडशीं तात्पुरत्या युद्ध बंदीचा तह करून टाकला. डार्डानेल्स व बास्फोरस या सामुद्रधुन्या इंग्रजांचे हवालीं करून काळ्या समुद्रात संचार करण्यास टर्कीनें इंग्रजी आरमारास वाट देण्याचें कबूल केलें. टर्कीच्या या तात्पुरत्या तहानें रशियात व रुमानियांत घुसून जर्मनीच्या पिछाडीस जाण्याचा मार्ग दोस्त सरकाराना खुला झाला. टर्कीचा तह होण्याबरोबर आस्ट्रियातली गडबड अधिकच वाढत चालली. मोठमोठ्या शहरासून दंगेधोपे झाले, आणि आस्ट्रियन बादशहाचा अमल बहुतेक अंशीं नष्ट झाला. याच सुमारास इटालियन सैन्यानें व्हेनिस प्रांतातील आस्ट्रियन सैन्यावर हल्ले चढविण्यास सुरुवात केली. अंतःस्थ गडबडीमुळे आस्ट्रियन सैन्याला लढण्याचा कंटाळा आला होता, तेव्हां इटालियन हल्ले सुरू होण्याबरोबर आस्ट्रियन सैन्यानें मागे पाय घेतला, आणि लगेच तात्पुरत्या तहकुबीच्या तहाचें बोलणें आस्ट्रियन सैन्यानें इटालियन सेनापतीशी सुरू केलें. लढाईच्यापूर्वी जो मुलूख इटली आस्ट्रियापाशीं मागत होता तो मुलूख इटलीच्या ताब्यात एकदम देण्यात यावा, आस्ट्रियन सेनेची पांगापांग व्हावी आणि जर्मनीवर हल्ला करणें भाग पडल्यास आस्ट्रियन आगगाड्याचा उपयोग दोस्त सरकारांना करतां यावा अशा प्रकारच्या अटींवर आस्ट्रियन सैन्य व इटालियन सैन्य यांच्यामध्यें आक्टोबर अखेरीस लढाईच्या तहकुबीचा तह झाला.

या तहावर आस्ट्रियन बादशहानें सही करण्याचें नाकारिलें; पण तेव्हांपासून आस्ट्रियन बादशहा बेपत्ताच झाले आहेत. हंगेरीनें आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें आहे; बोसनिया व हरगोविना हे प्रदेश सर्व्हियाला मिळाले आहेत आणि आस्ट्रियांतील जर्मनानीं स्वतंत्र रिपब्लिक स्थापलें असून जर्मन साम्राज्यांत सामील होण्याचा त्यांचा विचार आहे.

आस्ट्रियाचे असे तुकडे तुकडे पडल्यामुळे आणि आस्ट्रियन सैन्य घरोघर पागलें गेल्यामुळे जर्मनीचा सर्व आधारच सुटला. आक्टोबर अखेर-पर्यंत जर्मन सैन्य फ्रान्सच्या रणभूमीत चांगलें निकराने लढलें. आक्टोबर अखेरीला व नोव्हेंबरप्रारंभाला ॲंग्लो–फ्रेंचानी व अमेरिकन सैन्यानें जर्मन सैन्याला उधळून टाकण्याच्या हेतूनें जर्मनीवर निकराचे हल्ले केले. या वेळींहि जर्मन सैन्य मागे हटले पण उधळले नाहीं. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्याच्या अखेरीस म्हणजे तहकुबीचा तह होण्याच्या वेळेला जर्मन सैन्याने फ्रान्सचा सर्व मुलूख सोडला पण बेल्जमचा बहुतेक भाग जर्मनाच्या ताब्यांतच राहिला. आक्टोबर महिन्यात केसर बादशहाने आपले लष्करी हक्क जर्मन पार्लमेंटच्या हवालीं करून जबाबदार लोकशाही जर्मनींत सुरू केली असल्याचें फर्मान बाहेर काढलें. इतक्यात ८ नोव्हें-बरच्या सुमारास तहकुबीच्या तहाच्या अटी जर्मनीने सेनापति फॉक याजकडून समजून घ्याव्या असे प्रे. विल्सन यानीं जर्मन प्रधान प्रिन्स मॅक्स याना कळविलें. ता. ८ नोव्हेंबर शुक्रवार रोजीं जर्मनीचे वकील फ्रेंच सेनेंत आले व त्याना अटी समजून सागण्यात आल्या. सोमवार ता. ११ नोव्हेंबर रोजीं ११॥ वाजेतोपर्यंत ७२ तासाच्या मुदतीत अटी मान्य झाल्या पाहिजेत असें वकिलाना निक्षून सागण्यात आले. जर्मन सेनेची पागापांग लागलीच झाली पाहिजे, व जर्मन आरमाराच्या तोफा खाली उतरून घेऊन जर्मन लष्करावरोबर आरमारहि एकदम पगू झालें पाहिजे, अशा स्वरूपाच्या या तहकुबीच्या तहाच्या अटी होत्या. असल्या अटी जर्मन लष्करशाहीला मान्य होणें शक्य नव्हते, पण केसर बादशहा व जर्मन लष्करशाही याना या अटी कबूल केल्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता! आस्ट्रिया बल्गेरिया व टर्की या तीन दोस्तानीं शस्त्रास्त्रे खालीं ठेवलेली आणि स्वतः जर्मनीत सोशिया-लिस्ट पक्षाच्या मताचा पगडा उघडपणें बसत चाललेला, अशावेळीं लढाई पुढे चालविणें शक्यच नव्हतें. केसरनें राजपद सोडलेंच पाहिजे अशी आरोळी चोहोकडून ऐकू येऊं लागली तेव्हां १० नोव्हेंबर रोजीं केसर बादशहाने व जर्मनीच्या युवराजाने आपले गादीवरील सर्व हक्क सोडून दिले आणि केसर बादशहा व त्याच्या घराण्यातील सर्व मडळी मोटारींत बसून हालडात पळून गेली. लगेच ता. ११ नोव्हेंबर रोजीं तहकुबीच्या तहावर सह्या होऊन चोहोंकडे लढाई बंद पडली.

आतां यापुढें प्रे. विल्सन सांगतील त्याठिकाणीं सर्व राष्ट्रांचे वकील जमून पक्क्या तहाची वाटाघाट होईल. या वाटाघाटींकरितां प्रे. विल्सन स्वतः फ्रान्समध्यें येणार आहेत असें प्रसिद्ध झालें आहे. या पक्क्या तहाच्या वाटाघाटीसंबंधानें सर्वांत मोठी अडचण आहे ती, आस्ट्रिया, जर्मनी व रशिया या तीन राष्ट्रांतील अंतःस्थितिसंबंधाची होय. रशियांत बोल्शेव्हिक ऊर्फ सडेसोटपक्षाचें राज्य आहे. फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका हे देश लोकशाहीचे भोक्ते व पुरस्कर्ते असले तरी सर्व संपत्तीला उलथून पाडणाऱ्या सडेसोटांचीं मतें या देशांना कबूल नाहींत. आज जर्मनींत बर्लिन येथें कामकरी व सैनिक यांच्या कमिटीच्या हातीं सत्ता गेल्यासारखी आहे. हॅमबर्ग वगैरे बऱ्याच मोठ्या शहरांतून कामकऱ्यांच्या कमिट्या स्थापिल्या गेल्या असून जर्मन आरमारावरील खलाशांनीहि अधिकाऱ्यांना दूर करून खलाशांची सत्ता स्थापन केली आहे. रशियांतील राज्यक्रांतीचें अनुकरण जर्मनींत व आस्ट्रियांत होऊन सर्व युरोपखंड सडेसोटांच्या मतानें व्यापलें जाऊन युरोपखंडांतील मोठमोठे उद्योगधंदे, कारखाने, बँका व संपत्तीचीं इतर केंद्रस्थानें या सर्वांचा सडेसोटी अमलाखालीं चुराडा होतो कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे. केसर किंवा आस्ट्रियाचा बादशहा गेल्यानें फ्रान्ससारखीं प्रजासत्ताक राज्यें जर जर्मनींत व आस्ट्रियांत सुरू झालीं आणि रशियांतहि सडेसोटांचा अंमल नाहींसा होऊन फ्रान्सच्या नमुन्याचें प्रजासत्ताक राज्य सुरू झालें तर महायुद्धांत झालेला रक्तपात व्यर्थ गेला असें कोणीहि म्हणणार नाहीं. रशिया, आस्ट्रिया व जर्मनी या तीन प्रमुख साम्राज्यांतील अरेरावी सत्ता नष्ट होऊन लोकांना हक्क मिळून फ्रान्सच्यासारखी लोकशाही जर प्रे. विल्सन यांना तेथें स्थापितां आली तर इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका यांचीं स्तुतिस्तोत्रेंच इतिहासकार गातील यांत संशय नाहीं. जर्मनींतील लोक रशियाप्रमाणें अशिक्षित नाहींत, तेव्हां सडेसोटांना रशियांत जितकें फावलें तितकें जर्मनींत फावणार नाहीं. तथापि जर्मनींतील लष्कराची पुढील राज्यव्यवस्थेंत कांहींच अब्रू राहातां कामा नये असें जर फ्रान्सचें धोरण नोव्हेंबर महिन्यांत दृष्टीस पडलें तर सर्व जर्मनीभर हिंवाळ्यांत जुन्या लष्करी पक्षाचे व नव्या सोशियालिस्ट पक्षाचे तटे एकसारखे सुरू होऊन जर्मनीचें साम्राज्य व आस्ट्रियाचें साम्राज्य या दोन्ही ठिकाणीं रशियाप्रमाणेंच अंतस्थ लढाया माजून राहातील. रशियांतील अंतस्थ लढाया अद्याप चालूच आहेत.

जर्मनींत व आस्ट्रियांत सडेसोटांचें जर प्राबल्य वाढूं लागलें तर तेथेंहि अंतस्थ लढायांची बजबजपुरी दृष्टीस पडल्यावांचून रहाणार नाहीं. रणांगणावरील सैन्य घरोघर परत गेल्यावर आणखी किती अदाधुंदी होते, किती मोठी घराणीं रसातळास जातात, किती शहरें स्वातंत्र्याचा झेंडा रोवतात ह्याचा कांहींच नियम नाहीं. आस्ट्रियांत व जर्मनींत राज्यक्रांति होऊन हे तहकुबीचे तह झालेले आहेत. मुख्य केंद्रस्थानची सत्ता कोणत्याहि एका ठिकाणी शिल्लक राहिली नाहीं. पक्क्या तहाच्या वाटाघाटींकरतां प्रे. विल्सन पारिस येथे ज्या वेळेला सर्व लढवय्या राष्ट्राची सभा बोलावतील त्या वेळेला जर्मनी, आस्ट्रिया व रशिया यांच्या तर्फेनें कोणाला बोलवावयाचें ? सर्व राष्ट्राच्या वतीनें ज्या सत्तेशीं बोलण्यास हरकत नाहीं अशी सत्ताच ह्या तीनहि साम्राज्यांत उरलेली नाहीं. इंग्लंड, फ्रान्स व जपान या दोस्तांचीं मते घेऊन प्रे. विल्सन हे जर्मनी, आस्ट्रिया व रशिया यांची वाट जी ठरवतील ती पुढें सर्वांनीं मिळून ह्या राष्ट्रांना दाखवावयाची आहे. रशियाचीं अमुक वाट, जर्मनीची अमुक वाट व आस्ट्रियाची अमुक वाट असा निर्णय प्रे. विल्सन यांनीं स्वसमतीच्या तत्त्वानुसार न्यायबुद्धीनें व समतेनें जरी दिला तरी त्या निर्णयाची अंमलबजावणी सदर तीन राष्ट्रात कोणी व कशी करावयाची ? सडेसोटांचें प्राबल्य जर जर्मनींत व आस्ट्रियांत झालें तर ह्या सडेसोटांच्या घरातच जाऊन कान पिरगळणें अमेरिकेला भाग पडेल; पण तसें करतांना मजूर पक्ष व संग्रही पक्ष याच्यामध्ये फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका येथेहि उघडपणें दंगे उपस्थित होतील, आणि युरोप व अमेरिका येथील सर्व देशांतून भांडवल व मजुरी ह्यामधील सांप्रतचे कलह विकोपास जाऊन एका देशास दुसऱ्या देशांतील अंतस्थ कलहाकडे लक्ष देण्यासच फुरसत मिळणार नाहीं. रशियातील राज्यक्रांतीनें हे सडेसोटाचें भांडण पुढे आणलें, आस्ट्रियाच्या व जर्मनीच्या अधःपातानें त्या भांडणास दुजोरा व तिजोरा मिळाला. संग्रही पक्ष व सडेसोटाचा पक्ष यांच्यामध्यें योग्य तडजोड करून युरोपात पुन्हां शांतता स्थापण्याची जबाबदारी फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका ह्या तीन राष्ट्रावर आता येऊन पडली आहे. सडेसोटांच्या वादळात स्वतः न सांपडतां लेनीननें उत्पन्न केलेलीं पिशाच्चे प्रे. विल्सन कशीं गाडून टाकितात ह्याकडे पक्क्या तहाच्या वाटाघाटींच्या वेळीं दोन तीन महिने सर्वांचें लक्ष वेधून राहील, यांत संशय नाहीं.

---

# महायुद्धाचा पांचव्या वर्षाचा नोव्हेंबर-डिसेंबर महिना

## श्रम आणि संपत्ति यांचा कलह

नोव्हेंबरच्या प्रारंभीं जर्मनी व दोस्त सरकार यांच्यामध्ये तहकुबीचा तह झाल्या नंतर चोहोकडे लढाई एकदम बंद पडली आणि विजयाच्या आनंदोत्सवास सुरुवात झाली. पूर्वीच्या सर्व युद्धांना मागे टाकणाऱ्या महायुद्धाचा शेवट दोस्त सरकाराच्या अपूर्व विजयानें झाल्यामुळे दोस्त सरकारांना व त्यांच्या सेनेला व प्रजाजनांना मनापासून अपूर्व आनंद झाला. हा आनंदोत्सव इंग्लंड, हिंदुस्थान, फ्रान्स, इटली, अमेरिका वगैरे देशांतून मोठया थाटानें साजरा करण्यांत आला; आणि सर्व प्रजाजनांनीं आपापल्याप्रमाणें दोस्तांच्याहि सेनेचें, सेनानायकाचें, मुत्सद्याचें आणि अध्यक्षाचें किंवा बादशहांचें मनःपूर्वक अभिनंदन केलें. अशारीतीनें आनंदात नोव्हेंबर महिना चालला असतांना जानेवारी-फेब्रुवारी महिन्यांत होणारा तह कोणत्या स्वरूपाचा होईल याविषयीं चोहोकडे वाटाघाट सुरू झाली. या वाटाघाटीचें थोडेसें दिग्दर्शन करण्याचें या लेखात योजिलें आहे.

तहकुबीच्या तहावर सह्या होण्यापूर्वी जर्मनीचा बादशहा कैसर वुइल्यम यानें आपल्या गादीचा राजीनामा दिला व हॉलंडमध्ये तो पळून गेला. तो पळून गेल्यानंतर त्यावेळचे जर्मनीचेमुख्य प्रधान प्रिन्स मॅक्स व जर्मनीची पार्लमेंट सभा याच्याकडेच जर्मनीची राज्यसत्ता आली आणि या राज्यसत्तेच्याच हुकमानें जर्मन लष्करानें तहकुबीच्या तहवरा सह्या केल्या. तहकुबीच्या तहाच्या अटी जर्मनीला काय किंवा दुसऱ्या कोणत्याहि सेनेला काय अत्यंत लाजीरवाण्या ठरणाऱ्या आहेत. दाती तृण धरून शरण येणें ज्याला ह्मणतात तशाच स्वरूपाच्या या अटी आहेत. तहाच्यावेळीं जर जर्मनीला काही कलमे नावडतीं वाटली तर पुन्हां लढाई पुढे चालविण्याची शक्तिच जर्मनीच्या अंगीं राहाणार नाहीं अशा स्वरूपाच्या या अटी आहेत. जर्मनीनें फ्रान्स व बेल्जम या दोन देशात तोफा व मशिनगन्स जितक्या नेल्या होत्या त्यापैकी निम्याहून अधिक दोस्त सरकारांच्या स्वाधीन केल्या, इतकेच नव्हे तर जर्मनीत परत नेतां आली नाहीं म्हणून फार मोठी युद्धविषयक सामग्री तशीच रणांगणावर टाकून जर्मन सेना स्वदेशास परत गेली. आल्सासलारेन्स वगैरे फ्रान्सचे

प्रांत फ्रान्सच्या ताब्यांत नोव्हेंबर महिन्यात पुन्हां गेले; इतकेंच नव्हे तर तह-कुबीच्या तहाच्या शर्तीप्रमाणें र्‍हाईन नदी आणि फ्रान्स व बेल्जम याच्यामधील खुद्द जर्मनीचा मुलूखहि दोस्त सरकारांच्या ताब्यांत दिलेले आहेत. म्हणजे तह-कुबीचा तह मोडून पुन्हां लढाई सुरू झाल्यास दोस्त सरकाराचें सैन्य हा हां म्हणता बर्लिनवर चाल करून जाईल. जर्मनीच्या सर्व पाणबुड्या बोटी इग्रजी आरमाराच्या स्वाधीन झाल्या असून जर्मन आरमाराच्या मुख्य बलापैकी निम्मे बलहि इग्रजांच्या मुठींत आलें आहे. म्हणजे पुन्हां लढाई सुरू झाल्यास पाण-बुड्याची बिलकूल भीति राहिली नसून जर्मनीचें अवशिष्ट आरमारहि हां हां म्हणतां समुद्रांत बुडवून टाकतां येईल. इतकेंहि करून जर जर्मनीनें हट्टानें तरवार पुन्हां उपसली तर जर्मनीच्या व्यापाराला करण्यांत आलेली बंदी पूर्वीप्रमाणेंच सक्तीनें अमलात यावयाची असल्यामुळे पक्का तह होईतो परदेशाला माल विकून पैसे गोळा करण्याची सवलतहि तहकुबीच्या तहानें जर्मनीस मिळालेली नाहीं. लढाई चालू असता बाल्टिक समुद्रात संचार करून नॉर्वे–स्वीडनशीं व्यापार जर्मन जहाजाना इतक्या दिवस करता येत होता; कारण, बाल्टिक समुद्रात इग्रजी आर-माराचा इतक्या दिवस संचार नव्हता. पण आता बाल्टिक समुद्रात इग्रजी आरमार शिरलें असल्यामुळे बाल्टिक समुद्रातील जर्मन व्यापारहि जागच्याजागी थंड झाला आहे. म्हणजे पक्का तह होईपर्यंत बाहेरून मिळणारे व्यापारी द्रव्य आणि अन्नसामग्री या संबंधाची बंदी प्रत्यक्ष लढाई चालली असता-नाच्या वेळेहून तहकुबीच्या काळात अधिक कडक आहे. हे सर्व प्रतिबंध सोसून जर्मनीनें जर लढाई पुढे चालविण्याचें पुन्हा मनात आणलें तर जर्मनीच्या हातापायातच चलनवलनाची शक्ति राहू नये म्हणून जर्मन राष्ट्रातील सर्व आगगाड्याच्या इंजिनापैकीं व डब्यापैकीं एक तृतीयांश इंजिनें व एक तृतीयांश डबे सतरा डिसेंबरचे आत जर्मनीनें दोस्त सरकाराच्या हवालीं केले पाहिजेत असली देखील अट तहकुबीच्या तहांत घालण्यात आलेली आहे. डिसेंबरचे दहा तारखेपर्यंत तहकुबीच्या तहाच्या सर्व अटी जर्मनीनें पाळल्या असून डबे व इंजिनें ह्यासंबंधीची ही अट अंशतः पाळली आहे. पण १७ डिसेंबर-पर्यंत इंजिनासंबंधीची अट पूर्ण होईल असें लक्षण दिसत नाहीं. पण ह्याबाबतींत जर्मनीस अधिक मुदत मिळेल असे म्हणतात.

तहकुबीच्या तहानें जर्मनी पूर्ण लुला झाला असल्यामुळें ह्यापुढें जर्मनीच्या हातून लढाईस पुन्हां सुरवात होणें शक्यच नाहीं. ह्या असल्या कडक अटी जर्मनीवर कां लादण्यांत आल्या? तहकुबीच्या अटींचें इतके कडक स्वरूप ह्या पूर्वीच्या कोणत्याहि तहकुबीच्या तहांत दृष्टीस पडत नाहीं. रशियांत राज्यक्रांति होऊन लेनिनप्रभृति बोल्शेव्हिकांनीं जर्मनीशीं तह करण्याचें ज्यावेळीं ठरविलें त्यावेळीहि इतक्या कडक तहकुबीच्या अटी रशियावर लादल्या गेल्या नाहींत. मग या कडक अटींची आवश्यकता काय? आणि जर्मनीनें त्या कशा कबूल केल्या? लेनिनप्रभृतींशीं तह करण्याच्या पूर्वी तहकुबीच्यावेळीं लष्करी सामर्थ्यच शिल्लक राहिलें नव्हते. सर्व रशियन सैन्य त्यावेळीं लढाईसबंधानें उदासीन झालें होतें. इतकेंच नव्हे तर बरेंच सैन्य आपोआप घरोघर निघून गेलें होतें. तेव्हा तहकुबीच्या शर्तींनीं रशियन सैन्यास पंगु करण्याची जरुरीच नव्हती. जर्मन सैन्याची तशीच स्थिति तहकुबीच्यावेळीं नव्हती. या सैन्याची पीछेहाट व्यवस्थितरीतीनें होत होती आणि जर्मनीचें लष्करी सामर्थ्य म्यूज किंवा ऱ्हाइन नदीचा आश्रय घेऊन दोस्त सरकारांशीं वर्ष सहा महिने लढण्याइतके प्रबळ होते. जर्मनीचे त्यावेळचे मुख्यप्रधान प्रिन्स मॅक्स यानीं प्रे. वुइल्सन यांच्या चौदा अटी कबूल करून अमेरिकेशीं ज्यावेळीं तहाचें बोलणें सुरू केलें त्यावेळीं जर तहकुबीचा प्रश्न त्यांनीं पुढें आणला नसता तर कदाचित् तहकुबीच्या तहाशिवायहि लढाई तशीच पुढे चालू ठेवून पक्क्या तहाची परिषद सुरू झाली असती. लढाईची तहकुबी मागण्याची चूक आपल्या हातून झाली व ती काहीं सेनापतींच्या चुकीच्या अदाजामुळे आपण केली असा प्रिन्स मॅक्स यांनीं आपल्या या कृत्याविषयीं मागाहून खुलासा केला आहे. कसेंहि असो; प्रिन्स मॅक्स यानीं तहकुबी मागितल्यामुळे वर्ष सहा महिने दम काढण्याचेंहि बळ जर्मनांत उरलेले नाहीं अशी जर्मनीच्या दोस्ताची समजूत झाली. अशी समजूत होण्याबरोबर तुर्कस्थाननें हातपाय गाळले आणि आस्ट्रियानें इटलीशी तहकुबीचा तह करण्याची घाई केली. खरें पाहू गेलें असतां रणांगणावरील आस्ट्रियाच्या लष्कराची स्थिति जर्मनीच्या अगोदर तह करण्याइतकी वाईट नव्हती. हगारी आस्ट्रियापासून वेगळा होऊ लागला होता इतकेंच काय तें. पण जर्मनीनें अगोदर तहकुबीची गोष्ट काढण्याबरोबर आस्ट्रियन सैन्यानेंहि दम सोडला आणि जर्मनीच्या अगोदर इटलीशी

तहकुबी मागून आस्ट्रियन सैन्य घरोघर गेलें. आस्ट्रियाच्या या तहकुबीनंतर जर्मनीला दोस्त सरकारानीं आपल्या तहकुबीच्या अटी कळविल्या. आस्ट्रियानें जर दम सोडला नसता तर जर्मन सेनेनें वरील कडक अटी मान्य केल्या नसत्या. पण आस्ट्रियाचाहि आधार सुटल्यामुळे आणि आस्ट्रियांतील राज्यक्रांतीनें जर्मनींतील लोकहि राज्यक्रांतीस उत्सुक झाल्यामुळे केसरला आपली गादी सोडून द्यावी लागली आणि प्रिन्स मॅक्स त्यांच्या हवाली सर्व राज्यसूत्रे करून हालंडमध्ये तो पळून गेल्यावर नव्या जर्मन सरकारनें तहकुबीच्या अटी मान्य केल्या आणि प्रत्यक्ष लढणें बंद पडलें. जर्मन लष्कर व जर्मन आरमार हीं दोनहि वर्षं सहा महिने लढण्याच्या दृष्टीनें पगू न झाल्यामुळे त्याचीं नखें काढून घेऊन तहकुबीच्या अटीनें त्याना लुलें करणें दोस्त सरकाराना भाग होतें आस्ट्रियाची तहकुबी, आस्ट्रिया-हंगारीतील राज्यक्रांति, आणि जर्मनींतील अंतस्थ गडबड या तिन्हींचा फायदा दोस्त सरकारांना मिळून जर्मन सेनेनें जर तहकुबी केली नसती तर जर्मन सेनेस दोन तीन महिन्याच्या अवकाशांत लुलेपणाच्या स्थितीस दोस्त सरकारानीं पोचविले असतें. दोन तीन महिन्याच्या लढण्यानें जो वरचढपणा दोस्त सरकारास मिळाला असता, तोच वरचढपणा तहकुबीच्या तहानें दोस्त सरकारानीं मागितला. दोस्त सरकारांचें हें वर्चस्व तहकुबीच्या वेळी जर जर्मन सेनेनें कबूल केलें नसतें तर दोन तीन महिन्यांनी प्रत्यक्ष रणभूमीवरच दोस्त सरकारानी ते सिद्ध करून दाखविलें असतें. अशा रीतीने वर्चस्व सिद्ध करण्याची वेळीं उघडपणें पुढें उभी राहिलेली दिसत असताना तहकुबीच्या वेळ कमी कडक अटी तरी दोस्त सरकारानीं का घालाव्या? कडक अटी घालणें हें समयास उचितच होतें. या अटी कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं अशी सभोंवारची विलक्षण स्थिति झाल्यामुळे जर्मनीनें सैन्यबल असताहि त्या अटी कबूल केल्या ही ओघाओघानेंच होणारी गोष्ट होय.

अंतस्थ राज्यक्रांतीनें रशियाप्रमाणें आस्ट्रिया पगू झाला आणि तहकुबीच्या अटींनी जर्मनी लुळा झाला. सेनापति हिंडेनबुर्ग हे जर्मन सेनेचे अध्वार्य सेनानायक आहेत, आणि त्यांच्या हुकमतीखालीं जर्मन सेना ऱ्हाईन नदीच्या पलीकडे गेली असून सैन्यास घरोघर जाण्यास विदा देण्याचेंहि काम सुरू आहे. आम्ही पराभूत न होता धीमेपणानें रणांगण सोडून घरीं परत आलो आहो, असे सेनापति हिंडेनबुर्ग यानीं जाहीर केलें आहे. घरीं परत यावयाच्या वेळी जर्मन लोकाना व जर्मन सरकाराना सेनापति हिंडेनबुर्ग

यांनीं असें कळविलें आहे कीं तहकुबीच्या शर्तींमुळे लुल्या झालेल्या जर्मन सेनेंत एकट्या फ्रान्सशीहि लढण्याची ताकद उरलेली नाहीं. तेव्हां लोकांनीं राज्यक्रांति-संबधानें आपापसात न भांडतां जर एकी दाखविली तर पक्कया तहाच्या वेळीं जर्मनीस न्याय मिळण्याचा संभव आहे. सेनापति हिंडेनबर्ग याच्या या उद्‌गारा वरून जर्मन राष्ट्र किती हतबल झाले आहे हे कोणाच्याहि ध्यानात येईल. अशा स्थितीत पक्कया तहाच्या परिषदेपुढे प्रे. वुड्रलसन याच्या तत्वाप्रमाणें न्याय मागण्याची धमक तरी जर्मनीत शिल्लक राहाते किंवा कसें या विषयीं पुष्कळांना शंका उत्पन्न झाली आहे. तेव्हा जानेवारीमध्ये पक्कया तहाच्या वेळीं कोणते राष्ट्र कोणत्या स्थितीत परिषदेपुढें उभे राहील याचा अंदाज बांधूनच तहाच्या स्वरूपाची वाटा-घाट केली पाहिजे.जानेवारीपर्यंत राजकीय दृष्ट्या जर्मनी कोणत्या मार्गाला लागणार याचा प्रथम विचार करू या. कैसरनें आपल्या गादीचा राजीनामा दिल्यानंतर जर्म-नीची मुख्य सत्ता प्रिन्स मॅक्स व बर्लिनची पार्लमेंट सभा याच्या हातीं गेली; पण दोन चार दिवसाहून अधिक दिवस ती टिकली नाहीं. प्रिन्स मॅक्स यानीं सोशियालिस्ट पक्षाचे पुढारी असलेल्या व बर्लिन येथील सर्वात मोठ्या शिंप्याच्या दुकानाचे मुख्य असलेल्या एका गृहस्थाला नव्या सरकारचे अध्यक्ष म्हणून मदतीला घेतले. पण तेवढ्यानें सोशियालिस्ट पक्षाचें समाधान झालें नाहीं. जर्मनीच्या सोशियालिस्ट पक्षांत पूर्वी दोन भेद होते. सरकारला मदत करणाऱ्या पक्षाचा एक भेद आणि स्वतंत्र मताचा दुसरा भेद या सर्व सोशियालिस्टानीं मिळून असें ठरविलें की, आपल्यापैकीं एखाद दुसराच वरिष्ठ जागीं असून भागावयाचें नाहीं, तर प्रत्येक प्रमुख खात्याची सूत्रे आपल्या पक्षाच्या हातीं असली पाहिजेत. याप्रमाणें ठरल्यावर सोशियालिस्ट पक्षाचे प्रधान निवडण्यात आले आणि या नव्या प्रधानमंडळाला सांप्रतच्या आणीबाणीच्या प्रसंगीं जुन्या प्रधानानीं मदत करावी असे ठरलें. या नव्या सोशियालिस्ट सरकारनें जर्मनीची बादशाही पद्धत रद्द करून रिपब्लिक किंवा लोकशाही स्थापण्याचा ठराव पास केला. या रिपब्लिकचें स्वरूप कोणत्या प्रकारचें असावे हे निश्चित करण्याकरितां प्रत्येक मनुष्यास मत या तत्त्वाला धरून पार्लमेंटची निवडणूक करण्याचें या नव्या सरकारने ठरविलें. नवें सरकार संमिश्र स्वरूपाचें बनलें. जुन्या मुत्सद्यांना काढून टाकण्यात आलें नव्हतें, पण नवीनांच्या तेवढया नेमणुका होत्या. नव्या सरकारच्या या स्वरूपाकडे पाहून जर्मनींतील राज्य-

क्रांति बऱ्याच व्यवस्थित रीतीने पार पडणार आणि रशियासारखी अदाधुंदी जर्मनींत दिसणार नाहीं असे काहींना वाटलें; पण तो भ्रम ठरला. कारण हे नवें सरकार आठ दहा दिवसाहून अधिक दिवस टिकलें नाहीं. बर्लिन येथील कामकऱ्यांनीं आणि सैनिकानी रशियाच्या नमुन्याप्रमाणें कामकऱ्याची कमिटी ऊर्फ सोव्हिएट बर्लिन स्थापून सरकारी मुख्य खात्याचा कबजा घेतला; आणि बर्लिनचे मुख्य सरकार सोव्हिएट स्वरूपात झालें असे जाहीर केलें. बर्लिनप्रमाणें जर्मनीच्या निरनिराळ्या भागातूनहि तेथील स्थानिक राजांनीं व राजपुत्रानी आपापल्या गाद्यांचा राजीनामा दिला आणि प्रत्येक ठिकाणी स्थानिक सरकार कामकऱ्याच्या स्वरूपाचें किंवा लोकशाहीच्या स्वरूपाचे बनलें, काहीं ठिकाणी कामकऱ्याच्या हातात सत्ता आहे अशी अव्यवस्था सर्व जर्मनीभर माजून राहिलेली आहे. बर्लिन येथील कामकऱ्याच्या कमिटीच्या हातीं जर्मन साम्राज्याचीं मुख्य सूत्रे गेलीं आहेत, पण परराष्ट्राशीं बोलणें चालणें या जुन्या अधिकाऱ्याच्या मार्फतच चालतें. कामकऱ्याच्यातर्फेची किंवा लोकशाहीच्या तर्फेची राज्यक्रांति होताना थोडेसे दगेधोपे झाले खरे पण विशेषशी प्राणहानि झाली नाहीं. जुने पार्लमेंट व त्या पार्लमेंटातील सोशियालिस्ट पक्ष यानीं जर्मनीच्या राज्यकारभारात लक्ष घालता कामा नये, या जुन्या पार्लमेंटनें बोलाविलेलें नवे पार्लमेंट आपल्यास मान्य नाहीं, आणि जर्मनीची नवी राज्यपद्धत ठरविण्याचें काम सर्व लोकांच्या मतानें न होता नुसत्या कामकऱ्याच्या कमिटयाच्या कॉंग्रेसनेंच केलें पाहिजे, असा बर्लिनच्या कामकऱ्याचा आग्रह आहे म्हणजे रशियाप्रमाणें सर्व सत्ता कामकरी बोल्शेव्हिकाच्या किंवा सडेसोटाच्या हातींच राहिली पाहिजे; इतर पक्षाशीं मिळूनमिसळून समिश्र सरकार तयार करण्याची कामकऱ्याची इच्छा नाहीं. कामकऱ्याच्या कमिटयाची कॉंग्रेस आपल्या हातीं मुख्य सत्ता घेऊन धनोत्पादनाच्या सर्व उद्योगधंद्यावरील व कारखान्यावरील व्यक्तीव्यक्तींची मालकी नष्ट करून हे सर्व उद्योगधंदे व कारखाने, राष्ट्राच्या मालकीचे बनविणार; लहान सहान कारखाने त्या त्या गावच्या मालकीचे होतील, आणि आगगाड्या, खाणी वगैरे मोठमोठे कारखाने राष्ट्राच्या मालकीचे होतील.

सग्रही व्यक्तींची धनावरील किंवा धनोत्पादक धंद्यावरील मालकी काढून टाकून शक्य असेल त्याठिकाणीं त्या ऐवजीं गावची, तालुक्याची, प्रांताची किंवा राष्ट्राची मालकी स्थापिल्याशिवाय गोरगरिबांचे हाल चुकावयाचे नाहीत असे जर्मनीतील व

रशियातील सडसोटांचें ह्मणणें आहे. राजा व राजमंडळ याचे हातीं परंपरेनें कायमची सत्ता गेल्यास ज्याप्रमाणें त्या सत्तेचा दुरुपयोग होऊन प्रजेला पिळून काढून स्वदेशी किंवा परदेशीं स्वत:चेंच प्रस्थ माजविण्याकडे राजाचें व राजमडळाचें लक्ष लागून रहातें, त्याचप्रमाणें कोट्याधीश व्यापारी किंवा कारखानदार हेहि आपापल्या व्यापारापुरते किंवा कारखान्यापुरते अरेरावी स्वरूपाचे राजेच बनून त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या हजारों गरिबाचें रक्त जळू प्रमाणें शोषून घेत असतात आणि पोटाच्यापायी एकदां त्याच्या यंत्रात जाऊन पडले ह्मणजे त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग गरिबाना रहातच नाहीं. तेव्हा राज्यव्यवस्थेत ज्याप्रमाणें राजे नकोत व राजपुत्र नकोत त्याचप्रमाणें व्यापारात व उद्योगधंद्यातहि हे भाडवलवाले कोट्याधीश नकोत; अशी सडेसोटाची विचारसरणी आहे. जे भाडवल व जो उद्योगधंदा गावकीनें किंवा देशानें हातात न घेण्याइतका लहान असेल तेवढेच भाडवल व तेवढाच धंदा व्यक्तीच्या मालकीचा ठेवावा, पण ज्या भाडवलावर किंवा धंद्यावर हजारो लोकाचें पोट अवलंबून असते ते भाडवल किंवा तो कारखाना सार्वजनिक स्वरूपाचाच झाला पाहिजे असे सोशियालिस्ट पक्षाचें मत आहे. सोशियालिस्ट पक्षाचे हे वरील मत इंग्लड–फ्रान्स व अमेरिका येथील लोकशाहीना नापसत आहे अशातला भाग नाहीं. या मतात बराच तथ्यांश आहे असे प्रमुख मुत्सद्याना आजकाल वाटत आहे; आणि त्याप्रमाणें भाडवलवाल्याच्या मालकीच्या हक्काना आळा घालणारे आणि नोकराच्या हितसबंधाना जपणारे कायदेहि इंग्लड–फ्रान्स व अमेरिका येथे आस्ते आस्ते पास होऊं लागले आहेत. भाडवलवाल्याची मालकी आस्ते आस्ते काढून घेण्याचा सावकाशीचा क्रम रशियातील सडेसोटाना किंवा बोल्शेव्हिकांना पसत नाहीं. डेमॉक्रसी किंवा लोकशाही पद्धत सुरू झाली असता श्रीमत लोक त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या गरिबाचीं मतें आपल्या हातात घेतात आणि संग्रही धनिकाचा वर्ग निवडणुकींत निवडून येऊन प्रत्येक व्यक्तोला जरी मत असले तरी लोकशाहीच्या राज्यकारभारात हे धनिकच अधिक घुसतात. तेव्हा समाजातील संग्रहि धनिकाचा वर्ग समूळ नाहीसा करून नंतरच कामकऱ्यानी लोकशाही स्थापण्याचा उद्योग करावा असे रशियांतील सडेसोटाचें ह्मणणें असून या सडेसोटांनीं रशियांतील सग्रही लोकांचा वर्ग बऱ्याच अशाने अजिबात मारूनहि टाकला आहे. लेनिनप्रभृति रशियांतील सडेसोटांच्या हातात रशियाची राज्यसत्ता वर्ष दीड वर्ष टिकून रशियांत सग्रही लोकाचा सद्दार

या सडसोटांनीं चालविला आहे. गरिबांचें पूर्ण कल्याण करण्याच्या इच्छेनें हा संहाराचा मार्ग रशियांतील सडेसोटानीं पत्करलेला आहे. सोशियालिस्ट मतें इग्लंड, फ्रान्स व अमेरिका येथील लोकशाहीना मान्य होणें समाजाला अनर्थावह आहे, असें सदर तिन्ही देशातील लोकशाहींना वाटत आहे. पण युरोपखंडापुढे रशियातील लेनिनच्या राजशार्चे व त्यानें केलेल्या सत्तीच्या उलथापालथीचें प्रत्यक्ष जिवत उदाहरण रात्रदिवस नाचत असल्यामुळें जर्मनी, आस्ट्रिया वगैरे देशातील गरीब कामकऱ्यांना व सैनिकाना, लेनिननें केले व लेनिन करीत आहे त्याप्रमाणें धनाची एकदम उलथापालथ करून गरिबाना दारिद्र्याच्या कैचींतून एकदम सोडवावें असें वाटल्यास त्यात नवल नाही. म्हणजे युरोपखडात आज तीन प्रकारचीं मतें उत्पन्न झालीं आहेत असे म्हटलें पाहिजे.

तीं मते येणेंप्रमाणें—लोकाची सत्ता ज्या धनावर चालत नाही असलें एका व्यक्तीच्या ताब्यात असलेलें मोठे धन एकदम हिरावून घेऊन राज्यसत्तेप्रमाणें धनाची सत्ताहि लोकाच्या हवालीं तावडतोब करणें हे रशियन बोल्शेव्हिकाचें किंवा सडेसोटाचें पहिले मत होय. याच्या विरुद्ध दुसरें मत असें आहे कीं राज्यसत्ता लोकशाहीच्या हातात असलो म्हणजे पुरे आहे. व्यक्तीच्या धनामध्ये व इस्टेटीमध्ये सर्वसामान्य कायद्याबाहेर जर लोकशाहीनें ढवळाढवळ केली तर व्यापाऱ्यातल्या म्हणा, उद्योगधद्यातल्या म्हणा, कलाकौशल्यांतल्या म्हणा किंवा हरएक प्रकारच्या विद्येतल्या म्हणा, पराक्रमास उत्तेजन न मिळून मानवी समाज पराक्रमहीन होईल. तेव्हा लोकशाहीनें खाजगी इस्टेटीवर वाईट नजर केव्हाहि ठेविता कामा नये. या दोन्ही मताना राजे, महाराजे किंवा बादशहा नको आहेत. दोनहि मत लोकशाहीची चहाती आहेत. पहिलें मत लोकशाहीच्या जोरावर राजेरजवाडे याच्या सिंहासनाप्रमाणेंच कोटयाधिशाच्या मालकी हक्काचाहि चुराडा राज्यक्रांतीच्या वेळीं एकदम करूं पहातें. दुसरें मत सिंहासनाना मात्र उलथून पाडू इच्छितें, पण धनाच्या गादीला हात लावूं इच्छित नाही. पहिलें मत सडेसोटाचें होय; आणि दुसरें मत रिपब्लिकन किंवा प्रजासत्ताक राज्यपद्धतीचें होय. तिसरें मत या दोन मताच्या मिश्रणानें बनलेलें आहे. शभर वर्षापूर्वी फ्रान्सनें राजाचीं सिंहासनें फोडिली आणि प्रजासत्ताक राज्यपद्धति सुरू केली. त्यावेळीं इग्लडनें राज्यशासन व प्रजाशासन या दोन्ही पद्धतीतील चांगला

भाग तेवढा उचलून राजांच्या सत्तेला मर्यादित केलें. त्याप्रमाणें आतांहि भांडवल व श्रम यांच्यामध्यें युरोपांत तटा उपस्थित होऊन रशियांतील सडेसोटांनीं धनिकांच्या गाद्यांना उलथून पाडलें असतांना आणि धनाच्या सत्तेच्या जागी श्रमाची सत्ता स्थापिली असतांना इंग्लंडचे प्रधान लाईड जॉर्ज यांच्यासारखे मुत्सद्दी धनाच्या सत्तेला अजिबात नष्ट न करता मर्यादित करूं पहात आहेत आणि त्या योगानें श्रमाला घाम कमी येईल अशी गरिबाची व्यवस्था लावूं पहात आहेत हा तिसरा संमिश्र पक्ष होय. रशियात झारसाहेब गेले, जर्मनींत कैसर गेले व आस्ट्रियाचे बादशाहा नाहींसे झाले. ही राज्यक्रांति झाली खरी, पण युरोपात असल्या तऱ्हेच्या राज्यक्रांत्यांना शंभर वर्षांइतकें महत्त्व राहिलें नाही. रशियातील राज्यक्रांतीनंतर जी मोठी धनक्रांति रशियात झाली ती धनक्रांतीच सर्व युरोपखंडाचें लक्ष आज वेधून राहिली आहे. बादशाही का लोकशाही असला वाद उरलेलाच नाही. लोकशाहीला सर्व अनुकूल झालेलें आहे, पण या लोकशाहीच्या पाठोपाठ रशियात दृष्टीस घडलेल्या धनक्रांतीसंबधानें मात्र युरोपांत कलह माजून राहिला आहे.

धनक्रांति झाली पाहिजे म्हणणाऱ्या सडेसोटाचा पक्ष, ही क्रांति नको म्हणणाऱ्या संग्रही लोकांचा पक्ष व धनास मर्यादा घालूं पहाणार संमिश्राचा पक्ष, असे तीन पक्ष युरोपात आज आहेत. धनक्रांति करणाऱ्या सडेसोटांनी रशियास पूर्णपणें ग्रासले आहे; आणि जर्मनीचे बर्लिन शहर या सडेसोटाच्या हातात जाऊन जर्मनीच्या इसेन प्रांतातील क्रूपचे प्रख्यात तोफांचे कारखानेहि या सडेसोटाच्या हातीं पडले आहेत. जर्मनींतील सडेसोटाच्या प्रमुखांनीं डिसेंबरच्या पहिल्या आठवडयात सर्व जर्मनी आम्ही लवकरच व्यापून टाकूं अशी प्रौढी मिरविली आहे. सेनापति हिंडेनबुर्ग यांच्या ताब्यातील लष्कर अद्याप सडेसोटाच्या बाजूचें झालेले नाही. हे लष्कर घरोघर लवकर पाठवा आणि लष्करी अमलाचें केंद्रस्थानहि मोडून टाका अशी चळवळ जर्मन सडेसोटांनीं चालविली आहे. दक्षिण जर्मनीतील बव्हेरिया प्रांत, आस्ट्रियाचा काहीं भाग व हंगारी यथे सडेसोटाचा पक्ष प्रबल झालेला आहे. म्हणजे युरोपखंडात दोन तृतीयांशाहून अधिक भागात या पक्षाचें आज प्राबल्य झालेलें आहे. या पक्षाला हाणून पाडण्यासाठीं ॲंग्लो-फ्रेंचांच्या सेना रशियावर चाल करून जात आहेत. ॲंग्लो-फ्रेंच सेनेकडून हिंवाळ्यात आपलें फारसे नुकसान होणार नाही, आणि

हिंवाळा संपण्यापूर्वी म्हणजे डिसेंबर–जानेवारी महिन्यांत जर्मनीवर सडेसोटांचा अमल सुरू होऊन जर्मनी व रशिया यांची एकी होईल आणि या एकीपुढे ॲंग्लो–फ्रेंचाचें कांहीं चालावयाचें नाहीं अशी आशा सडेसोटांना वाटत आहे. डिसेंबरांत सडेसोटांचा अंमल जर जर्मनीवर पूर्णपणें बसला तर जानेवारींत तहाच्या परिषदेस सुरुवात होणें शक्य नाहीं. बर्लिन, पेट्रोग्राड व मास्को हीं शहरें ॲंग्लो–फ्रेंच सेनेला प्रथम ताब्यात घ्यावी लागतील आणि नतर तहाच्या परिषदेस सुरुवात होईल. सडेसोटाचा अमल डिसेंबरांत जर्मनींत सुरू न होतां जर समग्रही पक्षाची लोकशाही जर्मनींत सुरू झाली तर जानेवारीपासून तहाच्या परिषदेस प्रारंभ होईल. बादशहा पंचम जॉर्ज यानीं पारिस शहरास नुकतीच भेट दिली आणि सेनापति फॉक व फ्रेंच मुत्सद्दी यानीं लंडन शहरास भेट दिली. या भेटीच्या वेळीं इंग्लंड व फ्रान्स याचें परस्परांवरील प्रेम दृढ झालें आणि तहाच्या वेळीं दोन्ही राष्ट्रानीं मिळून करावयाच्या मागण्या ठरविण्यात आल्या. जर्मनीच्या वसाहती जर्मनीला परत मिळावयाच्या नसून इंग्रजी साम्राज्यास त्या जोडण्यात येतील, आरबी समुद्र व कास्पियन समुद्र यांच्या काठचे मुसलमानी प्रदेश इंग्रजी साम्राज्याच्या पखाखालीं जातील, आस्ट्रिया, हंगारी, जर्मनी व रशिया येथील राज्यव्यवस्थेला कोणतें वळण लावावयाचें ही कामगिरी फ्रान्सवर सोपविण्यात येईल; पूर्व भूमध्य समुद्राची विल्हेवाट इटली व ग्रीस यांच्या मर्जीप्रमाणें लागेल; जर्मनीपासून शक्य तेवढी मोठी खंडणी घेण्यांत येईल; इंग्रजी आरमार कमी जास्ती करण्याच्या कामांत इतर राष्ट्राना इंग्लंड बिलकूल बोल देणार नाहीं, आणि सक्तीचे लष्कर सर्व देशांतन नाहीसें करून टाकण्याच्या कामीं प्रे. वुड्रुसन याचें मत उचलून धरण्यांत येईल. असें फ्रान्स व इंग्लंड येथील मुत्सद्यांनी डिसेंबरचे प्रारंभाला आपापसांत ठरवून ठेवल्यासारखे दिसत आहे.

# महायुद्धाच्या पांचव्या वर्षाचा जून महिना

## पक्क्या तहावरील सह्यांच्या वेळची परिस्थिति

जूनच्या २३ तारखेस जर्मन पार्लमेंटनें सह्या करण्यास समति दिली आणि २५ तारखेस जर्मन वकिलानीं तहावर सह्या केल्या. जर्मन वकिलांच्या सह्या झाल्यावर फ्रान्स, इंग्लड, अमेरिका आदिकरून सर्व दोस्त राष्ट्रांनीं तहावर सह्या केल्या, आणि महायुद्धाची परिसमाप्ति झाली. सर्व जगाला ग्रासून टाकणारें जे युद्ध पाच वर्षांपूर्वी सुरू झाले त्या सबधाचें लढण्याचें काम गेल्या नोव्हेंबर महिन्यातच तहकूब ठेवण्यात आले. त्याचवेळीं महायुद्धाची खरी परिसमाप्ति झाली. गेल्या ६ महिन्यांत तहाची वाटाघाट झाली. या सहा महिन्यापैकीं शेवटच्या दोन महिन्यात म्हणजे मे–जून महिन्यात तहाच्या वाटाघाटीस असे स्वरूप प्राप्त झालें कीं, तहावर सह्या न होता तहकूब ठेवलेलें लढण्याचें काम आणखी चारसहा महिने पुढे चालते कीं काय अशी भीति वाटू लागली; पण जून अखेरला जर्मनीनें सह्या करण्यास समति दिल्यानें ती भीति टळली व लढण्याचें काम एकदाचें सपलें. जून अखेरला जर्मनीशीं झालेला तह युरोप खडात कितपत शांतता आणतो या गोष्टीचा आता चोहोकडे विचार सुरू आहे. ज्या कारणामुळे महायुद्धास सुरुवात झाली तीं कारणें तहाचेवेळीं किती नष्ट झालीं आहेत, याचा विचार केला म्हणजे तहानें उत्पन्न केलेली शातता कितपत नादेल हे ठरविण्यास ठीक पडेल.

महायुद्धाच्या कारणापैकीं दोन पक्षाना अरेतुरे करण्यास लावणारी अखेरचीं तात्कालिक कारणें एका बाजूस ठेविलीं तर इतर कारणाचे दोन वर्ग करतां येतात. पहिला वर्ग म्हणजे युरोपांतील लष्करशाहीची वाढ आणि या लष्करशाहीमुळे सर्व युरोपखडात व विशेषतः जर्मनींत लढण्याची उत्पन्न झालेली खुमखुमी होय. दुसरा वर्ग म्हणजे ज्या वासनाना बळी पडून युरोपियन राष्ट्राना लष्करशाहीची सत्ता सुखावह वाटली त्या वासनांचा जोर होय. जर्मन तहाच्यावेळीं लढण्याची खुमखुमी युरोपियन राष्ट्रांत कितपत नष्ट झाली आणि महायुद्धास सुरू करणाऱ्या वासनाना कोणते वळण मिळालें हें आतां आपण पाहूं या. लढण्याच्या खुमखुमीसबधानें विचार करता महायुद्धाचा शेवट

रणभूमीवरील भीषण कृत्यानीं जितका घडवून आणिला तितकाच निरनिराळ्या मताच्या वादविवादानीं घडवून आणिला असे म्हणणें भाग पडते. महायुद्धातून प्रथम पाय बाहेर काढला बल्गेरियानें. सॅलिनोकाच्या बाजूनें बल्गेरियाचा पराभव होऊन बल्गेरियन सैन्याची पीच्छेहाट झाल्यानें बल्गेरियन सरकारनें लढण्याची तहकुबी मागितली. पण ही तहकुबी लढण्याच्या कलेंत किंवा सामर्थ्यांत स्वपक्षाहून विरुद्ध पक्ष रणभूमीवर विलक्षण रीतीनें वरचढ ठरला आणि आपला पक्ष चारीमुंडे चीत झाला ह्मणून नव्हे, तर न लढताहि प्रे. विल्सननें त्याच्या चौदा तत्त्वाप्रमाणे आपलीं इष्ट कार्यसिद्धि होईल असे बल्गेरियास वाटलें ह्मणून होय. लढण्यानें आपलें दैव जितकें उदयास येईल तितकेंच न लढण्यानें येईल अशी समजूत हंगारीतील बहुजन समाजाची प्रथम झाली, आणि हंगारीच्या सैन्यानें लढण्याची टाळाटाळी प्रथम केली, व सॅलिनोकाच्या रणभूमीवर बल्गेरियास मदत हंगारीकडून होत नाहीं असे पाहून हंगारीची विचारसरणी बल्गेरियानें उचलली आणि लढण्याची तहकुबी मागितली. बल्गेरियाप्रमाणें हंगारीनेंहि महायुद्धाच्या विरुद्ध आपलें मत प्रकट केलें, आणि आस्ट्रियन बादशाहीची सत्ता उधडणें झुगारून दिली त्यामुळे आस्ट्रियन बादशाही ढासळली. आस्ट्रियन बादशाही ढासळल्याबरोबर जर्मनींतील कैसरशाही कोसळली. महायुद्धाच्या तहकुबीच्या कारणात हंगारीचें झालेलें मतांतर एक प्रमुख कारण असून या मतांतरानें बल्गेरिया, आस्ट्रिया व जर्मनी या देशांना हां हां म्हणता पछाडल्यामुळे अत्यंत त्वरेनें तहकुबी घडून आली. फ्रान्सच्या रणभूमींत जर्मन सेनेची जर एकसारखी पीछेहाट झाली नसती, तर हंगारीतील विचारक्रांति इतक्या झपाट्यानें सर्व मध्य युरोपभर पसरली नसती, ही गोष्ट खरी आहे. सेनापति फॉक यानीं जर्मन सेनेवर विलक्षण जय मिळविले, आणि जर्मन सेनेची एकसारखी पीछेहाट सुरू केली. त्यावेळीं तहकुबी जर झाली नसती आणि दोन चार महिने लढण्याचें काम जर तसेंच पुढें चाललें असतें, तर जर्मन सेनाशकट सेनापति फॉक यानीं पुरा मोडूनहि टाकला असता. पण जर्मन सेनाशकटाचा चुराडा होण्यापूर्वी नुसती पीछेहाट चालू असतांनाच तहकुबी झाली. पीछेहाटीमुळे विचारक्रांतीस जोर आला आणि ती क्रांति जोरावल्यामुळे जर्मन सेनेला तहकुबी इष्ट वाटली. म्हणजे कोणत्या तरी एका पक्षाच्या सेनाशकटाचा चुराडा होऊन लढाई न थांबतां दोन्ही सेनाशकट लढण्याच्या स्थितींत कायम राहून लढाई थांबली.

याचा परिणाम असा झाला आहे कीं, सेनापति लुडेनडार्फ, हिंडेनबुर्ग वगैरे आपण पडे पेहेलवान आहोत, ही गोष्टच हल्लीं नाकबूल करीत आहेत. जर्मन लष्कर व जर्मनीचे लष्करी अंमलदार स्वतःस लष्करी उद्योगधंद्यात दोस्त राष्ट्राहून अधिक वाकबगार व अधिक लायक समजतात. पराभव न होता अत्यंत लाजिरवाण्या अशा तहाचीं कलमें कबूल करावयास लावणाऱ्या दुःस्थितीचें खापर ते नव्या विचारक्रांतीवर फोडीत असून, महायुद्धातील खरे कर्तृत्ववान पुरुष अशा दिमाखानें जर्मन समाजात जर्मन सेनानायकत्व तहानंतरहि मिरवत आहे. म्हणजे तहाच्या योगानें जर्मनीतील लष्करशाहीची खुमखुमी जिरली नसून आपत्काल म्हणून या खुमखुमीने थोडा वेळ सत्ता सोडली आहे, इतकेच काय ते! जर्मनीत कैसरशाही ढासळल्यानंतर सोशियालिस्टपक्षाची लोकशाही सुरू झाली. त्या सत्ताधाऱ्यानीं गेल्या मे जून महिन्यात तहाची वाटाघाट ज्या आढ्यतेने चालविली, त्या आढ्यतेकडे पाहिलें आणि महायुद्धात जर्मनीचा पराभव झाला ही गोष्ट जर्मनीची नवी लोकशाही नाकारीत आहे, असेच दृष्टीस पडतें. कौंट रेंझा वकील म्हणून पारिसमध्ये आले, ते प्रे. विल्सन, मि. लाईड जॉर्ज, मि. क्लेमेंसो यांच्याशी बरोबरीच्या नात्यानें वागू लागले. चारीमुंडे चीत झाल्यामुळे दाती तृण धरून शरण आलेल्या शत्रूचा लीनपणा त्याच्या अंगी बिलकूल दिसत नव्हता. मे महिन्यात तहाच्या अटी जर्मनीला कळविण्यात आल्यावर जर्मनींतील निरनिराळ्या पक्षानी व सामान्य लोकसमाजाने जी चर्चा केली तीहि चोप खाल्लेल्या राष्ट्राच्या दीनपणाची नव्हती. खुद्द जर्मन पार्लमेंटमध्यें मुख्य मंत्री मि. शिडमन यानींहि दोस्त सरकारावर यथेच्छ तोंडसुख घेण्यास कमी केलें नाही. सोशियालिस्ट पक्षानें राज्यक्रांति घडवून आणून सोशियालिस्ट पक्ष जर्मनींत अधिकारारूढ झाला, याबद्दल सर्व जणानी जर्मनीची तारीफ करून जर्मनीशी मोठ्या अदबीनें वागविलें पाहिजे असा प्रकारच सर्व जर्मन पुढारी व्याख्यानातून, वर्तमानपत्रातून व पार्लमेंटरी भाषणातून करीत आहेत असें मे–जून महिन्यातील जर्मन चळवळीवरून वाटल्यावाचून रहात नाहीं. सर्व दोस्त राष्ट्रें एक होऊन त्यांनीं जे महत्कार्य केलें, त्या महत्कार्याच्या तोडीचें किंबहुना काकणभर सरस किंमतीचें महत्कार्य जर्मनीच्या सांप्रतच्या सत्ताधाऱ्यानीं घडवून आणलें अशी जर्मन सोशियालिस्ट पक्षाची दृढ समजूत झाल्याचें दिसत आहे. तुम्ही जसे मोठे तसेच आम्हीहि मोठे, किंबहुना आमच्या मताचें पाणी तुमच्या

लोकांच्या ओजळीनें घ्यावे लागेल, अशा दिमाखाने आजचे जर्मन सत्ताधारी गेले दोन तीन महिने एकसारखे बोलत आहेत. केसरशाहींत केसर बादशहानें, त्याच्या मंत्रिमंडळानें व सेनापतींनी ज्या खुमखुमीनें बोलावें, त्याच खुमखुमीने सोशियालिस्ट लोकशाहीसहि बिलकूल सोडिलें नाही. असे गेल्या तीन महिन्यातील वाद विवादांवरून स्पष्ट झालें.

जर्मनीत सामान्यतः आज तीन पक्ष आहेत. बुडालेल्या केसरशाहीचा पहिला पक्ष, केसरशाही धुडकाविणारा सोशियालिस्टाचा दुसरा पक्ष, आणि पूर्वीच्या हक्कदारांची परंपरा एकदम मोडून आजच सर्व सोशियालिस्टिक तत्त्वें सर्वतोपरी अमलात आणवू इच्छिणाऱ्या स्वतंत्र सोशियालिस्टाचा तिसरा पक्ष. हे तीनहि पक्ष अभिमानाने व गर्वानें सारखेच ताठलेले दिसत आहेत. तहाच्या अटीला संमति द्यावी किंवा न द्यावी याविषयीं वादविवाद चालला असताना सेनापति हिंडेनबुर्ग यानीं जाहीर केले कीं, लढता लढता मरणें पुरवलें, पण अपमानास्पद तह नको पूर्व प्रशियातील लष्करी लोकानीं तर स्वतंत्र सैन्याच्या टोळ्या उभारल्या असून काहीतरी कुरापत काढून पोलंडशीं लढण्याची तयारी जोराने चालविली आहे. सोशियालिस्टिक जर्मन सरकारनें तहावर सह्या करण्याचें ज्यावेळी मुक्रर ठरविले त्याच वेळीं पन्नास जर्मन आरमारी जहाजानीं स्वतःच्या जहाजाच्या तळाशी भोकें पाडून जहाजे समुद्रात बुडविलीं. हीं आरमारीं जहाजे सुमारे १२५–१५० कोट रुपये किंमतीची होती आणि युद्धाच्या तहकुबीच्या वेळीं इंग्रजी आरमाराच्या नजर कैदेत हीं आरमारी जर्मन जहाजे नांगर टाकून राहिली होतीं. तहातील कलमानें या आरमारी जहाजाची मालकी दोस्त सरकाराकडे यावयाची होती. उद्या ही जहाजे दोस्त सरकाराच्या मालकीची होणार असे मुक्रर करताच, या आरमारी ताडयाचे मुख्य ॲडमिरल रौटर यानीं आपल्या हाताखालील खलाशाना जहाजे बुडविण्याचा हुकूम दिला, व सर्व खलाशानीं हुकूम बरोबर अमलात आणिला. या कृत्यानें बरेच जर्मन खलाशी समुद्रात बुडून मेले, व बाकीचे चार पाच हजार खलाशी इंग्रजाचे कैदी झाले. या कृत्याबद्दल जाब विचारला असताना ॲडमिरल रौटर यानीं असें सांगितलें कीं, शत्रूच्या स्वाधीन होऊं नये असा आरमारी हुकूम असल्यामुळे मी हें कृत्य केलें आणि पुन्हा प्रसंग आल्यास मी पुन्हा असेंच कृत्य करण्यास चुकणार नाही.

चारीमुळे चीत झालेला पहिलवान जसा गळून जातो, त्याप्रमाणें जर्मनीचा लष्करी जोर गळून गेलेला नाहीं, हे पहिल्या पक्षाच्या तहाच्या वेळच्या वर्तनावरून स्पष्ट होते.

आता दुसऱ्या पक्षाकडे वळू. हा दुसरा पक्ष म्हणजे जर्मन सोशियालिस्टांच होय. हाच सांप्रत जर्मनीत अधिकारारूढ आहे, आणि सामान्य लोकसमूहाचा कल या पक्षाकडे आहे. मे महिन्यात तहाची वाटाघाट करण्यासाठीं या पक्षाचे एक पुढारी कौन्ट रैन्झा हे पॅरिस येथे हजर राहिले. तेथे त्यांनीं ताठ्याचें वर्तन केले. प्रे. विल्सन याच्या चौदा अटी सोडून तहाची कलमे आहेत असे दोस्त सरकारांना सांगून दोस्त सरकाराना उलट शिकविण्याचा आव आणिला.जसा काहीं जर्मनीचा पराभवच झाला नाही, अशा ऐटीनें ते पारिस येथे वागत होते. खंडणी संबधानें, पोलंडला तोडून द्यावयाच्या मुलुखासंबधानें आणि राष्ट्रसंघात जर्मनीचा प्रवेश करून देणाऱ्या कलमासंबधाने दोस्त सरकारानीं काहीं सवलती दाखविल्या तरी कौंट रौंझा यानी तहावर सह्या करण्याचें नाकारिलें, आणि आपल्या जागेचा राजीनामा दिला. तहाच्या अटी नव्या जर्मन सरकारापुढे विचाराकरिता आल्या, त्यावेळी मुख्य मंत्री शिडमन यानीं महायुद्ध जर्मनीस पुढे चालविणें शक्य नाही ही गोष्ट प्रांजलपणे कबूल केली. पण स्वतः तहाच्या अटींना संमति देण्याचें त्यानी नाकारिलें. मंत्रिमंडळाकडून सोशियालिस्ट पक्षाकडे या अटी जेव्हा विचाराकरिता आल्या, त्यावेळीं जर्मन राष्ट्र त्या अटींनी बुडविण्याचा दोस्त सरकाराचा हेतु आहे, अशाच प्रकारचे शिव्याशाप सर्व सोशियालिस्ट पक्षानें दोस्त सरकाराना दिले. तथापि आज आपल्यापाशीं सैन्य नाही, तोफा नाहींत व विमाने नाहीत, अशा सबब वर तहावर सह्या करण्यास बहुमत अनुकूल झालें. कैसरच्या लष्कराचा दोस्त सरकारानीं पराभव करून आपणास लष्करशाहींतून सोडविलें त्याबद्दल जर्मनींतील सोशियालिस्ट पक्षास काहींच वाटत नाहीं असे स्पष्ट दिसतें. आपणास काल जरा प्रतिकूल झाला आहे, तेव्हा हार खाणें जरूर आहे, एवढीच भावना दृष्टीस पडली, पण ताठ्यात व अहंकारात काहींच कमी झालेले दृष्टीस पडले नाहीं. जर्मन सरकारची व जर्मनीतील सोशियालिस्ट पक्षाची अशी स्थिति कां असावी? पराभूताची लीनता त्याच्या अंगीं का दिसू नये? जर्मन राष्ट्राचा हा असा ताठेबाज स्वभाव आहे असे म्हणावें, तर जर्मन राष्ट्राच्या बुद्धिमत्तेला ते शोभत नाहीं. स्वभावाचा हा अंशतः दोष असेल, पण तेवढयावर या घमेंडीचें खरें कारण समजून येत

नाहीं. पारिसच्या तहावर जर्मनीनें ज्याप्रमाणें नाखुषीनें सह्या केल्या त्याप्रमाणेंच वर्ष सव्वा वर्षापूर्वी ब्रेसलिटोव्हस्क येथे रशियातील लेनीनच्या पक्षानेंहि मोठया नाखुषीनें जर्मनीनें लिहून काढलेल्या तहाच्या खडर्यावर सह्या केल्या. त्यावेळीं जर्मनीशीं थोडा वादविवाद करण्याचा प्रयत्न लेनीनच्या पक्षानें केला. पण जर्मनी ऐकत नाहीं असें पाहून मोठया ऐटीनें व घमेंडीनें बेपर्वाईच्या लहरींत सह्या करून, एक क्षणभरहि जर्मन वकिलाचें तोंड अधिक वेळ बघावयाचें नाहीं असें ठरवून, लेनीनचा वकील मोठया गुर्मीनें व तडफेनें सभेच्या गावांतून स्पेशल ट्रेनने निघून गेला. त्यावेळीं लेनीनच्या वकिलाचे हे वर्तन निव्वळ उद्दामपणाचें आहे, असे जर्मनीला वाटलें. कर्मधर्मसंयोगानें काहीं भिकारडे झारच्या मागून रशियाच्या सिंहासनावर बसल्यावर स्वतःच्या जवळ कांहीं सैन्य नसताना, हत्यारें पात्यारे नसतांना, दारूगोळा नसतांना, लष्करी विद्येत निपुण झालेले सेनानायकहि नसताना, त्यानीं असला उर्मटपणा विजयशाली केसरशाहीशीं दाखवावा, हें त्यावेळीं जर्मनींतल्या मुत्सद्याना हास्यास्पद वाटल्यास नवल तें काय ! पण गेल्या दोन वर्षाच्या इतिहासानें सदर उर्मटपणात हास्यास्पदपणा फारसा नव्हता असें सिद्ध केलें आहे. विजयशाली जर्मन लष्कराशीं लढण्याची ताकद लेनीनच्या अगात नव्हती आणि एवढयाकरिताच त्याने तहावर सह्या केल्या, बाकी जर्मनीच्या कैसरला, सैन्याला व मुत्सद्याना तो फारसा मान देत नव्हता. हा मान न देण्याचें कारण जर्मन लष्कराचा प्रभाव त्याला माहीत नव्हता हे नव्हे तर ज्या तत्त्वाचा त्यानें अंगिकार केलेला होता व त्या तत्त्वापुढे कैसरशाही डबघाईस येणार असेंच त्याला निःसंदेह वाटत असल्यामुळे जर्मन मुत्सद्याशीं बोलतां चालताना लेनिनचा वकील बेपर्वानें व घमेंडीनें बोलत होता.

त्यानंतरच्या वर्ष दीड वर्षाच्या इतिहासाकडे पाहिलें तर लेनिनच्या पक्षाची त्यावेळची घमेंड व बेपर्वाई फोल होती असेहि म्हणवत नाहीं. झार शाहीला लेनिननें खाल्ले ही गोष्ट कैसरशाहीला बरी वाटली, पण झार- शाहीला खाऊन लेनिनची सत्ता रशियात प्रस्थापित होण्याबरोबर आस्ट्रियातील व जर्मनींतील बादशाहीचा पाया डळमळीत होऊं लागला. सोशियालिस्ट मताचा खरा अनुयायी झारच्या सत्तेचा रशियात वारस झाला, व कांहीं महिने अधिकारावर टिकला ही एवढीच गोष्ट जर्मनी व आस्ट्रिया येथील सोशियालिस्टांना प्रोत्साहन

देण्यास पुरेशी झाली. रशियांत बोल्शेव्हिकांनीं कितीहि अत्याचार केले, तरी यांच्याकडे सोशियालिस्टाचें लक्ष अधिकाधिकच झुकू लागलें. लेनिन रशियांत मुख्य सत्ताधारी होऊ शकतो, आणि सोशियालिस्टिक मतें वेडयावाकडया प्रकारानीं कां होईना, पण अमलात आणू शकतो ही एवढीच गोष्ट आस्ट्रो-जर्मन सोशियालिस्टाना महत्त्वाची वाटली. निंद्य प्रकारानीं गर्हणीय ठरलेल्या लेनिनच्या पक्षाचें जर रशियांत बरेच चालतें, आणि तो सोशियालिस्टिक मतांचा आहे एवढयावरच जर त्याला निभावून घेतां येतें, तर लेनिनचे निंद्य मार्ग टाळल्यास आस्ट्रो-जर्मन सोशियालिस्टाचें आस्ट्रियांत व जर्मनींत नीट बस्तान का बसू नये, अशी महत्त्वाकांक्षा दोस्त सरकाराच्या जयाइतकीच कैसरशाही बुडविण्यास कारणीभूत झाली. जर्मनींतील सोशियालिस्ट सोशियालिस्टिक मताच्या अभिमानानें आज नटलेले आहेत. जर्मन स्वभावातील ताठा, कुर्रा व करारीपणा आज त्याच्या अगांत दिसत आहे, याचें कारण सोशियालिस्टिक मतावरील त्याचा दृढविश्वास होय. महायुद्ध फार लांबल्यामुळे सर्व लोकास आलेल्या लढाईच्या कटाळयानें सोशियालिस्टिक मताना वर डोकें काढण्यास संधि मिळाली ही गोष्ट खरी आहे. पण कटाळयाचेंच रूपांतर सोशियालिस्टिक मतात झालें हे म्हणणें खोटें आहे. सोशियालिस्टिक मताना आयास न पडतां महायुद्धानें सिंहासनावर बसविलें; पण ते रडत राऊत घोडयावर बसलेले नाहींत. जर्मन केसरशाहींतील चिकाटीनें, करारीपणानें व दिमाखानें ते अधिकारारूढ झालेले आहेत. लेनिन जसा एका तत्त्वाला वाहिलेलला आहे आणि त्या तत्त्वाकरिता बरें वाईट काय वाटेल ते करून अधिकाराची लगाम आपले हातातून न सोडण्यास जसा तो तत्पर आहे, तशाच प्रकारची चिकाटी त्याच्या जर्मनींतील व आस्ट्रेलियातील अनुयायातहि दिसत आहे. आता त्या संकटाला कसे तरी तोंड देऊन जर आपण जिवत राहिलों आणि आपल्या मताची सत्ता आपल्या देशात कायम ठेविली तर ती कितीहि हिडिस स्वरूपाची असली किंवा दुर्बलतेची असली किंवा संकटमय असली तरी असल्या जिवत राहण्यानें शेजाऱ्यापाजाऱ्याना उदाहरण होऊन आपल्या मदतीस त्याना धावून यावयास लावता येते आणि आस्ते आस्ते तिच्यावरील संकटें टळून ती सशक्त होऊन विद्रूपतेच्या ऐवजी मोहकपणा तिच्यात उत्पन्न होऊ लागतो, असें लेनीनचें मत आहे. सोशियालिस्टिक मतें सर्व युरोपभर पसरलीं गेलीं पाहिजेत, या मताचा पूर्ण अभिमानी लेनिन असल्यामुळे रशियातील

बोल्शेव्हिकांच्या विद्रूप व भेसूर स्वरूपाकडे त्यानें दुर्लक्ष केलें, आणि सोशियालि-स्टिक मतांची सत्ता जशी साधली तशी रशियांत स्थापन केली. वर्ष दीड वर्षाच्या अवधींतच त्याच्या सत्तेचें अस्तित्व आस्ट्रियन व जर्मन बादशहाना बाधलें.

आस्ट्रियन बादशाहीची सत्ता झुगारून देण्यास सुरवात करणाऱ्या हंगेरींत आज बोल्शेव्हिक स्वरूपाची सत्ता आहे हंगेरींतील सडेसोट रशियांतील बोल्शेव्हिकाच्या इतके निंद्य मार्गानीं जात नाहीत. जर्मनींत बोल्शेव्हिकाची सत्ता स्थापन करण्याचे प्रयत्न गेल्या सहा महिन्यात दोनतीनदा झाले, पण ते फसले. जर्मनींत जरी सडेसोट अधि-कारारूढ झाले नाहींत तरी सोशियालिस्टाचे पाय चागले खंबीर झाले आहेत. अशा रीतीनें स्वतःचे देशात खंबीर झाल्यामुळे जर्मन सोशियालिस्टाना जर्मन स्वभावातील अहंकारामुळे असे वाटत आहे कीं, युरोप खंडात मानवी जातीचे खरें हित करणारी राजसत्ता स्थापित करण्याचा मान आम्हांसच आज मिळाला असून आमच्याच नमुन्याचें अनुकरण केल्याशिवाय इतर राष्ट्राना गत्यतर नाहीं. रशियातील बोल्शेव्हिकाचें हिडीस स्वरूप टाळून सोशियालिस्टिक मते केसरच्या सिंहासनावर आम्ही बसविली असल्यामुळे रशिया व हंगारी यानींहि आमचेंच उदाहरण गिरविलें पाहिजे अशा गुरुपदाच्या मोठेपणाला आम्ही चढलों आहों. मानवांचें कल्याण करण्याची खरी शक्ति जर आज कोणत्या राज्यपद्धतींत असेल तर ती आमच्या राज्यपद्धतीत आहे. आमच्या सोशियालिस्टिक मतानीं झारला धूळ चारली, आस्ट्रियन बादशहाला तख्तावरून खालीं ओढलें, आणि केसरला स्वदेशातून पळ-काढण्यात लाविलें. हीं तीन प्रचंड कामे सोशियालिस्टिक मतें करीत असताना रशियात या मताचें स्वरूप राक्षसी हिडीसतेचें झालें; पण रशियातील सोशिया-लिस्टाहून आम्ही जर्मन सोशियालिस्टिक अधिक हुषार, बुद्धिमान व विवेकी असल्यामुळे सोशियालिस्टिक राजसत्तेचा खरा नमुना निर्माण करून सर्व जगाला उदाहरण घालून देण्याचा मान आम्हासच मिळत आहे. रणभूमीवरील दोस्त सरकारच्या साम्प्रतच्या मुसंगतपणामुळे व आम्ही नुकतेच अधिकारारूढ होऊन पूर्वीचा सेनाशकट विस्कळित झाल्यामुळे, दोस्त सरकार आज आम्हाला धाकदपटशा दाखवून आम्हाला नावडणारा तह आमच्यावर लादीत आहेत. पण थोडक्या अव-काशात दोस्तसरकाराचे प्रजाजनहि आमचें उदाहरण पाहून आमच्याच राजसत्तेचें अनुकरण केल्याशिवाय रहाणार नसल्यामुळे काहीं काल आम्हास तहाच्या आपत्तींत

करावा लागणार आहे इतकेच. दोस्तसरकारांच्या देशांतील बुद्धीनें आज आम्हांस लपत छपत वरलेलें आहे. आज जो प्रकार गुप्तपणें चाललेला आहे तोच प्रकार उद्यां उघडपणे सर्रास सुरू झाल्यावर आमचा वरपक्ष सर्व जगभर स्थापित झाल्या-वांचून राहाणार नाहीं जर्मनींत अधिकारारूढ असलेल्या सोशियालिस्टांचा मताभिमान वरील स्वरूपाचा असल्यामुळें, एक प्रकारच्या गुर्मीनें व वरचढपणानें वागत राहूनच त्या पक्षानें बहुमतानें तहावर सह्या करण्यास संमति दिली.

जर्मनींतील तिसऱ्या पक्षाकडे पाहिलें, तर स्वमताचा निशंकपणा अधिक जोराचा दृष्टीस पडतो. हा तिसरा पक्ष स्वतंत्र सोशियालिस्टाचा आहे. बोल्शेव्हिकांचें अनुकरण करण्यामध्ये हा पक्ष धन्यता मानतो. भांडवलवाल्याचे कारखाने व इस्टेटी आजच जप्त केल्या पाहिजेत व त्याबद्दल त्यांस मोबदला देण्याचें कांहींच कारण नाहीं, असे बोल्शेव्हिकाप्रमाणें याहि पक्षाचें मत आहे. आगगाड्या, खाणी वगैरे मोठ-मोठ्या कारखान्याची मालकी भांडवलवाल्याच्या हातातून जाऊन समाजाच्या हातीं येईतों, संप करून कारखाने बंद पाडणें हें शस्त्र या तिसऱ्या पक्षानें हातात घेतलें आहे. असल्या संपानें समाजातील इतर लोकाचें मत आपल्याकडे वेधलें जाईल. आणि लवकरच सामान्य जनसमूह आपल्या बाजूचा तरी होईल, किंवा निदानपक्षीं ज्या दिवशीं लष्कराचे लोक संपातील तत्त्वाना अनुकूल होतील त्या दिवशीं आपण अधिकारारूढ होऊ आणि तो दिवस फार दूर नाहीं, असा या पक्षाचा भरवसा आहे. तहाच्या अटींनीं लष्करी दृष्ट्या व आरमारी दृष्ट्या जर्मनी रसातळास पोंचणारा असल्यामुळे, जर्मनींतील लष्करी सामर्थ्य सांप्रतचें सरकार उचलून धरण्यास तितकेसे उत्सुक नाहीं. सोशियालिस्टिक सरकार उलथून पडलें तरी चालेल असे म्हणणाऱ्याचा लष्करी शक्तीचा वर्ग तहानतर दिवसानुदिवस फुगत चालला आहे. मोठमोठ्या भांडवलवाल्याना तहानतर स्वतःच्या उत्कर्षाविषयीं शंका उत्पन्न झाल्यामुळे, तेहि उदासीन झाले आहेत. महायुद्धाच्या हालअपेष्टा सर्व जगाला भोगाव्या लागल्या. अमक्या राज्याची किंवा तमक्या देशाची संपत्ति स्वतःच्या मुठींत ठेवून परदेशच्या संपत्तीची भर त्यात घालून आपल्या हाताखालील लोकावर जीवनक्रमासंबधानें अरेरावीची सत्ता चालवावी, अशी जी सर्व युरोपखंडातील भांडवलवाल्याना गेलीं ५०–७५ वर्षे हाव सुटलेली होती ती हाव महायुद्धाचें मूळ कारण होय, असे सोशियालिस्ट पक्षाचें ठाम मत आहे. जर्मनीशीं झालेल्या तहानें संपत्तीची ही हांव कमी झालेली नसून, पंच महाराष्ट्रातील

सर्व भांडवलवाल्यांना पूर्वीच्याच क्रमानें पुढें पाऊल टाकण्यास नव्या सवलती व नवी मुभा मिळाली आहे, असा तहाचा अर्थ जर्मनींतील सोशियालिस्ट पक्ष करीत आहे. मोठमोठ्या कारखान्यांच्या जोरावर स्वदेशाची संपत्ति आपल्याच कुलपांत कोंडून ठेवणें व परदेशची संपत्ति स्वतःचे घरांत खेंचून आणणें हा युरोपियन पराक्रमाचा सांप्रतचा अर्थ आहे. असल्या पराक्रमाला गेलीं शंभर वर्षें युरोपनें उत्तेजन देता देतां मध्ययुरोप व पूर्व युरोप यांच्या अनुभवास आज असे आलें आहे कीं, सदर पराक्रमाच्या नादीं लागून युरोपचे हातपाय आज निरुत्साही, आळशी व असंतुष्ट झाले असून, पुढें पराक्रम गाजविण्यास शरिरात सामर्थ्यच उरलें नाहीं. स्वतःच्या शरिराला खाऊन टाकणारा पराक्रम तरी घेऊन काय करावयाचा? हा पराक्रम संपुष्टात येईल तो सुदीन, अशी समजूत रशियातील बोल्शेव्हिकाची आहे. मजुरांनीं कारखाने बळकाविले म्हणून तरी काय बिघडतें, अशी अनास्थेची वृत्ति बळावत चालली आहे. स्वदेशातील मजुरांना राबवून परदेशाला खंडणी भरण्यापेक्षा आपल्याच मजुराच्या हातीं कारखाने गेलेले काय वाईट, अशा बुद्धीनें खाका वर करण्याकडे पैसेवाल्यांचीहि प्रवृत्ति होऊ लागली आहे

शिवाय सर्व युरोपांत खाण्यापिण्यासंबंधानें लोकांचे हाल गेल्या चार वर्षांहून आज अधिक होत आहेत. कित्येक कारखाने साहजिक रीतीनें बंद पडले आहेत, शेतकीकडे दुर्लक्ष झालें आहे आणि उपासमार सोसणें लोकांच्या अंगवळणी पडल्यामुळें कामकाज करून तरी काय करावयाचें अशी संसाराविषयीं बेपर्वाई चहूंकडे पसरली आहे. ही बेपर्वाई सोशियालिस्ट मतानाच अधिक जोर आणीत आहे. नवीन शास्त्रीय शोधांच्या जोरावर भांडवलवाल्यानीं स्वतःच्या कबजात मोठमोठे कारखाने ठेऊन एकेका भांडवलवाल्याचे हात खालीं हजारो मजुरांना वाईट स्थितींत राबावयास लावून त्यांच्या श्रमाच्या जोरावर परदेशी संपत्ति स्वदेशास आणावयाची आणि शारीरिक कष्ट करणारे व भांडवल नाचविणारे यांच्या राहाणीमध्यें व रोजच्या शृंगारामध्यें कष्ट करणाऱ्यांच्या दृष्टीला दुःसह तफावत पडेल अशा रीतीनें त्या संपत्तीचा उपभोग घ्यावयाचा, हा सोशियालिस्टाच्या दृष्टीनें भांडवलवाल्यांचा जीवनक्रम ठरलेला आहे. पूर्वीच्या एकमुखी सत्तेचे अभिमानी राजे व सरदार जसे परदेशच्या विजयावर स्वतःचे हाताखालील नोकरांना दुःसह रीतीनें वागवीत असत, आणि जशी राजांची व

सरदाराची चैन त्याच्या सभोंवारच्या परिवाराला खपेनाशी होत असे, त्याप्रमाणेंच आज युरोपखडांत मोठमोठया कारखान्याचे मालक गरिबांचे डोळयांत सलू लागले आहेत. परदेशातून संपत्ति स्वदेशात हे भांडवलवाले आणितात, हें खरें आहे; पण त्या क्रियेसाठीं स्वदेशांतील मजुरांना इतके राबावें लागतें कीं, आणि श्रीमंतांच्या व गरीबाच्या राहणीमध्ये इतके विलक्षण अंतर पडतें कीं, ही परदेशची संपत्ति नको, हे राबणेंहि नको आणि अपमानास्पद तफावतहि नको, असें गरिबांना वाटू लागतें. युरोपात गरिबाचीं मनें वरीलप्रमाणें श्रीमंताविरुद्ध खवळलेलीं आहेत. युरोपखंडभर हीं मतें पसरविण्याचा साधारण मोठा उद्योग सोशियालिस्टांनीं आरंभिला असून, जर्मनीच्या तहानें त्या उद्योगास मध्ययुरोपात मोठा दुजोरा मिळाला आहे. हंगारीचें अनुकरण करण्याकडे मध्ययुरोपात अधिक प्रवृत्ति झाली आहे. हंगारीच्या नव्या सरकारच्या जुलमाला त्रासून फ्रान्समध्ये पळून आलेले हंगारीयन लोकहि हंगारींतील सडेसोटाची सत्ता तुम्ही नष्ट करा अशी फ्रान्सला विनति करीत असताना तुमच्या सारखी राज्यसत्ता आमच्या देशात स्थापा असे फ्रान्सला म्हणत नसून, बोल्शेव्हिकाच्याऐवजीं सोशियालिस्ट स्वरूपाची सत्ता आम्हास द्या; अशी मागणी करीत आहेत. म्हणजे मध्य व पूर्व युरोपात सोशियालिस्टिक मतें लोकांच्या मनावर पूर्णपणें ठसलीं असून पश्चिम युरोपची भांडवलवाल्या लोकशाहीचीं मतें तेथे आतां रुजणें दुरापास्त झालें आहे. तहाच्या कलमानीं भांडवलवाली लोकशाही व सोशियालिस्टिक लोकशाही असे दोन विभाग सर्व युरोपखंडाचे केले असून, पश्चिम युरोप भांडवलवाल्यांचे हातीं आहे आणि पूर्व व मध्य युरोप सोशियालिस्टाच्या हातीं आहे.

जगाचें कल्याण महायुद्धाचे वेळीं आम्ही आपल्या रीतीनें केलें, अशी साक्ष पटविणारा तह पश्चिम युरोपनें घडवून आणिलेला आहे. जर्मनीनें या तहावर सह्या केल्या असल्या तरी महायुद्धाचे वेळीं जी सोशियालिस्टिक राज्यक्रांति आम्ही घडवून आणिली, तीच क्रांति सर्व जगाला कल्याणप्रद होणारी आहे, अशी घमेंड जर्मनीस आज वाटत असून भांडवलवाल्याच्या पराभवाकरितां जर्मनी पूर्वी ज्या नेटानें, बुद्धीनें व करारीपणानें महायुद्धाच्या तयारीस लागला होता, तोच नेट, तीच बुद्धिमत्ता व तोच करारीपणा सोशियालिस्टिक मतें युरोपखंडभर स्थापित करण्याच्या कार्याला जुंपविण्यास जर्मनी तहानंतर प्रवृत्त होईल असे दाखविणारा नवा संचार जर्मनींत आज दृष्टीस पडत आहे.

जून अखेरीस झालेल्या तहानें पंच महाराष्ट्रांत पूर्वीच्या महत्त्वाकांक्षा कायम ठेविल्या असून, राष्ट्रसंघानें आपापसातील या महत्त्वाकांक्षेस आळा घालण्याचा प्रयत्न केला आहे. महत्त्वाकांक्षा सुदृढ झाल्या आहेत; आणि राष्ट्रसंघ' हा दुबळ्या जीवाप्रमाणें ह्या फोफावलेल्या महत्त्वाकांक्षेच्या गळ्यातील क्षुल्लक अलंकार होऊन बसणार; असें कांहीं तज्ज्ञाचें मत पडलें आहे. म्हणजे पंच महाराष्ट्रापुरतें जरी पाहिलें तरी पूर्वीचीं स्पर्धेचीं कारणे या तहानें नाहींशीं झालेलीं नाहींत, असें म्हणावें लागतें. या तहाने मध्य युरोपांत लष्करी दृष्टया, आरमारी दृष्टया, व आर्थिक दृष्टया कंगाल जरी केलें असलें, तरी नव्या सोशियालिस्ट मतांचा संचार तेथें अधिक जोराचा होण्यास हा कंगालपणाच कारणीभूत होणारा असून मध्ययुरोपचा व पश्चिम युरोपचा झगडा स्वमत स्थापण्याच्या दृष्टीनें फ्रेंच राज्यक्रांतीच्या दिवसासारख्या जाज्वल्य स्वरूपाचा ह्या तहामुळे होणारा आहे. रशिया, जर्मनी व हंगारी येथील सोशियालिस्टक मतें हाणून पाडल्याशिवाय फ्रान्स व इटली यांना यापुढें चैन पडावयाचें नाहीं. इंग्लंड, अमेरिका व जपान हीं राष्ट्रें या मतस्थापनेच्या झगड्यापासून अलग राहातील हे खरें आहे. मतस्थापनेचा झगडा युरोपात कदाचित् आस्ते आस्ते विझत जाईल, किंवा आस्ते आस्ते अधिक पेट घेईल. आस्ते आस्ते विझत गेला तरी, फ्रान्सला पुढील ४।५ वर्षे डोळ्यात तेल घालून सावधगिरीनें वागावें लागेल. पण या मतस्थापनेच्या झगड्यास जर तहाने पेटविलें तर खुद्द फ्रान्समध्ये व इटलीमध्येहि सोशियालिस्टाचा फैलाव वाढून तेथील भांडवलवाल्याचें सरकार स्वतःचे देशातील सोशियालिस्टापुढे कमकुवत दिसूं लागेल. हा कमकुवतपणा जर थोडासा जगाच्या नजरेस पडला, मध्ययुरोपातील व पूर्वयुरोपातील सोशियालिस्ट तहामुळे लष्करी दृष्टया कितीहि दुर्बल झाले असले तरी फ्रान्समधील सोशियालिस्टाच्या मदतीला धावून येऊन आपल्या मतांचा दिग्विजय सर्व युरोपखंडभर करण्याची संधी कधींहि व्यर्थ दवडणार नाहींत. तहाने खच्ची झालेल्या जर्मनीने फ्रान्सवर स्वारी करण्याचा लोभ जर यापुढें धरला, तर तो वरील स्वरूपाचाच होईल. या योगाची भीति फ्रान्सच्या मनाला राहू नये म्हणून जर्मनीनें फ्रान्सवर निष्कारण स्वारी केली असतांना इंग्लंड व अमेरिका फ्रान्सच्या मदतीला धावून येतील अशी हमी फ्रान्सच्या मनाला पटविण्याच्या एका नवीन तहावर प्रे. विल्सन व लॉईड जार्ज यानीं जुलईच्या प्रारंभाला सह्या केल्या आहेत.

---

# व्हर्सायचा तह

एका बाजूला दोस्त व सहाय्यक राष्ट्रें आणि दुसऱ्या बाजूला जर्मनी यांच्या दरम्यान झालेल्या तहावर व्हर्साय येथें ता. २८ जून १९१९ रोजीं सह्या झाल्या व परस्पर समतीनतर तो ता. १० जून १९२० रोजीं अमलात आला. हा जर्मनी बरोबरचा तह म्हणजे ऑस्ट्रिया, हंगारी बल्गेरिया, तुर्कस्थान या सर्व शत्रू राष्ट्राबरोबर होणाऱ्या अखड तहातील एक भाग समजण्यांत यावा अशी मळ कल्पना होती, परतु बाकीच्या राष्ट्राच्या तहाना अपेक्षेपेक्षा अधिक विलब लागल्यामुळे, हा जर्मनीबरोबर झालेला एकच तह 'व्हर्सायचा तह' या नांवानें ओळखण्यात येऊ लागला.

ऑक्टोबर आणि नोव्हेंबर १९१८ मध्यें अमेरिकेचे प्रे. विल्सन आणि जर्मन सरकार याच्या दरम्यान पत्रव्यवहार चालू होता व त्यांत प्रे. विल्सन यांनीं आपल्या ता. ८ जानेवारी १९१८ च्या भाषणात नमूद केलेल्या १४ मुद्याच्या आधारावर तह करण्यांत यावा अशी दोस्त व सहाय्यक राष्ट्राची ( फ्रान्स, इग्लड, इटली व अमेरिका ) भूमिका होती. फक्त, त्या चौदा मुद्यातील सागराच्या स्वातत्र्याचा मुद्दा वगळण्यात यावा आणि नुकसान भरपाई बद्दलची व्याख्या त्यात नमूद करण्यांत यावी असें त्यांचें म्हणणें होतें. या अटींना जर्मनीनें प्रत्यक्ष मान्यता दिली नाहीं तरी मार्शल फॉक यांच्या बरोबर युद्धतहकुबीचें बोलणें सुरू करून पर्यायानें मान्यता दिली होती. प्रे. विल्सन याचीं १४ तत्त्वें बधनकारक स्वरूपाचीं आहेत याबद्दल जर्मनी आणि दोस्त राष्ट्रे याच्यामध्यें वाद नव्हता. वाद होता तो फक्त त्या मुद्याच्या अर्थाबद्दलचा होता.

शेवटीं पारिस येथील शांतता परिषदेच्या वाटाघाटींतून हा १५ विभागांचा आणि ४४० पेक्षा अधिक कलमाचा तहनामा निर्माण झाला. अलिकडील तहामध्यें अत्यत मोठा व्यापक आणि गुंतागुतीचा असा हा तहनामा आहे, असें म्हणता येईल.

तहाचा पहिला भाग व त्यातील २६ कलमे राष्ट्रसघाची घटना निर्माण करून त्याला मान्यता देणारीं आहेत. ह्या कॉव्हेनटनें निर्माण केलेल्या संघाच्या सभासद राष्ट्राचें स्वातंत्र्य आणि शाश्वती ह्या संबधीची हमी घेण्यांत आली आहे. या

संघांत जर्मनीला प्रवेश देण्यास त्यावेळीं उत्तेजन देण्यांत आलें नाहीं व म्हणून १९२५ मध्ये लोकार्नोचा तह होऊन त्याला १९२६ मध्यें मान्यता मिळेपर्यंत जर्मनीस राष्ट्रसंघांत प्रवेश मिळविणें शक्य झालें नाहीं.

राष्ट्रसंघाला दिलेले सर्वांत मोठे अधिकार ( कलम २२ ) विश्वस्त प्रदेशावर देखरेख ठेवण्यासंबंधीचे आहेत. या कलमान्वये जर्मन वसाहती निरनिराळया राष्ट्रांच्या देखरेखीखालीं विश्वस्त या नात्यानें गेल्यानंतर त्यांच्या राज्यकारभारावर देखरेख ठेवण्याकरितां परमनंट मॅंडेटस कमिशनची योजना करण्यांत आली. या कमिशनची नेमणूक राष्ट्रसंघाकडून होत असे व ज्या राष्ट्रांच्या स्वाधीन विश्वस्त प्रदेश करण्यात आला असेल, त्यांच्या कारभारासंबंधीच्या वार्षिक अहवालाची पहाणी करण्यात येत असे.

याप्रमाणेंच धार्मिक व वर्णविषयक अल्पसंख्याकासंबंधीच्या तहनाम्यावरहि राष्ट्रसंघाची देखरेख ठेवण्याची तरतूद तहनाम्यामध्ये केली आहे; ती मॅंडेटस इतकी परिणामकारक झालेली नाहीं. या तहनाम्यांत केलेल्या शस्त्रसंन्यासाच्या योजनेवरील देखरेखीची शेवटची व्यवस्थाहि राष्ट्रसंघाच्याच हातात देण्यात आली असून, ही व्यवस्था अमलांत आणतांना, दोस्त राष्ट्रांनीं आपसातील आरमारी व लष्करी कमिशन्स रद्द केलें आणि १९२५ च्या अखेरीस सर्व व्यवस्था राष्ट्रसंघाकडे सोंपविली.

कलम २३ मध्ये कामगारविषयक प्रश्नावर अंतरराष्ट्रीय सहकार्याची तरतूद करण्यांत आली असून, कामगारासंबंधींच्या इतर प्रश्नाविषयींचीं कलमें पुढे १३ व्या भागामध्यें नमूद करण्यात आलीं आहेत.

कलम २५ मध्यें आरोग्य रोगराई, साथी वगैरेच्या बाबतींत आंतरराष्ट्रीय ताबा रहाण्यासंबंधींची व्यवस्था असून, ह्या कलमाच्या अमलबजावणीची व्याप्ति मात्र नंतरच्या काळांत बरीच वाढविण्यात आली आहे.

राष्ट्रसंघासंबंधींचीं अगदीं बंधनकारक अशीं कलमें तहनाम्यामध्यें १२ ते १६ हीं आहेत. या कलमान्वयें सभासदांनीं तीन महिन्यांचा लवाद किंवा कौन्सिलकडून चौकशी झाल्याखेरीज कॉव्हेनंटस न जुमानतां लढाईवर जावयाचें नाहीं असें मान्य केलें आहे. कलम ८ अन्वये राष्ट्रीय शस्त्रबळ कमी करण्याच्या बाबतींत राष्ट्रसंघानें योजना तयार करावयाची आणि १९२६ सालीं भरणाऱ्या शस्त्रसंन्यास परिषदेमध्ये या योजनाचा प्रामुख्यानें विचार व्हावा अशी तरतूद केलेली आहे.

राष्ट्रसंघाच्या घटनेसंबंधीं तहनाम्यामध्ये जीं कलमें आहेत, त्या कलमान्वयें नऊ सभासदाचें एक कौन्सिल स्थापन करण्यांत आलें असून, त्यांत फ्रान्स, ब्रिटन, इटली, जपान व अमेरिका हे आवश्यक सभासद होते; परंतु अमेरिकेनें सभासद होण्याचें नाकारलें, तेव्हां शिल्लक राहिलेल्या चार जागा ऐवजीं पाच जागा लहान राष्ट्राना देण्यांत आल्या व त्याची निवड राष्ट्रसंघाच्या असेंब्लीने करावी असे ठरलें. असेंब्लीमध्यें सर्व सभासद राष्ट्रांचे प्रतिनिधी असून, ही असेंब्ली म्हणजे दरसाल भरणारे आतरराष्ट्रीय पार्लमेंट आहे.

राष्ट्रसंघाशीं संबंध असलेल्या व घटनेच्या दृष्टीनें स्वतंत्र अशा या तहानें निर्माण केलेल्या दोन संस्था म्हणजे परमनंट कोर्ट ऑफ इंटरनॅशनल जस्टिस (क. १४) व इंटरनॅशनल लेबर ऑफीस आणि त्याची वार्षिक परिषद (क. २३ २४) या होत.

याखेरीज पुढील कांहीं कलमांखालीं सारचें बेसिन व डँझिगचें स्वतंत्र शहर यांचा राज्यकारभार चालविण्याचा अधिकारहि राष्ट्रसंघाकडे देण्यात आला.

भाग २ व ३ मध्ये देशाची फेरविभागणी आणि सरहद्दीची पुनर्रचना करण्यात आली आहे. लढाईचा परिणाम म्हणून जर्मनीला आपला दक्षिण, उत्तर व पूर्वेकडील प्रदेश गमावावा लागला आणि त्याखेरीज या तहनाम्यान्वये केलेल्या इतर व्यवस्थेमध्ये जर्मनीचें वर्चस्व आपल्या स्वतःच्या हद्दीबाहेर अगदी कमी करण्यांत आले. उदाहरणार्थ ३१ व्या कलमान्वयें बेल्जमची तटस्थता संपुष्टात आणण्यांत आली आणि त्यानंतर बेल्जमने फ्रान्सबरोबर लष्करी सहकार्याचा तहनामा केला. शिवाय मोरेस्नेट, यूपेन व मालमेडी हे जर्मन सरहद्दीवरील जिल्हे जर्मनीकडून बेल्जमला मिळाले. ( कलम ३२–३४ ) लक्झेंबर्गचीहि तटस्थता नाहीशी झाली (क. ४०–४१) आणि त्यानें बेल्जमबरोबर आर्थिक संघटनेचा करार केला. कलम ४२ ते ४४ अन्वये ऱ्हाइन नदीचा संबंध डावा किनारा व ऱ्हाइनच्या पूर्वेस ५० किलोमीटरपासून काढलेल्या सरळ रेषेच्या पश्चिमेकडे असलेला नदीचा उजवा किनारा हा संबंध भाग कायमचा बिनलष्करी प्रदेश म्हणून जाहीर करण्यात आला. या सर्व भागातील तटबंदी व कोट किल्ले मोडून टाकावयाचे व लष्करी हालचालीसाठीं कोणतेहि कायमचें बांधकाम या भागांत करू द्यावयाचें नाहीं असेहि नमूद करण्यांत आलें.

(क ४५–५०) सार बेसिनचा भाग सबंध आंतरराष्ट्रीय कमिशनच्या व राष्ट्रसंघाच्या देखरेखीखालीं देण्यांत आला आणि त्या भागातील कोळशाच्या खाणी फ्रान्सला देण्यांत आल्या. त्याचप्रमाणें असेहि नमूद करण्यांत आलें कीं, १५ वर्षा-नंतर (अ) प्रस्तुत आंतरराष्ट्रीय कारभार कायम रहावा, कीं (ब) फ्रान्सला जोडण्यांत यावें किंवा (क) जर्मनीला जोडण्यांत यावें, या प्रश्नावर तेथील रहिवाश्यांचीं मतें घेण्यांत यावीं. याखेरीज अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे कलम ५१ ते ७९ अन्वये जर्मनीनें अल्सेस आणि लॉरेन हे प्रांत फ्रान्सच्या हवालीं केले. अशा रीतीनें फ्रान्सला सुमारें २,०००,००० प्रजाजन, बरींच लष्करी महत्त्वाचीं ठाणी, जर्मनीं-तील तीन चतुर्थांशपेक्षा अधिक लोखंड व इतर बहुमोल खनिज पदार्थ याची प्राप्ती झाली.

उत्तर सरहद्द—उत्तरेकडे (क. ११५) हेलिगोलॅंडची तटबंदी पाडून टाकण्याला आणि तो प्रदेश बिनलष्करी करण्याला जर्मनीनें संमति दिली; परंतु त्या भागावरील राज्यकारभाराचें सार्वभौमत्व आपल्याकडेच ठेवलें. श्लेस्विगचा उत्तरेकडील भाग जर्मनीला डेन्मार्कच्या हातात द्यावा लागला. कलम १०९ ते ११४ अन्वयें या प्रदेशाच्या दोन भागात लोकमत घेण्यात यावें असें ठरलें होते. त्याप्रमाणें उत्तरे-कडील भागाचें डेन्मार्कमध्ये सामील होण्याला बहुमत मिळालें आणि दक्षिणेकडील किंवा फ्लेन्सबर्ग विभागानें जर्मनींत रहाण्याला अनुमती दिली (श्लेस्विगमधील या लोकमत नोंदणीचें आश्वासन १८६६ सालीं बिस्मार्क यानी डेन्मार्कला दिले होते. पण ते यापूर्वी कधीच पूर्ण केलें गेलें नव्हतें.)

पूर्व सरहद्द—कलम ८७ ते ९३ अन्वयें अप्पर सायलेसियामध्ये लोकमत घेण्याची तरतूद करण्यात आली होती. हें लोकमत १९२१ सालीं घेण्यात आलें व त्याचा परिणाम असा झाला कीं, महत्त्वाच्या खाणी वगैरे असलेला दक्षिणेकडील अर्धा भाग पोलंडला गेला आणि वरील अर्धा भाग जर्मनीकडे परत गेला. अशीच मतनोंदणी पूर्व प्रशियामध्ये ॲलेन्स्टीन व मेरियन वर्डर जिल्ह्यामध्ये करावयाचें ठरलें होतें. त्या दोन्ही ठिकाणच्या मतनोंदणीचा निकाल जर्मनीला अनुकूल झाला. या सर्व योजनेनंतर आखलेल्या सरहद्दीच्या रेषेप्रमाणें, पोसेन आणि ब्रॉबर्ग याचे बरेच मोठे विभाग नव्या पोलिश रिपब्लिककडे गेले. त्या खेरीज पूर्व प्रशिया व ब्रॅंडेन्बर्ग याच्या दरम्यान समुद्रापर्यंत जाणारा पोलिश कॉरिडर तयार झाला असून,

तो डँझिगच्या स्वतंत्र शहरापर्यंत गेला आहे. डँझिगच्या स्वतंत्र शहराचा कारभार राष्ट्रसंघाच्या हातांत असून, त्याच्या परराष्ट्रीय धोरणावरील नियंत्रण पोलंडकडे आहे. याशिवाय मेमेल शहर आणि त्याच्या मागील प्रदेश प्रमुख दोस्तांकडे सोपविण्यात आला आणि त्यानीं तो १९२४ सालीं लिथुआनियाला दिला. जर्मनींत रहात असलेले सुमारें ३५ लाख लोक अशारीतीनें पूर्वेकडे पोलंड किंवा लिथुआनियाकडे गेले असून, त्यापैकीं एकतृतीयांशापेक्षां कमी जर्मन नागरिक आहेत. या तहान्वयें एकदर जर्मन सत्तेमधून इतर राष्ट्रांकडे गेलेल्या रहिवाश्यांची संख्या ६० लक्षापेक्षां फारशी कमी नाहीं. आणि जर्मनीचें लोखड व इतर खनिज पदार्थांत जे नुकसान झालें, त्याच्या मानानें लोकसंख्येचें हे नुकसान कमीच दिसतें.

भाग ४—जर्मनीचे जर्मनीबाहेरील हक्क आणि हितसंबध—कलम ११९ ते १२७ अन्वयें जर्मनीनें आपल्या समुद्रापलिकडील सर्व वसाहती प्रमुख दोस्त राष्ट्राच्या हवाली केल्या. अशारीतीनें गमावलेल्या वसाहतींपैकीं आफ्रिकेतील कॅमेरूून्स हे फ्रान्स व ब्रिटिश साम्राज्य यांच्या दरम्यान मँडेटरीज म्हणून विभागण्यांत आलें, टोगोलँड हें ग्रेटब्रिटनला मॅडेटरी म्हणून देण्यांत आलें, साऊथवेस्ट आफ्रिका हा साऊथ आफ्रिकेच्या युनियनकडे मॅडेटरी म्हणून देण्यात आला, व पूर्व आफ्रिका हा ब्रिटन व बेल्जम यांना मॅडेटरी म्हणून देण्यांत आला. ह्या सर्व प्रदेशामध्ये मिळून सुमारें १८ हजार जर्मन व सुमारे १२० ते १३० लाख तद्देशीय रहिवासी होते. पॅसिफिक महासागरांतील मार्शल आइल्स जर्मनीकडून काढून घेऊन जपानला मँडेटरी म्हणून देण्यांत आलें, सॅमोवा हें न्यूझिलडकडे मॅडेटरी म्हणून गेलें व न्यूगिनी ऑस्ट्रेलियाकडे मॅंडेटरी म्हणून देण्यांत आलें. नॉरो आयलंड ब्रिटिश साम्राज्याकडे मॅडेटरी म्हणून आलें. चीनचें भुशीर असलेल्या शाटुंग प्रांतावरील हक्क जर्मनीनें कलम १५६ ते १५८ अन्वयें जपानकडे दिला आणि जपाननें तो प्रांत १९२१ सालीं चीनला परत केला. हे सर्व प्रदेश वरील तहनाम्यान्वये जर्मनीनें गमावलेच, पण त्याखेरीज या सर्व वसाहतींतील आपल्या राज्यकरभारातील सर्व स्थावर आणि जंगम मालमत्ताहि गमवावी लागली. चीन, लिबेरिया, सयाम, ईजिप्त, मोरोक्को वगैरे देशांबरोबर तहनाम्यान्वयें जे हक्क प्रस्थापित केले होते व ज्या सवलती मिळविल्या होत्या, त्या सर्वांवर पाणी सोडावें लागलें. थोडक्यांत म्हणजे समुद्रापलिकडे जर्मनीचे जे हक्क, जी सत्ता, मालमत्ता वगैरे होती, तें सर्व नामशेष करून टाकण्यांत आलें.

पुढें दिलेल्या कलम ४३८ प्रमाणें जर्मन मिशनऱ्यांची मालमत्ता व त्यांचीं केंद्रें हीं सुद्धा ट्रस्टींच्या स्वाधीन करावी लागलीं आणि वैयक्तिक जर्मन मिशनऱ्यांवर नियत्रण टाकण्याचा किंवा हद्दपार करण्याचा अधिकार मॅंडेटरी राष्ट्रांना देण्यात आला.

भाग ५——लष्कर, आरमार आणि विमानविषयक कलमे–ह्या भागातील सर्व कलमांचा उद्देश एकच म्हणजे जर्मन तटबंदी व युद्ध–सामुग्री नष्ट करण्याचा आणि जर्मनीला शस्त्रबलाच्या बाबतींत कायमचा अधू आणि दुच्ची करून ठेवण्याचा होता. जर्मन लष्कराची जास्तींत जास्त मर्यादा एक लाखाची ठरविण्यात आली व त्याचप्रमाणांत दारूगोळा, बंदुका, तोफा वगैरेंचा सांठा मर्यादित करण्यात आला. ह्या प्रमाणाबाहेर असलेला सर्व दारूगोळा जर्मनीनें दोस्ताच्या स्वाधीन केला पाहिजे आणि नष्ट केला पाहिजे व यापुढे दारूगोळयाची पैदास मर्यादित आणि नियंत्रित झाली पाहिजे असें ठरलें. सक्तीची लष्करभरती बंद करण्याला जर्मनीनें कबूली दिली आणि त्याऐवजीं दीर्घ–मुदतीच्या खुषीची लष्करभरतीची योजना स्वीकारण्यात आली. त्यात सैनिकांसाठीं १२ वर्षांची आणि अधिकाऱ्यासाठीं २५ वर्षांची मुदत नमूद करण्यांत आली. सैन्याबाहेरील लष्करी शिक्षणाला अजिबात बंदी करण्यांत आली आणि मोठया प्रमाणांत जनरल स्टाफ ठेवण्यालाहि प्रतिबंध करण्यांत आला.

आरमारी कलमेंसुद्धां अशीच कडक होतीं. जर्मन आरमारामध्ये एकदर 'ड्यूश-लॅंड' नमुन्याचीं सहा लढाऊ जहाजे, ६ हलक्या क्रूझर्स, १२ विनाशिका व १२ टार्पेडो बोटी (कलम १८१) याच्याखेरीज अधिक बोटी असूं नयेत असे ठरलें. म्हणजे जर्मनीला फक्त आपल्या किनाऱ्याचें संरक्षण करण्यापुरतेंच आरमार ठेवण्याची सवलत देण्यात आली. पाणबुडया बोटी ठेवण्याला मात्र अजिबात बंदी करण्यात आली. जुन्या बोटी रद्द करून नव्या बांधतांनासुद्धा १० हजार टनापेक्षा अधिक वजनाच्या बोटी बांधू नयेत असे बंधन घातलें आणि लष्कराप्रमाणेंच आरमारामध्येंहि लांबमुदतीच्या व स्वखुषीच्या सैनिकभरतीची योजना ठरविण्यात आली. किनाऱ्यापासून ५० किलोमीटर अंतरापर्यंतच्या हद्दीत असलेलें सर्व आरमारी बांधकाम आणि तटबंदी पाडून टाकण्याचा आग्रह धरण्यात आला. तहनाम्यातील वैमानिक दलाविषयींच्या अटी (कलम १९८ ते २०२) तर अतिशय कडक होत्या. या कलमान्वये आरमारी अगर लष्करी वैमानिक दलाला अजिबात बंदी

करण्यात आली आणि सर्व आरमारी व लष्करी वैमानिक दलाची सामग्री नष्ट करण्याची व्यवस्था करण्यांत आली. ह्या सर्व लढाऊ साधनाच्या बाबतींतील कलमाच्या अमलबजावणीसाठीं नियंत्रण ठेवण्याकरिता दोस्त राष्ट्रांचें एक कमिशन नेमण्यात अलें व त्या कमिशनचें काम १९२५ सालीं पूर्ण झालें. पण त्यानतर सुद्धा जर्मनीच्या शस्त्रास्त्र बलावर राष्ट्रसघाची देखरेख आणि नियंत्रण चालूच होते

भाग ६ —लढाईतील कैदी आणि थडगीं हा भाग सर्व तहनाम्याप्रमाणेंच सर्व सामान्य असून, त्यांत लढाईतील कैदी एकमेकांकडे परत पाठविण्यासाठीं आणि मृत सैनिकाच्या थडग्याची निगा राखण्यासबधीं व्यवस्थेबद्दलची कलमे आहेत.

भाग ७–शासन आणि दंड सबध तहनाम्यातील हा एक अतिशय वादग्रस्त भाग असून, शिवाय तो अजिबात अमलबजावणी न होतां तसाच राहिला आहे. या भागातील कलम २२७ अन्वये 'जर्मनीचे माजी बादशहा' दुसरे विल्यम याच्यावर 'आतरराष्ट्रीय नीतिमत्तेविरुद्ध आणि तहनाम्याच्या पावित्र्याविरुद्ध अतिशय मोठा गुन्हा' केल्याबद्दल खटला भरण्याची तरतूद केली आहे. प्रमुख दोस्त राष्ट्रांनीं प्रत्येकी एक या प्रमाणें नेमलेल्या पांच सभासदांच्या आतरराष्ट्रीय ट्रिब्यूनलपुढे या वरिष्ठ गुन्हेगाराचा खटला चालावयाचा होता. मात्र खटला चालविण्याची पद्धत आणि द्यावयाच्या शिक्षेचें स्वरूप या बाबतींत अनिश्चितता स्वीकारण्यांत आली होती. तथापि माजी कैसर हे नेदरलँड सरकारच्या आश्रयाला गेले होते व दोस्त राष्ट्रांनीं नेदरलँड सरकारला विनंती केली असतांना सुद्धा नेदरलँडनें त्यांना त्याच्या स्वाधीन करण्याचें नाकारलें म्हणून या योजनेची अमलबजावणी होऊ शकली नाहीं.

कलम २२८ ते २३० मध्ये 'लढाईचे कायदे व वहिवाट मोडलेल्या' जर्मनाविरुद्ध दोस्त राष्ट्रांच्या ट्रिब्यूनलपुढें खटले चालविण्याची तरतूद केलेली होती. त्याला अनुसरून अशा सुमारें १०० गुन्हेगाराची यादी तयार करण्यांत आली व त्या सर्वांना जर्मनीच्या बाहेर दोस्तांच्या स्वाधीन करण्याबद्दल जर्मनीकडे मागणी करण्यांत आली. शेवटीं स्वतः जर्मनीनेंच त्याच्यापैकीं १०–१२ लोकांवर आपल्या देशांत खटले भरले आणि त्यापैकीं फारच थोडयांना जरी शिक्षा झाली तरी लढाई केल्याखेरीज त्या लोकांना जर्मन हद्दीच्या बाहेर काढणें शक्य नाहीं असें दिसून आलें तेव्हां दोस्त राष्ट्राच्या सरकारानीं त्याचा नाद सोडून देण्याचें ठरविलें. इतकेच नव्हे तर 'लढाईतील या गुन्हेगारां' पैकींच एक फील्ड मार्शल हिंडेनबुर्ग

यांची जर्मन रिपब्लिकच्या अध्यक्षपदावर १९२५ सालीं निवड झाली तेव्हां दोस्त राष्ट्रांनीं औपचारिक शाब्दिक निषेध सुद्धा केला नाहीं.

भाग ८–खंडणी आणि नुकसान भरपाई–संबंध तहनाम्यातील हा एक महत्त्वाचा भाग असून, बाहेरील लोकमताचा सर्वांत अधिक परिणाम या भागाचीं कलमें तयार करताना झाला होता. या कलमाखालीं मागण्यात आलेल्या रकमांना, प्रे. विल्सन याच्या उदात्त तत्त्वांना मान देऊन 'खंडणी' न म्हणतां 'नुकसान भरपाई' म्हणण्यात आलें. पण नाव कोणतेंहि दिलें तरी याहून अधिक रकमेची मागणी करता येणें अशक्य होतें. या भागातील नुकसानभरपाईबद्दलचें पहिलें म्हणजे २३१ वें कलम सुप्रसिद्ध असून तें पुढीलप्रमाणें आहे:—

" दोस्त आणि सहकारी राष्ट्रें जाहीर करीत आहेत आणि जर्मनी मान्य करीत आहे कीं, जर्मनी आणि तिचीं दोस्त राष्ट्रें यानीं दोस्त राष्ट्रें आणि त्याचीं सहकारीं राष्ट्रें यांच्यावर चढाई करून लढाई ओढवून आणली व त्यामुळे दोस्त व सहकारी राष्ट्रें आणि त्याचे प्रजाजन याना सर्व प्रकारचें नुकसान आणि प्राणहानि सहन करावी लागली. "

हे कलम एकच विचारात घेतलें तर त्यांत जर्मनीनें आपल्या जबाबदारीबद्दल औपचारिक रीतीनें दिलेल्या मान्यतेखेरीज अधिक अर्थ काहीं निघणार नाहीं. परंतु दोस्त राष्ट्रांनीं जर्मनीला ता. १६ जून रोजीं जे पत्र पाठविलें त्याच्या संदर्भानें हे कलम वाचलें पाहिजे. त्या पत्रात दोस्त राष्ट्रांनीं प्रे. विल्सन यांचीं तत्त्वें बंधनकारक मानलीं असून, ह्या तहनाम्याचा एकत्रित स्वरूपातील अर्थच लक्षात घेतला पाहिजे असें म्हटलें आहे व विशेषत: त्या दृष्टीनें २३१ वें कलम हे जर्मनीची लढाईबद्दलची गुन्हेगारी निश्चित करणारें आहे असें त्यांचें मत होतें. कलम २३२ मध्यें ज्या नुकसानीबद्दल जर्मनीला जबाबदार धरावयाचें त्याची एक यादी दिलेली असून, त्यात मुलकी अधिकाऱ्यांच्या पेन्शनचाहि समावेश केलेला होता.

आठव्या भागातील इतर कलमें खंडणी व नुकसानभरपाई वसूल करण्या बद्दलच्या योजनेसंबंधीचीं असून, त्यासाठीं एक रेपरेशन्स कमिशन नेमण्यात येऊन त्याला व्यापक अधिकार देण्यात आले. हे कमिशन नेमण्यामध्ये मि. लॉईड जॉर्ज यांची पहिली कल्पना, जर्मनीची अखेरची जबाबदारी बरीच कमी झाली तर पहावी अशी होती, असें दिसतें. परंतु कमिशनवर अमेरिकेचे प्रतिनिधी नव्हते, फ्रेंचाचें वर्चस्व होतें आणि इंग्लंडातील लोकमतहि जर्मनीला सवलत देण्याच्या

विरुद्ध होतें, त्यामुळें ही कल्पना अमलांत येऊं शकली नाहीं. तथापि एवढे खरें कीं, खडणी वसुलीच्या बाबतींत अंमलबजावणीच्या वेळीं जर्मनीला अनुकूल असे बरेच फेरबदल झाले. मि. केन्स यांचा त्यावेळीं असा अदाज होता कीं, जर्मनीकडून जास्तींत जास्त २०० कोटि पौंडाची रक्कम काढता येईल. हा अदाज पुढें कमालीचा म्हणून ३०० ते ४०० कोटि पौंडापर्यंत गेला. पुढे १९२४ मध्यें डॉवेस योजना अमलात आल्यानंतर तहनाम्यातील खडणी सबधीचीं कलमें रद्द झालीं त्याप्रमाणें रेपरेशन्स कमिशनचें कामहि सपलें.

२३६ वें कलम व त्याला जोडलेलीं परिशिष्टे यांच्यामध्यें जर्मनीनें जिनसांच्या रूपानें द्यावयाच्या नुकसानभरपाईची योजना असून, ती अधिक भक्कम पायावर होती. इतर जिनसाप्रमाणें, जर्मन बोटींनीं दोस्त राष्ट्रांचीं जेवढीं व ज्या वजनाचीं जहाजे बुडविलीं असतील तेवढीं आणि त्या वजनाचीं भरून देण्याची तरतूद होती. या व्यवस्थेमुळे ग्रेटब्रिटनचा सर्वांत अधिक फायदा झाला. कोळसा वगैरे जिनसाच्या बाबतींत फ्रान्सचा आणि जनावरें मिळाल्यामुळे बेल्जमचा फायदा झाला.

भाग ९—पैशाच्या देवघेवीसबधीं कलमें—या भागामध्यें मुख्यतः खास कर्जाचीं देणीं वगैरे कशीं आणि कोणत्या क्रमानें आणि कोणत्या रकमेतून फेडावयाचीं यासबधाचीं कलमें असून, शिवाय चलन वगैरे सबधीच्या प्रश्नाचाहि त्यात विचार केला आहे.

भाग १०—आर्थिक कलमें—ह्या भागाचे पोट विभाग असून, पहिल्या पोट-विभागात असलेल्या २६४ ते २७५ कलमामध्ये परस्पर व्यापारी सबध, नौकानयन, अयोग्य चढाओढ, व्यापारी तहनामे याचा विचार करण्यांत आला आहे. या वाटाघाटींच्या वेळीं नद्या, कालवें, वहातुकीचीं साधनें वगैरे राष्ट्रीय मालकीचीं करण्याबद्दल चर्चा झाली, इतकेंच नव्हे तर कच्च्या मालावर जगांत कोठेहि जकात बसविण्यात येऊ नये असेंहि सुचविण्यात आलें होते. पण शेवटीं व्यवहारात दोस्त राष्ट्रांना फायदा एवढाच मिळाला कीं, जर्मनीनें पाच वर्षेपर्यंत या राष्ट्रांना अत्यत सवलतीनें वागविण्याचें कबूल केलें व त्याप्रमाणें असलेल्या व्यापारी तहनाम्यामध्यें जरूर ते फेरबदल करण्यांत आले.

पोट विभाग तीन ते आठ यामध्ये २९६ ते ३११ कलमें असून, त्यांत शत्रूच्या मालमत्तेवरील ताबा, कर्ज, देवघेवीचे करार वगैरे वरील नियंत्रण वगैरे सबधीं तरतूद करण्यात आली आहे. परदेशांतील जर्मन रहिवाश्याच्या मालमत्तेच्या बाबतींत, असें तत्त्व स्वीकारण्यांत आलें कीं, दोस्त राष्ट्राच्या हद्दींत असलेल्या जर्मनाची मालमत्ता जप्त करून तिची जी रक्कम येईल ती खंडणीखातीं जम-

करावयाचीं. या कलमाप्रमाणें दिलेल्या अधिकाराचा फ्रान्सनें पूर्णपणें उपयोग केला व ब्रिटननें कांहीं अंशीं केला. परंतु दक्षिण आफ्रिकेसारख्या कांहीं देशांनीं बिलकूल केला नाहीं.

भाग ११ वैमानिक वहातूक—या भागांतील कलमान्वये दोस्त राष्ट्रांच्या विमानांना जर्मनीवरून उड्डाण करण्याला ता. १ जानेवारी १९२३ पर्यंत पूर्णपणें मोकळीक देण्यात आली.

भाग १२ बंदर, कालवे आणि रेल्वे—ह्या विभागांत तांत्रिक स्वरूपाचीं कलमें बरींच असलीं तरी तीं महत्वाचीं आहेत. या कलमाचा मुख्य उद्देश एकापेक्षा अधिक देशांतून वहाणाऱ्या नद्यांवर आंतरराष्ट्रीय ताबा प्रस्थापित करण्याचा होता. हे तत्त्व १८१५ मध्यें व्हिएन्ना येथें मान्य केलेल्या तत्त्वाच्या विरुद्ध होते, तरी यांतील मुख्य उद्देश स्वित्झर्लंड, झेकोस्लोव्हाकिया सारख्या देशांना समुद्राचा मार्ग मोकळा करून देण्याचा होता. कारण, ह्या देशांना समुद्र किनारा नसला तरी पुढे समुद्राला जाऊन मिळणाऱ्या नद्यांचा उगम या देशांमध्ये आहे. ऱ्हाईन, ओडर, एल्ब, नीमेन व डॅन्यूब या नद्यांवर ताबा ठेवण्याकरितां एक आंतरराष्ट्रीय कमिशन निर्माण करण्यात आले आणि त्याचा परिणाम असा झाला कीं, ऱ्हाईन, ओडर व एल्ब या जर्मन नद्या म्हणून समजल्या जात असतानासुद्धा त्यांच्यावरील जर्मनीचे वर्चस्व कमी झालें. कील कालव्याचा कारभार जर्मनीच्याच हातात राहिलेला असला तरी शांततेच्या अगर लढाईच्या काळात सुद्धा कोणत्याहि देशाच्या बोटीला या कालव्यात येण्याजाण्याची मोकळीक मिळाली पाहिजे अशी व्यवस्था करण्यात आली. हांबुर्ग आणि स्टेटिन या बंदरात कांहीं स्वतंत्र भाग आंखून देऊन झेकोस्लोव्हाकियाला समुद्राची वाट मिळवून देण्यांत आली.

भाग १३—मजूर—मजूर समाजाच्या हितसंबंधाच्या रक्षणाच्या आणि वृद्धीच्या दृष्टीनें आंतरराष्ट्रीय व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न या भागांतील कलमामध्ये दिसून येतो. मालक व कामगार यांच्या प्रतिनिधींनीं ठराविक मुदतींत एकत्र येऊन विचारविनिमय करण्याची ही व्यवस्था आहे. अमेरिकेचे मि. सॅम्युएल गॉंपर्स, इंग्लंडचे मि. जॉर्ज एन. बार्नेस व फ्रान्सचे आल्बर्ट थॉमस या तीन प्रमुख मजूर पुढाऱ्यांनीं या घटनानिर्मितीत भाग घेतला इतकेच नव्हे तर आल्बर्ट थॉमस यांची आंतरराष्ट्रीय मजूर कचेरीचे कायमचे अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. ही कचेरी जिनेवा येथेंच असली तरी ती राष्ट्रसंघाच्या कचेरीहून निराळी आहे. ह्या मजूर कचेरीसाठीं रक्कम मंजूर करण्याचा प्रश्न राष्ट्रसंघाकडे

असला तरी मजूर कचेरीच्या निरनिराळ्या घटकांवर राष्ट्रसंघाच्या कचेरीचें नियंत्रण नाहीं. मजूर कचेरीवर ताबा गव्हर्निंग बॉडीचा असून, त्यावर असलेल्या २४ प्रतिनिधींपैकीं १२ निरनिराळ्या सरकाराचे असतात आणि बाकीच्या १२ पैकीं ६ मालकाचे व ६ कामगाराचे असे परिषदेला हजर रहाणाऱ्या प्रतिनिधींनीं निवडलेले असतात; परिषद वर्षातून एकदां भरते व तिचे २०० पेक्षा अधिक सभासद आहेत. राष्ट्रसंघाच्या प्रत्येक प्रतिनिधि-राष्ट्राला चार प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार असून, त्यांपैकीं दोघे सरकारचे, एक मालकांचा व एक त्या देशातील कामगारांचा असतो.

भाग १४–हमी–यापूर्वीच्या लष्करी कलमांमध्ये ऱ्हाईनच्या डाव्या किनाऱ्याधरून लष्कर काढून घेण्याची तरतूद करण्यात आलेलीच होती. त्याच्या जोडीला या भागांतील कलम ४२८ अन्वये हा बिनलष्करी झालेला भाग दोस्त राष्ट्राच्या सैन्यानीं आपल्या ताब्यांत ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली. ह्याप्रमाणें हा सर्व भाग त्याचप्रमाणें ऱ्हाईन नदीवरील पूल, तहनाम्यावर सह्या झाल्या दिवसापासून ( ता. १० जानेवारी १९२० ) १५ वर्षेपर्यंत दोस्त सैन्याच्या ताब्यांत राहावयाचा होता. त्याबरोबर कलम ४२९ प्रमाणें अशीहि तरतूद केली आहे कीं, पहिल्या पाच वर्षाच्या शेवटीं कोलन भागातून सैन्य काढून घेण्यात यावें, १० वर्षाच्या शेवटीं कॉब्लेंझ भागातून व १५ वर्षाच्या शेवटीं मेंझ भागातून सैन्य काढून घेण्यात यावें. जर्मनी तहनाम्याच्या शर्ती व अटी समाधानकारक रीतीनें पाळीत असल्याचें आढळून आलें तरच हें सैन्य काढून घ्यावयाचें होते. यासबंधींच्याच वादामुळे कोलन खालीं करण्याची मुदत जानेवारी १९२५ ची होती ती डिसेंबर १९२५ पर्यंत पुढे ढकलण्यात आली होती.

जर्मनीची पूर्वेकडील सरहद्द निश्चित केल्यानंतर ती कायम राखण्याची हमी म्हणून कलम ४३३ अन्वयें, ब्रेस्टलिटोव्हस्क येथें सोव्हिएट रशिया आणि जर्मनी यांच्या दरम्यान झालेला तह रद्द करण्यात आला आणि जर्मनीच्या ठरलेल्या हद्दीपलिकडील सर्व जर्मन सैनिकानी तो भाग खालीं करावा असें नमूद करण्यात आलें.

भाग १५—ह्या भागात बरींच किरकोळ आणि तांत्रिक स्वरूपाचीं कलमें असून, वरील भागातून राहून गेलेल्या कांहीं लहान सहान मुद्याचा त्यांत समावेश करण्यांत आला आहे.

**पांचवा भाग समाप्त**

विक्रीस तयार ! विक्रीस तयार !

# खाडिलकरांचा रुद्र

( लेखकः—श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर )

श्री. काकासाहेब खाडिलकरांचा हा ग्रंथ म्हणजे त्यांनी रुद्राचें आणि वैदिक वाङ्मयाचें जे भक्तिपूर्वक मनन चिंतन गेलीं सुमारें १० वर्षे चालविलें होतें त्या तपश्चर्येचें सुफल आहे. रुद्रातील मंत्राचें विवेचन करतांना श्री. काकासाहेबांनीं अभिनव अशी दृष्टी वापरली असून रुद्र अर्वाचीन पेहेरावात त्यांनीं वाचकापुढे ठेवला असल्यामुळे 'खाडिलकरांचा रुद्र' हे ग्रंथाचें नांव सर्वतोपरी सार्थ ठरत आहे. ह्या ग्रंथात श्री. काकासाहेबांचीं रुद्रावरील प्रवचनें दिलीं आहेत आणि नित्य-पठणासाठीं त्याचप्रमाणें नित्य अध्ययनासाठीं या ग्रंथाचा उपयोग व्हावा म्हणून ह्या ग्रंथात रुद्राचे मंत्र व त्यांचा अर्थ ठळक टाइपात दिला असून मंत्राचे स्वरहि दिले आहेत. मंत्रावर सविस्तर टीपाहि दिल्या आहेत.

ग्रंथाची किंमत एक रुपया आहे. ट. ह. निराळा.

**मॅनेजर—नवा काळ, गिरगाव मुंबई.**

**चित्रशाळा दुकान—पुणें व मुंबई.**

**परचुरे पुराणिक आणि मण्डळी, मुंबई ४.**

## आमच्याकडे मिळणारी पुस्तकें

# श्री. कृ. प्र. खाडिलकरांचीं नाटकें

**संगीतमाला.**

बायकांचें बंड— कि. ०।१२ आणे.
सावित्री— कि. ०।१२ आणे.
मेनका— कि. ०।१२ आणे.
द्रौपदी— कि. ०।१२ आणे.
स्वयंवर— कि. ०।१२ आणे.
विद्याहरण— कि. ०।१२ आणे.
मानापमान— कि. ०।१२ आणे.

**गद्यमाला.**

कीचक वध— कि. ०।१२ आणे.
कांचनगडची मोहना— कि. ०।१२ आणे.
सवाई माधवराव— यांचा मृत्यु— कि. ०।१२ आणे
भाऊबंदकी— कि. ०।१२ आणे
प्रेमध्वज— कि. ०।१२ आणे
सत्त्वपरीक्षा— कि. ०।१२ आणे
सवतीमत्सर— कि. ०।१२ आणे

श्री. य. कृ. खाडिलकरकृत कादंबऱ्या:— संसार शकट, सदानंद, आजकाल, प्रत्येकीं किंमत १॥ रुपया.

श्री. के. रा. पुरोहितकृत:—शून्यजगत्, आकाश पुष्प, प्रत्येकीं किं. २ रु.

श्री. भा. रा. धुरंधरकृत:—१० रुपयाचा चेक किंमत १॥ रुपया, गीता बोध किंमत ०।६ आणे.

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें—' नवा काळ ' ऑफीस मुंबई;
चित्रशाळा दुकान—मुंबई, व पुणें, व सर्व बुकसेलर्स.

म्यानेजर—नवा काळ, मुंबई.

# کتب خانہ

## جامعہ عثمانیہ

### قواعد انتظامی

۱۔ اراکین مجلس اعلیٰ، مجلس رفقاء، مجلس انتظامی
ایک وقت میں پانچ کتابیں ایک ماہ کیلئے اپنے پاس رکھ سکینگے۔ مع
جماعت شعبہ جات و نصاب پانچ کتابیں [illegible] عہدہ داران جا
۲۔ اساتذہ جامعہ عثمانیہ و کلیہ جات ایک وقت میں ایک ماہ کیلئے اپنے پاس رکھ سکینگے۔ اور اسسٹنٹ
اور اراکین دارالترجمہ و [illegible] شدہ دو کتابیں بی اے، و تحقیقاتی جماعتوں سے
۳۔ طلباء میں ایم اے، ایل ایل بی و تحقیقاتی جماعتوں کیلئے ایک ہفتہ اپنے پاس رکھ سکینگے۔
کیلئے میں کتابیں ۔ جو پندرہ دن کیلئے ۔ واپس ہوں تو طلب کیجائیگی
طلباء پانچ کتابیں ۔ مقررہ میعاد پر کتابیں واپس نہ کی جائیں تو
۴۔ مدت مقررہ پر کتابیں واپس لیا جائیگا ۔ اس کے بعد جرمانہ
ایک آنہ یومیہ فی کتاب اور جاری کی گئی کا لحاظ لازم ہے۔
۵۔ بلا اجازت کتب خانہ میں کتاب لانا یا جانا ممنوع ہے اور ان پر نشان لگانا
کے لئے کتب خانہ میں کتاب ہر قسم کا نشان لگانا یا حاشیہ لکھنا ممنوع ہے
۶۔ کتابیں میں کسی قسم کا نشان لگانا سیاہی یا پنسل سے
عائد ہوگا۔
۷۔ کتابوں پر کسی قسم کا نشان لگایا جائے۔
۸۔ قلمی نسخے اور حوالے کی کتابیں
جاری نہیں کیجا سکینگی۔